
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय प्रवास
सं. क्र. ७४८

# विश्व विदेश सेवेचे

हेमा देवरे

REFBK-0026917



आदर्श भू-प्रवास
६४८
२९९१६
२६।४।९३

भू-प्रवास
६४८
२९९१६
२६।४।९३

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 JUN 1993
10 JUL 1993
17 JUL 1993
4 AUG 1993
18 AUG 1993
18 AUG 1993
6 JUN 1993

1 SEP 1993
18 SEP 1993
OCT 1993
OCT 1993
23 OCT 1993
17 NOV 1993
20 NOV 1993

२०००-११-८९

# विश्व विदेशसेवेचे

हेमा देवरे

REFBK-0026917

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक

दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

© हेमा देवरे

प्रकाशन काल प्रथमावृत्ती
१५ जानेवारी १९९३

मुखपृष्ठ · कमल शेडगे

मूल्य ७५ रुपये

मुद्रक

आनद लिमये
इडिया प्रिंटिंग वर्क्स
४२ जी डी आबेकर मार्ग
मुबई ४०० ०३१

मला चाणक्याच्या विश्वात घेऊन जाणाऱ्या राजदूतास

— हेमा

# प्रस्तावना

हेमा देवरेनी "विश्व विदेशसेवेचे" हे पुस्तक लिहून मराठी साहित्यात एक मोलाची भर घातलेली आहे. हे पुस्तक विदेश सेवेच्या एकूण विभागाबद्दल आणि त्याच्या कामगिरीबद्दल माहिती देणारे तर आहेच पण ते खरोखरच वेगवेगळ्या देशातल्या जीवनाची प्रत्यक्ष माहिती अत्यत रोचक रूपाने देणारे असे झाले आहे. हेमाच्याच शब्दात सागायचे तर "विदेशसेवा हा आपल्याकडला काहीसा कुतूहलाचा विषय राजनीति, राजदूत हे प्रातच सामान्य जनाना काहीसे अपरिचित राजनीति म्हणजे काय, राजदूताच काम काय असाव याबद्दल अनेक तर्क कुतर्क केले जातात त्याच माप हेरगिरीकडे झुकत अशीही काही जणाची कल्पना परदेशातल जीवन म्हणजे सुखलोलुपता असाहि काहींचा गोड गैरसमज, कारण परदेश म्हणजे युरोप, अमेरिका हेच डोळ्यापुढच चित्र"

अशा या चाणक्याच्या विश्वातील विदेश सेवेची माहिती भारतीयाना व विशेषकरून महाराष्ट्रातील तरूण पिढीला व्हावी ह्या उद्देशाने पहिल्या भागात हेमाने सविस्तरपणे विदेश सेवेत प्रवेश करण्यापासून तो विदेश सेवेतील वकिलातीमधील जीवन आणि

व्यवहार कसा असतो ह्याचे सविस्तर वर्णन फार रुचकर शब्दात केलेले आहे पडित जवाहरलाल नेहरू ह्यानी स्वातत्र्यानतर भारताच्या विदेश सेवा विभागाची आणि धोरणाची बैठक कशी बसविली, त्या वेळेला आपले इतर देशाशी सबध कसे होते आणि एकूणच विश्वात भारताला स्वातत्र्याच्या सुरुवातीपासून एक मानाचे स्थान मिळवून देण्याचे काम त्या वेळच्या नेतृत्वाने कसे केले ह्याचे रीतसर वर्णन हेमाने केले आहे. हे सपूर्ण वर्णन ऐतिहासिक दृष्ट्याही उपयुक्त माहिती देणारे असे झाले आहे

आपल्या विदेशातील वकिलातींना राजकीय सबधापासून तो आर्थिक, व्यापारिक आणि सास्कृतिक क्षेत्रामध्ये सुद्धा कसे काम करावे लागते आणि त्यामुळे वकिलातीचे स्वरूप कसे व्यापक होत चालले आहे याची माहिती देत असताना राजदूताला कशी तारेवरची कसरत करावी लागते याचे अनुभवसिद्ध वर्णन हेमाने त्याना आलेल्या अनुभवावर केलेले आहे. राजदूताचे कार्यालय व निवास कसे असतात, विदेशी भाषा शिकण्यापासून त्याला तिथल्या लोकाशी सबध वाढविण्याकरिता काय काय करावे लागते हे वाचत असताना एखाद्या गूढ रहस्याच्या क्षेत्रात शिरल्याचा भास देखील होतो

पण सुरुवातीपासूनच विदेश सेवेतील राजदूताच्या पत्नीची भूमिका कशी व किती महत्त्वाची आहे याचे साग्रसगीत वर्णन हेमाने केलेले आहे. कारण तिच्या जीवनाची सुरुवातच मुळी १९६५ साली विदेश सेवेतल्या तरुण आणि हुशार अशा सुधीर बरोबर बोहोल्यावर चढूनच झाली ती म्हणते "राजनैतिक अधिकाऱ्याची पत्नी पतीचा हात धरून बोहोल्यावर चढूनच झाली ती म्हणते "राजनैतिक अधिकाऱ्याची पत्नी पतीचा हात धरून बोहोल्यावर चढते ती अतिथी देवो म्हणतच, कारण पुढच्या आयुष्यात तेच तिच ब्रीदवाक्य ठरणार असत " ह्याच प्रकरणात राजदूताच्या पत्नीला काय काय कामगिरी करावी लागते आणि राजदूताची अर्धांगिनी म्हणून, आपल्या देशाची सास्कृतिक प्रतिनिधी म्हणून सबध वाढविण्याची किती महत्त्वाची जबाबदारी असते हे रोचक रूपाने हेमाने लिहिले आहे तिलाही ज्या देशात राजदूताची नियुक्ती झाली असेल तिथल्या देशाची कामापुरती का होईना भाषा शिकण्यापासून तो तिथल्या प्रमुख लोकाच्या स्त्रियाशी कॉफीपान, चहापान, सहली, शॉपिंग या निमित्ताने सबध वाढविणे तसेच वेळोवेळी आपल्या देशाचे सास्कृतिक कार्यक्रम आयोजित करून तिथल्या लोकाना भारतीय सस्कृतीबद्दल माहिती करून देणे ही महत्त्वाची कामे कशी करावी लागतात आणि मग त्यात कशी धावपळ होते आणि कसे गोड अनुभव येतात ह्याचे सुदर वर्णन हेमाने केलेले आहे. ती स्वत साहित्य, सगीत व कला या क्षेत्रातील विदुषी

असल्यामुळे मॉस्को विद्यापीठाच्या हॉलमध्ये, जिनेव्हामध्ये आणि वॉशिंग्टनला सास्कृतिक कार्यक्रम करून तिथल्या लोकाना "सागा मुकुद कुणि हा पाहिला तसेच नाचरे मोरा, सीता स्वयवर" अशा कार्यक्रमानी मोहून टाकलेले होते या बरोबरच भारतीय वस्तूचे प्रदर्शन घडवून आणले अशी विविध तऱ्हेचीही कामे तिला करावी लागतात

विदेश सेवेतील राजदूताच्या जीवनातला रुचकर भाग म्हणजे नियमितपणे त्याला द्याव्या लागणाऱ्या कॉकटेल पार्ट्या या कॉकटेल पार्ट्या फक्त वेगवेगळ्या रुचकर मद्याचा आस्वाद घेण्याकरिताच नसतात तर पुष्कळशी चागली माहिती आणि वैयक्तिक सबध या पार्ट्यांच्या निमित्ताने घडून आलेले असतात कारण इथे अनौपचारिकरीत्या अनेक महत्त्वाच्या लोकाच्या भेटी होत असतात आणि म्हणून आठवड्यातून कमीतकमी एकदोनदा कोणा ना कोणा राजदूताकडे एकतर आपल्या राजदूताला सपत्नीक जावे लागते किंवा इतर लोकाना आपल्याकडे बोलवावे लागते यातूनच काही लोकाशी जास्त घनिष्ठ मैत्री निर्माण होते आणि त्यातून परस्पर सबध वैयक्तिक दृष्ट्या आणि राजकीय दृष्ट्याही वाढतात

परतु राजदूताच्या या धकाधकीच्या जीवनात सर्वात अडचणीची व गैरसोयीची जर कोणती बाब असेल तर ती असते आपल्या देशातून येणाऱ्या विशिष्ट आणि कधीकधी मत्र्याच्या रूपाने आलेल्या अतिविशिष्ट पाहुण्याची बरेचदा हे पाहुणे पुरेशी अगोदर सूचना न देता येतात आणि येतात तेही आपल्या लवाजम्यासकट. अन् मग त्याची बडदास्त आणि आवभगत करताना राजदूताची आणि विशेष करून त्याच्या पत्नीची कशी ओढाताण होते ह्याचे रसभरित वर्णन हेमाने केले आहे. या विशिष्ट पाहुण्याच्या आणि त्यातून मत्र्याच्या लहरी, त्याच्या आवडी-निवडीतले फरक हे सर्व लक्षात घेउन त्याची बडदास्त ठेवणे अन् ते कुठेही नाराज न होता किंवा न रुसता कसे जातील या विवचनेत राजदूत आणि त्याची पत्नी हे पाहुणे जाईपर्यंत असतात आणि ते सुखरूप गेले म्हणजे खरोखरच सुटकेचा निःश्वास टाकतात कसे कसे अनुभव अशा व्हीआयपी लोकाबरोबर आलेले आहेत याचे आपबीती वर्णन हेमानी केले आहे.

पुस्तकाच्या दुसऱ्या भागात आपल्या विदेश सेवेतील जीवनात ज्या ज्या प्रमुख ठिकाणी सुधीर देवरे ह्याची भारताचे प्रतिनिधी म्हणून नेमणूक झाली त्या त्या ठिकाणाचे आणि तिथल्या जीवनाचे अत्यत रसभरित, बहारदार व कलात्मक वर्णन हेमाने केले आहे हेमाला जात्याच निसर्गाची, फुलझाडाची फार आवड आहे आणि ज्या ज्या

ठिकाणी वर्ष दोन वर्ष रहाण्याची सधी मिळाली, मग ती ब्रह्मदेशातील रगून येथे असो किंवा कोरियातील सिओल येथे असो आणि अमेरिकेत वॉशिंग्टन येथे असो, हेमाने राजदूत निवासातील बाग सजविली आहे, फुलविली आहे. तिच्या या सपूर्ण पुस्तकात त्यानी केलेल्या देशातील प्रवासात निसर्गाचे वर्णन अत्यत लालित्यपूर्ण आहे.

पण ह्या पुस्तकात वैयक्तिक सबधाचे महत्त्व विदेश सेवेत किती असते, ते इतर देशातील लोकाशी तर असो पण परदेशात गेल्यानतर आपल्या देशातील वेगवेगळ्या प्रदेशातील भाषाभाषी लोक सुद्धा एका कुटुबासारखे किती जवळचे वाटतात याचे मनोवेधक वर्णन वेळोवेळी आलेले आहे परदेशातल्या व्यक्तीला आपल्या देशातून विशेषत आपल्या नात्यागोत्यातील माणसे कशी दुर्मिळ होत असतात आणि मग ती आली की कस मन बहरून येत याच सुदर वर्णन हेमाच्याच शब्दात "शाळा कॉलेजातली मैत्रीण अशा बाहेरच्या ठिकाणी आली की चार दिवस सगळीं कवच उतरतात ऑफिशियल पोझिशनच ओझ काढून ठेवल्यावर कस हलक वाटत तिचा आणि आपला नवरा पार्श्वभूमीत राहातात हास्य विनोदाला अगदी ऊत येतो मुलाना आईच्यातला हा अचानक झालेला बदल कळत नाही दारातल्या मॅग्नोलियाच्या झाडाचा बहर जसा आठवडाभर टिकतो तस आठवडाभर शैशव परत आलेल असत डोळ्याच्या कडा ओल्या होईपर्यंत दोघी हसतो मग ती परत जाते आणि मी माझी झूल परत चढवते पुढे काही दिवस तरी तिच ओझ जाणवत नाही इतक मन प्रफुल्लित झालेल असत "

या दुसऱ्या भागात श्री देवरे याना भारताच्या जवळचा, त्या वेळेला वेगळा असलेला पण नतर भारतात विलीन झालेला "सिक्किम" या देशात विलिनीकरणाच्या दिवसात रहाण्याचा योग आला आणि ते दिवस कसे होते, तिथली राजकीय परिस्थिती कशी होती याचे ऐतिहासिक दृष्ट्याही महत्त्वाचे वर्णन हेमाच्या "सिक्किम" प्रकरणात मिळते त्याचप्रमाणे सिओल मधले देवरे ह्याचे वास्तव्य हे अत्यत उलाढालीच्या काळात झालेले आहे. राजकीय दृष्ट्या लोकशाही कारकीर्दीत तिथे झालेली सुरुवात त्याचप्रमाणे सिओलमध्ये १९८६ साली झालेले एशियाडचे खेळ आणि १९८८ मध्ये भरलेल्या ऑलिपिक्सच्या वेळेला भारतातून आलेल्या खेळाडूची सोय करण्यात आलेले अनुभव याचे चटकदार वर्णन हेमाने केले आहे. पण याचबरोबर कोरियन लोकानी जिद्दीने "कॅन डू" ह्या मत्राने स्वाभिमानाने जेमतेम २०/२५ वर्षात आपला देश जगात प्रगत देश म्हणून कसा पुढे आणला याचेही सविस्तर वर्णन आपल्या देशातील लोकानाही उद्बोधक व्हावे असे केलेले आहे

या पुस्तकात राजदूत श्री सुधीर देवरे ह्यांची महत्त्वाची नियुक्ती फ्रॅन्कफर्ट मध्ये जर्मनीत झाल्यामुळे जर्मनीत गेल्या दोन तीन वर्षात जी क्रांतिकारी स्थित्यंतरे घडून आली यांचं "आखो देखा हाल" वर्णन फ्रॅन्कफर्ट या शेवटच्या प्रकरणात वाचायला मिळते अजून काही वर्षे वरिष्ठ विदेश सेवेचे अधिकारी म्हणून सुधीरना काढावयाची आहेत आणि त्याचबरोबर राजदूताची सुविद्य पत्नी म्हणून हेमाचीही कारकीर्द चालू आहे काही वर्षांनी याच पुस्तकाची दुसरी आवृत्ती हेमा लिहील तेव्हा युक्रेन आणि इतर देशाचेही असेच बहारदार माहितीपूर्ण वर्णन वाचावयाला मिळेल सर्वात महत्त्वाची गोष्ट मला जाणवली ती म्हणजे या पुस्तकाची सहज सुलभ आणि रोचक मांडणी आणि भाषा पुस्तक वाचताना कोणाचाही भाग किंवा प्रकरण जरा सुद्धा कंटाळवाण होत नाही आणि जणूकाही हेमाने लिहिलेली माहिती अपुरीच आहे, अजून बरचस सांगायला, लिहायला हव होत अशी चुटपुट मनाला लागून जात

मी या माहितीपूर्ण आणि रोचक पुस्तकाबद्दल हेमाच अभिनंदन करतो पण आजच्या स्त्री मुक्तीच्या युगात बोलायच तर Behind every successful woman there is an humble man particularly if he is a husband असे म्हणून या पुस्तकाचे काहीसे श्रेय सुधीर देवरे ह्यांनाही देण्याचा मोह मला टाळता येत नाही. दोघांचेही पुन्हा एकदा अभिनंदन

वसंत साठे

नवी दिल्ली,
१ जानेवारी १९९३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रयोग
ग्रं. क्र. २६०९८
२६।४।९३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# वेगळ्या वाटेनं चालताना

नवऱ्याच्या हाताला हात लावून 'मम' म्हणत चाणक्याच्या विश्वात प्रवेश केला आणि तिथे ही अनोखी वाट सुरू झाली सिदबादच्या सफरीवर घेऊन जाणारी! आज हिमाच्छादित डोंगराच्या बर्फाळ प्रदेशात, उद्या सहारा वाळवंटात तर परवा मादागास्करच्या बेटावर! या वाटेवर मैलाचे दगडच मुळी हजारो मैलावर येतात आणि मागे वळून बघायची सोय नसते कारण त्या पाउलखुणा केव्हाच पुसल्या गेलेल्या असतात वाटेतले वाटसरू काही काळ साथ देतात आणि आपल्या मुक्कामी निघून जातात परत कधीही न भेटण्यासाठी परतु स्नेहाची आणि आठवणींची शिदोरी मागे ठेवून जी कधीच रिती होत नाही

वाटेतली मुक्कामाची ठिकाणही तशीच रोमहर्षक! जिथे भाषा, देश, वेष सर्वच आगळ वेगळ! अर्जेंटिनाहून ऑस्ट्रेलिया, व्हेनेझुएलाहून व्हिएटनाम, हॅनोईवरून हवाना आणि झेकोस्लोवाकियाहून झाजीबार! असा हा देशोदेशीचा ससार माडणारे आम्ही राजनैतिक समाजातले लोक भटक्या जातीचे तीन वर्षं एका जागी रहायच, तिथे नवी नाती जोडायची, मधुघट स्नेहान भरायचे, आपल्या देशाच्या प्रतिमेची गुढी घट्ट रोवायची आणि तीन ओळींचा सरकारी खलिता आला की तिथला ऋणानुबध सपवून पुढच्या मुक्कामी रवाना व्हायच नवा गडी नव राज्याचा खेळ जोमान माडण्यासाठी!

ज्या विदेशसेवेतर्फे देशोदेशी आम्ही हे भ्रमण करतो ती विदेशसेवा हा आपल्याकडला काहीसा कुतूहलाचा विषय राजनीती, राजदूत हे प्रातच सामान्य जनाना काहीसे अपरिचित राजनीती म्हणजे काय, राजदूताच काम काय असाव याबद्दल अनेक तर्क-कुतर्क केले जातात त्याच माप हेरगिरीकडे झुकत अशीही काही जणाची कल्पना ! परदेशातल जीवन म्हणजे सुखलोलुपता असाही काहींचा गोड गैरसमज, कारण परदेश म्हणजे युरोप-अमेरिका हेच डोळ्यापुढच चित्र आदिस-अबाबा (एथिओपिया) नॉम-फेन (कपूचिया) किंवा मोगादिशू (सोमालिया) ही सुद्धा परदेशातलीच ठिकाण विदेशसेवेत अशा अनेक ठिकाणाचा समावेश होतो याची कल्पना फार थोड्या जणाना असते

या विश्वात प्रवेश करायचा तो भारतीयत्वाचा वसा घेऊन आणि औपचारिकपणाची झूल पाघरून कारण राजनैतिक विश्वाची ती एक नितान्त आवश्यकता देशाच्या प्रतिनिधित्वाची धुरा उचलून भारताचा किनारा ओलाडला की या भूमिकेला सुरुवात होते 'कशासाठी देशासाठी'चा चरण नकळत डोक्यात ताल धरतो मग ती भूमिका एवढी अगवळणी पडते की मनात आल तरी तिच कवच उतरवता येत नाही, इतकी ती स्वत च्या व्यक्तिमत्वात मिसळून गेलेली असते अशी एका सस्कृतीमधून दुसऱ्या सस्कृतीमधली देशोदेशीची यात्रा साहसपूर्ण तशीच मनोधैर्याची परीक्षा बघणारी !

आतरराष्ट्रीय प्रागणात भारतासारख्या विस्तृत आणि विविध अगी देशाच प्रतिनिधित्व करण हे एक आव्हान म्हटल तर आपला देश विकसनशील आणि म्हटल तर काही क्षेत्रात अत्यत प्रगत भारताबद्दलच्या बाह्य जगातल्या प्रतिमाही विभिन्न गरिबी आणि पारपरिक रूढींनी ग्रासलेला देश अशी भारताबद्दलची सर्वसामान्य कल्पना पूर्वापार चालत असलेली प्राचीन सस्कृती आणि नव तत्रज्ञान याची सागड घालणाऱ्या आपल्या देशाच योग्य ते चित्र आतरराष्ट्रीय समाजापुढे ठेवण ही विदेशसेवेवरची प्रमुख जबाबदारी ही कामगिरी पार पाडण्यामधे कल्पकता, विचाराची प्रगल्भता आणि धडाडी याचा सयोग असण अत्यत आवश्यक !

माझा चाणक्याच्या विश्वात प्रवेश झाला ६५ साली, आम्ही विवाहबद्ध झालो तेव्हा सुधीर विदेशसेवेत रुजू होऊन जेमतेम वर्षच झाल होत वकिलातीच्या जीवनात आम्ही जोडप्यान शिरलो राजनैतिक पथ जसा रोमहर्षक तसा काहीसा मृगजळासारखा दुरून मुलायम भासणारा, पण पाय ठेवल्यावर कुठे काटे आहेत त्याची जाणीव करून देणारा मात्र एकमेकाच्या सान्निध्यात त्या काट्याची बोच केव्हा दूर व्हायची ते कळायचच नाही जिथे जाऊ तिथल्या अडचणींचा बाऊ न करता तिथल्या चागल्या गोष्टींचा तेवढा उपभोग घ्यायचा हे सदैव मनात घोळवल आणि त्यामुळे मनाचा

तोल कधी ढळला नाही स्वित्झर्लंडच्या आल्पस्मधे तीन वर्षं जितकी आनदात गेली तितकीच रगूनच्या श्वेदगाँग पगोडाच्या परिसरातली अडीच वर्षं सुखासमाधानात गेली सगीत, नाट्य, लेखन या कलामध्ये मिळालेली दीक्षा राजनैतिक जीवनात कारणी लागली सास्कृतिक कार्यक्रम हा माझ्या वकिलातीच्या जीवनातला स्थायी भाव बनून गेला

भारत सरकारच्या मत्रिमडळातले माजी मत्री आणि ज्येष्ठ विचारवत श्री वसतराव ऊर्फ बापूसाहेब साठे यानी अत्यत आस्थेन या पुस्ताकाला प्रस्तावना दिल्याबद्दल त्याचे मनापासून आभार माझी विश्वविद्यालयीन जीवनाची वर्षं नागपुरात गेली श्री. बापूसाहेबाची कर्मभूमीहि नागपूरच माझे वडील डॉ ना र देशपाडे आणि श्री बसतराव साठे याची एका व्यासपीठावरून अनेक वेळा व्याख्यान झालेली बापूसाहेब आणि जयश्रीताईंचा परिचय तेव्हापासूनचा

विदेश सेवेत प्रवेश केल्यावरहि त्या परिचयाला वारवार उजाळा मिळत राहिला ही विशेष आनदाची गोष्ट त्याची ही प्रस्तावना म्हणजे माझ्या पुस्तकाला त्यानी दिलेला आशीर्वाद आहे अस मी समजते

माझ्या या पुस्तकान मूर्त स्वरूप घेतल त्यात माझी मैत्रीण ज्योति दाते हिचा मोठा वाटा आहे विदेशसेवेवचर लिहायचा विचार घोळत असल्याच मी तिला अनेकवेळा बोलून दाखवल होत पण मी ते लिहावच असा तिन आग्रह धरला सुप्रसिद्ध नाटककार श्री गोविन्द देशपाडे यानी केलेल्या मार्मिक सूचनाबद्दल त्याचे मन पूर्वक आभार. राजदूताची पत्नी या नात्यान मी हे पुस्तक लिहिल असल तरी त्यात नमूद केलेले विचार पूर्णपणे माझे व्यक्तिगत विचार आहेत पुस्तकाच ईप्सित साध्य झाल याच सपूर्ण श्रेय श्रीविद्या प्रकाशनचे श्री मधुकाका कुळकर्णी याना आहे. मी युक्रेनच्या राजधानीत विदेश सेवेशी सादर असूनही श्री मधुकाकामुळे पुस्तकाच काम पुर होऊ शकल, आणि मी ते नियोजित वेळेत वाचकापुढे ठेऊ शकले

सिदबादच्या सफरीमधली आमची सातवी सफर आता सपुष्टात आली आहे मात्र विदेशसेवेच्या विश्वातली राजनैतिक पथावरची आमची वाटचाल अजूनही चालू आहे. नव्या क्षितिजाच्या शोधात, पुढल्या अनोळखी वळणाचा वेध घेत

हेमा देवरे


कीव्ह-युक्रेन
३०-११-९२

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | पाच |
| | वेगळ्या वाटेने चालताना | अकरा |
| १ | वकिलात | १ |
| २ | राजदूत | १२ |
| ३. | राजदूत आणि शिष्टाचार | १८ |
| ४ | स्त्रियश्चरित्रम् | २६ |
| ५ | विदेश सेवेतले बाळगोपाळ | ३४ |
| ६ | राजदूत निवास | ३८ |
| ७ | विदेशसेवेतले बल्लवाचार्य | ४३ |
| ८ | परदेशातले स्थानिक भारतीय | ४८ |
| ९ | राजनैतिक वर्तुळातली माणस | ५६ |
| १० | स्वगृही | ६२ |
| ११ | विदेश सेवेत प्रवेश | ७४ |
| १२. | महाराष्ट्र आणि विदेश सेवा | ७७ |
| १३ | मास्को-सोव्हिएट युनियन | ८२ |
| १४ | वॉशिंग्टन-अमेरिका | ९७ |
| १५ | गंगटोक-सिक्कीम | १०६ |
| १६ | जिनीव्हा-स्वित्झर्लंड | ११९ |
| १७ | रंगून-ब्रह्मदेश | १२९ |
| १८ | सिओल-दक्षिण कोरिया | १४३ |
| १९. | फ्रँकफर्ट-जर्मनी | १६५ |



कोरियात भारतीय
नौदलाच्या जहाजाचे
नामकरण करताना
१९८८



ब्रह्मदेशाच्या परराष्ट्र मंत्र्यांसमवेत श्री व श्रीमती देवरे १९८१



सिओलमध्ये आशियाई खेळाच्या दरम्यान पी टी उषा, वलसम्मा, शायनी अब्राहम घरी भोजनाला आल्या असताना




सिओलमध्ये इकेबाना फ्लॉवर सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती इम व्हा काँग आणि इतर देशांच्या राजदूतांच्या पत्नींसमवेत



सिओलमध्ये मार्गारेट अल्वा आणि टागोर सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती किम याग शिक यांच्या समवेत



हायडल बर्ग विद्यापीठातील 'दक्षिण आशिया' संस्थेचे मुख्य प्राध्यापक श्री रॉथरमुड आणि श्रीमती रॉथरमुड याच्या समवेत



युक्रेनमध्ये कीव्ह इथं भारताची वकिलात सुरू झाल्यानंतर संरक्षणमंत्री माननीय श्री शरद पवार यांची भेट त्यांच्या समवेत भारताचे युक्रेनमधील राजदूत श्री सुधीर देवरे आणि सौ हेमा देवरे

# वकिलात

परदेशातल्या अनोळखी वातावरणात 'भारतीय राजदूतावास' अशी दगडी दरवाजावरची सोनेरी पाटी पाहिली की मायभूमीच्या वेशीवर आल्याचा आनंद मिळतो परदेशाचा प्रवास कितीही अगवळणी पडला तरी तो परकाच तिथली औपचारिकतेची लक्ष्मणरेषा कायम राहतेच त्यामुळे भारतीय वकिलातीत प्रवेश करताना स्वगृही आल्यासारख वाटत तिथल्या स्वागत कक्षातले उंची सोफे आणि गालिचे, वरती टागलेली झुबर-हड्या आणि या पार्श्वभूमीवर कडक इस्त्रीच्या चेहऱ्याची परदेशातल्या औपचारिकतेचा जणु ठेका घेतलेली रिसेप्शनिस्ट बघून सुरुवातीला जरा बिचकल्यासारख होत मात्र समोरच्या टेबलावरली हिंदी-इग्रजीतली भारतीय मासिक आणि त्या टेबलामागच्या भारतीय चेहऱ्यावरचा परिचित 'सरकारी' भाव बघितला की आपण आपल्याकडच्याच कचेरीत असल्याची खात्री पटते

दूतावासात शिरलेला नवीन पाहुणा पुरेसा दबावाखाली आहे याची खात्री पटल्यावर मग कर्मचारी त्याची दखल घेतो आणि सरकारी रजिस्टरमध्ये नोंद केल्यासारखी त्याची रवानगी पुढच्या माणसाकडे करतो आलेल्या इसमान दूतावासातल्या उच्चस्तरीय अधिकाऱ्याची ओळख सागितली तर मग त्याची ताबडतोब विचारपूस होऊन चहाची सुद्धा विचारणा होते आणि सबधित अधिकाऱ्याकडे जाण्याची ताबडतोब सधी मिळते

एरवी वरच्या अधिकाऱ्याला भेटायची विनती केल्यावर ते मीटिंगमध्ये तरी असतात, त्याच्याकडे दुसऱ्या कुणाची अपॉईंटमेंट तरी असते, नाहीतर ते बाहेर गेलेले असतात आलेला देशबांधव आपल्याच प्रांतातला निघाला तर त्याचं काम लौकर होण्याची शक्यता आणखीनच वाढते पूर्वीची ओळखदेख नसताना सुद्धा पट्दिशी काम करून देणारी माणसही वकिलातीत असतात मात्र त्यासाठी भेटायला येणाऱ्याचे ग्रह अनुकूल असावे लागतात

भारतीय वकिलातीचं स्वरूप एखाद्या गूढ रहस्यासारखं वकिलातीच्या कारभाराबद्दल सर्वांनाच कुतूहल असतं मात्र त्या फारशा काही करत नाहीत असा शिक्का मारायची घाईही दिसते भारतात टीकाकाराचं प्रमाण जास्त मतप्रदर्शनाची हौसही दांडगी, त्यामुळे कित्येक वेळा फारशी माहिती नसतानाही मतं बनवली जातात

कुठल्याही देशात आपली वकिलात असणं ही आपल्या देशाच्या दृष्टीनं एक सन्मानाची बाब आहे वकिलात म्हणजे दोन्ही देशामध्ये परस्पर संबंध अबाधित राखून ते वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीनं उभारलेली एक सरकारी यंत्रणा! उभय देशामधल्या घडामोडींची नांदी होणार हे ठिकाण! भारताचं विदेश-मंत्रालय आणि परदेशाचं परराष्ट्र खातं यामधला तो एक दुवा आहे. कुठल्याही देशासंबंधीची परदेशनीती ठरवण्यात येते ती मुख्यत त्या देशातल्या आपल्या वकिलातीनं पाठवलेल्या माहितीच्या आधारावर. विदेश मंत्रालयात त्या देशाशी संबंधित असा एक कक्ष असतो तिथे ही माहिती गोळा करण्यात येते तिथले संबंधित उच्चस्तरीय अधिकारी एकूण परिस्थितीचा आढावा घेऊन ही माहिती संकलित करून विदेश सचिवाकडे पाठवतात आणि इथून पुढे विदेश नीतीच्या धोरणाला प्रारंभ होतो

आपल्या देशाची वकिली करणं हा वकिलातीचा सरळसोट अर्थ होऊ शकेल तिथले राष्ट्रप्रमुख आपल्या देशाला भेट देतात किंवा आपले पंतप्रधान त्या देशाचा दौरा करतात त्याची सूत्रं सर्वप्रथम हालतात ती वकिलातीमधे त्या त्या देशामधल्या राजकीय परिस्थितीचं निरीक्षण करून त्या संबंधीची माहिती भारताला सतत पुरवणं ही आपल्या वकिलातींची प्रमुख जबाबदारी असते त्यादृष्टीनं पाकिस्तान, बांगला देश, श्रीलंका या शेजारी देशामधल्या आपल्या वकिलातीची भूमिका फार महत्त्वाची ठरते, कारण तिथल्या राजकीय संघर्षांचे पडसाद तांबडतोब आपल्या देशात उमटतात शेजारी देशाचे ज्या देशाशी घनिष्ठ संबंध आहेत तिथल्या घडामोडीही आपल्या दृष्टीनं महत्त्वाच्या उदा पाकिस्तान आणि इराण किंवा पाकिस्तान आणि सौदी अरेबियाचे संबंध लक्षात घेता तिथं काय घडत आहे याचा सतत परामर्श घेणं भारताच्या दृष्टीनं फार महत्त्वाचं

असत तसच नेपाळ-चीन आणि आपले नेपाळबरोबरचे सबध ध्यानात घेऊन नेपाळमध्ये चीनची काय कारवाई चालू आहे यावरही तिथल्या आपल्या वकिलातींना लक्ष ठेवाव लागत अशा ठिकाणी तर वकिलातींच काम आणखी कौशल्यपूर्ण आणि नाजुक ठरत

ज्या देशामध्ये भारतीयाची सख्या खूप आहे तिथे काही सघर्षजनक परिस्थिती निर्माण झाली तर तिथल्या भारतीय जनतेच हित साभाळण हीही वकिलातीची नैतिक जबाबदारी उदा फिजी या बेटात भारतीय मोठ्या प्रमाणावर आहेत मध्यतरी तिथल लोकशाही सरकार लष्करी सत्तेन उलथून पाडल तेव्हा भारतीयावर बराच हिंसाचार झाला आणि भारतीय लोकाच्या हक्कावर गदा आली आपल्या वकिलातीन या घटनाचा निषेध करून भारतीयाना न्याय मिळावा अशी वारवार मागणी केली त्यावेळी काही काळ आपला राजदूत परत बोलावण्यात आला होता निषेध नोंदवण्याचा हा एक प्रकार ! चीनच्या आक्रमणानतर कितीतरी वर्ष तिथे वकिलाची नेमणूक करण्यात आली नव्हती सिगापूरसारख्या ठिकाणी अनेक भारतीय मडळी लहान सहान व्यवसाय करतात स्थानिक सरकारकडून पिळवणूक होत आहे अस त्याना वाटल की ते उच्चायुक्ताकडे धाव घेतात त्याच्या पालकत्वाची अलिखित जबाबदारी वकिलातीवर येऊन पडते इग्लड, गयाना, मॉरिशस, फिजी, या ठिकाणच्या वकिलातींना अशा प्रकारच्या समस्याना वारवार तोंड द्याव लागत

आपापसात वैमनस्य असलेल्या दोन राष्ट्रामध्ये आपल्या वकिलाती असण हे आतरराष्ट्रीय राजकारणात नवीन नाही उदा इराण आणि इराक किंवा इथिओपिया आणि सोमालिया दुसऱ्या महायुद्धानतर हिंदुस्थानप्रमाणे इतरही काही देशाच्या फाळण्या झाल्या उदा कोरिया, जर्मनी, व्हिएटनाम विभाजनामुळे निर्माण झालेल्या राष्ट्रामध्ये एकमेकात शत्रुत्व किंवा स्पर्धा असावी हे स्वाभाविक (आपल्या देशात पाकिस्तानच्या सदर्भात हा अनुभव आहेच ) मात्र दोन्ही देशाबरोबर आपल मैत्रीच नात साभाळण ही एक कसबाची बाब आहे उत्तर आणि दक्षिण कोरियामधल्या आपल्या वकिलातींना ही राजनैतिक कसरत करावी लागते जर्मनीच एकीकरण होण्यापूर्वी या दोन्ही देशात तीच परिस्थिती होती

भारतीय शिष्टमडळाची त्या देशातली ये-जा, विशेषत भारतीय सरकारी पाहुण्याचे तिथले दौरे, हाही तिथल्या वकिलातीच्या कामाचा एक महत्त्वाचा भाग ठरतो व्यापारी उलाढालींच्या निमित्तान अनेक शिष्टमडळ भारतातून येत असतात त्याची परदेशातली सर्व प्रकारची व्यवस्था बघण वकिलातीला प्राप्त असत जर हे अतिथी नाराज होऊन परत गेले तर मग वकिलातींची खैर नसते या तक्रारी पार वृत्तपत्रापर्यंत जाऊन पोचतात

मग खर खोट बघतो कोण ? छापून आलेला शब्द खरा न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, टोकिओ, फ्रँकफर्ट, सिगापूर, मास्को, लडन ही सरकारी पाहुण्याची अत्यत आवडती ठिकाण मात्र ब्रह्मदेश, येमेन, गयाना अशा जागा तिथल्या वकिलातीच्या लोकानाच लखलाभ होवोत असा आशीर्वाद देऊन हे पाहुणे कधी त्या वाटेसही जात नाहीत

वकिलातींच काम राजकीय सबधापुरत मर्यादित राहिलेल नसून आर्थिक, व्यापार, सास्कृतिक, वैज्ञानिक, लष्कर आणि शिक्षण क्षेत्रातही परदेशातल्या कामाची व्याप्ती वाढली आहे. व्यापार विभागानी तर कित्येक देशामध्ये राजकीय सबधाच्याही पुढे आघाडी मारली आहे उदा युरोपमध्ये फ्रान्स, जर्मनी, डेन्मार्क, फिनलड, आफ्रिकेत नायजेरिया, केनिया, आयव्हरी कोस्ट आणि अतिपूर्वेकडे दक्षिण कोरिया, जपान या देशामध्ये आपली आर्थिक राजनीती अधिक महत्त्वाची ठरू लागली आहे

वकिलातींना काही ठिकाणी एम्बसी म्हणतात तर काही ठिकाणी उच्चायोग (हायकमिशन) ज्या देशामधे पूर्वी ब्रिटीश वसाहती होत्या त्या देशानी नतर राष्ट्रकुल निर्माण केल (कॉमनवेल्थ) राष्ट्रकुलातल्या देशामधल्या वकिलातीना उच्चायोग आणि वकिलाला उच्चायुक्त म्हणून सबोधण्यात येत उदा कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलड, नैजेरिया, मलेशिया, सिगापूर, जमेका इथे उच्चायोग आहेत न्यूयॉर्क आणि जिनीव्हा या ठिकाणी सयुक्त राष्ट्राना सलग्न असलेल्या आपल्या कायम स्वरूपाच्या कचेऱ्या आहेत (पर्मनट मिशन ऑफ इडिया टु यू. एन्.) ज्या देशामध्ये भारतीयाची सख्या जास्त आहे आणि आपला व्यापारही मोठ्या प्रमाणावर आहे अशा ठिकाणी वकिलातींखेरीज कौन्सुलेटसही असतात उदा कॅनडामधे व्हँकूव्हर, टॉरँटो, अमेरिकेत न्यूयॉर्क, शिकागो, सॅनफ्रान्सिस्को, इग्लडमधे बर्मिंगहॅम, मँचेस्टर, अरब अमिरातींमधे दुबई, सौदी अरेबियामध्ये जेद्दा, जर्मनीमधे फ्रँकफर्ट, हॅम्बुर्ग, बर्लिन आणि ऑस्ट्रेलियामधे सिडने ही काही प्रमुख कौन्सुलेटस् आहेत तिथल्या भारतीयाच हित साभाळण आणि व्यापार सुलभ होण्यासाठी हातभार लावण ही त्याच्या कामापैकी काही प्रमुख काम फ्रँकफर्टसारख्या ठिकाणी आलेल्या भारतीयाचे पासपोर्ट, व्हीसा कित्येकदा चोरीला जातात मग ते दिवसाच्या कोणत्याही वेळी कौन्सुलेटच्या आश्रयाला धावतात आणि नवीन पासपोर्टची मागणी करतात कौन्सुलेटला तिथे नव्यान पासपोर्ट देण्याचे अधिकार असतात

एका विशिष्ट देशामधली आपली वकिलात किती मोठी आहे हे त्या देशाचे आणि भारताचे सबध किती व्यापक आहेत त्यावर अवलबून असत उदा लडन, वॉशिंग्टन, मास्को, बॉन, पॅरिस, ढाका, कोलबो या ठिकाणच्या आपल्या वकिलाती म्हणजे सस्थानच

आहेत तर उलनबातोर (मगोलिया), ट्यूनिस (ट्युनिशिया), लिमा (पेरू), सोफिया (बल्गेरिया), ऑस्लो (नॉर्वे) या ठिकाणच्या वकिलाती लहान स्वरूपाच्या आहेत कारण त्या देशाबरोबर आपले सबध आज तरी जुजबी म्हणावे लागतील

वकिलातीचा प्रमुख राजदूत असतो आणि वकिलातीचा व्याप साभाळण्याच काम त्याच असत मोठ्या वकिलातींमधे राजदूताच्या हाताखाली राजकीय, आर्थिक, वाणिज्य आणि सास्कृतिक सल्लागार (मिनिस्टर आणि कौन्सिलर) मग प्रथम सचिव, द्वितीय सचिव, तृतीय सचिव आणि त्याच्या हाताखाली त्याचे खाजगी चिटणीस (पी ए ), वकिलातीच प्रशासन बघणारा अधिकारी आणि त्याचा स्टाफ अस एकूण वकिलातीच स्वरूप असत जिथली प्रचलित सरकारी भाषा इग्रजी नाही अशा ठिकाणी वकिलातीत एक दुभाषी असतो प्रत्येक देशात तिथली भाषा बोलणारे आणि त्या त्या देशाच्या प्रशासकीय कामकाजाच स्वरूप माहीत असलेले काही स्थानिक कर्मचारीही वकिलातीत काम करतात दूतावासाच्या सरक्षणासाठी सुरक्षा कर्मचारी भारतातून आणले जातात लहान वकिलातीमधे एक तर मोठ्या वकिलातीमधे दोन सुरक्षा कर्मचारी असतात दिवसा माणसानी गजबजलेली वकिलातीची इमारत सध्याकाळी ओकीबोकी होऊन जाते आणि या रखवालदाराच निवासस्थान बनते सध्याच्या आतरराष्ट्रीय दहशतवादाच्या परिस्थितीमध्ये सुरक्षा कर्मचाऱ्याच महत्त्व आणखी वाढल आहे

काही मोठ्या वकिलातींचा पसारा इतका वाढलेला आहे की तिथे सचिवालयाचा भास होतो तिथे अनेक मत्रालयाचे प्रतिनिधी असतात रेल्वे, शिक्षण, कस्टमस, वाणिज्य, ऑडिटस अकाउटस, व्यापार विकास विभाग (T D A.), स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन इ इ ज्या देशाबरोबर आपले लष्करी सबध महत्त्वाचे आहेत, जिथून आपण सरक्षण सामग्री आणि शस्त्रास्त्रे घेतो किंवा जिथल्या लष्करी परिस्थितीचा सखोलपणे अभ्यास करण आवश्यक असत तिथे लष्कर, वायुसेना, नौदल याचे प्रतिनिधी पाठवले जातात वॉशिग्टन, मास्को, लडन, पॅरिस, ढाका, बॉन इथल्या वकिलातींमध्ये अशा स्वरूपाच्या नेमणुका होतात ज्या देशातून आपल्याला तत्रज्ञान हव असत अशा ठिकाणी विज्ञान, तत्रज्ञानविषयक अधिकाऱ्याची नियुक्ती होते टोकिओ, वॉशिंग्टन, पॅरिस, बॉन या जागी हे अधिकारी पाठवले जातात

सरकारच्या विविध खात्याचे प्रतिनिधी वकिलातीत येताना आपापल्या खात्यामधल्या प्रथा, वरिष्ठता, बढत्या ही सगळी गुतागुत बरोबर घेऊन आलेले असतात वकिलातीत आल्यानतर वेगवेगळ्या खात्यामधून आलेल्या अधिकाऱ्यामध्ये एक प्रकारची चुरस निर्माण होते सर्वप्रथम ती विदेश सेवाधिकाऱ्याबरोबर होते यामधे खेळीमेळीच वातावरण

टिकवण म्हणजे राजदूताला मोठ जिकीरीच काम मोठ्या वकिलातींमधे प्रत्यक्ष विदेशसेवेतले अधिकारी अल्पसख्याकात जमा होतील इतक्या कमी प्रमाणावर असतात मात्र वकिलातीवर जर टीकेची झोड उठली तर झोतात येतात हेच अधिकारी कारण वकिलातीची मूलभूत जबाबदारी विदेशसेवेची समजली जाते प्रत्यक्षात मात्र उत्तमोत्तम ठिकाणच्या वकिलातींमधे विदेशसेवेतर अधिकाऱ्याचा भरणा आणि अवघड जागामधे इतर कुणी जायला तयार होत नसल्यामुळे तिथे केवळ विदेशसेवेचे अधिकारी अस सर्वसामान्य चित्र दिसत

विदेश सेवेत प्रवेश मिळाल्यानतर प्रत्येक अधिकाऱ्याला एक परदेशी भाषा शिकावी लागते त्यान तीन भाषा निवडायच्या असतात हवी ती भाषा मिळेलच याची खात्री नसते कारण ऐंशी टक्के अधिकाऱ्याना फ्रेंच किंवा स्पॅनिश भाषा हवी असते, त्यामुळे कित्येक वेळा फ्रेंच मागितल्यावर थाई भाषा मिळायची शक्यता नाकारता येत नाही ही भाषा शिकण्याकरता मग ज्या देशात ती बोलली जाते तिथे त्याची बदली होते सुरुवातीला वर्षभर केवळ भाषा शिकण्यासाठी त्याला वेळ देण्यात येतो मात्र फ्रेंच भाषा मिळवल्यास ती शिकायला पॅरिसला जायला मिळेल असेही नाही, तर सेनेगाल किंवा मादागास्कर जिथे ही भाषा सरकारी भाषा म्हणून प्रचलित आहे तिथेही त्याना पाठवल जाऊ शकत काही अधिकारी आपल्या वाट्याला आलेली भाषा इतकी सराईतपणे बोलतात की पतप्रधानसुद्धा वेळप्रसगी या अधिकाऱ्याला अधिकृत दुभाषी म्हणून वापरतात

गेल्या काही वर्षांमधे लष्करातून अनेक अधिकारी विदेश सेवेत आले आहेत त्याना त्यासाठी एक खास परीक्षा द्यावी लागत असे असे आलेले अधिकारी विदेश सेवेत केव्हाच रुळून गेले आहेत आय् एफ. एस ची परीक्षा पास होऊन आलेले अधिकारी आणि लष्करातून आलेले अधिकारी याच्यातला फरक ताबडतोब ओळखू येतो विदेश सेवेत थेट आलेल्या अधिकाऱ्यामध्ये एकमेकाबरोबर औपचारिकतेचा भाग फार कमी असतो विदेश सेवेत प्रवेश मिळवून बाजी मारल्याचा अभिमान प्रत्येकालाच वाटत असतो वरिष्ठ अधिकारी वरिष्ठ म्हणवला जातो केवळ काही वर्ष आधी रुजू झाला म्हणून अशी त्याच्यात एक भावना असते याउलट वरिष्ठ अधिकाऱ्याचा अधिकार कायम मोठा मग तो दोन वर्षांनी सिनीयर असो, अथवा दोन महिन्यानी हे बाळकडू लष्करात प्रवेश करतानाच लष्करी अधिकाऱ्याना मिळालेल असत वरच्या अधिकाऱ्याना खूष ठेवण्याची अंगिकारलेली कला आणि लष्करी शिस्त त्याना विदेशसेवेतही कामी येते लष्करातल्या शिस्तीनुसार आलेल्या सरकारी पाहुण्याचा 'बदोबस्त' हे अधिकारी उत्तम रीतीन करतात

विदेश सेवेत रुजू झालेल्या जोडप्याच प्रमाणही अलीकडे खूप वाढल आहे पूर्वी अशी उदाहरण तुरळक होती त्यामुळे दोघाची एकाच वकिलातीत नेमणूक करता येण जरा सुलभ होत आता ही सख्या मोठी होऊ लागली आहे त्यासाठी वकिलातीत अतिरिक्त जागा निर्माण करण्याची वेळ येते किंवा ज्या ठिकाणी आतरराष्ट्रीय सघटना असतात तिथे दोघापैकी एक जण बदली मिळवण्याचा प्रयत्न करतो मग एक जण वकिलातीत तर एक जण त्याच ठिकाणी आतरराष्ट्रीय सघटनेत अशी ही विभागणी होते न्यूयॉर्क, जिनीव्हा, पॅरिस, बॅंकॉक अशा ठिकाणी हे शक्य होत सरकार अशा जोडप्याबाबत साधारणत· सहानुभूतीपूर्वक विचार करून दोघाना एकाच ठिकाणी पाठवण्याचा प्रयत्न करत मात्र दोघाची राजदूत म्हणून नियुक्ती करण्याची वेळ येते तेव्हा प्रश्न उद्‌भवतो मग जवळच्या देशामध्ये दोघाना पाठवल जात (पेरू-चिली, स्वीडन-डेन्मार्क, पोर्तुगाल-स्पेन इ ) मात्र बायको नवऱ्यापेक्षा जास्त गुण मिळवल्यामुळे वरच्या स्थानी असते तेव्हा वेगळीच समस्या उपस्थित होते एकाच वकिलातीत दोघाची नेमणूक करायची वेळ आल्यावर वरची जागा अधिकृतरीत्या तिलाच दिली जाते मग पतीचा अहकार दुखावला जाऊ नये म्हणून बहुतेक वेळा पत्नी आपणहून खालच पद स्वीकारते कारण प्रत्येक भारतीय महिला प्रथम पत्नी असते आणि मग अधिकारी !

भारताच्या विदेश सेवेत महिला अधिकाऱ्याची सख्या बरीच आहे एकट्या स्त्रीन परदेशात रहायच म्हणजे धाडसच मात्र श्रीमती विजयालक्ष्मी पडिताच्या काळापासून राजनीतीमधे स्त्रिया कुठेही कमी नाहीत हे भारतीय स्त्रियानी दाखवून दिल आहे प्रशासनाच काम स्त्रिया अधिक चागल्या तऱ्हेन साभाळू शकतात हेही त्यानी सिद्ध केल आहे पत्नी विदेश सेवेत आणि पती दुसऱ्या नोकरीमधे अशीही काही उदाहरण आहेत अशा स्त्रिया दिल्लीत (विदेश मत्रालयात) जास्त काळ राहू इच्छितात मग सात आठ वर्षांतून एखाद्या बदलीवर त्या परदेशात जातात क्वचित् वेळा लग्न झाल्यावर किंवा इतर कारणानी महिला अधिकारी या नोकरीचा राजीनामा देतात मात्र अशी उदाहरण फार विरळ आहेत

परदेशात होणाऱ्या बदल्याची वर्गवारी करण्यात आली आहे. ही वर्गवारी करायची पद्धती आहे निरनिराळ्या देशातला राहणीमानाचा दर्जा, त्या देशात इग्रजी माध्यमातल्या शिक्षणाची सोय अशा तऱ्हेचे निकष ही वर्गवारी करण्यात लावले जातात त्या निकषाच्या आधारावर देशाची विभागणी ए स्टार, ए, बी, सी आणि सी स्टार अशी केली जाते अमेरिका, इग्लड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया या ठिकाणच्या वकिलातींमध्ये बदली होण हे भाग्याच लक्षण ठरत कारण हे देश ए स्टार समजले जातात ए वर्गात मोडणारी ठिकाण म्हणजे युरोपमध्ये बॉन (जर्मनी), रोम (इटाली), ब्रुसेल्स (बेल्जियम), ऑस्लो

(नॉर्वे), कोपनहेगन (डेन्मार्क) इ इ तर आशियामध्ये मलेशिया, सिगापूर, हाँगकाँग वगैरे वगैरे

'बी' वर्गात दक्षिण अमेरिकेतल्या ब्राझिलियापासून आशियामधले थायलड, इडोनेशिया, आफ्रिकेतले केनिया, झिंबाब्वेपर्यंतचे अनेक देश मोडतात सी स्टार या जागा सर्वात कठीण तिथे सुरक्षिततेची शाश्वती नसते रोजचे जीवन एक सग्राम ठरू शकतो आणि सर्व प्रकारचा तुटवडा भासतो सुदान, उत्तर कोरिया, झाईर, सोमालिया, कम्पूचिया, बागला देश, व्हिएटनाम इत्यादी देश या वर्गवारीत मोडतात सी ठिकाण म्हणजे सी स्टारच्या मानान किंचित् अधिक सुखकर गयाना, सुरीनाम, येमेन, घाना, नैजेरिया हे देश या वर्गात येतील सी स्टार जागामध्ये साधारणपणे दोन वर्षासाठी नेमणूक होते विदेश सेवेमध्ये वॉशिग्टनचा रस्ता मोगादिशूवरून जातो अस थट्टेत म्हटल जात अवघड ठिकाणची बदली म्हणजे एक प्रकारची तपस्याच! त्यानतर त्या सेवेच फळ म्हणून वॉशिंग्टन मिळायची आशा निर्माण होते याउलट न्यूयॉर्कनतर मगोलिया अथवा मोझाबिक अशा ठिकाणी जायला सिद्ध असाव लागत

विदेश सेवेच्या अधिकाऱ्यामध्ये दोन प्रकार असतात ए आणि बी ए वर्गातले अधिकारी आय्. एफ एस्.ची परीक्षा पास होऊन आलेले असतात तर बी वर्गातले अधिकारी दुय्यम श्रेणीच्या परीक्षा पास होऊन येतात या वर्गातले अधिकारी देखील कामातल्या हुशारीवर आणि अधिक परीक्षा पास करून उशीरा का होईना, ए वर्गात प्रवेश करू शकतात 'ए' वर्गामधे भारतातल्या सर्वच राज्याच प्रतिनिधित्व दिसून येत त्यातून पजाब, उत्तर प्रदेश, केरळ, तामिळनाडू, बगाल या राज्यामधले अधिकारी जास्त प्रमाणात दिसतात 'बी' वर्गामध्ये पजाबी भाषिकाच प्रमाण निश्चितच जास्त आहे म्हणूनच विदेश सेवेत हमखास उपयोग पडणारी भारतीय भाषा म्हणजे पजाबी अर्थात् वकिलातीच सर्व काम इग्रजी भाषेत चालत पण पजाबी भाषा समजल्यास आणि थोडी फार बोलता आल्यास काम अधिक सुकर होत

भारताच्या प्रातप्रातामधे दिसून येणारी वैशिष्ट्य वकिलातीतही दिसतात विदेश सेवेमधले एकूण रीतिरिवाज पजाबी लोक चट्दिशी आत्मसात करतात राजधानीच्या आणि आसपासच्या वातावरणात वाढलेल्या लोकामध्ये 'मी'पणाचा अकुर स्वाभाविकपणे जोपासला गेलेला असावा परदेशात अल्पावधीत इतरावर छाप पाडण्यासाठी 'अह'भाव फार कामी येतो स्थानिक वस्तू गोळा करण, कुठे काय स्वस्त मिळत याची माहिती करून घेण यातही त्याचा पुढाकार असतो पजाब्यासारखे हरहुन्नरी म्हणजे मल्याळी पजाबी काय किंवा मल्याळी काय जिथे जातील तिथे कुठलही काम करवून घेण्याची त्याची हातोटी, प्रत्येक ठिकाणची बारीक सारीक माहिती मिळवण्याच त्याच कसब

यामुळे ही मडळी फार यशस्वी होतात याउलट बगाली आणि मराठी मडळी आपल्या सस्कृतीचा झेंडा फडकावत ठेवण्यात पुढे असतात तामीळ लोक आपल्या इग्रजीच्या प्रभुत्वावर इतरावर छाप मारत असतात बहुतेक तामीळ मडळी शाकाहारी असतात परदेशात भारतीय शाकाहाराविषयी कुतूहल असतच त्यामुळे या मडळींचा शाकाहार परदेशात चर्चेचा विषय होतो विदेश सेवेत मराठी अधिकारी बोटावर मोजण्याइतकेच आहेत परदेशामध्ये वकिलातीत एकमेकाशी मराठी बोलता येईल असे प्रसग क्वचितच येतात

'डिप्लोमॅटिक बॅग' हे परदेशातल्या प्रत्येक वकिलातीच आन्हिक! वकिलात आणि भारतातली मत्रालय, सरकारी कचेऱ्या, तसेच आपले अन्य राजदूतावास याच्यातला पत्रव्यवहार गुप्त आणि सुरक्षित प्रकारे चालू ठेवता यावा यासाठी ही बॅग किंवा डिप्लोमॅटिक पाउचची व्यवस्था आहे ही आवश्यकता सर्व देशाच्या वकिलातींना भासत असल्यान आतरराष्ट्रीय कायद्यानुसार पूर्वापार अशा सवलतीची तरतूद आहे भारतातून सरकारी कागदपत्राव्यतिरिक्त वकिलातीच्या कर्मचाऱ्याचे टपाल, वृत्तपत्र आणि मासिक आणणारी ही पोतडी काही ठिकाणी आठवड्यातून एकदा तर काही ठिकाणी दोनदा येते

ज्या देशामध्ये एअर-इडियाची थेट सेवा आहे अशा जागी ही बॅग काही तासाच्या अवधीत येऊन पोचते मात्र जिथे ही सोय नाही तिथे ती पोचायला खूप जास्त वेळ लागतो ज्या देशातल्या आपल्या वकिलातीला पत्र पाठवायच आहे तिथल्या वकिलातीच नाव वर लिहून C/o विदेश मत्रालय, नवी दिल्ली अशा पत्त्याची भारतातून कुठूनही पाठवलेली आतर्देशीय पत्र किंवा पाकिट आधी दिल्लीला येतात आणि त्या त्या वकिलातीला पाठवल्या जाणाऱ्या बॅगमधून ती त्या देशाला रवाना होतात वकिलातीतली सर्व कुटुब बॅगची आतुरतेन वाट पाहत असतात दूरसचार क्षेत्राच्या जलद प्रगतीमुळे दिवसेंदिवस जगातल अतर कमी होत चालल आहे त्यामुळे हिदुस्थानातली महत्त्वाची बातमी टेलेक्स किंवा फॅक्सच्या सहाय्यान ताबडतोब कळू शकते टेलिफोन्सच आतरराष्ट्रीय दळणवळणही अधिक सुलभ झाल आहे तरीही डिप्लोमॅटिक बॅगन जी तपशीलवार बातमी समजते त्याची सर इतर कशालाही येत नाही

गारुड्याच्या पोतडीसारखी दिसणारी खाकी रगाची थैली वकिलातीत आली की तमाम वकिलातीला एकदम जाग येते पेंगत असलेले टायपिस्ट आपले टाईपराईटर बाजूला सारतात, पी ए. आपल्या हातातला चहाचा कप खाली ठेवतो आणि अधिकारी जणू आपण त्या गावचेच नाही अस दाखवण्याचा प्रयत्न करीत असले तरी बॅग उघडेपर्यंत उशीर झाला तरी ते ऑफिसमध्ये रेंगाळत असतात जिथे बॅग मिळायला वेळ लागतो तिथे माणस मेघदूतातल्या यक्षासारखी तिची प्रतीक्षा करतात उदा

नामीबियासारख्या ठिकाणी बॅग जायची म्हणजे ती फ्रँकफर्टला दुसऱ्या एअरलाईनवर चढवली जाते फ्लाईटची वेळ काही कारणान चुकली की काही दिवसाची निश्चिती रुमेनिया, बल्गेरिया, सेनेगाल, व्हिएटनाम या देशाच्या बाबतीत असाच काहीसा प्रकार. अशा वेळी बॅगन आलेली वर्तमानपत्र कितीतरी शिळी होऊन जातात मात्र या ठिकाणी एरवीच्या म्लान वातावरणात बॅगच्या दिवशी चैतन्य येत आणि तिथे दोन आठवड्यापूर्वीचा इडिया टुडे किंवा महिन्यापूर्वीचा फेमिना ताजाच वाटतो आणि तो अथपासून इतिपर्यंत वाचलाही जातो

जशी आठवड्यातून एकदा बॅग येते तशी आठवड्यातून एकदा ती वकिलातीतून भारताला जाते त्याही दिवशी कोलाहल असतो अर्धवट राहिलेली पत्र पुरी करायची नेमकी त्याच दिवशी घाई असते, तर बरेच अधिकारी विदेश मत्रालयाबरोबरचा हा शेवटचाच सपर्क आहे अशा थाटात बॅग बद होईपर्यंत खलिते टाईप करून घेत असतात

आतरराष्ट्रीय कायद्यानुसार (१९५१ चे व्हिएन्ना कन्व्हेन्शन) वकिलातींना तद्देशीय कायद्यापासून मुभा असते (राजनैतिक अधिकाऱ्यान चुकीच्या जागी गाडी लावली म्हणून स्थानिक पोलीस त्याच्याकडून दड घेऊ शकत नाहीत याचा वापर काही राजनैतिक अधिकारी कधीकधी हुकमी एक्क्यासारखा करतात) त्या देशाच्या सरकारकडून वकिलातींना सरक्षण दिल जात ही आतरराष्ट्रीय पद्धत सर्वत्र पाळली जाते परतु कित्येक वेळा ज्या देशाशी शत्रुत्वाचे सबध निर्माण होतात ते ही पद्धत पाळतातच अस नव्हे. पुष्कळ वेळा वकिलातींवर कठीण प्रसग गुदरतात गुडाच्या जमावान वकिलातीमधे घुसून वस्तूची नासधूस केल्याची आणि कागदपत्र पळवल्याची पुष्कळ उदाहरण आहेत १९६५ सालच्या पाकिस्तानबरोबरच्या युद्धात कराचीमधली भारताची वकिलात पाकिस्तान्यानी लुटली आणि दूतावासासारख्या अधिकाऱ्याना आपल्या [illegible] वातावरणात रहाव लागल रोजच खाणपिण मिळण्याचीही तेव्हा भ्रात निर्माण झाली होती तर १९६७ साली चीनमधे माओच्या कारकीर्दीत सास्कृतिक क्राती झाली तेव्हा भारत-चीन [illegible] रसातळाला गेले होते तेव्हा चिन्यानी एका भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यावर तो हेरगिरी करत आहे असा खोटा आरोप करून जाहीर मिरवणुकीत त्याची नालस्ती केली होती आपल्या वकिलातीन बाबापुता करून मोठ्या मिन्नतवारीन त्याची सुटका करवली

ज्या राजधान्यामधे दहशतवादाच वातावरण अधिक असत तिथे आपल्याही वकिलातींना धोका असतोच उदा बेरूत (लेबनॉन), बगोटा (कोलबिया), काबूल (अफगाणिस्थान), कोलबो (श्रीलका) अशा ठिकाणी कोणत्या क्षणी वकिलातीच्या तावदानावर बॉब येऊन फुटेल किंवा गाडीवर गोळ्या झाडल्या जातील याचा नेम नसतो आपल्या देशातल्या काही फुटीरवादी लोकाच्या कारस्थानामुळे परदेशातही कितीतरी ठिकाणी भारतीयाविरुद्ध विशेषत दूतावासाविरुद्ध धोक्याच वातावरण निर्माण

झाल आहे. विशेषत. इग्लड, अमेरिका, कॅनडा या देशामध्ये आणि युरोपमध्ये काही ठिकाणी शिखाचे अनेक दहशतवादी गट अस्तित्वात आहेत काश्मीर दहशतवादी सुद्धा अनेक ठिकाणी अशा कारवायामध्ये गुतले आहेत पश्चिम युरोप, अमेरिका आणि कॅनडात उदार मतवादी मानवी हक्काच्या धोरणामुळे दहशतवाद्याना निष्कारण आश्रय मिळताना दिसतो

[illegible] नवीन धमक्यामुळे वकिलातीमध्ये कडक सुरक्षा बदोबस्त करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे त्यासाठी लागणारी साधनसामग्री अत्यत खर्चाची असल्यामुळे कित्येक वेळा सरकारला ती परवडत नाही (उदा गोळ्यापासून बचाव करणारी काचेची तावदान, तशा प्रकारच्या गाड्या, सुरक्षेसाठी बर्गलर अलार्म इ इ ) आणि दूतावासावरचा धोका कायम राहतो दहशतवादाला बळी पडलेले एक मराठी अधिकारी श्री म्हात्रे याना बर्मिंगहॅममधून काश्मीरी दहशतवाद्यानी पळवून नेल आणि त्याचा अमानुष खून केला ही घटना महाराष्ट्र तरी विसरला नसेल दहशतवादापासून परराष्ट्र खात्याचे अधिकारी आता मुक्त राहू शकत नाहीत याच हे दु.खद उदाहरण आह.

मात्र परदेशात अडीअडचणींत सापडलेल्या भारतीय नागरिकाला वकिलातीचा केव्हाही आधार वाटतो अलिकडेच झालेल्या इराक-कुवेत सघर्षामध्ये हजारो भारतीय नागरिक निर्वासित झाले त्याची मालमत्ता एका रात्रीत नष्ट झाली हजारोंच्या सख्येन ते भारताला परतले त्याना अन्न, आश्रय आणि निवारा देण्यात आणि परत पाठवण्याची व्यवस्था करण्यामध्ये अमान (जॉर्डन), बगदाद (इराक) आणि कुवेत इथल्या वकिलातींनी अहोरात्र मदत केली त्यामुळेच सरकारला एअर इव्हॅक्युएशन यशस्वीरीत्या पार पाडता आल

अस असत वकिलातीच जग थोड कडू थोड गोड! या जगाचा नेता असतो राजदूत!

★ ★ ★

# राजदूत

राजदूत उर्फ राष्ट्रपतींचा परदेशातला दूत म्हणजे परदेशातला भारताचा सर्वोच्च प्रतिनिधी ! आणि भारताचा वकील उर्फ ॲम्बॅसडर

राजदूत म्हटल की विविध प्रतिमा डोळ्यापुढे उभ्या रहतात बव्हशी त्या ग्लॅमररसच वाटतात कारण थाटमाट, कॉकटेल पार्ट्या, शॅंपेन, उची अत्तर, हे त्याच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहेत शिष्टाचाराचा भागही असतोच पडित नेहरूच्या काळात जेव्हा भारताच्या राजनैतिक कारकीर्दीला सुरुवात झाली तेव्हा आपला राजमुत्सद्दीही इतर देशामधल्या डिप्लोमॅटस्च्या बरोबरीचा असावा, त्याला त्या देशातल्या उच्चभ्रू समाजात मिसळाव लागत त्यादृष्टीन तो परिपूर्ण असावा, थोडक्यात तो पुरुषोत्तम असावा असा आदर्श पडित नेहरूनी त्या काळात घालून दिला बुद्धिमान, अभ्यासू, हजरजबाबी परतु मितभाषी, अनेक भाषा जाणणारा, माणसाची पारख असणारा, उत्तम व्यक्तिमत्वाचा आणि अनेक कला क्रीडामध्ये निपुण असणारा, अशी त्याची आदर्श प्रतिमा निर्माण करण्यात आली आहे चाणक्यापासून अलीकडच्या काळात तालेराड आणि हॅरॉल्ड निकोल्सन या विख्यात राजनीतिज्ञानी डिप्लोमॅटला आवश्यक असणाऱ्या गुणाची, स्वभावविचाराची, वागण्याच्या पद्धतीची अनेक वर्णन केली आहेत

राजदूत हा आपल्या देशाचा परदेशातला हितरक्षणकर्ता आणि प्रवक्ता! प्रत्येक देशामधल राजदूताच काम विविध स्वरूपाच असत त्या देशाचे आणि भारताचे सबध कुठल्या स्वरूपाचे किंवा किती घनिष्ट आहेत यावर कामाचा तपशील अवलबून राहतो राजदूताकडून साहजिकच खूप अपेक्षा असतात आजकालच्या गुतागुतीच्या, सखोल आतरराष्ट्रीय व्यवहारात त्याच्यावरची जबाबदारी पुष्कळ वाढली आहे. राष्ट्रपतींचा त्या देशातला प्रतिनिधी या नात्यान परदेशात रवाना होण्यापूर्वी राजदूत आधी राष्ट्रपतींची भेट घेऊन मगच आपल्या पदाची सूत्र घेण्यासाठी रवाना होतो तिथल्या राष्ट्रप्रमुखाना भारताच्या राष्ट्रपतीच ओळखपत्र सादर केल्यावरच भारताच्या वकिलाची तिथली कारकीर्द सुरू होते हा प्रसग मोठ्या सोहळ्यान साजरा केला जातो भारताच्या वकिलाबरोबर वकिलातीतले सर्व प्रमुख अधिकारी राष्ट्रीय पोषाखात राष्ट्रप्रमुखाच्या प्रासादात जातात आणि तिथे हा समारभ पार पडतो

परदेशातल्या घटनाच निरीक्षण करून त्याच मूल्यमापन स्वगृही कळवण आणि हे करत असताना आपल्या देशाचे हितसबध कोणत्या रीतीन टिकवता आणि वाढवता येतील याबाबत उपाययोजना सुचवण आणि त्या कार्यरत करण हे राजदूताच प्रमुख काम आजकालच्या त्वरित दळणवळणाच्या जगात राजदूताकडून केवळ काय घटना घडली, हे कळण्याची अपेक्षा नसते टी व्ही वृत्तपत्र ती देतातच त्या देशातल्या परिस्थितीच्या विश्लेषणाची आणि विचारपूर्वक सल्ल्याची गरज भासते आणि राजदूत आपल्या प्रत्यक्ष अनुभवाच्या आणि अभ्यासाच्या आधारावर ती देऊ शकतो त्या देशातल्या लोकाबरोबर राजनैतिक सवाद चालू ठेवण हे वकिलीच काम राजदूताच्या दृष्टीन मूलभूत

राजदूताचा कामाचा व्याप वाढवावा तेवढा वाढू शकतो भारतीय सस्कृतीची ओळख करून देण, तिथल्या वृत्तपत्रामधे भारताची प्रतिमा अधिक स्पष्ट आणि व्यापक करण, तिथल्या विद्यापीठाना भारताविषयी माहिती उपलब्ध करून देण आणि शक्य त्या ठिकाणी त्या विद्यापीठामधे भारतावर सशोधन होण्यास मदत करण ह्या सर्व गोष्टी राजदूताच्या कामाचा भाग बनतात ह्यापैकी प्रत्यक्षात किती घडत हे राजदूताच्या पुढाकारावर अवलबून असत अर्थात या पुढाकाराच स्वरूप ज्या देशात तो भारताच प्रतिनिधित्व करत आहे, त्या देशावरही अवलबून असत उदा काही देशामध्ये भारताविषयी मुळातच बऱ्यापैकी लेखन-वाचन केलेली माणस असतात जर्मनी, ब्रिटन, अमेरिका या देशामध्ये भारत-विशेषज्ञाचा (Indologists) एक गटच आहे अशा ठिकाणी राजदूताच्या कामाच स्वरूप निराळ असत या उलट असे काही देश असतात

जिथे भारताविषयी फारशी माहितीच नसते तिथे राजदूताला श्रीगणेशापासून सुरवात करावी लागते (उदा द अमेरिकेत ब्राझील, चिली, कोलंबिया किंवा आफ्रिकेतले काही देश) भारत म्हणजे हत्ती, वाघ, आणि साधूंचा देश हा गैरसमज अजूनही काही ठिकाणी प्रचलित आहे. तो दूर करून भारताची योग्य ती आधुनिक बाजू जगाला दाखवण हे राजदूताच महत्त्वाच काम ठरत

भारत हा उद्योजक देश आहे. तिथे मोठ्या प्रमाणावर कारखानदारी, विज्ञान-तंत्रज्ञान तसच शेती यात प्रगती झाली आहे देशात शास्त्रज्ञ, टेक्निशियन्स, इंजिनियर्सची सख्या प्रचड (जगात तिसऱ्या क्रमांकाची) आहे याच समर्थपणे चित्रण करण हे राजदूताच अग्रकार्य भारतातून होऊ शकणारी निर्यात आणि भारतात गुंतवणुकीसाठी तसच उद्योगधंद्यासाठी पोषक परिस्थितीचा वाव या संदर्भात राजदूताच्या कामाला तर अमर्यादित सधी असते

भारताच प्रतिनिधित्व परदेशात करण्याच्या बरोबरीन त्या देशाबद्दलची अधिकाधिक माहिती भारताला कळवण ही देखील राजदूताची जबाबदारी मात्र कधी कधी तिथल्या सरकारबरोबर अत्यत मैत्रीपूर्ण सबंध निर्माण झाल्यावर त्या देशाचे भारताबरोबरचे सबध अधिक घनिष्ट व्हावेत या हेतून, राजदूत त्या देशाचीच भारतात तरफदारी करायला लागतो त्याची 'लोकलायटिस' उर्फ स्थानिक रोग अशी राजनैतिक भाषेमधे व्याख्या करण्यात आली आहे. दिल्लीपासून अधिक काळ दूर राहिल्यावर अस घडण अशक्य नाही त्यावरचा एक उपाय म्हणजे दिल्लीला जाऊन परराष्ट्र मत्रालयाच्या मुख्य कार्यालयाशी वारवार सल्लामसलत्त करण, आणि नित्य नवी ताजी दृष्टी घेऊन त्या देशाला परतण दुसऱ्या भाषेत सोनाराकडून कान टोचून घेण

परदेशातल्या उच्चभ्रू समाजातील व्यक्तींशी ओळखी करून घेण राजदूताला आवश्यक ठरत तिथल्या सरकारी वर्तुळात राजदूताची छाप पडण्यासाठी ते महत्त्वाच असत अनेक क्षेत्रातल्या नामवत लोकाशीही सबध ठेवायचा राजदूताचा प्रयत्न असतो त्याच काम केवळ ऑफिसमध्ये बसून होण्यासारख नव्हेच लोकामध्ये मिसळून तिथल्या रीतिरिवाजाची माहिती करून घेण, तिथल्या घडामोडींशी सतत सपर्क ठेवण, यासाठी औपचारिक रीतीन लोकाना भेटत राहण हा त्याच्या कामाचाच एक भाग अशावेळी राजदूताला तिथली भाषा उत्तम तऱ्हेन बोलता आली तर तिथल्या समाजात प्रवेश मिळवण आणखी सुकर होत विदेश सेवेत रुजू झालेल्या अधिकाऱ्याच्या प्रशिक्षणात एका परकीय भाषेचा अभ्यास हा आवश्यक विषय असतो त्याचेही तेच कारण आहे, कारण पुढे त्याच ठिकाणी बदली करून त्याच्या भाषेवरच्या प्रभुत्वाचा उपयोग करून घेता येईल अशी सरकारची अपेक्षा असते राजदूताची पत्नीही तिथली भाषा शिकून

आपल्या पतीच काम सोप करू शकते राजदूताची विविध विषयामधली गोडीही अशा वेळी पूरक ठरू शकते सगीत, नाटक, टेनिस, गॉल्फ, ब्रिज इत्यादींची आवड भेटीगाठींची सधी प्राप्त करून देते स्नेहमय वातावरणात वेळ घालवल्यान परिचय आपोआपच वाढतो 'मेजवान्या' हा देखील राजदूताच्या कामाचा रजक परतु आवश्यक भाग! कॉकटेल पार्टीमधे पाच मिनिटाच्या सभाषणामधे अनेक व्यक्तींकडून देशाच्या दृष्टीन जी माहिती मिळते ती फार महत्त्वाची ठरते

वकिलात ही जरी सरकारी कचेरी असली तरी परदेशात तिच स्वरूप कुटुबासारख विशेषत प्रतिकूल परिस्थितीत एकत्र राहण्याची वेळ आल्यावर परस्पर सबधामधले सरकारी पाश आपोआप कमी होतात राजदूताच्या कुटुबाची आणि दूतावासातल्या इतर कुटुबाची वारवार गाठभेट होत असते, त्यामुळे राजदूत आणि इतर कर्मचाऱ्यामधली औपचारिकपणाची भिंत आणखीनच कमी होते अर्थात् त्याचबरोबर त्याच्या आयुष्याचा खाजगी भागही फारसा रहात नाही काही वेळा असे प्रसग निर्माण होतात की राजदूत आणि इतर अधिकाऱ्याना धोक्याच्या प्रसगातून जाव लागत, काहीं कारणान त्या विशिष्ट देशाचे आणि भारताचे सबध बिघडतात तणाव वाढतात त्याचे परिणाम स्वाभाविकपणे भारतीय दूतावास, त्याचे अधिकारी आणि त्याचे कुटुबीय याना भोगावे लागतात उदा १९७५ साली बागला देशमध्ये झालेल्या शेख मुजीबर रहमान याच्या अमानुष हत्येनतर बागला देश आणि भारत यामधले सबध गढूळ झाले होते त्यावेळी तर उच्चायुक्तावर गोळ्याही झाडण्यात आल्या होत्या ज्या ठिकाणी अशी संकटग्रस्त परिस्थिती निर्माण होते तिथे काही वेळा तर बाहेरच्या जगाशी दळणवळण देखील तुटत अशा परिस्थितीत वकिलातीच्या कुटुबियाना राजदूताचा आधार वाटतो लष्करात अधिकारी असण म्हणजे केव्हा ना केव्हा तरी फ्रटवर जाऊन लढाई करण, आपल्या सैनिकाच मनोधैर्य टिकवण हेहि क्रमप्राप्त त्याचप्रमाणे या लढाई सदृश परिस्थितीत फ्रटवर असल्याप्रमाण त्या बिकट परिस्थितीशी सामना करण, वकिलातीतील अधिकारी, कर्मचारी आणि त्याचे कुटुबीय याच मनोबल टिकवण हे आलच राजदूताच तेही एक महत्त्वाच काम!

आपल्या देशातली सद्यःपरिस्थिती काय आहे याचीही जाणीव राजदूताला सतत ठेवावी लागते सरकारच्या ज्या धोरणावर राजदूत अवलबून असतो, त्याच्यात काही बदल झाला आहे काय हेही पडताळून पाहाण आवश्यक असत, कारण भारतातही परिस्थिती झपाट्यान बदलत असते त्या दृष्टीन दर दोन वर्षांनी स्वदेशी जाण्यासाठी मिळणारी रजा अत्यावश्यक ठरते विशेषत व्हिएटनाम, रुमेनिया, पेरू, मगोलिया यासारखी ठिकाण जिथे दुसरा भारतीय औषधालाच दिसणार आणि एकाकीपणाच

साबट सतत जाणवणार, तिथे दोन वर्षं काढल्यावर जवळ बाळगलेला मानसिक सयमाचा शिधा सपुष्टात येतो आणि आपण हजारो मैल दूर आहोत ही जाणीव परत वर उसळ्या मारायला लागते, हे जावे त्याच्या वशा तेव्हाच कळे! तेव्हा मानसिक स्वास्थ्याच्या दृष्टीने भारतात जाऊन येण फार महत्त्वाच ठरत परदेशात सदैव औपचारिकपणाच्या ओझ्याखाली वावरायचा एव्हाना कटाळा आलेला असतो भारतात परतल की ही झूल उतरवता येते

दर दोन वर्षांनी परत गेल्यावर कितीतरी बदल जाणवत असतात देशाबद्दलची जी प्रतिमा परदेशात बाळगलेली असते तिच्यातही बदल झालेला असतो लोकाच्या मूल्यामध्ये होत असलेला फरकही दरवेळी जाणवतो हिंदुस्थानातली तरुण पिढी परदेशातल्या तरुण पिढीपासून फारशी वेगळी नाही हुशारी आणि आत्मविश्वासाची जोड असलेल्या या पिढीला नैतिक मूल्याची फारशी पर्वा वाटेनाशी झाली आहे हे भारतात आल्यावर कळत आई वडिलाची तब्येत खचलेली असते काही कौटुबिक प्रश्न तातडीने सोडवायचे असतात ज्या देशामध्ये वैद्यकीय सेवा प्रगत नसते त्या देशातून रजेवर आल्यावर वैद्यकीय तपासण्या करून घ्यायच्या असतात टाझानिया, ब्रह्मदेश, भूतानसारख्या ठिकाणी कुणाला अमीबायसीस झालेला असतो तर एडन, मलावी, मॉरिशस या देशामध्ये कुणाला वारवार ब्रॉकायटिस होत असल्याच आढळून आलेल असत त्यामुळे ही रजा विदेश सेवेतल टॉनिक ठरत

एखाद्या ठिकाणी आपली बदली व्हावी अशी इच्छा असल्यास त्याच सूतोवाच देखील करता येत अर्थात् हा प्रकार जरा धोकादायक ठरू शकतो उदा ऑस्ट्रेलियाला जाण्याची इच्छा व्यक्त केल्यावर फिजीला बदली झाल्याची ऑर्डर येते किंवा अमेरिकेला जायच आहे म्हटल्यावर जमेकाला बदली होऊ शकते मग निदान सर्वसाधारण दिशा तीच आहे यावर समाधान मानायची वेळ येते हा विनोद सर्वच देशाच्या विदेश सेवेत होत असावा त्यामुळे जे मनात असेल त्याच्या विरुद्ध मागाव म्हणजे हव ते मिळेल अशी डिप्लोमॅटस् एकमेकाची थट्टा करतात मात्र लोखडाचीच कुऱ्हाड हवी म्हणणारे महाभागही विदेश सेवेत आहेत ढाक्याहून काबूलला जाण्याची इच्छा प्रदर्शित करणारे अधिकारी विरळाच, पण ज्याना कामात सतत राजकीय भक्ष्य हव असत त्याना ते हॉलड अथवा डेन्मार्कमध्ये राहून कस मिळणार?

राजदूताच्या पातळीवरच्या नियुक्त्या दोन प्रकारच्या असतात परराष्ट्र सेवेतले वरिष्ठ अधिकारी अथवा करियर डिप्लोमॅटस् हा झाला एक प्रकार. दुसऱ्या प्रकारामधे राजकीय नियुक्त्या मोडतात उदा शिक्षणमत्री श्री छागला वॉशिंग्टनमध्ये राजदूत

होते तर श्री नुरुल हसन मास्कोत भारताचे वकील होते श्री ना ग गोरे यानी लडनमध्ये भारतीय उच्चायुक्ताच पद काही काळ भूषवल पजाब पोलिसचे मुख्य श्री रिबेरो याची अलिकडची रुमेनियातील नियुक्ती व जनरल बेवूर याची डेन्मार्कच्या वकीलपदी झालेली नेमणूक ही राजकीय नियुक्त्याची काही ठळक उदाहरण म्हणता येतील लडन, वॉशिंग्टन या ठिकाणी राजकीय नियुक्त्याची जणु प्रथा पडली आहे

नागालँड, मिझोराम, सिक्कीमहून आलेल्या अधिकाऱ्यापैकी कुणाची दक्षिण किंवा पूर्व आशियाई देशात राजदूत म्हणून नियुक्ती होते तेव्हा कित्येक वेळा विनोदाचे प्रसग निर्माण होतात, कारण स्थानिक लोक त्याला आपल्यातलाच एक समजतात आणि त्याला तसच वागवतात रस्त्यावर, बाजारात, सिनेमागृहात, होटेलच्या मोठ्या मेजवान्यामधे, जिकडे तिकडे त्याला हाच अनुभव येतो मी 'भारताचा' राजदूत आहे अस मग विनवण्या करून सागायची त्याच्यावर वेळ येते

मिझोराममधला भारताचा एक राजनैतिक अधिकारी हाँगकाँगमधे असताना तिथल्या पोलिसानी त्याला चोर म्हणून पकडल होत आणि कित्येक तास पोलिस चौकीवर अटकेत ठेवल होत कारण त्याचा चेहरा म्हणे एका चिनी गुन्हेगाराशी मिळता जुळता होता त्यान गयावया करून मी भारतीय वकिलातीतला अधिकारी आहे अस पोलिसाना समजावण्याचा खूप प्रयत्न केला पण त्याची कुणी दखल घेतली नाही अखेर सतत आठ तासानतर त्याला भारतीय उच्चायोगामधे टेलिफोन करायची परवानगी देण्यात आली तेव्हा हा घोटाळा उलगडला ही घटना तिथल्या वर्तमानपत्रातही छापून आली होती तसच व्हिएटनाममधे मेघालयाच्या एका खासी अधिकाऱ्याला स्थानिक लोकानी निदर्शनाच्या जवळून चालला म्हणून पकडून बाजूला काढल आणि बडवल त्यान खूप सागायचा प्रयत्न केला तरीही तो व्हिएतनामी नाही हे मानायलाच कुणी तयार नव्हत राजदूताला स्वत ला अशा अनुभवातून जाव लागल तर उभय देशाच्या सबधावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते

राजदूत म्हणून नियुक्ती झालेल्या देशात राजदूताला आपली मातृभाषा वापरता आली तर ते अधिक चागल कारण भाषेमुळे त्याची परिणामकारकता आणखी वाढू शकते आणि त्यालाही त्या जागेचा पूर्ण उपभोग घेता येतो शेजारी देशामधे हे शक्य होतही उदा ढाक्याशी आपले राजनैतिक सबध प्रथम सुरू झाले तेव्हा आपले तिथले उच्चायुक्त बगाली भाषिक श्री एस् दत्ता हे होते भाषेची भूमिका काहीशी माऊलीसारखी तिच्यावरच्या प्रेमान उभय देशामधले सबध दृढ व्हायला आणखी मदत होते

★ ★ ★

# राजदूत आणि शिष्टाचार

राजदूताच्या आयुष्यात घरी मेजवान्या देण हा आवश्यक भाग त्या देशातल्या महत्त्वाच्या व्यक्तींबरोबर जवळचे सबध प्रस्थापित करण्यासाठी तिथले परराष्ट्रमत्री, इतर मत्री, उच्चस्तरीय अधिकारी आणि समाजाच्या विविध क्षेत्रातल्या प्रतिष्ठित व्यक्ती याना काही ना काही प्रयोजनान घरी जेवायला बोलावण राजदूताला उपयुक्त ठरत तर भारतातले मत्री, ससद सदस्य, महत्त्वाची शिष्टमडळ त्या देशात आल्यावर वकिलाच्या घरी मेजवानी ठरलेलीच आपले पतप्रधान जेव्हा एखाद्या देशाच्या अधिकृत भेटीवर जातात तेव्हा त्याच्यातर्फे यजमान देशातल्या पुढारी आणि प्रमुख व्यक्तींसाठी राजदूताच्या घरी भोजन समारभ किंवा स्वागत समारभ साजरा करायची प्रथा आहे.

मेजवानी म्हटली की त्यातला शिष्टाचार आणि सुरापानही महत्त्वाच स्थानिक अधिकाऱ्याशी काही बोलायच झाल तर दोघाच्या हातात ड्रिंक्सचे ग्लास असल्यावर बोलण्यातला ताण आपोआपच कमी होतो मदिरापान हा राजनैतिक शिष्टाचाराचा एक अपरिहार्य भाग आहे अर्थात् मदिरापान न करणारे अधिकारीही भारतीय विदेश सेवेत अनेक आहेत आपल्या देशात सुरापानाची प्रथा नसल्यान ते केलच पाहिजे असा आग्रह नसतो मात्र यजमान स्वत च मदिरेच सेवन करत नाहीत म्हटल्यावर आलेल्या पाहुण्याला स्वत हून घ्यायला सकोच वाटतो मग ही बैठक लगेच समाप्त

होते २६ जानेवारीचा गणतंत्र दिवस जगभर आपल्या वकिलातींमध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा होतो मात्र त्या दिवशी सुरापान नसते, त्यामुळे बहुतेक ठिकाणी परदेशी पाहुणे लगेच काढता पाय घेतात अर्थात् चमचमीत भारतीय पदार्थांची रेलचेल मदिरेची उणीव काही अशी भरून काढते त्याच दिवशी ऑस्ट्रेलिया हा देशही आपला स्वातंत्र्यदिन साजरा करतो, त्यामुळे परदेशी पाहुण्याची फार मोठी सोय होते आधी ऑस्ट्रेलियाच्या दूतावासात मदिरेच सेवन करून मग ते भारतीय पदार्थांचा आस्वाद घ्यायला भारतीय दूतावासात येतात 'आणि तदुरी चिकनवर ताव मारतात अर्थात् हा नियम राष्ट्रीय दिनालाच लागू आहे. एरवी राजदूताच्या मेजवानीत मदिरेच्या अनेक प्रकाराचा आस्वाद घेता येतो 'दारू' हा सभाषणातला एक विषयही होऊ शकतो, त्यामुळे कुठल्या प्रकारची वाईन चागली, उदा रेड वाईन जितकी जुनी तितकी चागली अगदी मुरलेल्या लोणच्यासारखी ! कुठल्या देशाची व्हाईट वाईन अधिक चागली तर जेवणात कोणत्या पदार्थाबरोबर कोणती वाईन घ्यायची याची माहिती डिप्लोमॅटला असण आवश्यक आहे.

टेबलाची सजावट, काटासुऱ्याची माडामाड, फुलदाणीत सजलेली फुल, कडक इस्त्रीचा टेबल क्लॉथ हे सर्व राजनैतिक शिष्टाचाराचे आवश्यक घटक आहेत टेबलावर कुणी कुठे बसायच यातही शिष्टाचार पाळावा लागतो मुख्य जागी यजमान आणि यजमानीणबाई असतात यजमानीणबाईच्या उजव्या बाजूला मुख्य पाहुणे आणि यजमानाच्या उजव्या बाजूला मुख्य पाहुण्या बसतात मेजवानीत मुख्य पाहुणे कुणीच नसल्यास कित्येक वेळा राजनैतिक वर्तुळात ज्या देशाचे राजदूत सीनियर (त्या देशातल्या वास्तव्यानुसार) त्याना हा मान द्यायचा असतो

पाहुण्याच्या ग्लासात वाईन ओतण्यापूर्वी यजमानानी त्या वाईनची चव घ्यायची हा जुना युरोपियन व्यवहार आहे, त्यामुळे पार्टीतही वेटर प्रथम यजमानाला वाईन देतो यजमानानी समतिदर्शक रुकार भरला की मगच पाहुण्याचे ग्लास भरले जातात वेटरन पाहुण्याच्या डाव्या बाजून वाढायच असत सर्व जेवण पानात एकत्र वाढायच ही खास भारतीय पद्धत मात्र परदेशी पाहुण्याचा त्यामुळे गोंधळ उडतो कशाशी काय खायच याचा त्याना पत्ता लागत नाही मग कुणी पुरीचा द्रोण बनवून त्यात भात घालून खातात, तर काट्यासुरीन चपाती खाताना भाजी कशी खायची असा त्याना प्रश्न पडतो बर, पाश्चात्य पद्धतीप्रमाणे भारतीय जेवणातले एका वेळी एक किवा दोन पदार्थ टेबलावर पाठवायचे म्हणजे नऊवारी साडी लुंगीसारखी नेसून दाखवण्यातला प्रकार आहे सात आठ पदार्थ टेबलावर असल्याशिवाय पाहुणचार व्यवस्थित होत आहे अस आपल्या भारतीय गृहिणीला वाटतच नाही यातून मार्ग

काढायचा म्हणजे ज्या दोन पदार्थांची जोडी जमेल असे पदार्थ दोन दोन करून टेबलावर पाठवायचे उदा छोले-भटुरे, पुलाव-करी किंवा तदुरी-चिकन-नान तदुरी चिकन या पदार्थान राजनैतिक मेजवान्यामध्ये राजाच स्थान पटकावल आहे. जगाच्या कुठल्याही भागात, कुठल्याही देशाच्या लोकामध्ये भारतीय जेवणाच नाव काढताच तदुरी चिकन लोकाना माहिती असत प्रत्येक राजदूताला आपल्या जेवणात तदुरी चिकनचा केव्हा ना केव्हा समावेश करावाच लागतो पापडही जगन्मित्र झाला आहे. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य देशातल्या पाहुण्याना पापड सारखाच आवडतो

जो प्रश्न भारतीय गृहिणीला पडतो तोच इतर पौर्वात्य देशातल्या गृहिणींना पडत असावा त्याच्याही जेवणात आपल्यासारखे सर्व पदार्थ एकत्र वाढून घेण्याची पद्धत आहे त्यानाही आपल्यासारखी तोड काढावी लागत असणार पाहुण्यासाठी श्रम घेऊन पदार्थ तयार करण हे भारतीयाच खास वैशिष्ट्य आहे. केवळ जेवण बनवण्यावर इतके श्रम वाया घालवायला इतर देशातल्या फार कमी लोकाची तयारी असते याला केवळ फ्रेंच लोकाचाच अपवाद असू शकेल जगभर अजूनही चिनी जेवणान मिळवलेला अग्रक्रम कायम आहे परतु भारतीय भोजनाचा क्रमाकही जवळपास आहे हे निश्चित

जेवणाच्या टेबलावर प्रत्येकाच्या प्लेटपुढे तीन ग्लासाची रागोळी असते व्हाईट वाईन, रेड वाईन आणि शेवटी शँपेन पाण्याचा ग्लासही जोडीला असतोच कोणत्या पदार्थाबरोबर कोणती वाईन घ्यायची त्याचही एक शास्त्र असत उदा फिशबरोबर व्हाईट वाईन! जे अधिकारी दारू घेत नाहीत त्याना वाईनच्या जागी फळाचा रस आणि क्रमाक्रमान पाणी द्याव लागत राजनीति आणि शाकाहार याची सागड बसणही जरा कठीणच परदेशीयासाठी करायच्या मेजवानीत मासाहारी पदार्थ ठेवावे लागतात, कारण त्याशिवाय त्याना जेवल्यासारख वाटणही कठीण अर्थात् भारतीय मेजवान्यामध्ये शाकाहारी आणि मासाहारी पदार्थांचा समतोल असतो मात्र परदेशीयाकडे जेव्हा मेजवानीला जायचा प्रसग येतो तेव्हा मात्र शाकाहारी अधिकाऱ्याची पचाईत होते जेव्हा टेबलावर मोजक्याच लोकाच जेवण असत तेव्हा तर आपल्या शाकाहारी आहाराबद्दल यजमानाला आधी नीट माहिती कळवण अत्यत आवश्यक असत नाहीतर पहिल्याच कोर्समध्ये सलाडच्या पानावर सजवलेली कोळबी समोर येते आणि ती काजूसारखी दिसली तरी शिष्टाचार म्हणून पोटात ढकलण केवळ अशक्य मग इतराच खाऊन होईपर्यंत सलाडची पान चिवडत बसाव लागत आणि आयत्या वेळी एखादी व्यक्ती शाकाहारी आहे हे समजल की मग मीटचे तुकडे काढून टाकलेल सूप शाकाहारी सूप म्हणून समोर येत, तेव्हा यजमानाला शाकाहाराबद्दल पूर्वसूचना दिलेली केव्हाही चागली किंबहुना ती आवश्यक आहे.

परदेशीयाची शाकाहारबद्दलची कल्पनाही फार वेगळी असते 'मासे' हा ते शाकाहार समजतात मीट खात नाही म्हटल्यावर फिश तर चालेल ना, हा पहिला प्रश्न असतो आणि एखादा अधिकारी अंडीसुद्धा खात नाही हे समजल्यावर परदेशी यजमानीण बाईचा चेहरा पाढरा पडतो कारण या व्यक्तीला जेवण द्यायच तरी काय हा साधा सरळ प्रश्न तिच्यासमोर उभा राहतो भाजीपाला ही त्याच्या जेवणातली केवळ साईड डिश असते मुख्य पदार्थ मीट, चिकन अथवा फिशचा असतो त्यामुळे नुसत्या उकडलेल्या भाज्या प्लेटवर द्यायला तिला सकोच वाटण स्वाभाविक आहे कित्येक वेळा मग जेवणाच्या टेबलावर शाकाहार हा सभाषणाचा मुख्य विषय होऊन बसतो त्याविषयी लोकाना अतिशय कुतूहल असत आणि हल्लीच्या काळात कोलेस्टेरॉलच्या भीतीमुळे जगात सर्वत्र शाकाहाराच महत्त्व लोकाना अधिकाधिक जाणवू लागल आहे.

मात्र राजनैतिक मेजवान्यामध्ये अशा व्यक्तींची थोडीफार गैरसोय होते हे नक्कीच स्वत चा शाकाहार कायम ठेवून तिथल्या स्थानिक राजनैतिक वर्तुळात कुतूहलाच स्थान बनणारे अधिकारी विदेश सेवेत थोड्याफार प्रमाणात आहेत शाकाहारी भारतीय जेवण पाहिल्यावर इतके विविध प्रकार त्यात असू शकतात याच परदेशीयाना कौतुक वाटत कित्येक राजदूत तिथलेच स्थानिक शाकाहारी पदार्थ शोधून काढतात आणि त्याच महत्त्व लोकाना सुनावतात उदा मास्कोत ब्लिनी (रशियन डोसा), जिनिव्हामधे राकलेट (चीज आणि बटाटे), पॅरिसमध्ये क्रेप (घावन) आणि सिओलमध्ये बिपेन भाप (परतलेल्या भाज्याबरोबरचा भात)

मेजवानीमधली भाषण हाही राजनैतिक शिष्टाचाराचा एक आवश्यक भाग (किंवा राजनैतिक मुत्सद्याचा तो एक गोड गैरसमज) जात्यावर बसवल्यावर स्त्रियाना जशी ओवी सुचायची तसा शॅंपेनचा ग्लास हातात आल्यावर राजदूताला भाषण स्फुरत असाव अर्थात् ज्याचा निरोप समारभ असेल त्याचे आपण आणि त्यान आपल गुणगान करायच हे ओघान आलच अस भाषण जेवणाच्या शेवटी होत मग यजमान मुख्य पाहुण्याच्या स्वास्थ्यासाठी आणि यशासाठी शॅंपेनचा ग्लास हातात उचावून 'टोस्ट' सादर करतो त्याला 'टोस्ट' का म्हणतात हे मला अजूनही न उमगलेल कोड आहे.

या मेजवान्यामध्ये राजदूताच्या पत्नीची भूमिका असते ती ऑर्केस्ट्रा कडक्टरची वाईन्स वेळच्या वेळी टेबलावर येण, पदार्थ सपल्यावर टेबलावर रिकाम्या डिशेस् फार वेळ राहू न देता वेटर्सनी येऊन त्या लगेच उचलण, बशाचा आवाज होऊ न देण, ठरलेले पदार्थ योग्य त्या क्रमान आणले जाण, ते यायला उशीर होतोय अस दिसल की टेबलावर पाहुण्याना सभाषणात गुतवून ठेवण हा तमाम ऑर्केस्ट्रा मुख्य जागेच्या आपल्या खुर्चीवर बसून तिला सादर करावा लागतो जेवण झाल्यावर कोनॅकच्या

ग्लासाबरोबर जेवल्याची पावती देऊन सिगारची दक्षिणा घेऊन पाहुणे बाहेर पडतात मेजवानी यशस्वीरीत्या पार पडल्यावर तिला होणारा सुटकेचा आनद काय असतो याच वर्णन करण अशक्यच स्वत मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही एवढच त्या स्वर्गीय आनदाच्या सदर्भात म्हणता येईल

कॉकटेल पार्टी हाही राजनैतिक शिष्टाचाराचा आणि राजदूताच्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग थोडक्या वेळात अनेक तऱ्हेची माहिती तिथे मिळवता येते एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीबरोबर त्याला बाजूला घेऊन राजदूत त्याच्याशी खाजगी बोलू शकतो गावात काय काय घडतय, राजकीय वारे कोणत्या दिशेने वहात आहेत याचा त्याला अदाज घेता येतो प्रत्येक देशाच्या स्वातत्र्य दिनानिमित्त होणाऱ्या कॉकटेल पार्ट्यांना हजर राहण हाही एक महत्त्वाचा भाग या पार्ट्यांना राजदूताला जावच लागत नाहीतर त्या देशाचा तो अपमान समजला जातो प्रत्येक देशाच्या स्वातत्र्यदिन समारभाच स्वरूप ठरलेल श्रीमत देशाना तो हॉटेलात साजरा करता येतो मग राजदूतीणबाईना मेहनत करावी लागत नाही मात्र ज्या देशाना आर्थिक सवलत कमी त्याना वकिलातीत किंवा राजदूतनिवासात हा समारभ करावा लागतो भारताचे राष्ट्रदिन समारभ बहुताशी राजदूतनिवासात होतात जिथे भारतीय रेस्टॉरटस् आहेत तिथे त्याचा उपयोग करून घेता येतो आणि पदार्थांची ऑर्डर दिली जाते मात्र जिथे ही व्यवस्था नाही अशी ठिकाणही अनेक आहेत मग लग्नाच्या रिसेप्शनची तयारी करावी त्या अदाजान सामोसे, गुलाबजाम बनवण्याची जबाबदारी राजदूतीणबाईच्या शिरावर येऊन पडते इतर अधिकाऱ्याच्या पत्नीही मदतीला येतात आणि निवासाला खरच लगीनघराच स्वरूप येत. राजदूताकडे आचारी असेल तर त्याला इतर लोकासमोर आपल्या पाककलेच प्रदर्शन करायची सधी मिळते आणि त्याला चेव चढतो

आठवडाभर आधी ही तयारी चालते मग बनवून ठेवलेले समोसे फ्रीजरमध्ये ठेवून ते आयत्यावेळी तळून गरम गरम टेबलावर द्यावे लागतात अशावेळी स्वयपाकघराची अवस्था होते एखाद्या हलवायाच्या दुकानासारखी मग गुलाबजाम, समोसे, बर्फी, कबाब टेबलावर सजून पाहुण्यासाठी सिद्ध होतात केलेले पदार्थ पुरेसे आहेत की नाहीत या चितेची झळ चेहऱ्यावर यत्किचितही दिसू न देता आल्या गेल्याशी औपचारिक गप्पा मारण्याच्या कलेत एव्हाना राजदूतीणबाई चागल्याच निष्णात झालेल्या असतात दुसऱ्या देशाच्या राष्ट्रीय दिनाच्या समारभाला हॉटेलमध्ये गेल्यावर बुफेची माडलेली आरास पाहिली आणि नटून थटून कॉफ्यूर करून आलेली राजदूताची पत्नी स्वागताला उभी असलेली पाहिली की आपल्या आयुष्यातही एक दिवस असा उगवेल अस स्वप्न पाहात आपल्या राजदूतीणबाई स्वत च समाधान करून घेतात

गरम हवेच्या ठिकाणी या कॉकटेल पार्ट्या बागेत होतात यातही मजेदार प्रसग निर्माण होतात पार्टीची सर्व तयारी होऊन टेबल पदार्थांच्या माडामाडी सकट सजली की पाण्याचे शिंतोडे येतात एव्हाना बाहेरचे पाहुणे यायला जेमतेम अर्धा पाऊण तास शिल्लक असतो मग परीटघडीच्या कपड्यानिशी वकिलातीचे लोक ती टेबलासकटची सजावट आत आणतात घर लहान पडेल म्हणून हा खास बागेचा घाट घातलेला असतो आता घरात पाहुण्याची दाटीवाटी होणार या चिंतेन राजदूतीणबाई अस्वस्थ होतात आणि खरोखरच पाहुण्याची रस्सीखेच व्हायची वेळ येते ही सर्व यातायात करायला लावल्यानतर पाऊस नुसता वाकुल्या दाखवून केव्हाच गायब झालेला असतो घरातली गर्दी आपोआप बाहेर ओसडू लागते आणि घरात सुरू झालेली पार्टी बागेत सपते

कॉकटेल पार्टीच खास वैशिष्ट्य म्हणजे दरवेळी दिसणारे अनोळखी चेहेरे. एखाद्या ठिकाणी नवीन बदली होऊन गेल्यावर सुरुवातीच्या काळात कॉकटेल पार्ट्यांचा अनुभव फार लक्षणीय असतो समोवताली अनोळखी चेहऱ्याचा समुद्र असतो मग प्रत्येकाशी हसून हस्तादोलन करून स्वत ची ओळख करून द्यायची आणि झिम्म्याची एक टाळी देऊन पुढे जाव तस पुढच्या माणसाच्या हातात हात मिळवून तीच रेकॉर्ड परत लावायची अर्थात् काही वेळा एखादी व्यक्ती खूप आवडून जाते मग तिच नाव गाव टिपून परिचय वाढवता येतो आपल्या नावाची कार्ड कॉकटेल पार्टीमधे नेहमी जवळ ठेवावी लागतात विशेषत जपानसारख्या देशात जोपर्यंत हातात कार्ड दिल जात नाही तोपर्यंत ओळख झाली अस गृहीतच धरल जात नाही

राजदूताच्या दृष्टीन कॉकटेल पार्टीची सध्याकाळ महत्त्वाची ठरू शकते उदा एखादी राजवट उलथून पडणार असेल म्हणजेच कू होणार असेल तर त्याची कुणकुण आधल्या सध्याकाळच्या कॉकटेल पार्टीत लागू शकते आणि राजदूत आपल्या सरकारला पुढली बातमी पाठवायला सज्ज राहतो उदा दक्षिण कोरियात विरोधी पक्षाचे नेते किम दे जुग याना तुरुगातून सोडून देण्याचा निर्णय तिथल्या राजकारणामधे फार महत्त्वाचा होता त्याची माहिती आधल्या दिवशीच्या कॉकटेल पार्टीत आपल्या तिथल्या राजदूताला अनौपचारिकरीत्या कळली होती सयुक्त राष्ट्रसघात अशा पार्ट्या आणखी महत्त्वाच्या ठरू शकतात कोणत्या देशाचा मुद्दा काय आहे किंवा कोणत्या प्रकारचा ठराव माडला जाणार आहे, एखादा ठराव मजूर होईल की नाही याबद्दल कुठला देश निवेदन करणार आहे ही महत्त्वाची माहिती अशा कॉकटेल पार्टीमध्ये मिळू शकते

नवीन नवीन क्षेत्रातल्या लोकाच्या ओळखी करून घ्यायला देखील कॉकटेल पार्टी ही उत्तम सधी असते पत्रकारितेमधे जे स्थान पत्रकार परिषदेच, ते राजनैतिक वर्तुळात कॉकटेल पार्टीच असत!

काही राजदूत महाशय राजनैतिक जगातल्या खुमासदार चर्चेचा विषय होतात कारण त्याची व्यक्तिमत्त्व त्याच्या व्यवसायासारखीच इंद्रधनूच्या रगाची असतात

आपल्या पूर्वीच्या एका राजदूताला शिकारीची फार हौस! ऑफिसमधल काम त्याना फार रटाळ वाटत असे ऑफिसातही ते शिकारीच्या परिभाषेतच बोलत असत "कुछ तीतर बीतर है?" अशी त्यानी आरोळी दिली की त्याचा शिपाई येऊन हजर होत असे ते आपल्या पी ए. ला डिक्टेटर म्हणूनच हाक मारत ऑफिसमध्ये कसा बसा काही वेळ घालवून ते घरचा रस्ता सुधारत आणि घरून सर्व ऑफिसातल्या लोकाना फोन करून ते जागेवर आहेत की नाहीत याची खात्री करून घेत त्याच हे शिकारीच वेड इतक पराकोटीला गेल होत की एकदा त्या देशाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याशी औपचारिक चर्चेच्या वेळी हे राजदूत महाशय शिकारीशिवाय दुसर काही जेव्हा बोलेनात तेव्हा त्या अधिकाऱ्यान लवकरच काढता पाय घेतला

तर पूर्वीचे एक सस्थानिक राजदूत ऑफिसमधेही तस्त घेऊन बसत ते पानाच्या पिचकाऱ्या मारण्याच्या बेतात असताना त्याच्या बरोबर असलेला सबधित अधिकारी तिथून पलायन करत असे याच राजदूत महोदयानी पत्नीच्या जागी आपल अगवस्त्र जाहीररीतीन पार्ट्यामध्ये पेश करायला सुरुवात केली आणि त्याच स्पष्टीकरण देताना सरकारच्या नाकीनऊ आले एका राजदूतान राजदूतनिवासातल्या स्वत च्या शयनगृहात आपल्या अगवस्त्राला राजरोस प्रवेश देऊन लग्नाच्या बायकोची रवानगी बाहेरच्या खोलीत केल्याच उदाहरणही अलीकडेच घडल आहे.

आपल्या पूर्वीच्या एका विदेश सचिवाचे जवळच्या देशाच्या राजघराण्यातल्या स्त्रियाबरोबर किती जवळचे सबध होते याचा अनुभव त्या त्यावेळी उपस्थित असलेल्या अनेक अधिकाऱ्यानी चक्षुर्वै सत्य घेतला विदेश सचिव त्या ठिकाणी वारवार का भेट देत याचा उलगडा सुरुवातीच्या काळात तिथल्या अधिकाऱ्याना होत नसे पुढे मात्र ते सूर्यप्रकाशाइतक स्वच्छ झाल आपल्या आणखी एका माजी विदेश सचिवाच कोरियातल्या सुप्रसिद्ध कवयित्रीबरोबरच प्रेमप्रकरण सर्वश्रुत आहे सयुक्त राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून ते कोरियात गेले असताना त्याची एक महत्त्वाची शिफारस त्याच्या नाजुक धाग्यातून उद्भवली याचा निर्वाळा "for once my heart ruled my head" या शब्दात त्यानी स्वत च आपल्या पुस्तकात दिला आहे.

राजनैतिक अधिकारी एखाद्या परदेशी स्त्रीच्या प्रेमात पडला तर त्याला विदेश सेवेच्या नियमानुसार सरकारी परवानगी शिवाय तिच्याशी लग्न करता येत नाही त्याला ती न मिळाल्यास नोकरीतून राजीनामा द्यावा लागतो प्रेमाखातर नोकरीवर लाथ मारलेले काही अधिकारी विदेश सेवेत गाजले मात्र बऱ्याच वेळा, परदेशी विवाहाच हे घोंगड

भिजत पडत आणि मग सरकारला कणव येऊन ते प्रकरण निकालात काढण्यात येत म्हणजे थोडक्यात नादा सौख्यभरे असा सरकारी आदेश मिळतो

राजदूत आपले तऱ्हेवाईक छद राजदूतनिवासात पुरवून घेत असल्याच्याही आख्यायिका आहेत एका राजदूतान कुक्कुटपालनाची आपली हौस राजदूतनिवासाच्या आवारात भागवली होती वकिलातीच्या सर्व अधिकाऱ्याना ती अडी (स्वस्तात) विकण्यात येत

राजदूत ही आसामी जशी हरहुन्नरी, बहुरगी तशी एकूण बिलदरच (सततच्या बदलाना तोंड द्याव लागत असल्यामुळे तो तसा बनतही असावा ) समोरच्या माणसाशी काही मिनिट सभाषण केल्यावर ते तितपत महत्त्वाच नसेल तर त्याला तशी जाणीव राजदूत लीलया करून देऊ शकतो कित्येक वेळा समोरचा गृहस्थ बोलत असतो मात्र राजदूत एव्हाना उद्याच्या मिटिंगमध्ये कुठल्या मुद्यावर चर्चा करायची आहे याचा विचार करायला लागलेला असतो आज सध्याकाळच्या भारतीयाच्या सभेत काय बोलायच याचीही जुळवाजुळव एव्हाना त्याच्या मनात सुरू झालेली असते आणि समोरच्या माणसाला तो केवळ सवयीन हुकार देत असतो आता त्या गृहस्थान एखादा प्रश्न विचारल्यावर त्याला उत्तर मिळेलच याची शाश्वती नसते शेवटी बिचारा पाहुणा काय ते उमगतो आणि राजदूताची रजा घेतो

राजदूताच वागण विचित्र वाटल तरी बाहेरचा पाहुणा तस दर्शवू शकत नाही घरी मुल मात्र चागली हजेरी घेतात पापा, दोन मिनिट तुम्ही आमच्याशी एकाग्र चित्तान बोलू शकाल का असा प्रश्न अकरावीत शिकणारी मुलगी खडसावून करते तेव्हा राजदूत महाशयाची तद्री खरी उतरते तर पत्नी जेव्हा नोकराची लफडी सागायला लागते तेव्हा एक सहानुभूतीचा थर त्याच्या चेहऱ्यावर पसरतो मात्र त्याचे कान केव्हाच बद झालेले असतात

कुणीतरी स्वत ची पूर्वतयारी करायची त्याला इतकी सवय होऊन जाते की पत्रावरच तिकीट स्वत ला चिकटवायची वेळ आली तर तो अस्वस्थ होतो बँकेच्या काउटरसमोर स्वत ला जाव लागल तर तो कावराबावरा होतो पत्नी आणि पी ए. राजदूताचे उजवे, डावे हात दोघापैकी एक जण हजर नसल्यास राजदूत महाशयाचा खोळबा होतो बाकी वगैरे किती असले तरी आपल्या उमद्या व्यक्तिमत्वान राजदूत समोरच्या व्यक्तीवर पहिल्या भेटीतच छाप पाडून जातो हे मात्र निश्चित राजदूताची (मर्सिडीज) गाडी आणि तिचा शोफर ही राजदूताची आभूषण! त्या गाडीवर फडकणारा तिरगी झेंडा या मानाच्या स्थानाची आणि त्यानुसार येणाऱ्या जबाबदारीची सतत आठवण करून देत असतो

★ ★ ★

# स्त्रियश्चरित्रम्

राजदूताच्या पत्नीची भूमिका गृहिणी-सचिव-सखी मित्र आणि प्रियशिष्येची ! विदेश सेवेमधला पतीच्या बरोबरीन पत्नीचा सहभाग दुसऱ्या कुठल्याही व्यवसायात क्वचितच असेल भारताच प्रतिनिधित्व करायची अवघड जबाबदारी नवऱ्याच्या बरोबरीन पेलणारी राजदूताची पत्नी त्याची सर्वार्थान अर्धांगिनी असते भारताबद्दलची ढोबळ प्रमाणात का होईना, पण सर्वांगीण माहिती, ज्या देशात आपण जाणार त्या देशाची सस्कृति आणि इतिहास याबद्दल आवश्यक तेवढी जाण तसच स्वत च्या वेषभूषेपासून ते घरच्या आदरातिथ्यापर्यंतचा भारतीय ठसा याची जाणीव ही तिच्यावरची व्यावसायिक जबाबदारी ठरते

स्थानिक लोकाशी स्नेहसबध वाढवताना त्यातला औपचारिकपणाचा भाग कमी करण्यामधे, पत्नीचा प्रमुख वाटा असतो या भेटी वारवार घडाव्यात म्हणून नवीन प्रसग निर्माण करण हे पत्नीच काम सकाळच कॉफीपान किंवा दुपारच्या चहापानासाठी स्थानिक बायकाना घरी बोलावण, त्याच्याबरोबर सहली काढण किंवा शॉपिंगच्या निमित्तान अधूनमधून भेटण हा व्यावसायिकपणाचाच एक भाग अशा भेटींनी सबध तर वाढतातच शिवाय घरी बोलावल याचही परदेशीयाना कौतुक असतच त्यातून तिला तिथली भाषा बोलता आली तर लोकाची आपुलकी सहजगत्या वाढते

आपल्या देशाच्या सस्कृतीची परदेशात ओळख करून देण्यात पत्नीचा सहभाग असतोच वकिलातीतल्या इतर भारतीय लोकाच्या मदतीन सास्कृतिक कार्यक्रम आयोजित करण, भारत दर्शन किंवा भारतीय नववधू अशासारख्या कार्यक्रमामधून भारताची विविधता दाखवण, भारतावरचे वार्तापट आणि चित्रपट दाखवण, भारतीय वस्तूची प्रदर्शन आयोजित करण असे तऱ्हतऱ्हेचे कार्यक्रम वकिलातीच्या स्त्रिया परदेशात सादर करत असतात अर्थात् स्थानिक टॅलटच्या सहाय्यान हे कार्यक्रम बसवले जातात मग कुणाला पेटी वाजवता येते का याचा शोध घेतला जातो बरीच शोधाशोध केल्यावर कुणीतरी सापडत मग त्या पेटीत तेल सोडण्यापासून, थोडक्यात सन्याशाच्या लग्नाची ही तयारी शेंडीपासून सुरू होते तमाम तरुण मुलींना एकत्र आणल जात तालमी सुरु होतात राजदूतनिवासाच काही काळ गाधर्व महाविद्यालयात रूपातर होत पेटी तबल्याचा साज विखुरलेला असतो कुणी सतारीतून बोल काढायचा निष्फळ प्रयत्न करीत असत व्यापार विभागात कुणी टायपिस्ट तबला वाजवू शकतो अशी माहिती मिळालेली असते त्याला बोलावण्यात येत अधिकारी वर्गाच्या पत्नींसमवेत वावरण्याचा मान मिळाल्यामुळे त्याची कळी खुलते आणि गोपींमधल्या श्रीकृष्णासारख रुद स्मित त्याच्या चेहऱ्यावर विलसायला लागत काही दिवस तालमींची अशी धमाल चालते आणि मग तो कार्यक्रम पार पडतो अशाच एका कार्यक्रमामध्ये मास्को विद्यापीठाचा हॉल 'सागा मुकुद कुणी हा पाहिला' या गाण्यान दुमदुमून गेला होता तर नाच रे मोरापासून सीता स्वयवरापर्यंत अनेक कार्यक्रमाची वर्णी जिनीव्हामध्ये लागली होती

भारतीय वस्तूची प्रदर्शन भरवताना कित्येक वेळा वस्तूही पुरेशा नसतात मग प्रत्येकीच्या घरून कुणाचे राजस्थानी चित्र, कुणाची उच समई, कुणाचा गालिचा, कुणाचा गुजराथी सोफा तर कुणाची पितळी सुरई अशा वस्तू त्या प्रदर्शनात जातात त्या धडपणे घरी पोचेपर्यंत प्रत्येकीचा जीव मुठीत असतो वकिलातीतल्या बायका बऱ्याच ठिकाणी चॅरिटी बझार आयोजित करतात वेगवेगळ्या प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू, आरसे कामाचे किवा तयार कपडे, नकली दागदागिने अशासारख्या विविध गोष्टी भारतातून मागवायच्या, त्या विकायच्या आणि येतील ते पैसे स्थानिक सस्थाना धर्मादाय द्यायचे किवा थोडा निधी स्थानिक सस्थाना मदतीदाखल देऊन बाकी रक्कम भारतातल्या एखाद्या गरजू सस्थेला पाठवायची हा त्या बझार मागचा उद्देश त्या निमित्तान त्या देशातल्या लोकानाही भारतीय कलाकुसरीच्या नवीन वस्तू बघायलाही मिळतात अशा कार्यक्रमामध्ये स्थानिक भारतीयाचीही वकिलातीला मदत होत असते

राजनैतिक अधिकाऱ्याची पत्नी पतीचा हात धरून वेदीवर चढते ती अतिथी 'देवो' म्हणतच, कारण पुढल्या आयुष्यात तेच तिच ब्रीदवाक्य ठरणार असत भारतीय लोकाची परदेशातली ये-जा गेल्या काही वर्षांत इतकी वाढलेली आहे की भारतात कधी न भेटणारे लोक नियमितपणे परदेशातल्या वास्तव्यात भेटत असतात आलेल्या सर्व प्रकारच्या पाहुण्याच स्वागत करायला सिद्ध होण तिला सवयीन आत्मसात कराव लागत

पाहुण्याचे प्रकार अनेक उच्चस्तरीय सरकारी पाहुण्याच आदरातिथ्य म्हणजे तमाम वकिलातीची जबाबदारी विमानतळावर त्याच स्वागत करण्यापासून त्याच्या तिथल्या सपूर्ण मुक्कामाची देखभाल वकिलातीन करायची असते अर्थात् असे सरकारी पाहुणे बहुतेक हॉटेलात राहतात मत्री, ससदसदस्य आणि इतर उच्चस्तरीय अधिकारी या वर्गात मोडतात मत्री येण्याची तारीख शेवटच्या दिवसापर्यंत पक्की नसते त्याची भेट बरेचदा आयत्यावेळीही ठरते मग वकिलातीत धावाधाव सुरू होते मत्र्यासाठी मोठा स्वागत समारभ किंवा भोजन आयोजित करायच असत मास-मच्छीच्या खरेदीपासून निमत्रण पाठवण्यापर्यंत सर्व तयारी फार झटपट करावी लागते कुणी शाकाहारी असत तर कुणाला गोमास नाहीतर डुकराच मास वर्ज्य, अशा आहाराच्या पचवीस तऱ्हा पचतारांकित मेनू तयार होतो त्या देशातले उच्चस्तरीय सरकारी अधिकारी इतक्या आयत्यावेळी जेवायला बोलावून येतील की नाही ही परत डोक्याला चिंता आपल्या मत्र्याच्या अचानक ठरलेल्या भेटीनतर तिथल्या मत्र्याना आमत्रण पाठवण्यात येत त्याच्या पत्नीबरोबर राजदूताची पत्नी केव्हातरी ब्रिज खेळलेली असते किंवा त्याना भारतीय भोजनासाठी तिन घरी बोलावलेल असत, भारतीय कलाकुसरीची एखादी वस्तू भेट म्हणून दिलेली असते आणि सुदैवान त्याच्या पत्नीला त्याची आठवण असते, त्यामुळे फारशी आगाऊ सूचना नसतानाही राजदूताच आमत्रण तिथले मत्री स्वीकारतात म्हणजे यातही राजदूताच्या पत्नीचे कौशल्य कामी येतच

काही वेळा तर मत्री येणार आहेत ही माहिती इतकी उशीरा मिळते की पूर्वतयारीला काही वेळच मिळत नाही मग मत्र्याना आणि त्याच्या लवाजम्याला फक्त घरगुती जेवणासाठी बोलवाव लागत ही सध्याकाळ खास सरकारी चेहऱ्याची असते मत्र्याना जेवून परत जायची घाई आहे अशी घोषणा आल्या आल्याच त्याचा खाजगी चिटणीस करून टाकतो मत्री हसून सर्वांशी दोन चार शब्द बोलतात भारतातल्या गुतागुतीच्या राजकारणातून काही दिवस बाहेर पडल्याची सुटकेची भावना त्याच्या चेहऱ्यावर दिसत असते, तरीही दुसऱ्याशी बोलताना त्याच्या डोक्यात इतर चक्र चालू आहेत हे जाणवत राहत

बरोबरचे इतर अधिकारी मात्र उंची दारू आणि घरच्या जेवणावर ताव मारतात मंत्र्याच्या मागे त्याचा भाविक गण नसल्यामुळे मंत्री आता आपल्या ताब्यात असल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत असतो त्या नादात स्कॉचचा एक पेग जास्त झाल्याचं त्याच्या नंतर लक्षात येत दरम्यान राजदूत त्या देशाबद्दल असलेली सर्व माहिती मंत्र्यांना पुरवून त्यांच्यावर छाप मारायच्या प्रयत्नात असतो कोफ्त्याचा आणि तंदुरी चिकनचा समाचार घेत मंत्री मधून मान डोलावत असतात मंत्रीमहाशय भोजनाबद्दल यजमानीणबाईंचे आभार मानतात आणि ही संध्याकाळ लवकरच आटोपते मग गेल्या चार दिवसाची श्रमणूक राजदूतीणबाईंना एकदम जाणवते राजदूत मात्र एक फाईल सही करून पुढे सरकवल्याच्या थाटात पुढल्या तयारीला लागतो

दुसरा प्रकार घरी रहायला येणाऱ्या बिनसरकारी पाहुण्याचा वेळ जशी सांगून येत नाही तसेच हे पाहुणेसुद्धा न कळवता अचानक प्रगट होतात पहाटे किंवा रात्री टेलिफोनची घंटा वाजली की समजाव, कुठून तरी कुणाची तरी येण्याची ही नांदी आहे. लंडन, फ्रँकफर्ट, सिंगापूर किंवा हाँगकाँग ही ठिकाणं तर पाहुण्यांच्या जाण्यायेण्याच्या वाटेवरचीच मग बाकीचे कार्यक्रम बाजूला सारून राजदूताची पत्नी पाहुण्यांच्या तयारीला लागते कामाच्या निमित्तानं आलेले पाहुणे सकाळी नाश्ता करून जातात ते संध्याकाळी परत येतात ते घरात वावरल्याचं फारसं जाणवत नाही मात्र परदेशप्रवासासाठी म्हणून आलेले पाहुणे परदेशाची मजा लुटायला आलेले असतात भारतात नोकरचाकरांची सवय असलेल्या या पाहुण्यांना परदेशात सर्व कामं स्वतःला करावी लागतात याचं फारसं सोयरसूतक नसतं त्यांच्याबरोबर यजमानीणबाईंनी शॉपिंगला यावं अशी त्यांची माफक अपेक्षा असते, त्यामुळे त्यांची परफ्यूमस् आणि पर्सेस्‌ची खरेदी चालते तेव्हा राजदूतीणबाई सफरचंद किंवा केळ्यांचे भाव विचारत असतात किंवा टॉयलेट पेपर नाहीतर पाव अंड्याची खरेदी करत असतात संध्याकाळी पाहुण्यांना काय स्वयंपाक करायचा हा विचारही त्यांच्या डोक्यात चालू असतो

भारतात जाताना आमची एखादी छोटी वस्तू बरोबर न्याल का म्हणून यजमानांनी विचारल्यावर ते पाहुणे एकदम चमकतात एवढ्या मोठ्या यजमानाकडून अशा सामान्य विनंतीची त्यांना अपेक्षाच नसते आपलं वजन आधीच जास्त झालं आहे म्हणून ते पुटपुटतात, तर काही पाहुणे लांब होकार देऊन मग आपलंही व्यक्तिगत प्रचंड सामान एअर-इंडियाला सांगून जाऊ द्यावं अशी यजमानाकडून अपेक्षा करतात हे पाहुणे गेल्यावर त्यांच्या खोलीतला शॉपिंगच्या पिशव्यांचा खच राजदूताच्या पत्नीला आवरत बसावा लागतो ही पाहुण्यांची कहाणी शुक्रवारच्या कहाणीसारखी असते ब्रह्मदेशात असताना येरे येरे पाहुण्या म्हणत पाहुण्यांची अक्षरशः प्रतीक्षा करावी लागते

कारण तिथल्या म्लान वातावरणात त्याच्या आगमनान गुलाबपाण्याचा शिडकावा होणार असतो मात्र ती वाट पाहुण्याची नव्हेच युरोपमध्ये मात्र वाऱ्यान कॅलेंडरची पान फडफडावीत, त्या गतीन पाहुणे येत असतात

एखादा दिवस असा उगवतो की भारतातून आलेल्या व्ही आय् पीं साठी इतर परदेशी लोक बोलावून जोरदार मेजवानी करायचा बेत आखलेला असतो सकाळी साफसफाई ते स्वयपाकापर्यंतची जय्यत तयारी एक-दीड नोकराच्या सहाय्यान करून घ्यायची दुपारी आतरराष्ट्रीय क्लबमध्ये एखादी मीटिंग असते, सध्याकाळी या व्ही आय पीं साठी कुठेतरी स्वागत समारभ असतो याच घाईगर्दीत वकिलातीतल्या कनिष्ठ अधिकाऱ्याची बायको बाळत झाल्याचा सकाळीच फोन आलेला असतो तिच्या घरी करायला कुणी नसत ती शाकाहारी असते आणि तिला दवाखान्यात जेवण पाठवायच असत कुणीतरी प्रसिद्ध भारतीय कलावत ह्याच सुमारास परदेशात आपल्या मैफलीसाठी आलेले असतात त्याच्या कोल्हापुरी चपलेचा अगठा तुटलेला असतो ते कोल्हापुरी चपलाशिवाय दुसर काहीच वापरत नसतात त्याच्या पायाला कुणाची चप्पल बसू शकेल याचाही शोध चालू असतो कुठल्या तरी बॅगेच्या तळाशी असलेला राजदूताचा नवीन कोल्हापुरी चपलेचा जोड त्या घाईगर्दीत शोधावा लागतो मनात दहाचे आकडे मोजतच सर्व आघाड्यावर तिची ही झुज चालू असते

सर्वात शेवटचा प्रकार म्हणजे घरचे पाहुणे, नातेवाईक आणि घरची मडळी ते बिचारे आमच्या राजनैतिक आयुष्याच्या बागुलबुवाला आधीच घाबरलेले असतात, आणि येतात तेही दबकत, दबकत कुठल्याही दृष्टीन आपला त्रास वाटू नये याची खबरदारी घेतच आम्हाला मात्र आपली माणस आपल्या जवळ आहेत ही एक सुखद भावना समाधान देऊन जाते सासर-माहेर हे भेद हिंदुस्थानातच मागे रहातात आणि बरोबर येतो तो फक्त मायेचा दुवा हे परदेशात एकत्र राहिल्यावर समजत

आम्ही सिक्कीमला असताना माझी आजी पासष्टाव्या वर्षी माझ्याकडे आली आजी या वयात नातीकडे आली याच सर्वांना अप्रूप वाटल होत आणि ती 'सेलिब्रिटी' झाली होती त्या वयातही तिचा उत्साह आणि जिद्द वाखाणण्याजोगी होती चौदा हजार फुटावरच्या नाथुलाच्या सरहद्दीवर नऊवारी पातळात जाऊन येणारी ती पहिलीच स्त्री असावी नऊवारी पातळात पाय खाली उघडे रहातात तेव्हा तुला खूप थडी वाजेल अस तिला समजावून सागण्याचा आम्ही खूप प्रयत्न केला पण तिन त्याच्याकडे लक्षच दिल नाही वर 'परका' कोट आणि खाली गुडघ्याएवढे बूट घालून ती गस्त घालणाऱ्या चिनी पहारेकऱ्याला बघून आली

सिक्कीममधे कुणीही सरकारी पाहुणे आले की मेजवान्याची खैरात होत असे हिमालयाच्या कुशीत दडलेल्या त्या छोट्याशा ठिकाणी वेळ घालवायचा तो एक सोपा मार्ग असायचा माझी आजी तिथे असताना तिन केलेल्या पुरणपोळ्याची जेवण कितीतरी वेळा झाली त्या पार्ट्यांमधे तीही सामील होत असे रात्री उशीरापर्यंतची जागरण, हाय हॅलोच्या वर्तुळात वावरण, मनातली चीड चेहऱ्यावरच्या स्मितहास्याखाली झाकण हे तिला पटत नसे या सर्वात मुलाना स्थान कुठे हा प्रश्न ती मला नेहमी विचारायची त्याच उत्तर माझ्याजवळ नव्हत मुलाकडे दुर्लक्ष होऊ देऊ नको हा मत्र मला परत परत सुनावून ती जड मनान परत गेली होती

आमच्या घरच्या माणसाना या कृत्रिम जीवनाशी सदर्भ जोडण फार कठीण जायच कॉकटेल पार्टीत आधी न पाहिलेल्या आणि पुन्हा दिसणार की नाही अशा माणसाशी हवापाण्याच्या गप्पा मारत रहायच हे त्याना रुचायच नाही कार्यालयाच्या स्तरावर घरच्या रिसेप्शनची तयारी पाहिल्यावर त्याचा जीवच दडपून जात असे अनेक डगरींवर एकाच वेळी पाय रोवून आम्ही आमचा समतोल राखताना बघून त्याना आमच दोघाच कौतुक वाटायला लागायच आणि आता परत आलीस की आमच्याकडे अगदी विश्रांतीला ये ह अस आमत्रण मनापासून मिळायच

माझ्या सासूबाई कोरियात आमच्याकडे आल्या होत्या तिरगी झेंडा फडकणाऱ्या आपल्या मुलाच्या गाडीत बसताना त्याचे डोळे पाणावले होते आशियाई खेळाच्या धामधुमीत आमच्या घरची लगीनघाई त्यानी स्वत अनुभवली होती आज मत्री आणि अधिकाऱ्याच जेवण, उद्या कलाकाराच्या पथकाच चहापाणी, परवा तमाम पत्रकारासाठी कॉकटेल या रिंगणात सुरुवातीला त्याना जरा चक्रावून जायला झाल खर, पण त्याही राजदूताच्या मातोश्रीच पडल्या ! लवकरच आशियाई खेळाच्या तयारी सबधीची माहिती त्या पत्रकाराशी बातचीत करून पुरवू लागल्या होत्या

तर कोरियात जहाजाच नामकरण करण्याऱ्या समारभाला माझ्याबरोबर माझी नणद पाहुणी म्हणून हजर होती कोरियन समाजातल नणदेच महत्त्व मला त्यावेळी कळल होत 'शिनू' (कोरियनमधे नणद) येणार म्हटल्यावर कोरियन जहाज कपनीच्या प्रमुखानी तिच अगदी खास आगतस्वागत केल होत नणंदेची खप्पा मर्जी झाली की कोरियन कुटुबाचा तोल बिघडतो मग भावजयीची काही खैर नसते (कारण नणद ही सासूची हेर असते) या कोरियन समजानुसार त्यानी माझ्याही नणदेचा मान ठेवला माझा भाऊ ऑलिम्पिक्सच्या वेळी तिथे आला तेव्हा प्रसिद्धीच्या वलयातल्या सर्व व्यक्ती (खेळाडू आणि मत्री) आमच्या घरी बघून तो अगदी खूष झाला होता

शाळा कॉलेजातली मैत्रीण अशा बाहेरच्या ठिकाणी आली की चार दिवस सगळी कवच उतरतात ऑफिशियल पोझिशनच ओझ काढून ठेवल्यावर कस हलक वाटत तिचा आणि आपला नवरा पार्श्वभूमीत राहतात हास्य विनोदाला अगदी ऊत येतो मुलाना आईच्यातला हा अचानक झालेला बदल कळत नाही दारातल्या मॅग्नोलियाच्या झाडाचा बहर जसा आठवडाभर टिकतो तस आठवडाभर शैशव परत आलेल असत डोळ्याच्या कडा ओल्या होईपर्यंत दोघी हसतो मग ती परत जाते आणि मी माझी झूल परत चढवते पुढे काही दिवस तरी तिच ओझ जाणवत नाही इतक मन प्रफुल्लित झालेल असत

असे हे हवेसे वाटणारे पाहुणे, ज्याच्या तिथे असण्यान मनाला शाती वाटते, आधार वाटतो, ते वारवार येऊ शकत नाहीत ही मात्र वस्तुस्थिती आहे.

राजदूताच्या पातळीवरचे भारतातले उच्चाधिकारी किंवा उद्योगपती याच्या व्यावसायिक जबाबदाऱ्या उचलण्याच्या कामात पत्नीला सर्व प्रकारची मदत उपलब्ध 'असते बऱ्याचशा मेजवान्या हॉटेलमधे किंवा मोठ्या रेस्टॉरटस्मधे सरकारी खर्चान किवा 'एक्स्पेन्स अकाउट'मधे होत असतात नतर एका छोट्या कार्डावर यजमानानी सही केली की ही जबाबदारी सपते यजमानीणबाई म्हणून देखरेखीपलीकडे पत्नीला स्वत ला फारशी तोशीस लावून घ्यावी लागत नाही परदेशात विदेशी चलनामधे खर्च करायचा म्हणजे सरकारला हात आखडता घ्यावा लागतो, त्यामुळे बहुतेक मेजवान्या राजदूताच्या घरीच आयोजित कराव्या लागतात

राजदूतनिवासाच खटल असत सस्थानिकाच नोकराचा मात्र खडखडाट प्रसगी नोकराच्या बरोबरीन काम करून, घराचा सर्व डामडौल कायम ठेवून, सराईतपणे राजदूतीणबाईच्या भूमिकेत अलगद् शिरायची सवय राजदूतीणीला हळूहळू होते ही हेअर स्टाईल करून आलेली, मदाम रोशाच्या सुगधात न्हायलेली ॲम्बॅसडरची पत्नी दुसऱ्या दिवशी होऊ घातलेल्या मेजवानीसाठी तीन चारशे गुलाबजाम आणि शे-दोनशे समोसे तळून आली आहे याचा कुणाला पत्ताही लागत नाही दिवसें दिवस राजदूताच्या पत्नीऐवजी आम्ही 'ग्लोरिफाईड कुकस्' बनत चाललो आहोत असा विदेश सेवाधिकाऱ्याच्या पत्नींचा तक्रारीचा सूर वाढायला लागला आहे. विदेश सेवेतल्या गेल्या दोन पिढ्यामधल्या गृहिणींनी का-कू न करता ही जबाबदारी उचलली तरुण पिढीतल्या अधिकाऱ्याच्या पत्नी मात्र ही नाराजी उघड उघड दर्शवत आहेत अमेरिकेच्या विदेश सेवेत घरातल्या सरकारी कामासाठी गृहिणींना वेगळा भत्ता मिळतो तसा आपल्याला मिळावा अशी मागणी विदेश-सेवा स्त्री सघटनेन (EAWA) एक मुखान विदेश

मत्रालयाच्या प्रशासनाकडे केली आहे. राजनैतिक अधिकाऱ्याच्या पत्नी त्या सोनियाच्या दिवसाची मनोभावे प्रतीक्षा करत आहेत

साराश, राजदूताच्या पत्नीला, तिच्या कार्यात यशस्वी होण्यासाठी, अनेक गुणधर्म लागतात त्यातला सर्वात महत्त्वाचा म्हणजे दर दोन तीन वर्षांनी बदलणारे देश, भाषा, सस्कृती, बदलणारे हवामान आणि माणस याच्याशी जुळवून घेण्याची तिची क्षमता मनाचा सयम ढळू न देता प्रत्येक ठिकाणी चागल काय आहे त्याचा शोध घेऊन त्याचा आनद लुटण्याची सवय सर्व कुटुबाला लावण्याची जबाबदारी तिची असते जी गृहस्वामिनी कुटुबाच राजकारण स्वाभाविकपणे साभाळते ती राजनीतीतही कमी कशी पडेल ?

★ ★ ★

# विदेश सेवेतले बाळगोपाळ

विदेशसेवाधिकाऱ्याच्या परदेशातल्या सततच्या वास्तव्यात आणि वारवार होणाऱ्या बदल्याच्या जीवनात मुलाच सगोपन आणि शिक्षण हे एक प्रश्नचिन्ह असत

ज्या देशामध्ये ही मुल जन्मतात किंवा वाढतात त्या देशाच्या पद्धतीनुसार त्याच सगोपन होत, म्हणूनही विदेश सेवेतल्या आईवडिलाना आपल्या मुलाच शिक्षण आणि भवितव्य याबद्दलची अनिश्चितता वाटत असते ही मुल कळत्या वयात येण्यापूर्वीच चार देश हिंडून आलेली असतात नव्या ठिकाणी झटपट रुळण्याची कला उपजतच त्याच्या अगवळणी पडत असते त्याचबरोबर नवा देश, नवे लोक, नवी भाषा, नव्या पद्धती, सगळ्याचा नव्यान सराव करून घ्यावा लागतो, त्याच दडपणही नकळत मुलावर येत असत

कितीतरी आई-बाप लहान वयातच मुलाना होस्टेलमधे ठेवतात म्हणजे त्याच शिक्षण एका जागी होत आणि वारवारच्या बदलाना त्याना तोंड द्याव लागत नाही इतक्या लहानपणापासून दूर राहिल्यावर या मुलामध्ये घरासबधीची ओढ कमी झाली तर त्यात आश्चर्य काय! गेल्या काही वर्षांपर्यंत मुलाना भारतातल्या होस्टेलमधे ठेवण्याच प्रमाण अधिक होत, कारण परदेशात अमेरिकन आतरराष्ट्रीय शाळाच्या फिया प्रचड असत आणि राजनैतिक अधिकाऱ्याना आपल्या भारतीय वेतनामधून त्या देता येणं

केवळ अशक्य असे आता मात्र सरकार ही फी भरत असल्यान ज्या देशात आतरराष्ट्रीय शाळा आहेत, त्या देशामध्ये आई वडिलाजवळ राहण मुलाना सहज शक्य होऊ लागल आहे. गेली काही वर्षं विदेश सेवेतली मुल अनेक ठिकाणी पाश्चिमात्य शाळामधून शिक्षण घेत आहेत

पाश्चिमात्य शाळामध्ये पाश्चात्य पद्धतीन वाढणाऱ्या भारतीय मुलाची काहीशी त्रिशकूसारखी अवस्था होते बालवयातच त्या वातावरणात शिकायला लागल्यावर त्या सस्कृतीचा ठसा त्याच्या मनावर खोलवर उमटतो, तर घरच वातावरण बऱ्याच अशी पूर्ण भारतीय असत दोन्हीची सागड घालता येण त्याच्या बालवयाला कठीण जात आतरराष्ट्रीय शाळेतल्या प्रशिक्षणामुळे या मुलामध्ये स्वत बद्दलचा आत्मविश्वास बळावतो स्वत हून अभ्यास करायची जिद्द निर्माण होते त्याच वाचन वाढत चर्चा करायची सवय लागते मात्र भारत आणि इतर प्रगत देश याची तुलना ती आपोआप करू लागतात भारतीय यत्रणेमधल्या त्रुटी ते परखडपणान व्यक्त करायला लागतात तर कुटुबाच्या आणि घराच्या पातळीवर पारपारिक वातावरण त्याच्या लेखी एक शृखला होऊन बसते इतर मुलाना वाटेल तेव्हा वाटेल तितका वेळ बाहेर फिरण्याच स्वातत्र्य आहे ते आम्हाला का नाही अशी त्याची तक्रार सुरू होते आणि त्याना काबूत ठेवण आई वडिलाना अवघड होऊन बसत

यापैकी बरीचशी मुल पुढल्या अभ्यासासाठी म्हणून युरोप अमेरिकेत जातात आणि तिथेच स्थायिक होण्याची स्वप्न बघतात अर्थात् आज भारतातले मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय विद्यार्थी देखील हीच आकाक्षा बाळगून आहेत विदेश सेवेतले काही आई-बाप मुलाना अमेरिकेला पाठवायला परवडत नसल्यान त्याना कॉलेज शिक्षणासाठी भारतात पाठवतात भाषा, देश, आणि वातावरणाच्या सतत बदलामुळे काही मुलाना अस्थिर वाटत रहात आणि पाळमुळ नसल्याची भावना त्याच्यात निर्माण होते, तर या उलट काही वेळा आतरराष्ट्रीय शाळेतल्या मोकाट वातावरणाचा आणि तिथल्या सूचक वर्णविद्वेषाचा उबग येऊन आपली भारतीय मुल स्वत हून भारतात शिकायला जाण्याचा निर्णय घेतात ही मुल भारतीय वातावरणात चट्दिशी समरस होतात आणि भाषा किंवा कला विभागाच्या विषयामध्ये ते चागला अभ्यास करतात राजदूताच्या मुलानी विदेश सेवेत प्रवेश घेतल्याची उदाहरण त्यामानान कमी आहेत एका सस्कृतीमधून दुसऱ्या सस्कृतीतला सततचा ठिकरीचा खेळ त्याना नकोसा होत असावा

विदेश सेवेतली मुल इग्रजी माध्यमात शिकत असली तरी आपल्या मातृभाषेबरोबरही त्याची झटापट चालू असते विदेश सेवेतल्या काही घरामधे मुलानी मातृभाषेतच

बोलल पाहिजे असा दडक पाळला जातो मग मुल आईवडिलाशी त्या भाषेत आणि आपापसात इग्रजी बोलतात आम्हाला आपल्या भाषेतच पत्र लिहा असा कित्येक आजी आजोबाचा आग्रह असतो मग ळ च्या जागी ल आणि ण च्या जागी न अस रडत खडत ते पत्रलेखन चालत माझी मुलगी लहानपणी, "माला तूझी फार आठवन येते" अशा वाक्यान आजीच्या पत्राची सुरवात करायची "माझा पाय बसमधे चुरगळला (चेंगरला)" असही तिन एकदा लिहिल होत मुलाच्या पत्रात असे मुद्राराक्षसाचे विनोद नेहमी व्हायचे बऱ्याचशा मुलाची हीच अवस्था असते

परदेशात वडीलधारी माणस घरी रहायला आली की आतरराष्ट्रीय शाळेत जाणाऱ्या मुलाचे आणि त्याचे सबध सुरुवातीला आबटगोड असतात आपली नातवड इग्रजी शाळेत काय काय नवीन गोष्टी शिकतात याच आजी आजोबाना कुतूहल असत तर मुलाना त्याची लुडबूड वाटते मग चार दिवस गेले की आपोआप हा ताण सैल होतो आणि नात्याची घडी व्यवस्थित बसायला लागते आपण करू त्याच आजी आजोबाना कौतुकच वाटत हे जस मुलाना उमगायला लागत तशी त्याची कळी खुलते आणि आजी आजोबाना त्याच्या जगात प्रवेश मिळतो माझ्या मुलीच आतरराष्ट्रीय शाळेतल पाठातर माझ्या मावस सासूबाईंना भोज्यासारख समोर उभ करून चालायच आणि त्याही बरोबर म्हणून मान डोलवायच्या अर्थ दोघीनाही फारसा कळलेला नसायचा, पण मुली फाडफाड इग्रजी बोलतात आणि माझ्याशी अस्खलित मराठी बोलतात याचच त्याना कौतुक! माझ्या मुलीच्या प्रॉमच सर्वात कौतुक त्याना वाटल होत आतरराष्ट्रीय शाळेतल्या शेवटच्या वर्षानतर प्रॉम हा एक मोठा समारभ असतो त्याला मुलगा-मुलगी अशा जोडीन जायच असत प्रॉमच्या पोषाखावर दोन-तीनशे डॉलर्स आईवडील सहज खर्च करतात इतक्या त्या समारभाच महत्त्व असत सिड्रेलासारखा बिनबाह्याचा फुगणारा झगा घालून माझी मुलगी प्रॉमला निघाली तेव्हा, अग तुझा प्रिन्स चार्मिंग तरी दाखव म्हणून माझ्या सासूबाईंनी तिला चिडवल होत आपल्या अशा परक्या मुलाबरोबर जाण्यान आजीला काहीच वाटल नाही याचच माझ्या मुलीला आश्चर्य वाटल होत

आजी आजोबा आले की मुलाना खरा आनद होतो कारण एरवी राजदूताच खाजगी आणि सार्वजनिक जीवन इतक एकजीव झालेल असत की राजदूत आणि त्याच्या पत्नीच परदेशातल वास्तव्य सततच सार्वजनिक घटनानी व्यापलेल असत कुठल्या तरी देशाचा राष्ट्रीय दिन, भारतीय सस्थेचे कार्यक्रम, परिसवाद, म्युझियम शो, प्रदर्शन यामुळे आईवडील क्वचितच मुलाच्या वाट्याला येतात कधीपासून मुलानी आईवडिलाबरोबर एखादा कार्यक्रम ठरवलेला असतो आणि ऐनवेळी सरकारी पाहुणे येऊन टपकतात मग मुलाचा साहजिकच हिरमोड होतो या जीवनामधे आपल स्थान

दुय्यम आहे अशी एक प्रकारची तेढ मुलाच्या मनात मूळ धरते तरीही कळत नकळत ते आईवडिलाच अनुकरण करत असतात त्यामुळे वर्षानुवर्षे बाहेर राहूनसुद्धा विदेश सेवेतली मुल मनान भारतीय राहतात ती जरी परदेशात जन्मली तरी ती तत्वत वकिलातीच्या परिसरात आणि पर्यायान भारतीय प्रागणात जन्मलेली असतात म्हणून ते भारतीय नागरिकच राहतात त्याचे आई-बाप भारताच प्रतिनिधित्व करत असल्यान भारतीयत्वाचा ठसाही त्याच्यावर सतत उमटत असतो भारतातली वृत्तपत्र, भारतातून सतत येणारे पाहुणे, भारताचे सास्कृतिक मेळावे आणि त्यात या मुलाना घ्यावा लागणारा सहभाग यामुळे विदेशी वातावरणातही भारताबरोबरचा त्याचा सबध अबाधित राहातो विदेशी सस्कृतीचा त्याच्यावर प्रभाव होऊन सुद्धा भारतावर कुणीही केलेली अनाठायी टीका त्याना खपत नाही दूतावासाच्या प्रागणात फडकणारा तिरगी झेंडा नकळत त्याना ही शिकवणूक देत असावा

★ ★ ★

# राजदूतनिवास

भारताच्या राजदूताच घर म्हणजे त्या देशातल भारताच प्रतीक भारताच्या परपरागत कला आणि सस्कृतीची झलक परदेशीयाना बघायला मिळण्याच ते एक ठिकाण, त्यामुळे त्याच स्वरूपही तेवढच महत्त्वाच!

ही इमारत निवडताना खूप विचार करून मगच निर्णय घेतला जातो शहराच्या श्रीमत वस्तीत साधारणत हा निवास असतो कित्येक ठिकाणी ही घर बऱ्याच वर्षांपूर्वी विकत घेण्यात आली आहेत आणि आजकालही घेतली जात आहेत हे सरकारच धोरण अत्यत इष्ट ठरल आहे कारण परदेशात भाडी इतकी झपाट्यान वर जात आहेत की त्यावेळी घेतलेल्या विटा आता सोन्याच्या ठराव्यात वॉशिंग्टन शहराच्या मध्यभागी 'रॉक क्रीक पार्क'मधे असलेला आपला राजदूतनिवास, हेगमधल प्रासादात्मक राजदूताच घर, तर आयफेल टॉवरला लागून असलेला पॅरिसचा राजदूतनिवास ही आपली गौरवस्थान ठरावीत पॅरिसच्या राजदूतनिवासाच्या खिडकीतून बाहेर डोकावल की आयफेल टॉवरची रात्रीची अवर्णनीय शोभा दृष्टीस पडते

ऑफिस किंवा घर विकत घेण्यापूर्वी दिल्लीहून प्रशासन विभागातले खास अधिकारी ते बघण्यासाठी येतात आणि सर्व बाजूनी विचार करून मगच निर्णय घेतला जातो त्यावेळी राजदूत कोण आहे, त्याच्या आवडीवरही घराची निवड अवलबून राहते

एखाद्या राजदूताला सुरक्षिततेसाठी म्हणून मोठी बाग नको वाटते आणि मग ओसाड भितीमागे दडलेलं घर पुढच्या प्रत्येक राजदूताच्या वाट्याला येतं (अर्थात् अशी उदाहरणं विरळा) मग प्रत्येक राजदूत विशेषतः त्याची पत्नी त्या घराला सुशोभित करायचा प्रयत्न करते राजदूतनिवासांना सुसज्ज करण्याकरता शोभेच्या भारतीय वस्तू, पारंपरिक कलाकृती आणि चित्रं पाठवण्यासाठी, विदेश मंत्रालयात एक खास विभाग असतो त्यासाठी एक समिती नेमलेली असते ही समिती दरवर्षी दिल्लीतली इम्पोरियम किंवा इतर ठिकाणाहून तऱ्हतऱ्हेच्या मूर्ती, पेंटिंग्ज आणि समया अशा वस्तू खरेदी करते मग त्या ठिकठिकाणी वकिलातींमधे पाठवल्या जातात राजदूत म्हणून नेमणूक झाल्यावर या विभागात चक्कर मारून आपल्याला आवडलेली एखादी वस्तू राजदूत निवडतो, मग ती त्या ठिकाणी पाठवली जाते, त्यामुळे गणेश, मीनाक्षी किंवा नटराजाच्या मूर्ती, मिनिअेचर पेंटिंग्ज, गालिचे आणि एखादी भव्य समई बऱ्याच राजदूतनिवासामध्ये स्थानापन्न झालेल्या आढळतात प्रत्येक निवासातले सरकारी गालिचे ठराविक ठशाचे असतात लाल रंगाचा ठळक डिझाईनचा गालिचा दिसला की तो हमखास सरकारी आहे असं धरावं

राजदूतनिवासात एखादी गोष्ट नव्यानं घ्यायची म्हणजे 'आगळाच' अनुभव आहे. राजदूत हा वकिलातीतला सर्वोच्च अधिकारी! ऑफिस आणि इतर स्टाफ याच्या प्रशासनाचे सर्व अधिकार राजदूताकडे असतात मात्र राजदूतनिवासात एखादी नेहमीची वापरातली वस्तू, उदा एखादी खुर्ची जरी नवीन घ्यायची झाली तरी त्याची तरतूद दिल्लीहून यावी लागते, मग दिल्लीच्या प्रशासन विभागातल्या लाल फितीच्या भेंडोळ्यात ही मागणी जाऊन अडकते घरात किती खुर्च्या आहेत, त्यातल्या वापरात किती आहेत, नवीन घ्यायची ती कुठल्या प्रकारची याचं सर्व वर्णन प्रशासनाला कळवावं लागतं दरम्यान् प्रशासन विभागातल्या (अधिकाऱ्याच्या) खुर्चीवर कुणी नसल्यानं हे आख्यान आणखी लांबतं केव्हातरी या खुर्च्यांची अदलाबदल होणार आहे आणि राजदूताच्या खुर्चीत आपण असू किंवा आपल्या खुर्चीत पुढे हे राजदूत महाशय असू शकतील याचीही त्या अधिकाऱ्याला कल्पना असते, त्यामुळे तोही आपल्याकडून राजदूताला मदत करण्याच्या प्रयत्नात असतोच, परंतु दिल्ली दरबारात जगभरातल्या वकिलातींकडून तऱ्हतऱ्हेच्या कितीतरी मागण्याचा खच येऊन पडलेला असतो त्यातून या खुर्चीची पाळी येईपर्यंत राजदूत महाशय आपल्या घरात आणखी एका खुर्चीची गरज होती हे विसरलेले तरी असतात किंवा ते स्वतःच खुर्चीवरून हललेले असतात

सरकारनं घेतलेलं नवीन घर सुसज्ज करायचं म्हणजे तर अनंतकाळची प्रतीक्षा! घरासाठी लागणाऱ्या गोष्टींची संपूर्ण यादी दिल्लीला पाठवायची, त्यातून त्याची छाननी

होऊन कोणत्या वस्तू स्थानिकरीत्या घेता येतील याचा ऊहापोह होऊन मग प्रशासन विभागाकडून त्याची तरतूद येते तोपर्यंत दोन-तीन महिने सहज निघून गेलेले असतात स्थानिक फर्निचर घेण्याची परवानगी बघून राजदूत सुटकेचा निश्वास टाकतात घराला पडदे हवेतच मात्र ते हिंदुस्थानातून घेतले गेले पाहिजेत कारण तिथे ते स्वस्त पडतात, हे साध सरळ गणित! तेव्हा राजदूताला पडद्याचे नमुने पाठवले जातात ज्या घराला पडदे लागायचे त्या घरातली फिटिंग्ज कशी आहेत त्याची कल्पना नसताना हे पडदे बनून आल्यावर कधी ते लहान होतात तर कधी मोठे परदेशाची हवा न लागलेले ते बिचारे पडदे राजदूतनिवासालाही बिचारे करून टाकतात अशी अनेक उदाहरण घडल्यावर हल्ली स्थानिक ठिकाणाहून ते घेता येण्याची परवानगी मिळू लागली आहे. घरातल्या गोष्टींची जमवाजमव करून ते परिपूर्ण होईपर्यंत बदलीची वेळ आलेली असते दुसऱ्या राजदूताला हे सर्व आवडेल याचीही खात्री नसते किंबहुना ते आवडल तरच नवल विदेश सेवेतली नवी कारकीर्द नेहमी कुरकुरीनच सुरू होत असते मग ते ऑफिस असो अथवा घर! आधीच्या राजदूतान केलेल मी कस निस्तरत आहे ही भूमिका घेऊन सुरुवात केल्यावर ती यशस्वी ठरते असा एक समज आहे. नवीन आलेल्या माणसान पूर्वीच्या माणसाची प्रशसा केली तर भोवतालचे लोकही बिचकतात कारण त्याना ती कधी सवयच नसते एखादा राजदूतनिवास मॉडर्न आर्टन भरलेला असतो, तर नवीन राजदूत आल्यावर बीरेन डेच्या जागी 'पिचवाई' विराजमान होत 'सतोषी' जाऊन तिथ तजावर येत निळ्या रगाचा वॉलपेपर जाऊन तिथे पाढरा येतो सगळीकडे नवा छाप उमटल्यावर मग सर्व कस शात शात होत

वकिलातीतला प्रशासनविषयक अधिकारी वकिलात आणि राजदूतनिवासाच्या प्रशासनाचा व्याप साभाळतो राजदूतीणबाईंची मर्जी साभाळून त्याला हे काम कराव लागत राजदूतनिवासाच स्वरूपही येणाऱ्या प्रत्येक राजदूताबरोबर बदलत असल्यामुळे तर हे काम आणखीनच कठीण होऊन बसत राजदूतनिवासाची डागडुजी उत्तम तऱ्हेने साभाळण फार महत्त्वाच असत कारण त्या देशाचे परराष्ट्रमत्री, महत्त्वाच्या उच्चपदस्थ व्यक्ती, क्वचित् प्रसगी राष्ट्राध्यक्ष सुद्धा राजदूतनिवासात येतात (उदा क्यूबाचे राष्ट्राध्यक्ष फीडेल कॅस्ट्रो भारतीय राजदूतनिवासात अनेक वेळा आलेले आहेत )

बऱ्याच देशामधले राजदूतनिवास हवेलीवजा जुन्या पद्धतीचे असतात अशा जुन्या घरामध्ये असणाऱ्या सर्व कुरबुरी या घरामध्ये जाणवत असतात मात्र हवेलीमध्ये रहाणाऱ्या जमीनदाराचा थाट असायचा तो त्या सुसज्ज ठेवायला असणाऱ्या नोकराच्या ताफ्यामुळे त्याचा लवलेशही निवासामधे नसतो मोठ्या मिनतवारीन परदेशात यायला तयार झालेला एखादा नोकर आणि फार तर झाडलोटीला एखादा स्थानिक मनुष्य

म्हणजे शिकस्त बंगल्याचा थाट बघून आधीच भारतीय नोकरावर दडपण आलेल असत त्याची मर्जी बिनसली की भारतात परत जायची मागणी करणार ब्रह्मास्त्र त्याच्या हातात असत त्यामुळे राजदूताच्या पत्नीला त्याला साभाळून घ्याव लागत (थोडक्यात त्याला फारस काम सागता येत नाही)

जुन्या घराची बाहेरून जितकी शान तितकी ती आतून ठिकठिकाणी आपल पुराणत्व सिद्ध करत असतात रगून (ब्रम्हदेश) सारख्या ठिकाणी भव्य प्रासादामधे बाहेरच्या धुआधार पावसाची झलक घरातही बघायला मिळते कारण छतातून तो सरळ घरात शिरकाव करतो थड प्रदेशातली जुनी घर थडीत हातपाय गार पडल्यासारखी गारठतात त्याच्यातले हीटर्स चालत नसतात कधी एकदम गरम हवेचा झोत येतो तर कधी थड मध्यरात्री अचानक फ्रीजरमधे असल्याची सवेदना निर्माण होते कारण हीटिंगन परत राम म्हटलेला असतो कित्येकवेळा पाणीही अशा घरामधे सप पुकारत कारण पाण्याचे पाईप जुने झालेले असतात पाण्याचा रग इद्रधनुष्यासारखा यायला लागला की ते पाईप पचवीस-तीस वर्ष जुने असल्याची माहिती तात्काळ पुरवण्यात येते

क्वचित् ठिकाणी अशा जुन्या घरात एकदम आधुनिक फिटिंग बघायला मिळतात मात्र ते समाधान अल्पकाळच टिकत नवीन दिसणारा स्टीलचा फवारा सुरू करावा आणि पाण्याचा जोर बघून आघोळीचा आनद उपभोगायला मिळेल अशा आशेन शॉवरखाली जाव तर पाणी एकदम रुसूनच बसत काही केल्या त्या शॉवरमधून पाणी बाहेर येत नाही बागेला पाणी घातल की वरच्या मजल्यावर पाणी चढत नाही अशी मोलाची माहिती घराच्या माळ्याकडून समजते आता आघोळ बागेची का स्वत ची हा प्रश्न आधी निकालात काढावा लागतो आणि माळी बागेला पाणी घालायला येण्यापूर्वी स्वत च अभ्यगस्नान उरकून घ्याव लागत बाहेरचे कुणी परदेशी पाहुणे भेटायला आले की दिवाणखान्यातली झुबर, नक्षीचे कोच आणि ब्रॉझच्या मूर्ती बघून अवाक् होतात घराची वारेमाप प्रशसा करतात मात्र त्या घराचा रुसवा केवळ राजदूत आणि त्याच्या पत्नीलाच ठाऊक! काही प्रगत देशामध्ये मात्र अगदी आधुनिक सुखसोयींनी परिपूर्ण अशा घरामधे राहण्याची सधी मिळते आणि मग त्या आठवणींवर पुढची कठीण जागेतली वर्ष काढावी लागतात

राजदूतनिवासाच्या बागाही त्या निवासासारख्याच आलीशान हॉलडमधल्या निवासाची बाग आठ एकराची असेल तर वॉशिंग्टनच्या घराभोवतालचा परिसर सपून नैसर्गिक जगल कुठे सुरू होत हे कळण कठीण इतका तो परिसर मोठा आहे. काही राजदूतनिवासामधे स्विमिंग पूल आणि टेनिस कोर्ट याचीही सोय असते रगून, तेहरान,

हरारे (झिंबाब्वे) या ठिकाणी आणि इतर अनेक जागी अशी सोय आहे थड प्रदेशातला बागेचा सीझन जेमतेम काही महिने टिकतो काही राजदूत आणि त्याच्या पत्नी स्वत बागेत काम करून आपली बागेची हौस भागवतात, कारण अशा ठिकाणी महिन्यातून एकदोनदाच माळी परवडतो आणि त्याच्या तारखा महिनोमहिने आधी ठरवाव्या लागतात गरम हवेच्या ठिकाणी बारा महिने बागेची मशागत करावी लागते अशा जागी सरकार माळी पुरवत अनेक ठिकाणी, मोठ्या बागेचा राष्ट्रीय दिनाच्या समारभातही उपयोग होतो आणि पधरा ऑगस्टचे ध्वजवदनही राजदूतनिवासाच्या बागेत केल जात

या बागाच्या निमित्तान जगातल्या तऱ्हतऱ्हेच्या फुलाची आणि झाडाझुडुपाची आपोआप माहिती होते थड प्रदेशात पँझी, बेगोनिया, ट्यूलिप्स, रोडोडेँड्रनस, अँतुरेनियम, फ्यूशिया इ सर्रास दिसतात गरम प्रदेशात सर्व ट्रॉपिकल झाड आणि फुल दिसतात नारळी पोफळीची झाड आग्नेय आशियात मुबलक तर दार्जिलिगमधल्यासारखे सूचिपर्णी वृक्ष युरोपातल्या थड देशात भरपूर वॉशिंग्टनच्या उन्हाळ्यात गुलबक्षीची आणि कोरियातल्या उन्हाळ्यात कोराटीची फुल पाहिली की पुण्याचा मे महिना आठवतो तर रगूनच्या बागेत मोगरा फुललेला दिसला की महाराष्ट्रातल्या श्रावणाची सय येते सिकीमसारख्या थड प्रदेशातली ऑर्किडस् मलेशिया, थायलडसारख्या गरम हवेच्या ठिकाणी फुलताना पाहिली आणि बेजिंगसारख्या ठिकाणी नोव्हेंबरच्या थडीत माना टाकणारी पँझीची फुल फ्रँकफर्टच्या हिमवृष्टीनतर देखील बर्फाच्या थराखाली तग धरताना पाहिली की निसर्गातला चमत्कार जाणवतो तर नेपाळमधली रोडोडेँड्रनस् स्वित्झर्लंडच्या आल्पस् पर्वतामध्ये बघितली की निसर्गामधे वर्णविद्वेष नसल्याची खात्री पटते

★ ★ ★

# विदेशसेवेतले बल्लवाचार्य

राजदूताच्या यशाची गुरुकिल्ली कित्येकवेळा त्याच्या आचाऱ्याच्या हातात असते इतकं त्याचं राजदूताच्या आयुष्यात महत्त्व आहे. चांगला जावई मिळणं जितकं अवघड तितकंच चांगला नोकर मिळणंही कठीण ठरवून दिलेली कामं नोकरानं पार पाडायची आणि बाजूला व्हायचं हा आपल्याकडला दंडक काही कारणानं त्याचे आणि आपले मतभेद झालेच तर ते संबंध तिथेच संपुष्टात येतात आणि नवा गडी शोधायला सुरवात होते (अर्थात् गडी हा प्रकारही आता संपुष्टात येत चालला आहे )

मात्र वकिलातीच्या जीवनामध्ये नोकराचं स्थान ध्रुवासारखं अढळ ! परदेशात जिथे कुठल्याही प्रकारची मदत उपलब्ध नसते तिथल्या राजनैतिक मेजवान्या पार पाडायच्या त्या आपल्या भारतीय नोकराच्या जिवावरच राजनैतिक अधिकाऱ्याला भारतातून नोकर सरकारी खर्चानं नेता येतो तो याच कारणाकरता (मात्र त्याचा पगार असतो खास 'सरकारी' तेव्हा अशा नोकरीला हल्ली कुणीही नोकर विचारत नाहीत हा मुद्दा निराळा )

राजदूताला असे दोन नोकर सरकारी खर्चानं नेता येतात कित्येकवेळा राजदूताच्या नोकराला सर्व काम स्वतःलाच सांभाळावं लागतं विशेषत भारतातून उच्चपदस्थ सरकारी पाहुणे आल्यावर राजदूताच्या पत्नीला त्यांच्याबरोबर अनेक कार्यक्रमांना हजर रहावं लागतं तेव्हा घरच्या मेजवानीला ती पाहुण्याबरोबरच 'घरी' येणार अशी कितीदा तरी

होऊन कोणत्या वस्तू स्थानिकरीत्या घेता येतील याचा ऊहापोह होऊन मग प्रशासन विभागाकडून त्याची तरतूद येते तोपर्यंत दोन-तीन महिने सहज निघून गेलेले असतात स्थानिक फर्निचर घेण्याची परवानगी बघून राजदूत सुटकेचा निश्वास टाकतात घराला पडदे हवेतच मात्र ते हिंदुस्थानातून घेतले गेले पाहिजेत कारण तिथे ते स्वस्त पडतात, हे साध सरळ गणित! तेव्हा राजदूताला पडद्याचे नमुने पाठवले जातात ज्या घराला पडदे लागायचे त्या घरातली फिटिंग्ज कशी आहेत त्याची कल्पना नसताना हे पडदे बनून आल्यावर कधी ते लहान होतात तर कधी मोठे परदेशाची हवा न लागलेले ते बिचारे पडदे राजदूतनिवासालाही बिचारे करून टाकतात अशी अनेक उदाहरण घडल्यावर हल्ली स्थानिक ठिकाणाहून ते घेता येण्याची परवानगी मिळू लागली आहे. घरातल्या गोष्टींची जमवाजमव करून ते परिपूर्ण होईपर्यंत बदलीची वेळ आलेली असते दुसऱ्या राजदूताला हे सर्व आवडेल याचीही खात्री नसते किंबहुना ते आवडल तरच नवल विदेश सेवेतली नवी कारकीर्द नेहमी कुरकुरीनच सुरू होत असते मग ते ऑफिस असो अथवा घर! आधीच्या राजदूतान केलेल मी कस निस्तरत आहे ही भूमिका घेऊन सुरुवात केल्यावर ती यशस्वी ठरते असा एक समज आहे नवीन आलेल्या माणसान पूर्वीच्या माणसाची प्रशसा केली तर भोवतालचे लोकही बिचकतात कारण त्याना ती कधी सवयच नसते एखादा राजदूतनिवास मॉडर्न आर्टन भरलेला असतो, तर नवीन राजदूत आल्यावर बॅरिन डेच्या जागी 'पिचवाई' विराजमान होत 'सतोषी' जाऊन तिथ तजावर येत निळ्या रगाचा वॉलपेपर जाऊन तिथे पाढरा येतो सगळीकडे नवा छाप उमटल्यावर मग सर्व कस शात शात होत

वकिलातीतला प्रशासनविषयक अधिकारी वकिलात आणि राजदूतनिवासाच्या प्रशासनाचा व्याप सांभाळतो राजदूतीणबाईंची मर्जी साभाळून त्याला हे काम कराव लागत राजदूतनिवासाच स्वरूपही येणाऱ्या प्रत्येक राजदूताबरोबर बदलत असल्यामुळे तर हे काम आणखीनच कठीण होऊन बसत राजदूतनिवासाची डागडुजी उत्तम तऱ्हेने साभाळण फार महत्त्वाच असत कारण त्या देशाचे परराष्ट्रमत्री, महत्त्वाच्या उच्चपदस्थ व्यक्ती, क्वचित् प्रसगी राष्ट्राध्यक्ष सुद्धा राजदूतनिवासात येतात (उदा क्यूबाचे राष्ट्राध्यक्ष फीडेल कॅस्ट्रो भारतीय राजदूतनिवासात अनेक वेळा आलेले आहेत )

बऱ्याच देशामधले राजदूतनिवास हवेलीवजा जुन्या पद्धतीचे असतात अशा जुन्या घरामध्ये असणाऱ्या सर्व कुरबुरी या घरामध्ये जाणवत असतात मात्र हवेलीमध्ये रहाणाऱ्या जमीनदाराचा थाट असायचा तो त्या सुसज्ज ठेवायला असणाऱ्या नोकराच्या ताफ्यामुळे त्याचा लवलेशही निवासामधे नसतो मोठ्या मिनतवारीन परदेशात यायला तयार झालेला एखादा नोकर आणि फार तर झाडलोटीला एखादा स्थानिक मनुष्य

म्हणजे शिकस्त बंगल्याचा थाट बघून आधीच भारतीय नोकराबर दडपण आलेलं असत त्याची मर्जी बिनसली की भारतात परत जायची मागणी करणार ब्रह्मास्त्र त्याच्या हातात असत त्यामुळे राजदूताच्या पत्नीला त्याला सांभाळून घ्याव लागत (थोडक्यात त्याला फारस काम सागता येत नाही)

जुन्या घराची बाहेरून जितकी शान तितकी ती आतून ठिकठिकाणी आपल पुराणत्व सिद्ध करत असतात रगून (ब्रम्हदेश) सारख्या ठिकाणी भव्य प्रासादामधे बाहेरच्या धुआधार पावसाची झलक घरातही बघायला मिळते कारण छतातून तो सरळ घरात शिरकाव करतो थड प्रदेशातली जुनी घर थडीत हातपाय गार पडल्यासारखी गारठतात त्याच्यातले हीटर्स चालत नसतात कधी एकदम गरम हवेचा झोत येतो तर कधी थड मध्यरात्री अचानक फ्रीजरमधे असल्याची सवेदना निर्माण होते कारण हीटिंगन परत राम म्हटलेला असतो कित्येकवेळा पाणीही अशा घरामधे सप पुकारत कारण पाण्याचे पाईप जुने झालेले असतात पाण्याचा रग इंद्रधनुष्यासारखा यायला लागला की ते पाईप पचवीस-तीस वर्षं जुने असल्याची माहिती तात्काळ पुरवण्यात येते

क्वचित् ठिकाणी अशा जुन्या घरात एकदम आधुनिक फिटिंग बघायला मिळतात मात्र ते समाधान अल्पकाळच टिकत नवीन दिसणारा स्टीलचा फवारा सुरू करावा आणि पाण्याचा जोर बघून आघोळीचा आनद उपभोगायला मिळेल अशा आशेन शॉवरखाली जाव तर पाणी एकदम रुसूनच बसत काही केल्या त्या शॉवरमधून पाणी बाहेर येत नाही बागेला पाणी घातल की वरच्या मजल्यावर पाणी चढत नाही अशी मोलाची माहिती घराच्या माळ्याकडून समजते आता आघोळ बागेची का स्वत ची हा प्रश्न आधी निकालात काढावा लागतो आणि माळी बागेला पाणी घालायला येण्यापूर्वी स्वत च अभ्यगस्नान उरकून घ्याव लागत बाहेरचे कुणी परदेशी पाहुणे भेटायला आले की दिवाणखान्यातली झुबर, नक्षीचे कोच आणि ब्रॉझच्या मूर्ती बघून अवाक् होतात घराची वारेमाप प्रशसा करतात मात्र त्या घराचा रुसवा केवळ राजदूत आणि त्याच्या पत्नीलाच ठाऊक! काही प्रगत देशामध्ये मात्र अगदी आधुनिक सुखसोयींनी परिपूर्ण अशा घरामधे राहण्याची सधी मिळते आणि मग त्या आठवणींवर पुढची कठीण जागेतली वर्षं काढावी लागतात

राजदूतनिवासाच्या बागाही त्या निवासासारख्याच आलीशान हॉलडमधल्या निवासाची बाग आठ एकराची असेल तर वॉशिंग्टनच्या घराभोवतालचा परिसर सपून नैसर्गिक जगल कुठे सुरू होत हे कळण कठीण इतका तो परिसर मोठा आहे. काही राजदूतनिवासामधे स्विमिंग पूल आणि टेनिस कोर्ट याचीही सोय असते रगून, तेहरान,

हरारे (झिंबाब्वे) या ठिकाणी आणि इतर अनेक जागी अशी सोय आहे. थड प्रदेशातला बागेचा सीझन जेमतेम काही महिने टिकतो काही राजदूत आणि त्याच्या पत्नी स्वत बागेत काम करून आपली बागेची हौस भागवतात, कारण अशा ठिकाणी महिन्यातून एकदोनदाच माळी परवडतो आणि त्याच्या तारखा महिनोमहिने आधी ठरवाव्या लागतात गरम हवेच्या ठिकाणी बारा महिने बागेची मशागत करावी लागते अशा जागी सरकार माळी पुरवत अनेक ठिकाणी, मोठ्या बागेचा राष्ट्रीय दिनाच्या समारभातही उपयोग होतो आणि पधरा ऑगस्टचे ध्वजवदनही राजदूतनिवासाच्या बागेत केल जात

या बागाच्या निमित्तान जगातल्या तऱ्हतऱ्हेच्या फुलाची आणि झाडाझुडुपाची आपोआप माहिती होते थड प्रदेशात पँझी, बेगोनिया, ट्यूलिप्स, रोडोडँड्रनस, अँतुरेनियम, फ्यूशिया इ सर्रास दिसताल गरम प्रदेशात सर्व ट्रॉपिकल झाड आणि फुल दिसतात नारळी पोफळीची झाड आग्नेय आशियात मुबलक तर दार्जिलिगमधल्यासारखे सूचिपर्णी वृक्ष युरोपातल्या थड देशात भरपूर वॉशिंग्टनच्या उन्हाळ्यात गुलबक्षीची आणि कोरियातल्या उन्हाळ्यात कोराटीची फुल पाहिली की पुण्याचा मे महिना आठवतो तर रगूनच्या बागेत मोगरा फुललेला दिसला की महाराष्ट्रातल्या श्रावणाची सय येते सिक्कीमसारख्या थड प्रदेशातली ऑर्किडस् मलेशिया, थायलडसारख्या गरम हवेच्या ठिकाणी फुलताना पाहिली आणि बेजिंगसारख्या ठिकाणी नोव्हेंबरच्या थडीत माना टाकणारी पँझीची फुल फ्रँकफर्टच्या हिमवृष्टीनतर देखील बर्फाच्या थराखाली तग धरताना पाहिली की निसर्गातला चमत्कार जाणवतो तर नेपाळमधली रोडोडँड्रनस् स्वित्झर्लंडच्या आल्पस् पर्वतामध्ये बघितली की निसर्गामधे वर्णविद्वेष नसल्याची खात्री पटते

★ ★ ★

# विदेशसेवेतले बल्लवाचार्य

राजदूताच्या यशाची गुरुकिल्ली कित्येकवेळा त्याच्या आचाऱ्याच्या हातात असते इतकं त्याचं राजदूताच्या आयुष्यात महत्त्व आहे. चांगला जावई मिळणं जितकं अवघड तितकंच चांगला नोकर मिळणंही कठीण. ठरवून दिलेली कामं नोकरानं पार पाडायची आणि बाजूला व्हायचं हा आपल्याकडला दंडक. काही कारणानं त्याचे आणि आपले मतभेद झालेच तर ते संबंध तिथेच संपुष्टात येतात आणि नवा गडी शोधायला सुरवात होते. (अर्थात् गडी हा प्रकारही आता संपुष्टात येत चालला आहे.)

मात्र वकिलातीच्या जीवनामध्ये नोकराचं स्थान ध्रुवासारखं अढळ! परदेशात जिथे कुठल्याही प्रकारची मदत उपलब्ध नसते तिथल्या राजनैतिक मेजवान्या पार पाडायच्या त्या आपल्या भारतीय नोकराच्या जिवावरच. राजनैतिक अधिकाऱ्याला भारतातून नोकर सरकारी खर्चानं नेता येतो तो याच कारणाकरता. (मात्र त्याचा पगार असतो खास 'सरकारी'. तेव्हा अशा नोकरीला हल्ली कुणीही नोकर विचारत नाहीत हा मुद्दा निराळा.)

राजदूताला असे दोन नोकर सरकारी खर्चानं नेता येतात. कित्येकवेळा राजदूताच्या नोकराला सर्व काम स्वतःलाच सांभाळावं लागतं. विशेषतः भारतातून उच्चपदस्थ सरकारी पाहुणे आल्यावर राजदूताच्या पत्नीला त्याच्याबरोबर अनेक कार्यक्रमांना हजर रहावं लागतं. तेव्हा घरच्या मेजवानीला ती पाहुण्याबरोबरच घरी येणार अशी कितीदा तरी

वेळ येते मात्र मेजवानीचा थाट जिथल्या तिथे हवाच ती जबाबदारी मग नोकरावर पडते घरी फोन आल्यावर दोनचार वाक्य इग्रजीतून बोलता येण्याएवढ त्याच इग्रजीच ज्ञान हव ऐनवेळी फ्यूज उडाला तर तो बघायला इलेक्ट्रिशियन पुढच्या आठवड्यातली वेळ देतो अशी काम देखील घरातल्या नोकराला यावी लागतात त्यामुळे तो केवळ आचारी नसून हँडी मॅन असावा लागतो

सामान्यत नोकरान मालकाची मर्जी सपादन करायची असते मालकिणीन नोकराची मर्जी राखायचा प्रकार फक्त विदेश सेवेतच घडत असावा राजदूताच्या नोकरद्वयीन गुण्यागोविंदान राहून मेजवान्याचा भार व्यवस्थित उचलला तर त्या राजदूताची तिथली कीर्ती वाढते तदुरी चिकनचा महिमा तिथे दिसायला लागतो पण मग हळूहळू कुकच तिथल प्रस्थ वाढत, आणि किचन म्हणजे त्याला आपलीच मालमत्ता वाटायला लागते तिथल्या पदार्थांचा वापर कसा करायचा हे ठरवायच त्यान तो पदार्थ तिथे मिळतो का नाही, तो पुरवायचा कसा ते बघून घ्याव यजमानीणबाईंनी, ही त्याची भूमिका! पुढे पुढे किचनमध्ये बाईंनी फेरी मारलेली सुद्धा या कुकला सहन होईनाशी होते एखादा पदार्थ बिघडला म्हटल की त्याचही तत्र लगेच बिनसत तर काहीवेळा हे दोन नोकर एकमेकाना भडकावून देतात आणि दोघामध्ये चुरस सुरू होते ती सोडवताना राजदूतीणबाईंच्या नाकीनऊ येतात कारण त्याच्याकडून बावापुता करून तिलाच काम करून घ्यायची असतात किचनमधे काय आतषबाजी चालू आहे याचा बाहेरच्या पाहुण्याना पत्ता लागू न देता चेहऱ्यावर परत हास्याचा मुखवटा चढवून सभाषणात सामील होण्याची कला तिलाही सवयीन साधते त्यासाठी 'स्थितप्रज्ञस्य का भाषा' या उक्तीची तिला वारवार मनात उजळणी करावी लागते वरचेवर होणाऱ्या मेजवान्या हा आपल्यावर पडणारा ताण असतो हे दाखवून देण्याची सधी नोकर अजिबात सोडत नाही

पाहुण्याना द्यायची मद्य कित्येक वेळा नोकर स्वत पिऊन बसल्याची उदाहरण घडली आहेत मग त्याना सावरून घेताना राजदूताच्या पत्नीची पुरेवाट होते त्याना जास्त समज देण्याची सोयच नसते कारण "हा मी चाललो" हा त्याचा हुकमी एक्का तयारच असतो नोकरान परत जाण्याच नाव काढू नये यासाठी तिला स्वत च सार कौशल्य पणाला लावाव लागत नाहीतर राजनैतिक जीवनातला अक्राळविक्राळ कामाचा डोंगर तिला भेडसावायला तयारच असतो

बरोबर नेलेला नोकर जर स्त्री असेल तर तिच्या समस्या आणखीनच वेगळ्या! दोन आठवडे घरच पत्र नसल की तिच्या स्वयपाकाची चव जाते चार दिवस सूर्याच

दर्शन झाल नाही की तिला आजारी वाटायला लागत मार्केटमधे सेल लागल्यावर घरी पार्टी असली की भाजीत मीठ जास्त पडत आणि रश्शात पाणी जास्त होत नवराबायकोच जोडप नेल्यावर नवऱ्याला बायकोच्या तब्येतीची इतकी काळजी की तिन काम करण दूरच राहिल परतु त्यालाही त्याच काम धड सुचत नाही मूलबाळ होण्याची शक्यताही नाकारता येत नाही मग राजदूतीणबाईच्या डोक्यावर सतत टागती तलवार !

अतिप्रगत देशामध्ये भारतीय नोकर साभाळण आणखी जिकीरीच भारतातले सरकारी अधिकारी त्याच्या नोकराना कामाला जुपताल आणि पुरेस वेतन देत नाहीत असा परदेशात उगीचच प्रचार झाला आहे 'झोपडपट्ट्यामधे रहाणारे लोक' हे पाश्चात्य जगाच विशेष आकर्षण ! टेलिव्हिजनवर दाखवले जाणारे बरेच वार्तापट 'गरिबी दिखाओ' अशा धर्तीवर असतात त्याची सहानुभूति नेहमीच नोकरवर्गाकडे असते, त्यामुळे अधिकाऱ्यान नोकराला नाखूष करण्याचाच अवकाश की वृत्तपत्र त्याच्या मागावर रहातात आणि भारतीय नोकराच्या दयनीय अवस्थेच समग्र वर्णन करतात त्या राजनैतिक अधिकाऱ्यान आपल्या क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावूनसुद्धा नोकर प्रकरणामुळे त्याची नाचक्की होते

तर काही वेळा या प्रगत देशामध्ये भारतातून नेलेल्या नोकराचे डोळे बाहेरच्या कामाकडे आणि तासावर मिळणाऱ्या तिथल्या स्थानिक चलनाकडे लागलेले असतात मालकिणीचा पाय बाहेर पडला की नोकरही बाहेर कामाच्या शोधात पसार यजमान आणि यजमानीणबाई दोन दिवस नोकरावर घर सोडून गावाला गेले तर आल्यावर कळत की नोकरान केव्हाच पोबारा केला आहे त्याच्या अस्तित्वाची नामनिशाणीही त्यान मागे ठेवलेली नसते न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, लडन अशा ठिकाणी हा धोका फार !

एखाद चागल ठिकाण पाहून याव अशा विचारान आपल्याकडल्या मध्यमवयीन बायका सुद्धा हल्ली घरकामाची बाई अशी उपाधी लावून राजनैतिक जोडप्याबरोबर परदेशात येतात त्या ठिकाणी पोचल्यावर कामाचा बडगा दिसला की "मी नाही बाई असली काम करणार", म्हणून त्याचा हात कपाळावर आणि मालकिणीच्या हातात झाडू असा विरोधाभास निर्माण व्हायची वेळ येते

नोकराची करमणूक हाही राजनैतिक जोडप्याला विचार करायला लावणारा विषय तिथे बऱ्याच कुटुबामधे नोकर असतात ते सुट्टीच्या दिवशी एकत्र येऊ शकतात (त्यातून नवीन समस्या उद्भवतात तो भाग निराळा ) जिथे अशी सोय नाही तिथे त्या नोकराला मनोरजनाच साधन नसतच त्यामुळे सुट्टीच्या दिवशी त्याला आपल्याबरोबर

घेऊन जाव लागत किंवा त्याची काहीतरी सोय लावावी लागते कुटुब आणि आप्तजनापासून दूर असल्याचा ताणही नोकराना वारवार जाणवतो तरी हल्ली व्हिडिओमुळे हा प्रश्न जरा सुटल्यासारखा झाला आहे. आठवडाभरातून दोन व्हिडिओवरचे सिनेमे बघायला मिळाल्यास त्याच्या चित्तवृत्ती प्रसन्न रहायला मदत होते

नवा देश, नवी माणस आणि नवा नोकर अस हे नोकराच त्रैराशिक असत खूप वर्ष एकच नोकर हे समीकरण आता जुन झाल दर नवा गडी अनुभवविश्वात नव्या अनुभवाची भर घालून जातो आमच 'हे' विश्व आता समृद्ध झाल आहे आमच्या एका बदलीच्या ठिकाणी वयस्क आजोबासारखे दिसणारे स्वयपाकी महाशय मोठ्या आनदान आमच्याबरोबर नवा देश बघण्याच्या निमित्तान उत्साहान यायला तयार झाले आधीची वीस वर्षं ते दुसऱ्या राजदूताकडे काम करत असत या कामाची त्याना माहिती असल्यामुळे आपल्यालाही ते सोयीच होईल अशी आमची धारणा आपण आता नव्या ठिकाणी कामाला आहोत याचा त्याना सारखा विसर पडायचा फोनवर पहिल्या राजदूताच नाव घेऊनच ते निरोप द्यायचे किंवा घ्यायचे शेवटी राजनैतिक यादीत छापलेल आमच नाव खर आहे की नाही अशी काही जणाना शका यायला लागली काही महिन्याच्या अवधीतच आपली बायको आता मरणार आणि आपण तिच्या अतकाळी हजर राहिल पाहिजे हे पालुपद स्वयपाकी महाशयानी चालू केल आणि तिच शेवटच( ?) दर्शन घेण्यासाठी ते खरोखरच रवाना झाले

आमचे दुसरे मध्यमवयीन कुक महाराज स्वत ला ज्योतिषी समजणारे! काही महिन्यातच आजुबाजूच्या तरुण मुलीचे ते हात बघायला लागले दरवाजाशी सुरक्षेसाठी उभ्या राहाणाऱ्या परक्या भाषेच्या दारवानानाही भाषेची अडचण फारशी मधे येऊ न देता ज्योतिष सागून दक्षिणा म्हणून ते त्याच्याकडून स्वस्तातली दारू मिळवायला लागले रात्रीच काम आटोपून सामसूम झाल्यावर या सोमप्राशनाला पहिली सुरुवात झाली मग दिवसाही स्वयपाकी महाशय तद्रीत दिसायला लागले घरासमोरच्या हौदा शेजारून चालताना दिवसाढवळ्या तळ्यात की मळ्यात अशा अवस्थेत ते तळ्यात पडणार अशी चिन्ह दिसायला लागल्यावर त्याचे आमच्याकडे दिवस भरत आल्याची जाणीव झाली

दक्षिण कोरियामध्ये ऑलिंपिक खेळापूर्वी आलेला आमचा कुक मोठा नशीबवान! आला तोच मुळी ऑलिपिक सघाबरोबर आपल्याला हॉकी आणि फूटबॉल बघायचा अशी घोषणा करतच "अहो, लाखात एक अशी सधी मिळाल्यावर मी सोडतो काय!" हॉकीची मॅच बघायला शेजारी बसलेल्या पुण्याच्या वार्ताहराला आमचा कुक मुलाखत

दिल्यासारखी ही माहिती पुरवत होता आपण राजदूत महोदयाचे स्वयपाकी असल्याच त्यान आणखी चार जणाना ऐकू जाईल अशा आवाजात त्या वार्ताहराना सागितल आणि तिथल्या एक दोन जणाना घरच्या ऑलिंपिक पार्टीच आमत्रणही करून टाकल समोसे बनवायच्या वेळी मात्र आधी हॉकी फायनल आणि मगच सामोसे हे त्यान मला स्पष्ट सागून टाकल लग्न पहावे करून तस नोकर, पहावा वागवून हे खर

मास्कोला आमची बदली झाल्याच कित्येकाच्या लक्षात राहिल ते आम्ही तिथे पोचल्यावर आमच्याकडे आलेल्या कामाच्या बाईमुळे जाताना 'याच्याकडे घरगुती कामासाठी मास्कोला रवाना' अशी त्यानी स्वत ची मुलाखत पुण्याच्या वर्तमानपत्रात छापवून आणली होती नऊवारी साडी, नाकात चमकी आणि पैशाएवढ कुकू यामुळे तमाम रशियन पादचारी रस्त्यात क्षणभर थबकून बाईकडे निरखून बघत पुढे जात नऊवारी साडीत पाय उघडा कसा रहातो या कुतूहलाची शहानिशा करून घेण्यासाठी काही महाभागानी त्याच्या सोग्याला चक्क हात लावून पाहिला रशियन मजनू मिळाल्याचा आनद बाईच्या विजयी मुद्रेवर दिसायला लागला कोपऱ्यावरच्या दुकानातून ब्रेड आणि बटर आणायला त्याना तासन् तास लागायला लागला बाईना परत पृथ्वीवर आणायला फार प्रयास पडले

एकदरीत मालकीण आणि नोकराच नातच मुळी काहीस सासू-सुनेसारख ! एका मर्यादेपलीकडे ते सुधारूच शकत नाही तितपत सलोख्यान जरी ते राहिल तरी राजनैतिक नोकरीतली बाजी जिंकली म्हणायला हरकत नाही

★ ★ ★

# परदेशातले स्थानिक भारतीय

परदेशामधे भारतीय वकिलातीच्या भूमीवर पाय रोवून उभे असलेले सरकारचे प्रतिनिधी आणि तिथले स्थानिक भारतीय याचे सबध पाल्य-पालकासारखे ! NRI हे सबोधन सध्या भारतात दबदबा निर्माण करत त्यानी परदेशात मिळवलेली मानमान्यता याबरोबरच त्याच्या चलनाची श्रीमती हेही त्यामागच मुख्य कारण परदेशी चलन भारतीय रुपयात कित्येक पटीन वाढत त्यामुळे NRI चा भारतात रुबाब असल्यास नवल नाही एकेकाळी ब्रेनड्रेन म्हणून भारतात जो आक्रोश चालू होता त्याची जागा आता वीस वर्षानतर NRIच्या जल्लोशान घेतली आहे कारण तोच बाहेर पडलेला भारतीय अपार मेहनतीच्या जोरावर परदेशात घट्ट पाय रोवून उभा आहे आणि आता भारतात पैसे गुतवण्याच्या प्रयत्नात आहे. मात्र ही स्थिती येण्यापूर्वी याच भारतीयानी पचवीस वर्षापूर्वी जेव्हा प्रथम परदेशात पाऊल ठेवल तेव्हा अत्यत खडतर परिस्थितीत दिवस काढून काटकसरीन खर्चाची हात मिळवणी केली, शक्य तितका वेळ काम करून पैसा मिळवला आणि तिथल्या समाजात स्थानिक लोकाच्या बरोबरीन मानाच स्थान मिळवल त्याच हे फळ आता त्याना दिसत आहे

परदेशात जाणारा कुठलाही भारतीय बाहेर पडतो तो भारतीयत्वाचा वारसा घेऊनच तो कितीही वर्ष बाहेर राहिला तरी त्याच हे भारतीयपण त्याच्यावर चिलखतासारख विराजमान झालेल असत परदेशात राहून तिथल्या सस्कृतीत अगदी एकजीव होऊन

गेलेला भारतीय क्वचितच दिसतो परदेशात तो पैसा जरूर मिळवतो, राहतोही तिथल्या थाटात, त्याच्याही घरात परदेशी आधुनिक सुखसोयी सर्व असतात मात्र स्टिरिओवर बहुतेक वेळा हिंदी चित्रपट सगीत ऐकू येत असत तर व्हिडिओवर लेटेस्ट हिंदी चित्रपट चालू असतो बायको रिकोटा (पनीरसारखे तयार चीज) चीजची एखादी नवीन बर्फी बनवून बघत असते नाहीतर झुकिनीच (दोडका आणि घोसावळ्यामधला भाजीचा प्रकार) लोणच घालून बघत असते शनिवारच्या सध्याकाळच्या ताशाच्या पार्टीला काय बेत करायचा याचा तिला विचार पडलेला असतो तर यावेळची दिवाळी कुणाकडे साजरी होणार आहे हे ती नवऱ्याला शोधून काढायला सागत असते

परदेशात नशीब काढायला म्हणून बाहेर पडलेली भारतीयाची ही पहिली पिढी इग्लड, अमेरिका, जर्मनी, जपान, सिगापूर आणि आखाती देशामधे अशा भारतीयाच प्रमाण अधिक आहे जे अजूनही मनात भारताचा विचार करतात आणि त्याचे भारताबरोबरचे सबध दृढ आहेत आई, वडील, भाऊ, बहिणी यानाही ते परदेशात नेण्याचा प्रयत्न करतात आपल्या कुटुबाना वर आणण्याच्या प्रयत्नात ते बहुताशी यशस्वी झाले आहेत

मध्यमवर्गातून वर आलेल्या या परदेशीय भारतीयाच्या पिढीला वकिलातीबद्दल अप्रूप असत मात्र वकिलातीपासून शक्य तो दूर रहाण्याच त्याच धोरण असत कारण वकिलातीत गेल्यावर स्मितहास्यान स्वागत होईलच याची त्याना खात्री नसते तसच क्षुल्लक कामासाठी चार चकरा माराव्या लागणार याचीही त्याना कल्पना असते तरी भारत आणि आपल्या दरम्यानचा तो एक दुवा आहे याची त्याना जाणीव असते ज्यानी आपले पासपोर्ट कायम ठेवले आहेत त्याना वकिलातीशी सबध ठेवण प्राप्त असत पचवीस वर्षं परदेशात राहिलेल्या भारतीय कुटुबामधे बहुधा नवऱ्यान तिथल नागरिकत्व स्वीकारलेल असत तर बायकोचा अजूनही भारतीय पासपोर्ट असतो भारताशी राहिलेल ते अधिकृत नात तोडायला तिची अजूनही तयारी नसते केव्हातरी पुढे भारतात एखाद छोटस घर बाधून राहू अशी स्वप्न ती अजूनही बघत असते (ते आता स्वप्नच राहणार आहे याची पूर्ण कल्पना असूनसुद्धा) कारण परदेशात जन्मलेली पुढची पिढी परदेशीय सस्कृतीत बहुताशी विलीन झालेली असते भारत हा त्याना परदेश वाटायला लागलेला असतो, त्यामुळे भारतात परत जाण्याचा सभव त्याच्या बाबतीत उद्भवणारच नसतो

पिढ्या न् पिढ्या परदेशात राहिलेले भारतीय ही परदेशीय भारतीयाची आणखी एक वर्गवारी केनिया, स्पेन, हॉंगकॉंग सिगापूर, फिजी, मॉरिशस, गयाना, ब्रह्मदेश

अशा ठिकाणी या भारतीयाची सख्या खूप आहे. हाँगकाँग, दक्षिण अमेरिका, स्पेन, सिगापूर इथले भारतीय सिधी, व्यापारात आघाडीवर आहेत मात्र तेही आपली भारतीय सस्कृति पूर्ण टिकवून आहेत

रामनवमी असो, जन्माष्टमी असो, मुलाच बारस असो किंवा साईबाबाच भजन असो त्याच बादशाही थाटात हे सर्व समारभ साजरे होत असतात हिरे आणि जडजवाहिरान या समारभाची शोभा आणखी वाढलेली असते

सुरीनाम, मॉरिशस, गयाना, फिजीमधे पन्नास टक्क्याहून जास्त लोक भारतीय वशाचे आहेत पॉलिनेशिया, फिजी, गयानामधले काळे लोक भारतीयाना दूर ठेवायचा प्रयत्न करतात फिजीमधे मध्यतरी लोकशाही सरकार उलथून पडल आणि दोन लष्करी कूप झाले तेव्हा तिथल्या भारतीयाची कुचबणा झाली आणि हजारो भारतीय पळून गेले अशा प्रसगी भारत सरकारन आपली बाजू घेऊन आपल्यासाठी काहीतरी कराव, तिथल्या सरकारवर दबाव आणावा अशी या स्थानिक भारतीयाची अपेक्षा असते या प्रसगामधे भारतीय राजदूत त्याना देवदूतासारखा वाटतो परदेशातल्या भारतीयाच्या अशा समस्या म्हणजे अवघड जागेच दुखण ! त्या देशाच्या अतर्गत कारभारात ढवळाढवळ केल्याच तर जाणवू द्यायच नाही मात्र तिथल्या भारतीयाचे हितसबध तर कायम राखायचे हे मोठ नाजुक काम !

ज्या ठिकाणी भारतीय मोठ्या सख्येन आहेत त्या ठिकाणी भारतीय सास्कृतिक केद्र उघडण्यात आली आहेत तिथे हिंदी आणि नृत्य-सगीतासारख्या इतर भारतीय कलाच खास प्रशिक्षण देण्यात येत तिथल्या भारतीयाना भारतीयत्व कायम टिकवण्यामधे त्यामुळे मदत होते फिजी, गयाना, सुरीनाम, मॉरिशस, पोर्ट ऑफ स्पेन, या ठिकाणी अशी सास्कृतिक केंद्र आहेत मॉरिशसशी महाराष्ट्राच खास नात आहे शभर वर्षांपूर्वी ब्रिटिशाच्या काळात महाराष्ट्रातले शेकडो मराठी भाषिक लोक मॉरिशसमधल्या उसाच्या मळ्यामधे काम करण्यासाठी नेण्यात आले आणि ते तिथेच स्थायिक झाले मराठी पूर्वजाखेरीज त्याचा महाराष्ट्राशी फारसा सबध राहिला नाही मात्र ते उत्तरोत्तर प्रगति करत राहिले त्यानी मॉरिशसच्या सस्कृतीत महत्त्वपूर्ण भर घातली आपली मराठी मायबोली टिकवण्याचा मात्र ते आजतागायत प्रयत्न करत आहेत महाराष्ट्रातल्या मराठीला पुढे कितीतरी पैलू पडत गेले मात्र त्यावेळी तिथे गेलेली मराठी भाषा त्याच स्थितीत राहिली १९९१ च जागतिक मराठी समेलन मॉरिशसमधे भरवण्यात आल यावरून तिथल्या मराठी भाषिकाच्या सख्येची आणि त्याच्या मराठीवरच्या प्रेमाची प्रचीती येते

ब्रह्मदेशात झियावाडी, चौतागा या ठिकाणची भारतीय वस्ती पाहिल्यावर बिहारमधे आल्याचा भास होतो तशीच घर, तशीच राहणी आणि तशीच विचारसरणी, या लोकानी ब्रह्मभूमीतही कायम राखली आहे ब्रह्मदेशातल्या बासष्ट सालच्या क्रातीनतर सर्व स्थानिक भारतीयाची तिथून हकालपट्टी झाली जे तिथे राहिले ते अत्यत हलाखीच्या परिस्थितीत स्वत च्या इस्टेटी अक्षरश वाऱ्यावर सोडून लोकाना ब्रह्मदेशातून बाहेर पडाव लागल त्यातून लब्हाळ्यासारखी वाचलेली आणि आजही तिथल्या शेतीवरच्या तुटपुज्या कमाईमधे सुखसमाधानान नादणारी ही बिहारी मडळी आजही त्याच्यावर दडपण आणून सक्तीन त्याच्याकडून धान्य काढून घेतल जात एकेकाळी खाऊन पिऊन सुखी असलेली ही लोक, त्याच्यावरच्या जुलुमामुळे देशोधडीला लागायची वेळ आली वकिलातीन आपल्या दु.खावर फुकर घालावी या आशेन येणाऱ्या या लोकाचा ओघ पाहून वकिलातीच्या कुशल कामगिरीची तीव्रतेन जाणीव व्हायची त्याच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करण्याशिवाय तूर्त वकिलात फारस काही करू शकत नाही केवळ ब्रह्मदेशातच नव्हे तर फिजी, गयाना, युगाडा या देशामधेही भारतीयाची अशीच परिस्थिती आहे. एकीकडे प्रगत देशामधल्या NRI चे वाढणारे महत्त्व तर दुसरीकडे परदेशस्थ भारतीयाची ही स्थिती दोघाबरोबर वकिलातीचे सबध मात्र समसमान

आखाती देशामधे रहाणारे भारतीय ही आणखी वेगळीच वर्गवारी एक पाय हिंदुस्थानात आणि दुसरा आखाती देशात रोवून स्वत चा तोल साभाळणारे हे भारतीय तिथे स्थायिक होण्याची त्याची महत्त्वाकाक्षा कधी नव्हतीच तिथे परकीय चलन कमावून ते भारतात पाठवतात यातून त्यानी भारताची फार मोठ्या प्रमाणावर सेवा केली आहे. एअर इडियाची विमान अजूनही भरभरून मध्यपूर्वेकडे जातात कुवेत, बहारिन, कतार, सौदी अरेबिया, दुबाई, ओमान या देशाकडे हा ओघ जात असतो कामगार, शिक्षक, नर्सेस, डॉक्टर्स, इजिनिअर्स अशा सर्व क्षेत्रातल्या लोकानी मध्यपूर्वेत बस्तान बसवल आहे. मात्र त्याचे सबध भारताशी पूर्णपणे निगडित आहेत पैसा मिळवून भारतात परत जायच ही त्याची दृढ धारणा आहे. त्याचे वकिलातीबरोबर जिव्हाळ्याचे सबध असतात कारण त्याना अनेक प्रकारची मदत भारत सरकार पुरवत असत

परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयाची पुढची पिढी म्हणजे तिथली स्थायिकच धरायला हवी जन्मदाते आईबाप भारतीय सोडल्यास बाकी त्याचा भारताशी फारसा सबध येत नाही त्याच शिक्षण स्थानिक भाषेत झालेल असत सस्कार तिथलेच झालेले असतात मित्रपरिवार परदेशी असतो त्यामुळे त्रयस्थ आपुलकी सोडल्यास

त्याच्या भारताबद्दल फारशा भावना नसतात आईवडील का इतक भारत पुराण लावतात हे त्याना प्रामाणिकपणे समजत नसत, कारण आईबापाच्या समाधानासाठी प्रत्यक्ष भारतात गेल्यावर तिथल्या गर्दीन, विमान वेळेवर न सुटण्यान आणि आजुबाजूच्या अस्वच्छतेन त्याना उबग आलेला असतो नातेवाईकाच्या चाभार चौकशानाही ते कटाळून जातात त्यामुळे स्थानिक भारतीयाचे भारताशी असणारे सबध पुढल्या पिढीत उत्तरोत्तर कमी होत जाणार की काय अशी एक शका मनात डोकावून जाते त्याचबरोबर परदेशीयामधे भारताबद्दल कुतूहल निर्माण करण्याच कामही ही पिढी करत आहे कारण ते जरी त्या देशात मिसळले गेले तरी ते वेगळेच असतात ही जाणीव दोघानाही असते

स्थानिक भारतीयानी आपली नाव वकिलातीमधे नोंदवण्याची प्रथा आहे बरेचसे भारतीय ते करण्याच्या फदातही पडत नाहीत अर्थात् वकिलातीकडून मिळणारी वागणूक समाधानकारक नाही अशी त्याची तक्रार असते वकिलातीत पासपोर्टसाठी आणि दुसऱ्या कुठल्याही माहितीसाठी तासन् तास खोळबून रहाव लागत, साध्या कामात विलब लागतो तसच वकिलातीच्या अधिकारी वर्गाकडून माफक सौजन्यही दाखवल जात नाही, असा त्याचा सूर असतो अलीकडेच भारत सरकारन इतर देशाचे नागरिक झालेल्या भारतीयाना भारतात अनेकवेळा जाता-येता येईल असा पाच वर्षांसाठीचा व्हिसा सुलभपणे मिळण्याची व्यवस्था केली आहे.

सव्वीस जानेवारी आणि पधरा ऑगस्ट या दिवशी तिथल्या भारतीयानी ध्वजवदनाला याव अशी वकिलातीची अपेक्षा असते त्यासाठी एक जाहीर निमत्रण दिल जात मात्र झेंडावदनाच महत्त्व स्वातत्र्य मिळाल्यापासून सगळीकडे सपलेल दिसत मात्र सध्याकाळच्या राजदूताच्या चहापानाला आमत्रण हव यासाठी त्याच्यात अहमहमिका असते, कारण ज्याला निमत्रण आहे त्याचा भाव इतर स्थानिक भारतीयामधे वधारतो

ज्या देशामधे भारतीय स्थायिक झाले आहेत त्या देशाचा ठसा त्याच्यावर थोड्याफार प्रमाणात उमटलेला दिसतो युरोपीय समाजात प्रादुर्भावान दिसून येणारी खाजगीपणाची भावना युरोपात स्थायिक झालेल्या भारतीयामधे नकळत भिनली असावी अर्थात् आपल्याच प्रातातल्या दुसऱ्या भारतीयाबरोबर हे खाजगीपण जरा कमी होत परदेशात दोन भारतीय नागरिक एकमेकाना दिसल्यावर ते आधी सशयान एकमेकाकडे बघतील मात्र दुसराही आपल्याच भाषेत बोलताना ऐकल्यावर दोघाचीही कळी खुलेल आणि दोघही एकमेकाकडे बघून हसतील

जिनीव्हासारख्या ठिकाणच्या भारतीयाच्या चेहऱ्यावर अलम् दुनियेतला पैसा तिथे खुळखुळत असल्याची जाणीव स्पष्ट लिहिलेली असते जगाला भेडसावणाऱ्या तमाम प्रश्नापासून दूर आल्पस् पर्वताच्या कुशीत सुखरूप असल्याची एक सुखद बेपर्वाई

जिनिव्हाकरामधे जाणवते जर्मनीमधले भारतीय जर्मन समाजामधे जास्त मिसळून गेले आहेत जर्मन-भारतीय विवाहही कदाचित् त्याला कारणीभूत असावेत इथले भारतीय आपापसात कित्येक वेळा जर्मन भाषेत बोलतात जर्मन सणवार जर्मनाच्या उत्साहान साजरे करतात भारताबरोबरचे सबध रोडावत चालल्याची फारशी खत त्याच्यामधे दिसत नाही भारताकडे बघण्याची त्याची दृष्टीही हळूहळू जर्मन होत चालली आहे.

तर अमेरिकेतल्या खुल्या मैत्रीपूर्ण वातावरणाचा छाप तिथल्या भारतीयाच्यावर उमटला आहे 'हाय' म्हणून रस्त्यात कुठेही थाबून कुणाशीही चार शब्द बोलायची त्याची तयारी असते गालावर हसू असत युरोपात प्यायला साध पाणी मिळण मुष्किल तसच चेहऱ्यावरच स्मितही दुर्मिळ | अमेरिकेतला सैल स्वभाव तिथल्या भारतीयाच्यातही भिनला असावा त्याचे कपडे अमेरिकन असतात, उच्चार देसी अमेरिकन असतात मात्र मनान ते भारतीयच राहिलेले असतात तिथल्या समाजात इतक तऱ्हतऱ्हेच्या जातींच मिश्रण आहे की भारतीय चेहरेही त्यात समावून जातात अमेरिकन उच्चारणासहित एखादी भारतीय वृत्तनिवेदिका टी व्ही वर आली तरी लोकाना त्यात विशेषस वाटत नाही परदेशीय भारतीयाची सध्याची पिढी सर्व क्षेत्रात अमेरिकनाची बरोबरी करत आहे. कॉम्प्यूटरसारख्या क्षेत्रामधे तर आशियाई विद्यार्थी आघाडीवर आहेत आपल्या भारतीयत्वाला ते अमेरिकेत मान्यता मिळवून देऊ लागले आहेत

परदेशात कितीतरी भारतीयानी भारताला मानस्थान मिळवून दिल आहे. अमेरिकेत स्थायिक झालेले नोबेल पारितोषिक विजेते डॉ हरगोविंद खुराना आणि डॉ चद्रशेखर, गयानामधले भारतीय वशाचे पतप्रधान श्री छेडी जगन, परदेशात आघाडीवर असलेले भारतीय लेखक (उदा अमेरिकेत भारती मुखर्जी तर त्रिनिदादमधे व्ही एस्. नायपॉल), सगीतज्ञ झुबिन मेहता, हॉंगकॉंगमधे व्यापारात मानस्थान मिळवलेले भारतीय व्यापारी श्री हरिलीला, वेस्ट इडीजमधले कालीचरण, रोहन कन्हाई हे क्रीडा क्षेत्रातले आघाडीवरचे क्रिकेटपटू ही भारताची परदेशातली भूषण आहेत तनिता टीकारामसारखी एखादी परदेशस्थ भारतीय युवती पॉप म्युझिकमधे आघाडीवर आलेली पाहिली की भारतीय सगीताचा वारसा इथेही उणा पडत नाही हे जाणवत तर जपान कोरियासारख्या अतिपूर्वेकडे राहणाऱ्या भारतीयाच्यात जबर आत्मविश्वास आढळतो, मात्र ते गर्वान फुगून गेलेले नाहीत तिथल्या पाण्यात अजूनही विनयाचा अश शिल्लक राहिलेला असावा तर हॉंगकॉंगची बेफिकीरी तिथल्या श्रीमत भारतीय व्यापाऱ्यामधे उतरली असावी

बहुताशी परदेशीय भारतीयाना वकिलातीच्या अधिकाऱ्याबरोबरचे सबध अभिमानास्पद वाटतात आपल्या भारताबरोबरच्या नात्याला उजाळा मिळाल्यासारख त्यात त्याना वाटत असाव वकिलातीन स्थानिक भारतीयासाठी थोडेसे श्रम घेण्याची तयारी दाखवली तर ते नक्कीच त्याची पावती देतात जिनीव्हा, सिओल, रगून,

फ्रँकफर्टसारख्या ठिकाणी केलेले लहानमोठे सास्कृतिक कार्यक्रम तिथल्या भारतीयाची दाद मिळवून गेले

'बझार' हे परदेशातल एक खास वैशिष्ट्य ठिकठिकाणी हे बझार करून भारतीय वस्तू आणि भारतीय पदार्थ स्थानिक लोकाना विकायचे आणि ते उत्पन्न स्थानिक सस्थामधल्या गरजू सस्थाना मदत म्हणून द्यायच स्थानिक भारतीयाच्या मदतीन कित्येक देशात आपल्या वकिलाती हे 'बझार' घडवून आणतात ज्या ठिकाणी एअर इडिया जात नाही त्या ठिकाणी दुसऱ्या एअरलाईनन त्या वस्तू मागवण, सर्व भारतीय लोकानी एकत्र येऊन भारतीय पदार्थ बनवण, स्टॉल सजवण, तिकीट छापून ती विकण या सर्वात खूप मेहनत असते, मात्र वकिलातींनी ही परपरा ठिकठिकाणी चालू ठेवली आहे आणि स्थानिक भारतीयानी हे बझार यशस्वी करण्यात सहकार्य दिल आहे. जसा परोपकार तस स्वत च मनोरजन हाही थोडाफार भाग त्यात असतो एरवी परदेशातल्या एकटेपणाच्या जाणीवेवर आणि घरातल्या कामान पिचून गेल्यानतर येणाऱ्या वैतागावर हा एक उत्तम उपाय असतो त्यानिमित्तान वकिलातीतल्या आणि इतर स्थानिक भारतीय बायका एकत्र येतात, ओळखी वाढतात, वेळ चागला जातो आणि तोही सत्कारणी लागतो

हे बझार केवळ भारतीय वकिलातीपुरते मर्यादित नसून कित्येक ठिकाणी आतरराष्ट्रीय बझार होतात त्यात भारताचा सहभाग असतो समोसे, तदुरी चिकन आणि करी-राईस ही या बझारची ठरलेली आकर्षण आतरराष्ट्रीय बझारामधे जेवायच्या वेळी भारताचा स्टॉल गर्दीन फुलून गेलेला असतो भारतीय जेवण आणि भारतीय सिनेमा यानी भारताच नाव जगाच्या कानाकोपऱ्यात नेऊन पोचवल आहे ऑस्ट्रेलियातल्या सिडनेसारख्या शहरात चाळीस भारतीय उपाहारगृह आहेत तर कॅनडामधे ती थेट व्हॅंकूव्हरपर्यंत पसरली आहेत हाताला मेंदी लावून देणे, हात बघून भविष्य सागणे ही भारतीय स्टॉलची हुकुमी आकर्षण असतात

जिथे स्थानिक भारतीयाची सख्या जास्त तिथे भाषावार मडळ स्थापन होतात आणि ते आपापले प्रातिक सणवारही साजरे करतात बगाली आणि केरळी मडळी त्यात अगदी आघाडीवर असतात दुर्गापूजा, ओणम् हे सण धूमधडाक्यान साजरे होतात मराठी मडळीही त्यात मागे नाहीत जिथे मराठी लोकाची सख्या जास्त तिथे गणपती स्थानापन्न होतातच अमेरिका, इग्लड, कॅनडा आणि आखाती देशात अशी महाराष्ट्र मडळ अस्तित्वात आहेत (जर्मनीमधली शे-दीडशे मराठी कुटुब वर्षातून एकदा एकत्र येऊन मराठी समेलन साजर करतात )

जिथे भारतीयाची सख्या मोजकी तिथे सर्व भारतीयाच मिळून एक मडळ असत परदेशातल्या भारतीयामधे मराठी माणसाची सख्या एकूण कमीच 'भव्य हिमालय तुमचा अमुचा केवळ माझा सह्यकडा' अस म्हणत, महाराष्ट्राच्या परिसरात सुखासमाधानान नादणारी मराठी मडळी पुन्हा अटकेपार जाऊ लागली आहेत पण अजूनही कमी प्रमाणात इग्लड, अमेरिकेत मराठी लोक मोठ्या सख्येन आहेत आफ्रिकेतल्या नैरोबीसारख्या ठिकाणी अनेक मराठी मडळी जाऊन पोचली आहेत मॉरिशसमधे मराठी मायबोली असलेले पूर्वज पिढ्यान् पिढ्या तिकडे राहिल्यानतर आता स्थानिक बनून गेले आहेत इतर देशामधे मात्र मराठी माणस मोजकी असतात खुद्द वकिलातीमधे तोच प्रकार आपापसात मराठी बोलण्याचा प्रसग क्वचितच येतो एक तर मराठी अधिकाऱ्याची सख्या फार कमी आणि एकाच वकिलातीत असण्याचा योगही विरळा (मातृभाषेत बोलण्याचा आनद काय असतो याची कल्पना वर्षानुवर्षं बाहेर राहणाऱ्यानाच येऊ शकते )

परक्या देशात तिथल्या भाषेचीच सतत कानाला सवय झालेली, अशावेळी अचानकपणे मराठी कानावर पडल की केवळ भाषाच नव्हे तर आपल माणूस भेटल्यासारख वाटत पूर्व स्मृती जाग्या होतात त्यात पावसानतरच्या ओल्या मातीचा सुगध असतो जाई-जुईचा मद दरवळ असतो घोंगडीसारखी ही जाडीभरडी भाषा, मात्र तिच्यातली आपुलकीची ऊब ती कानावर पडल्यावरच कळते सातासमुद्रापलिकडे कितीतरी गोष्टींच महत्त्व जाणवत 'मायबोली' हा त्यातलाच एक भाग 'अमृताते पैजा जिंके'ही तेव्हा पटत

★ ★ ★

# राजनैतिक वर्तुळातली माणसं

विदेश सेवेच्या निमित्तान वेळोवेळी हिंडलो [illegible] झाली जगाच्या विविध भागातली माणस भेटली प्रत्येक ठिकाणी जस देशाच चित्र वेगळ, भाषा वेगळी तशी माणसही भिन्न भाषेची थोडीफार जुजबी माहिती होऊन तिथली माणस कशी आहेत याच आकलन होण्यातच वर्ष निघून गेलेल असायच काही ठोकताळे आपोआपच मनात तयार व्हायचे तिथल हवामान, इतिहास, आर्थिक परिस्थिती याचा तिथल्या माणसाच्या स्वभावावर कसा परिणाम होऊ शकतो हा एक स्वतत्र अभ्यासाचा विषय आहे. तरी ठिकठिकाणच्या मनुष्य स्वभावाचे पैलू पारखण हेही विदेश सेवेमधल आव्हानच

जेव्हा राजनैतिक समुदाय एकत्र येतो तेव्हा पाश्चिमात्य आणि पौर्वात्य देशामधले मूलभूत फरक प्रकर्षान जाणवतात पाश्चिमात्य लोक एकदम एक्स्ट्रॉव्हर्ट, व्यायामाची, खेळाची आवड असलेले, सतत कुठल्या ना कुठल्या तरी कामात गुतलेले, अत्यत व्यवहारी, कुठल्याही गोष्टीचे स्तोम न माजवणारे, झटपट निर्णय घेऊन मोकळे होणारे आणि नियोजनाला अत्यत महत्व देणारे असतात दुसऱ्याबद्दल फारशी तोशीस बाळगणारे हे लोक नव्हेतच अर्थात् युरोपीय आणि अमेरिकन दोघही पाश्चिमात्य असून त्याच्यातही फरक आहे युरोपीय लोक सस्कृतीची अधिक जाण ठेवणारे अमेरिकन माणसाच्या

व्यक्तिमत्वान इतर देशाचे लोक काहीसे दबून जातात, तर युरोपीय लोकाबरोबर त्याचा हळूहळू सवाद होऊ शकतो पूर्व युरोपची माणस आतरराष्ट्रीय वातावरणात सुरवातीला थोडीशी बुजून जातात इग्रजी भाषा न आल्यान त्याना स्वत बद्दल पूर्ण आत्मविश्वास वाटत नाही हे जाणवत. मात्र त्याचा मैत्रीचा हात सतत पुढे असतो

युरोपीय समुदायात इटली या देशाचे लोक जास्त आपल्यासारखे युरोपमधून प्रवास करताना इटलीची सरहद्द ओलाडली की सर्व इमारतींच्या बाहेरच्या बाल्कन्यामधे कपडे वाळताना दिसायला लागतात मुल इकडे तिकडे धावताना दिसतात त्याच्या आरडाओरड्याचे आवाज यायला लागतात आणि मायभूमीची आठवण व्हायला लागते इटलीमधे मुलाच फार प्रेम त्याच्या कुटुबामधे मुलाच प्रमाणही जास्त असत स्पॅनिश लोकही काहीसे भारतीयासारखे घड्याळ्याच्या टिकटिकीवर त्यांच आयुष्य बाधलेल नसत त्यानाही आरामात आयुष्याचा उपभोग घ्यायला आवडतो ब्रिटिश राजनैतिक प्रतिनिधींमधे सुभ गेला तरी पीळ कायम असतो 'राज' आता इतिहासजमा झाल तरी अजूनही आतरराष्ट्रीय राजकारणात आपली सत्ता प्रबळ असल्याची त्याची भावना दिसून येते (वस्तुस्थिती तशी आहे की नाही हा मुद्दा निराळा) मात्र भारतीय आणि ब्रिटिशामधे समान विषय अगणित दोघानाही राजकारण आणि क्रिकेट सारखच प्रिय, त्यामुळे दोघामधला सवाद पट्दिशी साधतो

फ्रेंच काहीसे स्वत मधे मशगुल असणारे लोक त्याची भाषा बोलणाऱ्या परदेशीयाचीही ते फारशी कौतुकान दखल घेत नाहीत मात्र त्याच्या स्वप्नाळू स्वभावाला प्राचीन सस्कृती आणि इतिहास दोहोंच जबरदस्त आकर्षण, त्यामुळे भारत आणि चीन या उभय देशाबद्दल त्याना कमालीच कुतूहल आहे भारताबद्दल त्याना एक नैसर्गिक ओढ वाटते त्याच्या जेवणाचाही त्याना रास्त अभिमान तासन् तास ते न कटाळता जेवणाच्या टेबलावर घालवू शकतात स्वत च्या कपड्यानी आणि फॅशन्सनी ते युरोपीय समुदायात उठून दिसतात

रशियन लोक युरोपीय ठशाचे मात्र जास्त रागडे त्याची चाल काहीशी ढापण लावलेल्या घोड्यासारखी सरकारकडून आलेल्या आदेशानुसारच वागायच ही त्याची शिकवण, त्यामुळे त्याच्या वागण्यात उत्स्फूर्तपणा फारसा नसतो भारतीयावर त्याच विशेष प्रेम सोव्हिएट युनियनची शकलें झाल्यानतरचा रशिया मात्र वेगळा आहे

नव्यान स्वातत्र्याची जाणीव झालेल्या रशियन देशामधे इतर जगाबद्दल औत्सुक्य आहे कुतूहल आहे मात्र आपल स्वातत्र्य सिद्ध करण्याच्या नादात आपल्या इतर रशियन बाधवाशी त्याचा फारसा सलोखा राहिलेला नाही आपणही युरोपीय आहोत

आणि हळूहळू इतर युरोपीय देशाची बरोबरी करायला लागू ही जाणीव सध्या तरी त्याच्यात प्रकर्षान दिसत आहे.

तुर्कस्थानचे लोक मुसलमान खरे पण ते अधिक युरोपीय असतात इतर मुसलमान देशाइतकी बधन या देशात पाळली जात नसावीत तुर्की स्त्रिया नेहमी पाश्चिमात्य कपड्यामधे वावरतात त्या फॅशनेबल असतात आणि पुरुषामधे सहजगत्या मिसळतात

दक्षिण अमेरिकेचे लोक आपल्याला जवळचे वाटावेत असे नातेवाईकाच्या आणि मित्रपरिवाराच्या गोतावळ्यात रमणारे, स्पॅनिश बोलणारे लोक त्याना नेहमीच जवळचे वाटतात मग ते स्पेनचे असो अथवा चिलीचे मात्र युरोपीय सस्कृती त्याच्यात पूर्णपणे भिनली आहे. त्याचबरोबर आपली सस्कृतिही ते टिकवून आहेत त्याच्या वागणुकीत सौजन्यशीलता असते वेळाच्या बधनात अडकवून घ्यायला त्याना अजिबात आवडत नाही त्याच आयुष्य खर रात्रीच सुरू होत पाहुण्याना रात्री आठ वाजता बोलावल की ९ वाजता पहिला पाहुणा उगवतो अशा सवयीच्या लोकाना सध्याकाळच्या कॉकटेल पार्टीला वेळेत पोचायच म्हणजे हालच युरोपियनासारखे हे लोक देखील फॅशन्सबद्दल जागरूक असतात

आशियामधे भेटणारे पाश्चिमात्य लोक काहीसे आशियाई झालेले असतात मात्र स्वत च्या देशात ते आशियाई लोकाना फारस उत्तेजन देत नाहीत स्वित्झर्लंडमधले स्विस परदेशीयाकडे भुवई वक्रावूनच बघतात तर जर्मन लोकाशी परिचय करून घेण म्हणजे चक्रव्यूह भेदून आत जाण्यासारख। फणसासारख्या कठीण व्यक्तिमत्त्वाचे जर्मन लोक आतून गऱ्यासारखे मऊ असू शकतात याचा प्रत्यय येण्यासाठी जर्मन भाषेचाच उपयोग करून घ्यावा लागतो तरीही एकदरीत पाश्चिमात्य लोकाबरोबरच्या सबधामधे औपचारिकतेचा भाग थोडासा राहतोच कारण त्याच्या जीवनामधे खाजगीपणाला फार महत्त्व आहे.

पौर्वात्य लोकाचा स्वभावधर्म एकदमच निराळा सुरुवातीला लाजऱ्याबुजऱ्या वाटणाऱ्या लोकामधले गुण आणि हुशारी पहिल्या भेटीत जाणवत नाही जसा परिचय वाढतो तस त्याच व्यक्तिमत्व हळूहळू उमलत जात भारतीय उपखड, आग्नेय आशिया, आणि अतिपूर्वेकडले लोक याच्यातही फरक आहे भारत, पाकिस्तान, श्रीलका यासारख्या देशामधल्या राजनैतिक अधिकाऱ्याच इग्रजीवर प्रभुत्व असल्याकारणान त्याच व्यक्तिमत्व छाप पाडून जात खेळाची आवड आसियान (इडोनेशिया, मलेशिया, थायलड, फिलीपाईन्स, सिगापूर) मधल्या आणि अतिपूर्वेकडच्या लोकाना अधिक असते गॉल्फ डिप्लोमसीमधे ते बाजी मारून जातात सर्वच पौर्वात्य देशामधे एक गुण प्रकर्षान

जाणवतो, तो म्हणजे त्याची आपुलकीची भावना या देशाचे लोक कित्येकवेळा जे शब्दामधे व्यक्त करून दाखवत नाहीत ते आपल्या कृतीमधे करून दाखवतात स्वत तोशीस घेऊन दुसऱ्यासाठी काहीतरी करण्याची वृत्ती सर्व पौर्वात्यामधे असते जुजबी ओळखीवरसुद्धा घरी येण्याच आमत्रण देऊन ही मडळी मोकळी होतात पाहुण्याची सरबराई करावी ती भारतीय उपखडातल्या लोकानी त्याच्या तैनातीत ते कुठल्याही प्रकारची कमी राहू देत नाहीत मग स्वत ला त्यात कितीही गैरसोय झाली तरी चालेल भारतीय उपखडातल्या घरामधल हे अतिथीच स्वागत पाहिल की राजनैतिक वर्तुळातली परदेशी मडळी काहीशी भाराबून जातात अरबही आपल्यासारखे आशियाई गुणधर्माचे सहृदयी आणि अगत्यशील मात्र नव्यान श्रीमती आल्यावर माणसाला ताठा येतो तो त्याच्यात थोडासा जाणवतो

जपानी आणि कोरियन लोक पूर्वनियोजनाला फार महत्त्व देतात सर्व गोष्टी (शेड्यूल) वेळापत्रकाप्रमाणे होण त्याना फार महत्वाच वाटत जपान्यानी आज जी सुबत्ता मिळवली आहे ती कदाचित् त्याच्याच जोरावर असेल जपानी अधिकाऱ्याना आणि त्याच्या पत्नींना विदेश सेवेमधल्या आयुष्यासाठी खास प्रशिक्षण देण्यात येत असाव अस त्याना जगाच्या पाठीवर कुठेही भेटल तरी जाणवत कुठल्याही जपानी अधिकाऱ्याला किंवा त्याच्या बायकोला त्याच्या देशाबद्दलची काही आकडेवारी विचारली तरी ते ताबडतोब खिशातून किंवा पर्समधून एक छोटीशी डायरी काढून अगदी सध्याची लेटेस्ट माहिती पुरवतात पुस्तकी इग्रजी बोलून का होईना पण त्याच्या बायका स्वत ला कधी मागे पडून देत नाहीत ऑस्ट्रेलियाच्या लोकामधे पूर्वेच आणि पश्चिमेच खेळकर मिश्रण आहे पाश्चिमात्य लोकासारखे ते एक्स्ट्रॉव्हर्ट आणि खेळात निपुण तर आहेतच पण पौर्वात्य अनौपचारिकतेचाही त्याना स्पर्श झालेला आहे. कपड्यामधेही ते जास्त बेफिकीर, कॅज्युअल असतात मात्र राजनैतिक समुदायात त्याना पाश्चात्य लोक नेहमीच जास्त जवळचे वाटतात चिनी राजनैतिक अधिकारी राजनैतिक वर्तुळात फारसे कुणाशीही मिसळताना आढळत नाहीत ते स्वत चा वेळ कसा घालवत असावेत याचा तर्कच करावा लागेल इतका त्याच्याशी सबध कमी येतो

आफ्रिकी देशाचे राजनैतिक प्रतिनिधी वागायला मनमोकळे, जरासे ढिलेढाले त्याचबरोबर आपल्या देशाचा अभिमान बाळगून असतात

भारत, पाकिस्तान, श्रीलका, ब्रह्मदेश, इडोनेशिया आणि आफ्रिकी देशाच्या स्त्रिया नेहमी आपले राष्ट्रीय पोषाख परिधान करतात इतर देशाच्या स्त्रिया पाश्चात्य कपड्याकडे जास्त प्रमाणात वळलेल्या आहेत

भारताबद्दलच औत्सुक्य अनेकविध कारणानी राजनैतिक वर्तुळात दिसून येत भारतीय पोषाख, भारतीय जेवण, भारतीय चित्रपट, इंदिरा गांधी अशी भारताबद्दलची अनेक आकर्षण आहेत भारताच्या लोकशाही पद्धतीबद्दल आतरराष्ट्रीय जगतात कुतूहल आहे. भारतासारख्या प्रचड लोकसख्येचा अवजड गाडा लोकशाहीच्या मार्गानं पुढे कसा रेटला जातो याच जगातल्या अनेक लोकाना कौतुक आहे. सोव्हिएट युनियनसारख्या बलशाली देशालाहि भारतातली विविध भाषिक राज्य लोकशाही पद्धतीन एकत्र नादू शकतात याचा अभ्यास करायची तेव्हा वेळ आली होती पाश्चात्य देशामधे भारताबद्दल बराच माहिती असते फेस्टिव्हल ऑफ इडियानही पाश्चिमात्य जगाच्या भारताबद्दलच्या ज्ञानात भर घातली आहे. मात्र भारताबद्दल नको ती माहितीही या देशामधे जास्त प्रमाणात असते गरीबी आणि अस्वच्छता हे तर नेहमीचेच विषय पण हुडाबळीला सुद्धा तिथल्या वृत्तपत्रामधे नको तेवढी प्रसिद्धी दिली जाते वर्तमानपत्रात ज्या तऱ्हेन या गोष्टी वारवार छापून येतात त्यानी लोकाना वाटाव की भारतात मुलीच लग्न होत ते बळी जाण्यासाठीच की काय! विकसनशील देशावर कुठल्याही प्रकारची टीका करण्याचा हक्क असल्यासारखी पाश्चात्य देशाची वागणूक असते अशा कुप्रसिद्धीच निवारण करून भारताबद्दल योग्य आणि सर्वांगीण माहिती देण्याचा प्रयत्न दूतावासातून आणि स्थानिक भारतीयामार्फत चालू असतो पण विदेशी वृत्तसस्था आणि टी व्ही या सनसनाटी गोष्टी प्रसिद्ध करण्यासाठी उत्सुक असल्यान भारताविषयाच चित्र पुष्कळदा समतोल असत नाही

आतरराष्ट्रीय वर्तुळात आपल्या शेजारी देशाच्या राजनैतिक प्रतिनिधींबरोबरचे सबध आपल्या आणि त्या देशाच्या सबधाइतकेच गुतागुतीचे असतात बाहेरच्या परक्या वातावरणात उभय देशाच्या अधिकाऱ्याना एकमेकाबद्दल जास्त जवळीक वाटते, कारण दोघाची पार्श्वभूमी तीच, भाषा तीच, खाणपिण सारख आणि बाहेर जाणवणाऱ्या समस्याही सारख्या भारतीय दुकानात बासमती तादूळ घेण्यासाठी आलेल्या पाकिस्तानी अधिकाऱ्याची भारतीय अधिकाऱ्याशी सहजगत्या गाठ पडू शकते तर मेदीची देवाणघेवाण दोघाच्या बायकामधे होत असते गझला दोघानाही आवडतात ही मैत्री भारत-पाक सबधासारखी! सबध सुरळीत होत आहेत अस जाणवल्यावर पाकिस्तानी अधिकारी आपला पवित्रा एकदम बदलतात, आणि तुर्की, इराणी भाईबदाशी आपली जवळीक किती जास्त आहे हे दाखवण्याचे त्याचे प्रयत्न सुरू होतात श्रीलकेचे अधिकारी भारतीय अधिकाऱ्याच्या फार जवळ यायला धजत नाहीत कारण त्याची गणना भारतीयाच्यात होण्याची त्याना नेहमी भीती वाटत असते भारतीय बगाली अधिकारी आणि बागला-देशी एकमेकाकडे भाषेमुळे ओढले जातात 'हिलसा'ची चव दोघाच्याही जिभेवर असते मात्र आपल्या शेजारी देशाचे प्रतिनिधी मोठ्या काळजीपूर्वक निवडले

जात असावेत कारण पाण्यात माशान सुळकाडी मारावी इतक्या सहजपणे ते राजनैतिक वर्तुळात वावरत असतात

कुठल्याही देशाचे राजनैतिक वर्तुळात भेटणारे अधिकारी आणि प्रत्यक्ष त्या देशात गेल्यावर भेटणारे लोक याच्यातही फरक असतो, कारण जगातले सर्व राजनैतिक अधिकारी साधारणत एकाच ठशाचे असतात ज्या प्रकारचे आयुष्य ते जगतात, ज्या प्रकारचे काम करतात, ज्या बदलाना ते सतत तोंड देतात आणि ज्या प्रकारचे धोके त्याच्या आयुष्यात निर्माण होऊ शकतात ते एकच असल्यामुळे 'राजनैतिक समुदाय' ही वेगळी जातच निर्माण झाली आहे. काहीसे औपचारिक, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे पण सावध, राजनीतीच्या मूल्याना जपणारे, थोड्या अवधीत आहोत त्या देशाची अधिकाधिक माहिती करून घेण्यासाठी धडपडणारे, सध्याकाळी एकमेकाच्या सहवासात व्हिस्कीच्या किंवा वाईनच्या ग्लासबरोबर राजनीतीचे मूल्याकन करणारे, एकमेकाशी स्पर्धा करू पाहाणारे देशोदेशीचे राजनैतिक अधिकारी एकमेकाना आपल्याच कळपातले वाटायला लागतात

★ ★ ★

# स्वगृही

परदेशातल्या प्रदीर्घ वास्तव्यानंतर दिल्लीला परत आल्यावर वकिलातीत असताना मिळणाऱ्या सोयी-सवलती साहजिकच संपतात आणि सामान्य नागरिक म्हणून जम बसवताना येणाऱ्या अडचणींना निकरानं तोंड द्यावं लागतं मग रेशन कार्ड, दुधाचं टोकन आणि गॅस सिलेंडर मिळवण्यापासून या लढ्याला सुरवात होते. राजनैतिक अधिकारी म्हणून कुठलीही खास वागणूक स्वदेशी आल्यावर मिळणार नसते. त्याची चुणूक कस्टमस्पासून दिसायला लागते बॅगा उघडल्या जातात वस्तूंवर ड्यूटी लावली जाते

स्वगृही झालेल्या या स्वागता(!)नंतर आधीच्या अत्याधुनिक जीवनाचं प्रायश्चित्त करायचं का अज्ञातवास संपल्याचं उदक सोडायचं हे आधीच्या पोस्टिंगवरून ठरतं पॅरिस किंवा लंडनहून परतल्यावर आपण मायदेशी म्हणजे विकसनशील देशात परत आल्याची तीव्रतेनं जाणीव होते दर कोपऱ्यावर टेलिफोनचे बूथ का नाहीत, थंडीत तरी नळातून गरम पाणी येण्याची साधी सोय का नाही, उन्हाळ्यात पैसे टाकून कोक किंवा ज्यूस टिन बाहेर काढता येईल अशी मशीन का नसावीत हा विचार मनात येत राहतो आणि दिल्लीतल्या 'मशीन का ठंडा पानी'वर समाधान मानावं लागतं पेट्रोलपंपापाशी एखादं स्वच्छ टॉयलेट का असू नये याचा विषाद वाटायला लागतो

याउलट सुदान किंवा ब्रह्मदेशातून भारतात परत आल्यावर आपल्या देशानं किती सुधारणा केली आहे याची खात्री पटते ग्लुकोज बिस्किट किती चवदार लागू शकतात

याची प्रचीती मला ब्रह्मदेशातून परत आल्यावर आली बाजारात जाऊन कॉफी, लोणी काड्यापेट्या, मेणबत्त्या यासारख्या वस्तू सहजासहजी विकत घेता येतात हा केवढा दिलासा होता मलेशियातल्या पेनागहून येणाऱ्या जहाजावर आता अवलबून राहाव लागणार नव्हत

अर्थात् दिल्लीला नव्यान जम बसवण म्हणजे कठीण काम! सुरुवातीला काही महिने कस्तुरबा गाधी मार्गावरच्या परराष्ट्र खात्याच्या होस्टेलमधे राहता येत हा फार मोठा आधार असतो, कारण त्या अवधीमधे सर्व साधनसामग्रीची जमवाजमव करता येते दिल्लीत ज्या ज्या आघाड्यावरती लढत द्यावी लागते त्यामधे मुलाना शाळेत प्रवेश ही प्रमुख कुठल्याही शाळामधे विदेशसेवेच्या मुलासाठी जागा राखून ठेवण्यात आलेल्या नाहीत, त्यामुळे शाळेच्या प्रवेशासाठी लागलेल्या पालकाच्या रांगेत जाऊन उभ राहाव लागत मुलाना शाळेत प्रवेश मिळवताना करावी लागणारी तपश्चर्या आय्. एफ् एस परीक्षेहूनही अवघड भासते कुठल्या तरी शाळेत एकदा मुलाला प्रवेश मिळाला की गगेत घोड न्हाल्याचा आनद होतो होस्टेलमधे काही महिने घालवल्यानतर कुठल्या तरी सरकारी कॉलनीमधे 'मकान' मिळते आणि मग ते दिल्लीतल खर आयुष्य सुरू होत या घरामधे सर्व्हंटस् कार्टर्स ही फार मोठी जमेची बाजू, त्यामुळे नोकर मिळवण सुलभ जात आणि दिल्लीतल्या वास्तव्याची घडी बसवण अधिक सोप जात

दिल्लीत आल्यावर मात्र एक प्रकारची मोकळीक जाणवते देशाच प्रतिनिधित्व करण्याच जू आता मानेवर राहिलेल नसत, त्यामुळे परदेशातल्या लोकासाठी घडवून आणाव्या लागणाऱ्या पार्ट्या, त्यासाठी सतत घ्यावी लागणारी मेहनत या कशाकशाचा आता पुढली तीन वर्ष विचार करावा लागणार नसतो घरी येणारी प्रत्येक व्यक्ती आपला मित्रच असणार असते आणि पिठल भाताच जेवणही तो गोड मानून घेणार असतो इतके दिवस बाहेरच्या देशात ज्या ज्या भारतीय गोष्टींची उत्कठा असते त्या सर्व आता मनसोक्त मिळणार असतात सगीत-समेलन, नाटक, मराठी-हिंदी पुस्तक, भेळ, चाट, पाणीपुरी, पान या सर्वांचा आता मनमुराद आनद लुटता येणार असतो परदेशात राजनैतिक अधिकाऱ्याच्या पत्नीला वेतन घेऊन काम करण्याची इतके दिवस परवानगी नसे (हल्ली मात्र डॉक्टर्स, शिक्षक अशा व्यवसायाचा अपवाद करण्यात येऊ लागला आहे ) कितीतरी स्त्रियाना आपल्या गुणवत्तेचा बाहेरच्या देशात उपयोग करता येत नाही मग दिल्लीत आपल्या आवडीच्या क्षेत्रात त्या स्वत ला वाव मिळवू शकतात त्यामुळे विदेश सेवेतल्या कितीतरी बायकाना दिल्लीत आल्यावर स्वतत्र व्यक्तित्वाची नाडी सापडल्यासारखी वाटते अर्थात् तीन वर्षांनी हे निर्माण केलेल स्वतत्र जग मागे टाकून परत बाहेर जायच कितीतरी वेळा जिवावर येत परतु

त्याला इलाज नसतो हल्लीच्या तरुण पिढीमधे अशा व्यावसायिक पदवीधर स्त्रिया नवऱ्याबरोबर जातही नाहीत मधून रजा घेऊन जाऊन येऊन राहातात

दिल्लीत आल्यावर आपण स्वकुटुबियाच्या निकट आलो आहोत हे समाधान असत परदेशातल कुटुब म्हणजे नवरा, बायको आणि मुल आई वडील, बहीण, भाऊ याना परदेशात येण तितक सोप नसत

त्यामुळे दिल्लीला होणारी बदली हा फार मोठा दिलासा असतो कुटुबात एखादा अपघात झाला किंवा अचानक कुणाचा मृत्यू झाला तर सरकारन दिलेल्या दोन इमर्जन्सी पॅसेजचा वापर करून ताबडतोब भारतात येता येत पण फक्त दोनदाच ही सधी मिळू शकते काही कौटुबिक जबाबदाऱ्या उचलण्याच्या दृष्टीन दिल्लीची बदली फार महत्त्वाची ठरते विदेश सेवेत दिल्लीचे लोक खूप आहेत त्याना तर अर्थात् घरीच राहिल्यासारख आहे दक्षिण, पूर्व, पश्चिम भारतात राहणाऱ्या अधिकाऱ्याना सुद्धा दिल्लीहून आपल्या गावी पाहिजे तेव्हा जाता येत

साऊथ ब्लॉक हा विदेश सेवेचा 'दिल्ली दरबार' राष्ट्रपती भवनाच्या सानिध्यात वसलेला आहे पतप्रधानाचे कार्यालय सुद्धा साउथ ब्लॉकमधेच! या निकटतेमुळेही असेल कदाचित् आपल्याला ही सत्ता प्राप्त झाली आहे अशी इथल्या अधिकाऱ्याची उगीचच भावना झालेली असते दिल्लीच्या इतर सरकारी कचेऱ्याप्रमाणे साऊथ ब्लॉकमधे वावरणाऱ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अहकार ओसडत असतो वाऱ्याचे पखे सोडणारे चपरासीसुद्धा त्याला अपवाद नसतात

विदेश सेवेतल्या कारकीर्दीत साधारणपणे दोन बाहेरच्या बदल्यानतर दिल्लीच्या विदेश मत्रालयात बदली होते दिल्लीत राहून विदेश मत्रालयात काम करण प्रत्येक राजनैतिक अधिकाऱ्याला अत्यावश्यक असत लोकशाहीमधे परराष्ट्र धोरण आखताना अनेक बाबीचा विचार करण्यात येतो सरकारची नीती, ससदेमधली त्या विषयावरची चर्चा, जनतेची त्या सबधीची मतं इ इ! हल्लीच्या काळात वृत्तपत्र आणि टेलिव्हिजन ही माध्यमही त्यात महत्त्वाची भूमिका बजावतात

सर्व देशातल्या भारतीय वकिलातींमधून येणाऱ्या माहितीच्या आधारावर विदेश नीतीच सपूर्ण चित्र बनू शकत आखाती देशामधल्या सघर्षाच उदाहरण घ्यायच झाल तर अमेरिकेची त्यावरची प्रतिक्रिया काय, जपानच धोरण काय, सयुक्त राष्ट्राच मत काय ही सर्व माहिती त्या त्या ठिकाणच्या वकिलाती दिल्लीला पाठवतात दिल्लीमधे गोळा झालेल्या या माहितीच विश्लेषण होत भारताच्या दृष्टीन हितावह काय आहे याचा विचार विनिमय होऊन मग त्या सघर्षाबाबत भारताची भूमिका ठरते

परराष्ट्र धोरण ठरवण्यामागची विचारधारा कशी तयार होते, तत्सबधीचे निर्णय कसे घेतले जातात, या प्रक्रियेत आपण स्वत. कसा हातभार लावू शकतो याचा अनुभव राजनैतिक अधिकाऱ्याला विदेश मत्रालयात काम करताना घेता येतो विदेश सेवेप्रमाणे विदेश मत्रालयाच्या स्वरूपाची लोकाना फारशी कल्पना नसते परराष्ट्राचा व्यवहार बघणार हे खातही सामान्य जनाना परक वाटत त्या दृष्टीन विदेश मत्रालयाबद्दल तपशीलवार माहिती करून घेण इष्ट ठरेल

पडित नेहरूच्या काळापासून भारताचे परराष्ट्राबरोबरचे हितसबध साभाळण्याची धुरा विदेश मत्रालयावर सोपवण्यात आली आहे. विदेश मत्रालयावरची प्रमुख जबाबदारी म्हणजे विदेशातल्या भारताच्या राजकीय, आर्थिक, सास्कृतिक, सरक्षण आणि व्यापारी, इ सबधाचा अभ्यास आणि अवलोकन करून आपल्या नीतिबद्दल निर्णय घेण प नेहरूनी स्वत परराष्ट्र खात साभाळल्यामुळे आणि त्याची घडणही त्यानी स्वत केल्यामुळे विदेश मत्रालयाला एक विशिष्ट स्थान आणि दर्जा सुरुवातीपासून प्राप्त झाला स्वातत्र्यानतरच्या सुरुवातीच्या काळापासून भारताची लष्करी किंवा औद्योगिक शक्ती मर्यादित असूनसुद्धा भारतान त्या काळातल्या जागतिक घडामोडींमधे शातता प्रस्थापित करण्याच्या उद्देशान खूप प्रयत्न आणि कष्ट घेतले भारताच्या स्वतत्र भूमिकेमुळे विशेषत असलग्नतेच्या विचारप्रणालीमुळे भारताला विकसनशील देशामधे नेतृत्व प्राप्त झाल विदेश मत्रालयान भारताची प्रतिमा आणि भारताची भूमिका साभाळण्यामधे सातत्य दाखवल आहे. त्यासाठी आवश्यक अशी मत्रालयाची रचनासुद्धा वारवार केली आहे.

विदेश मत्रालयाची धुरा साभाळतात परराष्ट्र व्यवहार मत्री त्या अनुषगान असलेल त्याच आतरराष्ट्रीय स्थान, मत्रालयातले प्रमुख म्हणून पडणाऱ्या जबाबदाऱ्या आणि मत्रिमडळातले एक वरिष्ठ सभासद या नात्यान ससदेमधली त्याची भूमिका ही त्याच्या कार्याची साधारण रूपरेखा आजवर भारताला अनेक मान्यवर परराष्ट्रमत्री लाभले पडित नेहरू, न्यायमूर्ति छागला, सरदार स्वर्णसिग, नरसिहराव, यशवतराव चव्हाण, इदरकुमार गुजराल इ इ ! परराष्ट्र मत्र्याच्या खालचे राज्यमत्री, परराष्ट्र मत्र्याच्या जबाबदारीचा वाटा काही अशी उचलतात त्याच्या नतर विदेश सचिव हे विदेश (शासकीय) सेवेतले सर्वात वरिष्ठ अधिकारी होत विदेश सचिवाची निवड परराष्ट्र मत्र्याच्या सल्ल्यानुसार पतप्रधान स्वत करतात विदेश-सचिव हा पतप्रधानाचा आणि परराष्ट्र मत्र्याचा परराष्ट्र नीतीमधला प्रमुख सल्लागार पाकिस्तान, चीन, अमेरिका, रशिया यासारख्या भारताच्या दृष्टीने महत्त्वाच्या देशाबरोबरच्या वाटाघाटींची पार्श्वभूमी तिथे भेट देऊन, तिथल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याशी बोलणी करून विदेश सचिव तयार करतात आणि महत्त्वाचे करारही घडवून आणतात पतप्रधानाच्या परदेश भेटीमधल्या

शिष्टमंडळात विदेश सचिवाचा नेहमीच समावेश होतो आजवर या जागेसाठी अत्यंत कर्तबगार आणि निष्ठावान व्यक्तींची निवड होत आलेली आहे. विदेश सचिवाच्या स्वत च्या स्थानामुळे आणि वैयक्तिक प्रतिमेमुळे त्याना देशात आणि परदेशात नेहमीच मान मिळत आला आहे.

विदेश सचिवाना साहाय्य करण्यासाठी मत्रालयात दोन सचिव असतात कामाच्या भौगोलिक वितरणानुसार त्याना पूर्व व पश्चिम सचिव असे म्हटल जात हे सचिव अत्यंत मुरब्बी राजनैतिक अधिकारी असतात., वयाची तीस पस्तीस वर्षे त्यानी देशाच्या परराष्ट्र व्यवहारामधे भारताचे प्रतिनिधित्व केलेल असत या सचिवाच्या जोडीला तीन अतिरिक्त सचिव असतात त्याच्या हाताखाली सयुक्त सचिव सध्या असे पचवीस सयुक्त सचिव आहेत त्याच्या अधिकाराखाली काम करणाऱ्या विभागांमधे जगाच्या वेगवेगळ्या भागातल्या किंवा स्वतत्र विषयावर खोलवर निरीक्षण आणि त्यावर उपाययोजना याची रोजच्या रोज चर्चा आणि माडणी होत असते विदेश मत्रालयातल मोठ्या प्रमाणावर होणार काम या विभागामधे होत सयुक्त सचिवाच्या खालचे डायरेक्टर (निर्देशक), डेप्युटी सेक्रेटरी (उपसचिव) आणि अडर सेक्रेटरी अशी पदयोजना असते शासकीय सेवेतला अधिकारी दिल्लीला बदलीवर येतो तेव्हा त्याच्या वरिष्ठतेच्या क्रमानुसार त्याच पद ठरल जात मत्रालयात तीन वर्षे काम केल्यावर त्याची परत बाहेर नेमणूक होते

विदेश मत्रालयात अनेक कक्ष असले तरी भौगोलिक वर्गीकरणाच्या विभागात काम करायला मिळाव अशी प्रत्येक अधिकाऱ्याची इच्छा असते कारण सर्वांगीण अनुभव घ्यायला त्यामुळे मदत होते या भौगोलिक वर्गीकरणात अति पूर्व विभागामधे चीन जपान, दक्षिण कोरिया, उत्तर कोरिया, हॉगकॉग वगैरे देश आहेत आखाती देशाच्य विभागामधे बहारिन, कतार, अरब अमिराती, सौदी अरेबिया इ देशाचा समावेश होतो. दक्षिण विभागात इडोनेशिया, मलेशिया, थायलड, व्हिएतनाम, ऑस्ट्रेलिया यासारखे देश येतात तर दक्षिण अमेरिका विभागात मेक्सिको ते अर्जेंटिनापर्यंतचे देश आहेत 'पाकिस्तान, इराण, अफगाणिस्थान' हा एक स्वतत्र विभाग आहे 'बांगला देश-ब्रह्मदेश' 'नेपाळ-भूतान', मालदीव-श्रीलका असेही वेगवेगळे विभाग आहेत

विदेश मत्रालयातल्या अतिपूर्व विभागात काम केल्यानतर चीन अथवा जपानला बदली झाली तर त्या देशातून भारत सरकारबरोबर करायच्या देवाणघेवाणीमधे भारताच धोरण कस राहील याची पूर्ण कल्पना येऊ शकते त्या देशाच्या परराष्ट्र खात्याबरोबर बोलणी करताना ते फार उपयुक्त ठरत भारताच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे देश म्हणजे

शेजारी देश शेजारी देशाच्या विभागात काम करायची संधी ज्या अधिकाऱ्याना मिळते त्याना विदेश सेवेत एक खास स्थान प्राप्त होत शेजारी देशाबद्दलच धोरण ठरवताना त्यात जर सक्रीय भाग घेता आला तर तो कुठल्याही अधिकाऱ्याच्या दृष्टीन करियरमधला मानबिंदू समजला जातो दिल्ली दरबारी काम करायची सवय झाल्यावर अधिकाऱ्याचा स्वत बद्दलचा आत्मविश्वास कैक पटींनी वाढतो

विदेश मत्रालयाचा प्रशासन हा फार मोठा विभाग आहे दिल्लीत बसून ऑस्ट्रेलियापासून दक्षिण अमेरिकेपर्यंतच्या आपल्या सर्व वकिलातींच प्रशासन बघायच म्हणजे शब्दश उटावरून शेळ्या हाकण्यासारख अवघड ! वकिलातीसाठीं जमिनी अथवा इमारती विकत घेण, तिथे आर्थिक सवलती पुरवण, फर्निचर आणि इतर साधनसामग्री विकत घेण्याची परवानगी देण हे या प्रशासनाच्या हाती असत, त्यामुळे प्रशासनामधे काम करणाऱ्या अधिकाऱ्याचा कोठीची चावी स्वत च्या हातात असल्यासारखा रुबाब असतो विदेश सेवेत नवीन उमेदवाराच्या भरत्या, अधिकाऱ्याच्या बदल्या, त्याच्या बढत्या या महत्त्वाच्या गोष्टी प्रशासन विभागात ठरवल्या जातात अधिकाऱ्याच्या परदेशातल्या घराची सोय, मुलाच्या शिक्षणाची व्यवस्था, वैद्यकीय सेवा, वकिलातीमधली सुरक्षा या सर्व बाबींची व्यवस्था प्रशासन विभाग बघतो प्रत्येक देशामधल राहणीमान, महागाई, आवश्यक वस्तूच्या किंमती, तिथल्या जीवनमानाचा दर्जा या सर्व गोष्टी ध्यानात घेऊन मग 'विदेश भत्ता' ठरवला जातो परदेशातल्या वास्तव्यात वैद्यकीय सेवा हा अत्यावश्यक घटक आफ्रिका खडातल्या देशामधे होणारा मलेरिया तर थड प्रदेशात होणारा न्यूमोनिया, पाण्याच्या बदलामुळ उद्भवणार पोटाचे विकार तर उंच जागी (उदा बगोटा-कोलबिया, मेक्सिको सिटी -मेक्सिको) राहिल्यामुळे होऊ शकणारे श्वसनाचे विकार इ अनेकविध कारणामुळे सरकारतर्फे वैद्यकीय मदतीची आवश्यकता असते

परदेशात महागाई वाढली, वस्तूच्या किंमती वर गेल्या, राहणीमान दर्जात वाढ व्हायला लागली की विदेश भत्त्यामधे वाढ व्हावी अशी त्या वकिलातीकडून विनती केली जाते सरकारी कारभारातून त्याची दखल घेतली जाईपर्यंत तिथे तिसरा किंवा चौथा राजदूत स्थानापन्न झालेला असतो मग दिल्लीच्या प्रशासन विभागातून अधिकाऱ्याच एक खास पथक या कामगिरीवर येत विदेश भत्त्याचा फेरविचार करण्यासाठी म्हणून आलेल्या या पथकाची पचतारांकित व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी वकिलात पूर्ण तऱ्हेने उचलते प्रथम, किंमती किती वर गेल्या आहेत याची कल्पना त्याना महागड्या दुकानामधे नेऊन देण्यात येते मग त्याची मर्जी सपादन करण्यासाठी त्याच्यासाठी खास मेजवान्या आयोजित केल्या जातात त्याच्यासाठी उत्तमोत्तम पदार्थ बनवण्याची अहमहिका लागते अनुकूल मत करून घेण्यासाठी हा प्रयत्न असतो हे

'ब्राह्मण' भोजनानतर सतुष्ट होऊन तथास्तु कधी म्हणतात याची वकिलातीमधे सर्वजण वाट बघत असतात कारण त्याचा भत्ता वाढवण या पथकाच्या निर्णयावर अवलबून असत एकूण वधूपक्ष वराकडच्या लोकानी काय बडदास्त राखेल अशी वकिलात या वऱ्हाडाची व्यवस्था ठेवते सर्वसाधारणपणे वकिलातीतला प्रत्येक अधिकारी प्रशासन विभागातल्या सहकाऱ्याची मर्जी साभाळायचा आपापल्या परीने प्रयत्न करत असतो.

दर पोस्टिंग नतर प्रत्येक अधिकाऱ्याला कपड्यासाठी खास भत्ता मिळतो परदेशात भारतीय अधिकाऱ्यानी औपचारिक समारभात घालायचा पोषाख म्हणजे शेरवानी आणि सुरवार, किवा बद गळ्याचा कोट विदेश सेवेत रुजू होताना शिवलेली शेरवानी दरवर्षी २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट या दोन्ही दिवशी वापरली जाते अर्थात् विदेश सेवा मानवल्यानतर ही शेरवानी परत नवीन शिवण्याची वेळ येते थड प्रदेशात बदली झाल्यावर गरम कपडे घ्यावे लागतात चाळीस वर्षांपूर्वी ठरवलेला ५०० रुपयाचा भत्ता हळूहळू वाढत वाढत आता तीन हजार रुपयावर आला आहे. पूर्वीच्याकाळी ५०० रुपयात सर्व पोषाख शिवून होत असे आता मात्र या भत्त्यामधे फक्त शेरवानीच बसू शकते, सुरवार नाही सरकारचे हे भत्ते सध्याच्या काळात विनोद निर्माण करतात

विदेश मत्रालयाच्या पासपोर्ट विभागामधे पासपोर्ट व्हिसा सबधीच धोरण ठरवल जात भारतात अनेक ठिकाणी पासपोर्ट कचेऱ्या आहेत त्याच सचालन या विभागातर्फे होत पासपोर्ट देण्यामधे गृहखात्याचाही सबध येतो विदेश मत्रालयातला परराष्ट्र नियोजन विभाग जगातल्या घडामोडींचा पूर्णत्वान विचार करून भारताचे सद्य आणि भावी हितसबध ध्यानात घेऊन कोणत्या प्रकारच धोरण असाव या सबधीचा विचार विमर्श करतो आर्थिक विभाग हाही विदेश मत्रालयातला आणखी एक विभाग आजकालच्या काळात राजकीय सबधाबरोबर आर्थिक सबधानाही महत्त्व प्राप्त झाल आहे. देशाच आतरराष्ट्रीय वर्तुळातल स्थान, त्याची औद्योगिक प्रगती, व्यापार, दळणवळणाची साधन इत्यादींवरती खूप अवलबून आहे तेलाच्या वाढत्या किंमती, आतरराष्ट्रीय कर्ज, विकसित आणि विकसनशील देशामधला वाढता दुरावा या बाबी भारताच्या दृष्टीन महत्त्वाच्या आहेत त्याच विश्लेषण करून समन्वित धोरणाच नियोजन करण हे परराष्ट्र खात्याच महत्त्वाच काम आहे. ते प्रामुख्यान या विभागात केल जात

परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्याना इतर मत्रालयाच्या कामकाजाची माहिती होण्याच्या दृष्टीन, ICCR, पॉलिसी प्लॅनिंग, वाणिज्य (कॉमर्स) खात यातही काम करण्याची सधी दिल्लीत असताना मिळते परदेशातल्या वकिलातींमधे व्यापार आणि सास्कृतिक सबध हे विभागही परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्याना साभाळावे लागत असल्याकारणान

हा अनुभव शैक्षणिक ठरतो NDC (राष्ट्रीय सुरक्षा महाविद्यालय) मधेही दोन वर्षांच्या मुदतीसाठी काही परराष्ट्र अधिकाऱ्याची नेमणूक होते लष्कर, हवाई दल, नौदल, आणि इतर सेवेचे अधिकारी तिथे एकत्र येतात

ICCR ऊर्फ भारतीय सास्कृतिक सबध मडळ स्वायत्त असल तरी त्याच प्रशासन विदेश मत्रालयामार्फत केल जात भारताचे इतर देशाबरोबरचे सास्कृतिक सबध या विभागातर्फे सपादन केले जातात भारतीय सस्कृतीचा परदेशात प्रसार करण आणि सगीत, नृत्य, शिल्पकला, चित्रकला आदि विविध भारतीय कला आणि भारतीय वाङ्मय याना परदेशात प्रोत्साहन मिळवून देण हे त्यामागच मुख्य उद्दिष्ट आहे. भारतामधून या सस्थेतर्फे सास्कृतिक शिष्टमडळ परदेशात पाठवण्यात येतात त्यात समाविष्ट होण्यासाठी कलाकारामधे चढाओढ लागलेली असते दिल्लीच्या स्थान सान्निध्यामुळे तिथलेच कलाकार या पथकामध्ये शिरकाव करून घेतात असा इतर ठिकाणच्या कलाकाराचा रोष असतो ही टीका बरेचदा परराष्ट्र व्यवहार खात्याला उद्देशूनही असते जिथे भारतीयाची सख्या जास्त आहे तिथे सास्कृतिक केंद्रे प्रस्थापित करण्यात आली आहेत

आपल्या वकिलातींमधेही हिंदीचा वापर व्हावा अशी सरकारची भूमिका असते तो होत आहे की नाही हे बघण्यासाठी मधूनच शिष्टमडळ बाहेर जाते त्यात ससद सदस्याचा समावेश असतो

ही शिष्टमडळ न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, लडन अशा ठिकाणी जाऊन हिंदीचा वापर होत आहे की नाही ते बघतात वकिलातीत राष्ट्रभाषेचा वापर पुरेसा आहे की नाही त्याची ते प्रत्यक्ष शहानिशा करतात स्थानिक सरकारबरोबर पत्रव्यवहार हिंदीत का केला जात नाही अशी विचारणा ही मडळी आपल्या दौऱ्याच समर्थन करण्याकरता करत असतात असे शिष्टमडळ यायच म्हटल्यावर घाईघाईने हिंदी टाईपरायटरवरची कव्हर काढली जातात आणि प्रत्येकजण आपल्या हिदीला उजाळा देण्याचा प्रयत्न करायला लागतो पजाबीसुद्धा 'की हाल' म्हणण्याऐवजी 'क्या हाल' म्हणून विचारायला लागतात तर हिंदी भाषिक अधिकारी हरभऱ्याच्या झाडावर चढून जातात कारण त्याची मातृभाषा आता इतराना झक्कत बोलावी लागणार असते हे हिंदीच प्रेमप्रकरण शिष्टमडळ परत गेल्यावर सपुष्टात येत एरवी सुद्धा वकिलातीतले कर्मचारी आपापसात बोलताना हिंदीचा वापर सर्रास करताना आढळतात मात्र लेखी पत्रव्यवहार फारच थोडे अधिकारी हिदीतून करतात

ICCR च्या पुढाकाराखाली इतर देशाबरोबर सास्कृतिक करार होतात इतर देशाची सास्कृतिक पथकही भारतात आणण्यात आली आणि त्याचे कार्यक्रम घडवून आणण्यात

या सस्थेचा मोठा भाग असतो प्रख्यात भारतीय लेखकाच्या पुस्तकाची परकीय भाषामधे भाषातर करून त्या त्या देशात त्या पुस्तकाच वितरण करण्याच कामही ICCR करत गेल्या काही वर्षांत काही देशामधे भारतीय महोत्सव (Festival of India) आयोजित करण्यात आले इग्लड, अमेरिका, फ्रान्स, रशिया, जपान या ठिकाणी झालेल्या महोत्सवाच स्वरूप अत्यत व्यापक होत त्यानी भारताची कला, सस्कृती आणि आर्थिक प्रगतीसुद्धा सुदरीत्या उच्च पातळीवर दर्शवण्यामधे यश प्राप्त केल ते पार पाडण्यात ICCR च्या बरोबरीन तिथल्या वकिलातींनीही हातभार लावला

विदेश मत्रालयान अलीकडे NRI हा नवीनच विभाग सुरू केला आहे भारताबाहेर राहणाऱ्या नागरिकाबरोबर भारताचा जवळचा सपर्क रहावा, त्याना भारताबद्दलची माहिती पूर्णपणे योग्य रीतीन मिळत रहावी आणि भारताच्या प्रगतीमधे त्याच सहकार्य मिळवता याव या दृष्टीन गेल्या काही वर्षांपासून भारत सरकारचे अधिकाधिक प्रयत्न चालू आहेत आज जवळ जवळ अडीच तीन कोटी भारतीय बाहेर देशामधे स्थायिक झाले आहेत अमेरिका, इग्लड, आखाती अरब देश, पूर्व आफ्रिका, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशात त्याची सख्या मोठ्या प्रमाणात आहे अनेक तात्रिक, आर्थिक व्यवसाय आणि व्यापारात भारतीयाची कुशलता दिवसेंदिवस प्रकर्षान दिसून येत आहे. अशा भारतीय समाजाबरोबर सतत सपर्क ठेवण हे या विभागाच मुख्य काम

भारताची परराष्ट्रात प्रसिद्धी हा आपल्या विदेश नीतीतला महत्त्वाचा भाग असल्यान ते काम साभाळण्यासाठी एक स्वतत्र विभाग आहे भारतीय आणि विदेशी पत्रकाराबरोबर, जगातल्या घटना आणि भारताच्या त्या सबधीच्या भूमिका याबाबत सवाद कायम ठेवण हे या विभागाच महत्त्वाच काम या विभागाचा प्रमुख, विदेश मत्रालयाचा प्रवक्ता असतो आणि पत्रकार तसच वृत्तसस्था याना आवश्यक ती माहिती, देशाच्या धोरणाची कल्पना देत असतो प्रसिद्धी विभागातर्फे परदेशातल्या नामवत पत्रकाराना भारतात बोलावण, भारताच्या अनेक विषयावर वार्तापट किंवा आजकाल व्हिडिओ, चित्रपट बनवण, मासिक-पुस्तक छापून प्रसिद्धीसाठी बाहेर पाठवण इत्यादी काम चालू असतात बाहेरच्या देशात भारताची प्रतिमा दारिद्र्यावर भर देणारी आहे असा टीकेचा सूर नेहमी ऐकू येतो याच कारण आपल्या प्रसिद्धी यत्रणेची क्षमता कमी पडते अस नव्हे तर परदेशात, विशेषत विकसित देशात विकसनशील देशातल्या उणीवावरच अधिक जोर देण्याचा उद्देश असतो हेही असू शकेल

नवी दिल्लीमधे अलीकडेच विदेश मत्रालयातर्फे 'विदेश-सेवा सस्था' (Foreign Service Institute) सुरू करण्यात आली आहे. विकसित देशाच्या फॉरिन सर्व्हिसमधे

अशा प्रकारच्या संस्था केव्हाच स्थापन झाल्या होत्या इतके दिवस मसुरीच्या नॅशनल ॲकेडमी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशनमधे इतर सेवेच्या अधिकाऱ्यांबरोबरच्या सहा महिन्याच्या प्रशिक्षणानतर भारतीय राजनैतिक अधिकारी विदेश मत्रालयात आपल शिक्षण पूर्ण करत असत प्रशिक्षणाचा कार्यक्रम पुष्कळ विस्तृत असला तरी त्यामधे कल्पकता आणि आधुनिकता कमी होती व्यवसायाच्या दृष्टीन आवश्यक असणाऱ्या सर्वांगीण अभ्यासक्रमात अनेक त्रुटी होत्या त्या भरून काढण्यासाठी ही संस्था निर्माण करण्यात आली या इन्स्टिट्यूटमधे विदेश सेवेसबधित विविध प्रकारच प्रशिक्षण देण्यात येत उत्तमपैकी राजमुत्सद्दी तयार करण्यासाठी खास शिक्षणक्रमाची गरज असतेच राजनैतिक व्यवसायाच्या काय खास गरजा आहेत त्या ध्यानात घेऊन त्याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम ठरवले जातात व्यवस्थापनाचा भाग हल्ली या व्यवसायामधे फार मोठा आहे. कुठल्याही विषयावर निर्णय घेण्यापूर्वी त्यासबधीची माहिती मिळण आवश्यक आहे. ते करताना आज उपलब्ध असलेली साधन वापरता येण अत्यावश्यक आहे. कॉम्प्युटर्स, फॅक्स, वर्डप्रोसेसर्स या सर्वांची माहिती असण अपरिहार्य होऊन बसल आहे. राजनैतिक प्रतिनिधींना परदेशात जाण्यापूर्वी या संस्थेत ठराविक अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो वरिष्ठ अधिकाऱ्यासाठीसुद्धा अलीकडे रिफ्रेशर्स कोर्सेस तिथे आयोजित करण्यात येतात

विदेश मत्रालयात शिष्टाचार (Protocol) हा एक स्वतत्र विभाग आहे. त्याचा व्यापही विस्तृत आहे. राजनीति आणि शिष्टाचार म्हणजे एका नाण्याच्या दोन बाजू. आपल्या नेत्याच्या परदेशात होणाऱ्या अधिकृत भेटी तसच इतर देशाच्या पुढाऱ्याचे भारतातले कार्यक्रम अत्यत काटेकोरपणे आखण या विभागाच काम आहे. राष्ट्रपती किंवा पतप्रधान परदेश दौऱ्यावर जातात त्याच्या कितीतरी आधी या विभागाच काम सुरू झालेल असत अशा भेटींमधे फार खोलवर जाऊन सर्व बारकावे बघावे लागतात कार्यक्रम आखताना मिनिटामिनिटाची गणती करावी लागते दोन देशाच्या व्यवहारामधे त्याच्या तिकडच्या मेजवान्या, भाषण त्याना द्याव्या लागणाऱ्या भेटी या सर्वांचा समावेश होतो शिष्टाचार विभागाच काम म्हणजे तारेवरची कसरत व्ही आय् पीं चे मूड इद्रधनुष्याच्या रगासारखे क्षणाक्षणाला बदलत असतात त्याच्या मनाजोगे कार्यक्रम आखता येण हे काम कठीणच! परदेशातल्या वकिलातीत असे अनुभव वारवार येत असतात

एक बडे पाहुणे परदेशात खाजगी भेटीवर आले असताना त्यानी तिथल्या व्ही आय् पीजच्या भेटी मिळाव्यात म्हणून आग्रह धरला आणि तोही अल्प मुक्कामात त्याची भेट अधिकृत नसल्यामुळे अशा अपॉईंटमेन्टस् मिळवण म्हणजे वकिलातीची परीक्षाच होती भारताचे प्रतिनिधी म्हटल्यावर हे काम आपसूक व्हायला हवे, हा

देशाच्या इभ्रतीचा प्रश्न आहे हे त्यानी ठासून सागितल तेव्हा आपले सर्व वजन खर्ची घालून राजदूत आणि इतर अधिकाऱ्यानी त्या मिळवल्या आणि पाहुण्याना सतुष्ट केले

दुसरे एक मत्री परदेशाच्या दौऱ्यावर आले त्याना हॉटेलच्या जेवणात अजिबात रस वाटेना मग वकिलातीकडून त्याना रोज सकाळी पराठ्याचा नाश्ता पाठवण्याची सोय करावी लागली एक महिला मत्री परदेश भेटीवर आल्या असताना साहजिकच त्याच्यासाठी खूप कार्यक्रम आखण्यात आले होते इतर सबधित मत्र्याच्या दिवसा भेटी झाल्यावर रात्री स्थानिक उच्चपदस्थ नेत्यान खास त्याच्यासाठी मेजवानी आयोजित केली होती महिला मत्र्याना भारतात नेहमी जेवायला खूप उशीरा जायची सवय या देशात मात्र नियोजित वेळेला फार महत्त्व दिल जात असे मत्री महोदया फॉर्मल डिनरला तास दीडतास उशीरा पोचल्या राजदूताना त्याच्या उशीराची रदबदली करताना नाकीनऊ आले

व्ही आय् पी व्हिजिटस् म्हणजे सुरक्षेच्या लोकाना मोकळ रानच शकराच्या नन्दीन मोकाट सुटून धुडगूस घालावा तसे हे सेक्युरिटीचे लोक पतप्रधानाच्या भेटीपूर्वी राजदूताच्या घराची उलथापालथ करतात टेलिफोनची कनेक्शन्स् नवीन वायरिंग या सर्वांच्या निमित्तान त्याना घरात मुक्त प्रवेश असतो मग यजमान/यजमानिणीलाच घरात चोरट्यासारख वावराव लागत

आपले एखादे मत्री महाशय शिष्टाचाराला धाब्यावर बसवून सुरक्षा कर्मचाऱ्याच्या हातावर तुरी देऊन मधूनच अतर्धान पावतात त्याची सुरक्षितता ही बरोबरच्या इतर सरकारी अधिकाऱ्याची आणि वकिलातीची जबाबदारी असते मत्रीमहाशयाची शोधाशोध सुरू होते मत्री दिसले नाहीत की सर्वांच्या तोंडच पाणी पळत मग काही वेळान ते आपोआप प्रविष्ट होतात स्टेशन खाली अडरग्राउड मार्केटच्या शॉपिंगचा आनद लुटून ते परतलेले असतात त्याना सहीसलामत आलेल बघून सर्व अधिकारी सुटकेचा नि·श्वास टाकतात व्ही आय्. पीं नी आयत्या वेळी नियोजित कार्यक्रमाच्या बाहेर जाऊन कुठलीही गोष्ट केली म्हणजे इतर अधिकाऱ्याना धास्तीच विदेशसेवा शिष्टाचाराच्या पायावर उभारलेली असल्याकारणान तो मजबूत नसेल तर विदेश सेवेचा डोलाराही डगमगणार हे निश्चित

ऐतिहासिक विभाग, सशोधन विभाग, दुभाषी, कायदा आणि करार विभाग या कक्षाचाही विदेश मत्रालयात समावेश होतो यातले अधिकारी विदेश सेवेसाठीची परीक्षा पास होऊन आलेले नसतात पण विदेश नीतीशी सबधित विषयाचा त्याचा

अभ्यास असतो विदेश मत्रालयाच मुख्य काम परराष्ट्र धोरण आखण्याच आणि त्याला ही सर्व पूरक क्षेत्र आहेत

विदेश मत्रालयातर्फे अनेक आतरराष्ट्रीय परिषदा भारतात घडवल्या जातात असलग्न राष्ट्रे, तसच, राष्ट्रकुल, विकसनशील देश आणि दक्षिण आशियामधल्या देशाचा समूह अशा अनेक गटामधे, भारत नेहमी पुढाकार घेऊन सक्रीय भाग घेत असल्यामुळे या गटाच्या अनेक परिषदा आपल्या देशात आयोजित केल्या गेल्या आहेत (उदा १९८३ ची तटस्थ देशाची शिखर परिषद आणि राष्ट्रकुल शिखर परिषद) अनेक विषयावरच्या परिषदाही दिल्लीत आयोजित केल्या जातात त्यासाठीही विदेश मत्रालयाचा एक वेगळा कक्ष असून तो त्या सबधीची पूर्ण व्यवस्था करत असतो

देशाची राजनैतिक धोरण बनवण्यामधे ससदेचा साहजिकच सहभाग असतो ससदेचे सभासद अनेक राजकीय पक्षामधून येतात त्याच्याबरोबर विदेश मत्री सल्लामसलत करतात यासाठी ससदेची एक सल्लागार समिती असते या समितीत फक्त सत्ताधारी पक्षातलेच नव्हे तर विरोधी पक्षाचे सभासदही असतात या समितीच्या बैठकीत खुली चर्चा होते परदेशनीतीवरच सरकारच धोरण बनवण्यामधे या समितीचा वाटा मोठ्या प्रमाणात असतो

★ ★ ★

# विदेश सेवेत प्रवेश

भारताच्या विदेश सेवेचे सदस्य देशातल्या आय् ए. एस्. सनदी वर्गाप्रमाणे यू. पी एस् सी ह्या केंद्रीय सस्थेमार्फत निवडले जातात स्वातत्र्यानतर एक वर्षानी सुरू झालेल्या विदेश सेवेसाठी यू. पी एस् सी ह्या केंद्रीय सस्थेमार्फत परीक्षा घ्यायला सुरवात झाली आय् एफ् एस्. आणि आय् ए. एस् (भारतीय प्रशासन सेवा) याची परीक्षा एक असे दोन्हींसाठी तीन आवश्यक विषय, तीन सर्वसाधारण स्नातक दर्जाचे विषय आणि दोन पदव्युत्तर दर्जाचे विषय असत तसेंच UPSCच्या सभासदासमोर इटरव्ह्यू होत असे गेल्या ४० वर्षांत या अभ्यासक्रमात कित्येक बदल झाले

विदेश सेवेसाठी दाखल झालेल्या उमेदवाराचा पूर्वीपासून विदेश मत्रालयात स्वतत्र इटरव्ह्यू घेतला जात असे पतप्रधान पडित नेहरू विदेश मत्रीही असल्यान आणि आतरराष्ट्रीय व्यवहारात खास रुची घेत असल्यान हा इटरव्ह्यू बहुधा पडितजीच्या समोर होत असे नेहरूना एखादा तरुण उमेदवार होतकरू वाटला तर ते काही चाचण्याचे अहवाल उदा वैद्यकीय तपासणी किंवा पोलिसाचा रिपोर्ट बाजूला ठेवून त्याची नेमणूक पक्की करत अशी अनेक उदाहरण आहेत नेहरूच्या वैयक्तिक आवडीमुळे आणि सखोल लक्ष घालण्याच्या पद्धतीन विदेश सेवेत रुजू होण्यासाठी खास आकर्षण होत पडित नेहरू आपले पहिले विदेश मत्री होते राजनीतीमधे त्याना रस होता स्वातत्र्यपूर्व

काळात कॉंग्रेस पार्टीच्या विदेशी घटनाच्या चर्चेत किंवा ठरावात त्याचाच पुढाकार असायचा स्वातत्र्यानतर भारताचे सर्व प्रकारचे परराष्ट्रीय हित सबध, त्याची जोपासना, निरीक्षण याची जबाबदारी पूर्णपणे विदेश सेवेवर पडली नेहरूच्या नेतृत्वाचा, त्याच्या कल्पनाचा आणि ध्येयाचा विदेश सेवेवरही खूप खोलवर परिणाम झाला विदेशसेवा कशी असावी यात त्यानी जातीन लक्ष घातल आणि त्याबद्दल त्यानी विस्तारपूर्वक आणि अभ्यासात्मक लिहिल

स्वातत्र्यानतर विदेशसेवेसाठी माणस उपलब्ध नव्हती राजनीतीची तर गरज होती प नेहरूनी अनेक ठिकाणाहून अनेक क्षेत्रातली माणस गोळा केली स्वातत्र्य पूर्व काळातल्या इडियन सिव्हिल सर्व्हिसच्या (I.C.S.) अधिकाऱ्याना नेहरूनी विदेश सेवेत सामावून घेतल याव्यतिरिक्त पुष्कळ लष्करी अधिकारी विदेश सेवेत आले विलीन झालेल्या सस्थानाच्या राजे महाराजानाही त्यानी विदेश सेवेत रुजू व्हायला वाव दिला १९४९ साली यू. पी एस् सी तर्फे विदेश सेवेसाठीची पहिली परीक्षा झाली त्यावेळी पहिल्यादा राजनैतिक अधिकारी परीक्षा पद्धतीन निवडले गेले

विदेश मत्रालयाच्या गरजेनुसार दर वर्षी किती नवीन सदस्य घ्यायचे हे ठरवल जात पहिली वीस वर्षं ७-८ पेक्षा अधिक अधिकारी घेतले जात नसत नतर विदेशसेवेचा व्याप जसा वाढत गेला त्याप्रमाणे दरवर्षी अधिकाऱ्याची सख्याही मोठी होत गेली आजकाल दरवर्षी सर्वसाधारणपणे १५-२० जण घेतले जातात गेल्या काही वर्षांपासून यू. पी एस् सी परीक्षा पद्धतीत बदल करण्यात आले आहेत आजकाल प्रथम जनरल स्टडीज आणि ऑप्शनल अशा दोन विषयाची चाचणी परीक्षा होते त्या परीक्षेसाठी जनरल स्टडीज आणि आवडीचे दोन स्तराबरचे विषय मिळून १८०० मार्कांची परीक्षा होते त्यातून व रिक्त जागाच्या सख्ये नुसार उमेदवार गुणानुक्रमानुसार इटरव्ह्यूला बोलावले जातात २५० मार्कांची तोंडी परीक्षा घेतल्यावर मग परत गुणानुक्रम ठरवून वेगवेगळ्या सेवासाठी उमेदवाराची निवड होते आय एफ. एस्, आय् ए. एस् आणि इतर सनदी सेवा, उदा आय्. पी एस्, कस्टमस, इन्कम टॅक्स या सर्वांची परीक्षा आता एकाच धर्तीची असते शेवटी गुणानुक्रमानुसार वेगवेगळ्या सेवामधे उमेदवाराची निवड होते

विदेश सेवेत प्रवेश मिळाल्यानतरच प्रशिक्षण १९५८ पर्यंत दिल्लीत होत असे ५९ साली मसुरीला नॅशनल ॲकेडमी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन स्थापन झाल्यानतर हे प्रशिक्षण तिथे द्यायला सुरुवात झाली विदेश सेवेचा ६-७ महिन्याचा अभ्यासक्रम असतो पायात्मक अभ्यासक्रमात अनेक मूलभूत विषय शिकवले जातात उदा भारतीय

घटना, इतिहास, भारतीय अर्थव्यवस्था, व्यवस्थापन, इ इ अभ्यासाखेरीज अधिकाऱ्याच व्यक्तिमत्व सर्वांगीण व्हाव, त्यात नेतृत्व निर्माण व्हाव यासाठी अनेक प्रकारचे परिसवाद आणि सभा होतात विदेश सेवाधिकाऱ्याला त्या सर्वात भाग घ्यावा लागतो मैदानी खेळ आणि घोडेस्वारी याचाही अभ्यासक्रमात समावेश असतो मसुरीच प्रशिक्षण सपल्यानतर तिथे पुन्हा चाचणी घेण्यात येते आणि मगच हा अभ्यासक्रम समाप्त होतो

विदेश सेवेतल्या अधिकाऱ्याना भारतीय लष्कराची माहिती व्हावी यासाठी भारतीय लष्कराच्या एखाद्या बटालियनमधे त्याना तीन आठवडे जाऊन राहाव लागत नतर त्याच्यासाठी ३-४ आठवड्याचा भारत-दर्शनाचा कार्यक्रम आखला जातो भारत-दर्शनामधे औद्योगिक कारखाने, ऐतिहासिक आणि सास्कृतिक स्थळाना भेटी याचा समावेश असतो राजनैतिक अधिकाऱ्याला सुद्धा भारतातल्या जिल्हा शासनाच काम कस चालत आणि भारतीय ग्रामीण जीवन कस आहे याची जवळून माहिती व्हावी यासाठी ३ ते ६ महिने एखाद्या जिल्हा कलेक्टरच्या हाताखाली काम कराव लागत जिल्ह्यातल वास्तव्य सपल्यानतर विदेश सेवेचा अधिकारी दिल्लीच्या विदेश मत्रालयात आपल प्रशिक्षण चालू ठेवतो तिथे त्याला वेगवेगळ्या विभागात कामाची तोंडओळख करून देण्यात येते परराष्ट्र व्यापार, आतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था, आतरराष्ट्रीय कायदा, सयुक्त राष्ट्र या सर्वांची त्याला माहिती करून दिली जाते

त्याला शिकाव्या लागणाऱ्या (परदेशी) भाषेची निवड झाली की तो परदेशात पाऊल ठेवायला सिद्ध होतो पहिल्या बदलीच्या ठिकाणी, वकिलातीतही त्याच प्रशिक्षण चालू राहत त्याला नेमून दिलेल्या भाषेची परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय तो विदेश सेवेत कायम होऊ शकत नाही

वकिलातीत तृतीय सचिव म्हणून बदली झाल्यावर अशा तरुण अधिकाऱ्याच्या प्रशिक्षणाची जबाबदारी राजदूतावर सोडली जाते एक वरिष्ठ अधिकारी व मुरब्बी राजनीतिज्ञ या नात्याने राजदूत नवीन अधिकाऱ्याला वकिलातीच्या अनेक कार्यांचे ज्ञान कसे होईल व कामाची जबाबदारी स्वतत्रपणे उचलण्यास कसे तयार करता येईल या दृष्टीने प्रशिक्षणाचा कार्यक्रम ठरवतो पुढच्या वर्ष-दीड वर्षाच्या अवधीत राजदूताची यावरची देखरेख व मार्गदर्शन या अधिकाऱ्याला विदेशसेवेच्या सुरुवातीच्या काळात फार उपयुक्त ठरते

★ ★ ★

# महाराष्ट्र आणि विदेश सेवा

परदेशात आपल्या कुठल्याही वकिलातीत प्रवेश केला तर मराठी भाषा कानावर पडण विरळाच! सपूर्ण विदेश सेवेत बोटावर मोजण्याइतक्या मराठी अधिकाऱ्याची सख्या आणि त्याच मराठीपण देखील राजनीतीच्या भपक्याखाली काहीस दबून गेलेल हे अस का ? याचा ऊहापोह महराष्ट्रातल्या वृत्तपत्रामधे केव्हातरी होत असतो विशेषत आय्. ए एस् परीक्षाचे निकाल जाहीर झाल्यावर जेव्हा तुरळक मराठी नाव आढळतात तेव्हा चर्चेला पुन्हा उजाळा मिळतो

खरोखरी कारणच शोधायची झाली तर सिव्हिल सर्व्हिसेसबद्दलच महाराष्ट्राच अज्ञान हे प्रमुख कारण द्याव लागेल हुशार मुलान इजिनियर तरी व्हायच नाही तर डॉक्टर ही मराठी माणसाची सुरुवातीपासूनची मनोधारणा उत्तरेकडच्या पाण्यातच आय्. ए. एस् ची बीज रुजत असावीत आधी सेंट स्टीफन्स कॉलेजमधून इतिहास किंवा इग्रजी विषयातली पदवी, मग पदव्युत्तर अभ्यासाबरोबरच आय् ए. एस् ची तयारी असा दिल्लीच्या महत्त्वाकाक्षी विद्यार्थ्यांचा ठरलेला क्रम तर इटर सायन्स नतर आय् आय्. टी किंवा मेडिकल कॉलेजमधे प्रवेश ही महाराष्ट्रीय विद्यार्थ्याची महत्त्वाकाक्षा

एक तर आपल्या विद्यार्थ्यांमधे या परीक्षेचा इतका बाऊ असतो की या परीक्षेला बसण्याचा प्रयत्नही केला जात नाही इग्रजीवर प्रभुत्व असाव लागण ही देखील या

सेवेची प्रमुख आवश्यकता त्याचही दडपण आपल्या विद्यार्थ्यांना जाणवत मात्र आता महाराष्ट्रातही सरसकट विद्यार्थी इग्रजी माध्यमात शिकायला लागल्यापासून ही भीती हळूहळू कमी होत चालली आहे उत्तरेकडे पूर्वीपासूनच आय् ए.एस् साठीचे क्लासेस अस्तित्वात आहेत महाराष्ट्रात ते ठिकठिकाणी नव्यान सुरू होत आहेत, त्यामुळे हल्ली लहान लहान शहरातले विद्यार्थीही आय् ए.एस्.मधे प्रवेश मिळवत आहेत

विदेश सेवेत मराठी नाव कमी आढळण्याच दुसर प्रमुख कारण म्हणजे सहसा महाराष्ट्राबाहेर न जाण्याच मराठी माणसाच धोरण शक्य तो पुण्यामुबईतच नोकरी मिळाल्यास उत्तम ही विचारधारा आता आतापर्यंत कायम होती जिथे शाळा कॉलेजच शिक्षण तिथेच नोकरी मिळाल्यास आणखी उत्तम! फारसे बदल मराठी माणसाला आवडत नाहीत त्यातून विदेश सेवेतले खालीवर जाणाऱ्या जत्रेच्या पाळण्यासारखे नाट्यपूर्ण बदल म्हणजे मराठी माणसाच्या अगावर शहारे उभे करणारे! सरळ वाटेन जाणाऱ्या, कुणाच्या अध्यात मध्यात न येणाऱ्या शातता प्रिय मराठी माणसाला उलट सुलट जीवन नकोच वाटतं

परदेशात जाणारा मराठी माणूस इग्लड अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी जातो आणि तिथे रिसर्च किंवा कॉम्प्यूटर कपनीत एखादी चागली नोकरी पटकावून तिथे स्थायिक होतो मग दर तीन चार वर्षातून एकदा कुटुबासह भारताला भेट द्यायची असा त्याचा जीवनक्रम ठरून जातो मग तिथे इतर मराठी मडळी असली तर त्याच्याशी सवाद साधला जातो त्यातून एखाद महाराष्ट्र मडळ स्थापन होत गणेशोत्सव साजरा केला जातो विदेश सेवेतल्या माणसाला मात्र घर सोडल्यास जिथे मराठी बोलायचीसुद्धा पचाईत तिथे त्याच मराठीपण फुलणार कस ?

अशा पार्श्वभूमीवर महाराष्ट्रान विदेश सेवेला दिलेले मोजके पण अत्यत कुशल असे राजमुत्सद्दी राष्ट्रीय स्तरावर नाव मिळवून गेले उदा श्री यशवतराव चव्हाण १९७४ ते ७७ पर्यंत भारताचे परराष्ट्रमत्री होते तर श्री राम साठे भारताचे विदेश सचिव होते श्री अप्पासाहेब पत यानी केनिया, इजिप्त, इग्लड, सिक्कीम या ठिकाणी भारताच राजदूतपद भूषवल इजिप्तचे भूतपूर्व अध्यक्ष श्री नासेर याना त्यानी सूर्य नमस्काराच आणि योगासनाच महत्त्व पटवल होत ज्या ज्या देशात ते राहिले तिथे त्याच्या व्यक्तिमत्वाचा ठसा आजही कायम आहे. जर्मनीत राजदूतपदी श्री कामतेकर, नेपाळमधे श्री अरविंद देव, इराणमधे श्री अशोक गोखले तर ब्राझीलमधले भारताचे वकील श्री काकोडकर होते सध्या भारताचे स्वित्झर्लंडमधले वकील श्री मगलमूर्ति आहेत तर बल्गेरियामधले भारताचे राजदूत श्री धुमे हे आहेत

मात्र सर्वसाधारणपणे महाराष्ट्रात परराष्ट्र नीतीबद्दल आणि परराष्ट्रातल्या घटनाबद्दल जेवढ कुतूहल आणि आस्था पाहिजे तेवढी दिसत नाही मराठी माणूस आपल्या प्रातातून बाहेर जायलाच जिथे उत्सुक नाही तिथे त्यान परराष्ट्रतल्या बाबींची दखल घेतली नाही तर त्यात नवल ते काय! विदेश सेवेत मराठी लोकाच प्रमाण कमी आहेच पण महाराष्ट्रातही परराष्ट्रनीतीचा अभ्यास करणाऱ्या अशा सस्था जवळ जवळ नाहीत मराठी भाषेतही अशी फारशी पुस्तक आढळत नाहीत मराठी वृत्तपत्रामधेही त्यावरची चर्चा मर्यादित असते कुणी यावर म्हणेल की परराष्ट्र नीती केद्रीय सरकारची जबाबदारी आहे तेव्हा राज्यान किंवा राज्यसरकारन त्यात रस घेतला नाही-तर कुठे बिघडल? तत्वत ही गोष्ट जरी खरी असली तरी आजच्या काळात अशी धारणा क्वचितच विधायक स्वरूपाची नाही आणि त्या राज्याच्या फायद्याची पण नाही महाराष्ट्र आज एक पुढारलेल औद्योगिक राज्य आहे. किंबहुना औद्योगिक क्षेत्रातल्या प्रगतीत महाराष्ट्राचा पहिला क्रम लागतो महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर परदेशातले उद्योग आहेत हाय टेक कारखाने आहेत पन्नास टक्के भारतातल्या तेलाचा पुरवठा महाराष्ट्राला लागून असलेल्या बॉम्बे हायमधून होतो एकूण देशाच्या निर्यातीमधे मुबईहून निर्यात होणाऱ्या वस्तूची शेकडेवारी जवळ जवळ पचवीस टक्के असेल देशात येणाऱ्या परदेशी पर्यटकामधे जवळ जवळ साठ टक्के पर्यटक मुबईत आणि महाराष्ट्रात येतात पूर्वापार, युरोप अमेरिकेतून होणारे विचारप्रवाह मुबईत प्रथम येतात मग ते राजकीय असोत, आधुनिक तत्रज्ञानासबधी असोत, वैद्यकीय असोत किंवा फॅशन्स अथवा चित्रपट सबधातले असोत, व्यापारी जगातल्या घडामोडीचे पडसादही मुबईत प्रथम उमटतात

आखात आणि आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याची राष्ट्र किंवा हिंदी महासागरातली बेट महाराष्ट्राला जवळ आहेत आखातामधे होणाऱ्या घटना जगातल्या सर्व देशाना हेलावून सोडतात इराक-कुवेत सघर्षाचे भारतावर उमटलेले पडसाद सर्वज्ञात आहेत आपण इतक्या जवळ असूनही या घटनाचा अभ्यास न करण हे आर्थिक, व्यापारी किंवा सामाजिक दृष्ट्या हितावह नाही महाराष्ट्रातून या भागात जाणाऱ्या, अरब देशामधे काम करणाऱ्या लोकाच्या सख्येवर, महराष्ट्राच्या कारखान्यामधून होणाऱ्या निर्यातीवर तसच महाराष्ट्रात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या अरबी पर्यटकाच्या सख्येवर या घटनाचा परिणाम अवश्य होणार. महाराष्ट्रातल्या सरकारी सस्था, वृत्तसस्था आणि अभ्यासक यानी या घटनाचा खोलवर विचार करण वास्तववादी ठरेल त्याचप्रमाणे पूर्व आफ्रिकेतले अनेक देश भारताकडून यत्रसामग्री, व्यवस्थापनातल नैपुण्य आणि काही प्रमाणात भाडवल घ्यायला उत्सुक असतात त्याच्याबरोबर महाराष्ट्रातल्या औद्योगिक आणि आर्थिक सस्थाचा वारवार सबध येण दोघाना पूरक आहे. या देशातले

विद्यार्थी पूर्वापार महाराष्ट्रातल्या शिक्षणसस्थामधे शिकत आलेले आहेत आजही पुण्यामुबईच्या विश्वविद्यालयामधे ते मोठ्या सख्येन आहेत त्या देशाच्या परिस्थितीचा अभ्यास करण उचित ठरेल

हिंदी महासागरातल्या मॉरिशस बेटाच आणि महराष्ट्राच जुन नात आहे. अलीकडेच जागतिक मराठी समेलन तिथे झाल्यामुळे या नात्याला परत एकदा उजाळा मिळाला आहे. मॉरिशसच्या आर्थिक, व्यापारी आणि सास्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्र अजूनही अधिक वाटा उचलू शकेल उदा मॉरिशसच्या साखरेच्या उद्योगधद्यात महाराष्ट्र आणि मॉरिशस याची अधिक देवाण घेवाण होऊ शकेल इतर हाय टेक उद्योगसुद्धा महाराष्ट्रातले कारखानदार तिथे काढू शकतील

महाराष्ट्रातली चेम्बर्स ऑफ कॉमर्स आणि परदेशातल्या व्यापारी सस्था तसच उद्योजक याच्यात नियमित स्वरूपाच्या भेटी आणि देवाण-घेवाण व्हायला हवी आजकालच्या काळात आर्थिक प्रश्नाना आणि सबधाना परराष्ट्र सबधात महत्त्वाच स्थान प्राप्त झाल आहे किंबहुना दिवसेंदिवस आर्थिक क्षेत्रातल्या वाढत्या परस्परावलबनामुळे आणि बाजारपेठा खुल्या करण्याच्या लाटेमुळे आतर्देशीय सबधाना एक नवीन स्वरूप प्राप्त होऊ लागल आहे

कम्युनिझमच्या सार्वजनिक पराभवानतर बाजारपेठाचे अर्थशास्त्र सगळीकडे प्रभावी ठरू लागल आहे अस जाणवायला लागल आहे. अशा पार्श्वभूमीवर देशादेशातल्या सबधात तत्रज्ञान, व्यापार, आर्थिक सहकार्य, ऊर्जा इत्यादी घटकाच महत्त्व वाढल आहे.

महाराष्ट्रातल्या अनेक वस्तूना, यत्रसामग्रीला आणि कौशल्याना परदेशात खूप वाव मिळण शक्य आहे. शेतीप्रधान वस्तूच उदाहरण द्यायच झाल्यास साखर, फळफळावळ, फुले, भाज्या तर यत्रसामग्रीच्या क्षेत्रात (महाराष्ट्रात बनणारे) स्कूटर्स, ट्रक्स, डिझेल पप, कपडा, रसायन याचा समावेश सहज होऊ शकेल महाराष्ट्रातले तत्रज्ञ, बँकर्स, व्यवस्थापन क्षेत्रातले तज्ज्ञ, कॉम्प्यूटर सॉफ्टवेअरमधले इजिनियर्स या सर्वांना जगातल्या इतर देशामधे मोठ्याप्रमाणावर मागणी आहे आणि ती वाढू शकेल नारायणगाव इथे बनणारी शँपेन युरोपच्या बाजारपेठेत फ्रान्समधल्या शँपेनच्या बरोबरीन स्पर्धा करू शकेल इतकी या शँपेनची लोकप्रियता वाढत आहे पण हे सगळ व्हायला सुसघटित मार्गदर्शनाची आणि योग्य तऱ्हेन माहिती करून घेण्याची आवश्यकता आहे भारताच्या एकूण निर्यातीत महाराष्ट्र अजूनही फार मोठा वाटा उचलू शकेल महाराष्ट्राची उत्पादनक्षमता, या राज्यात असलेली यत्रणा आणि जगातल्या बाजारपेठाची महाराष्ट्राला

असलेली तोडओळख हे महाराष्ट्राला खचितच फायद्याच ठरू शकेल विशेषत सरकारच्या सध्याच्या धोरणानुसार आपल्या राजनीतीचा कलही आता अर्थयंत्रणेकडे अधिक झुकू लागला असल्यामुळे महाराष्ट्राचा या क्षेत्रातला वाव अधिक वाढेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे

★ ★ ★

# मास्को-सोव्हिएट युनियन

## माझा चाणक्याच्या विश्वात प्रवेश

लहानपणी कुणी ज्योतिषान सागितल होत की घट्ट मूठ वळल्यावर मनगटाच्या वरच्या बाजूला जितक्या रेघा पडतील तितके वेळा तुम्हाला परदेशगमनाचा योग आहे त्यावेळी जास्तीत जास्त रेघा दिसाव्यात म्हणून जिवाचा केवढा आटापिटा चालायचा ससारच परदेशात थाटावा लागेल अस मात्र कधी कुठल्या ज्योतिषान सागितल नाही मुलाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणे लहानपणी सुद्धा मी भिगरी लावल्यासारखी फिरायची जनता सपर्काची मला तेव्हाही भयकर हौस असा स्वभाव पुढच्या आयुष्यात एक उपयुक्त साधन बनेल अशी तेव्हा कुणाला काय कल्पना !

तर, ही मुलगी पुढे विदुषी बनेल ह्या ज्योतिषाच्या आडाख्याला धाब्यावर बसवून कॉलेजच शिक्षण सपताच मी बोहोल्यावर चढले सप्तपदीनतर पुढच पाऊल टाकल ते मुळी मुबईच्या विमानतळावरच ! लग्नाआधी ज्या दिवसात नवरा बायकोंनी एकमेकाचे हात हातात घेऊन इतराच्या नजरा चुकवत हँगिंग गार्डनच्या कुजात बसायच, त्या दिवसात आम्ही एअर इडियाच्या ऑफिसात चकरा मारत होतो आणि उरलेल्या वेळात बरोबर न्यायच्या तादुळाच्या पोत्याचा आणि सामान नेण्यासाठी लागणाऱ्या अवजड

ट्रकाच्या शोधात होतो हजार किलो (१ टन) सामान जहाजान नेण्याची सरकारी सवलत असल्यामुळे काय नेऊ आणि काय नको अस होऊन गेल होत हातात हात घालून किराणा मालाच्या दुकानात शिरणारे आम्ही पहिलेच प्रियकर प्रेयसी असू. एवढ्या दूर मुलीला पाठवायला बरे बाई तयार झालात अस म्हणणारे लोक होतेच कलकत्ता असो, कोचीन असो, नाहीतर अहमदाबाद किंवा अलाहाबाद असो, मुलीला महाराष्ट्राबाहेर दिली म्हणजेच ती किती दूर ही आपल्याकडची कल्पना, पण मुलीला "एकदम मास्कोला पाठवणार!" इतकी का जड झालीय मुलगी अशी थोडीशी झाक असायची त्या विचारण्यात

मास्कोला जायची आमची तयारी ज्या धर्तीवर चालली होती ती म्हणजे उत्तर ध्रुवावर चालल्यासारखी सतत बर्फ पडत असलेल्या ठिकाणी रहायच या कल्पनेच पुण्यात बसून फारस आकलनही होत नव्हत डोळ्यासमोर यायची ती फरचे सूट घातलेली एस्किमोची चित्र इतके दिवस बर्फाची कल्पना थडगार आईस्क्रीमपुरतीच मर्यादित होती हातातल्या मोज्यापासून ते माकड टोप्यापर्यंत लोकरीचा एकही कपडा घ्यायचा शिल्लक ठेवला नव्हता सैबेरियात थडीन लोकाचे नाक-कान गळून पडतात अशा आख्यायिका ऐकलेल्या रत्नागिरीच्या कमामावशी लग्नाच्या आधी येऊन आशीर्वाद देऊन गेल्या तेव्हा त्यानी अस डोळे भरून पाहिल की मी आता परत दिसते का नाही "बिचारी" म्हणून माझे दोन्ही हात प्रेमभरान दाबून त्या गेल्या होत्या वकिलातीतली नोकरी म्हणजे देशोदेशीच भ्रमण आज मास्को तर उद्या मेक्सिको तर परवा मादागास्कर हे त्याना समजावता, समजावता नाकीनऊ आले होते अर्थात् त्याच्या बुद्धीला हे झेपलच नसत पण मास्कोला कायमच राहायच नाही हे सागितल्यावर त्याच्या जिवात जीव आला होता

मास्कोला आपल्या पदार्थांपैकी काऽऽही मिळत नाही सर्व इथून घेऊन जाव लागेल अशी माहिती मिळालेली महिन्याच सामान सपल्यावर वाण्याकडे नुसती यादी पाठवली की ते घरपोच येणार अशी सवय झालेली, आता तर बिऱ्हाड बरोबर होत आणि ते बरोबरच्या १८० किलोत बसवायच म्हणजे परीक्षाच होती, त्यातून वकिलातीच्या काही लोकाच्या फर्माइशी आलेल्या होत्याच कुणाला टूथपेस्ट, कुणाला पाढरे बूट, कुणाला तुरीची डाळ तर कुणाला केळी तर कुणाला कोथिबीर! बर, कुठलीही गोष्ट न नेऊन चाललच नसत कारण हिदुस्थानात कुणी येणार म्हणजे सातासॉझ येणार असल्यासारखी सर्व मडळी वाट पाहत असणार! (ते आता स्वानुभवानतर मी खात्रीपूर्वक सागू शकते) तेव्हा त्या वस्तू आधी भरल्या शक्य तितक सामान हँडबॅगेत ठोसल कोटाच वजन कराव लागू नये म्हणून दोन्ही खिसे सामानान गच्च भरलेले थडीचे

कोट अगावर चढवून खाद्यावर एअर बॅग आणि तीन-तीन, चार-चार पिशव्या, नातेवाईक मडळींनी मोठ्या प्रेमान आमच्या गळ्यात घातलेले हार, इतके दिवस सगीताची आराधना केल्याच प्रतीक म्हणून बरोबर नेण्यासाठी मिरजेहून खास आणवलेला तबोरा, या वस्तूसकट लळत-लोबत विमानाकडे चाललेल "माझ सुदर ते ध्यान" बघून पाणावलेल्या डोळ्यानी निरोप देणाऱ्या आईच्या चेहऱ्यावर देखील ऊनपावसासारखी हास्याची झाक दिसत होती

विमानाचा पहिला प्रवास म्हणजे पहिलटकरणीसारखा पुढे कितीही बाळतपण झाली तरी लक्षात राहाते ती पहिली वेळ! पद्मावतीपर्यंत केलेला बैलगाडीचा पहिला प्रवास अजूनही स्मरणात जितका ताजा आहे तेवढाच हा विमानाचा पहिला प्रवासही! परदेशात गेल्यावर आपला आणि मायदेशामधला एकमेव दुवा म्हणजे एयर इडिया, याची प्रथम जाणीव झाली ती या विमानाच्या प्रवासात सुरवातीला हवी हवीशी वाटणारी ढगाची सोबत काही तासानतर कटाळवाणी वाटायला लागली इतर देशावरून उड्डाण करताना पायलट तशी घोषणा करत होता १९६५ च्या डिसेंबरमधे मुबई-मास्को हा प्रवास नेहमीप्रमाणे पाकिस्तानवरून होण शक्य नसल्याने तो इराणवरून झाला आपल्या देशापासून अधिकाधिक दूर चाललो ही जाणीव मनाला अस्वस्थ करीत होती

मास्कोचे दिवे लुकलुकायला लागले आणि काही वेळातच विमानाच्या घरघरीत पार्श्वसगीताचे सतारीचे सूर विरून गेले विमानतळाभोवती गिरक्या घेत घेत आमच विमान अलगद जमिनीवर येऊन उतरल विमानातन खाली उतरलो आणि उत्तर ध्रुवावर चालल्याच समजून केलेली तयारी सुद्धा किती अपुरी होती हे ताबडतोब जाणवल पहिल स्वागत केल तेच मुळी झिमझिमणाऱ्या बर्फान सध्याकाळचे सात वाजले होते हातातल घड्याळ रात्रीची दहाची वेळ दाखवत होत सबध आसमत बर्फाच्या आवरणाखाली झाकला गेला होता क्षणभर परीराज्यात आल्याचा भास झाला सर्वच माणस अगावर जड कोट हातात मोजे आणि कानावर लोबणाऱ्या टोप्या घालून वावरत होती त्यातलाच एकजण पुढे आला आणि हिंदीत त्यान आमच स्वागत केल जवळ आल्यावर तो वकिलातीतला सरदारजी अधिकारी असल्याच ध्यानात आल माझ्या हातातला तबोरा बघून त्याला अगदी उचबळून आल त्यान लगेचच तबोऱ्याचा ताबा घेतला आणि गायक असल्याच्या थाटात तो खाद्यावर तबोरा घेऊन वावरायला लागला सरदारजीच्या हातात तबोरा! माझ मलाही क्षणभर हसू आवरलं नाही एक-दोन रशियन माणसानी तबोऱ्याकडे बोट दाखवून त्याला रशियनमधे तुम्ही वाजवता का म्हणून विचारल्यावर त्यान मिशीला पीळ देऊन दिलेला होकार आम्हाला भाषा न समजताही कळला इतकी माणस सभोवताली असून सुद्धा विमानतळावर चागलीच शातता जाणवत

होती आम्हा तिघाचे हसण्या-बोलण्याचे आवाज सुद्धा उच वाटत होते मुबईच्या जत्रेसारख्या विमानतळानतर हा फरक चागलाच जाणवला धिप्पाड शरीराच्या रशियन बायका हातात मोठमोठे झाडू घेऊन विमानतळाच्या कडेला साठलेला बर्फ साफ करताना दिसत होत्या पुढे मग तिथल्या जीवनाचा तो अविभाज्य भाग आहे हे कळून आल

बाहेर सूर्याची किरण दिसायला लागली की जाग व्हायची रोजची हिंदुस्थानातली सवय! इथे हिवाळ्यात घड्याळाकडे बघूनच वेळा ठरवाव्या लागणार हे पहिल्याच दिवशी ध्यानात आल कारण हवामान फारच फसव सकाळी नऊ-सव्वानऊला उजाडणार, की परत दुपारी तीन वाजल्यापासून अधार व्हायला लागणार. बाहेर थडीचा कडाका बघून घराबाहेर पडण्याचा जीवच होत नव्हता घराच्या आतमध्ये सेंट्रल हीटिंग असल्यान एकदा घरात शिरल्यावर थडीचा मागमूसही जाणवत नव्हता पण बाहेर पडल्याशिवाय गत्यतर नव्हतच बाजारहाट करून वस्तू आणण तर प्राप्त होत कोट, टोपी, बूट, मोजे या सर्व सरजामानिशी बाहेर पडले वकिकलातीमधले दुसरे अधिकारी जवळच राहत होते माझ्याबरोबर बाजारात चलतेस का म्हणून त्याच्या पत्नीचा फोन आला ती अर्ध्या पजाबीत तर अर्ध्या हिंदीत बोलत होती एरवी महाराष्ट्रात हिंदी बोलायचीसुद्धा फारशी वेळ येत नाही एकदा आपला देश सोडून बाहेर पडल्यावर भाषा, प्रात, जात-पात या गोष्टी किती दुय्यम होऊन जातात याचा प्रत्यय मला त्या दिवशी आला एक पजाबी प्रोफेसर पूर्वी आमच्याकडे येऊन राहिले होते तेव्हा त्याच सर्वच वागण किती वेगळ होत आज परदेशात त्या पजाबी बाईशी हिंदीत बोलताना किती जवळीक वाटली होती वकिलातीतल्या लोकाना जगाच्या पाठीवर कुठेही गेल तरी एक फायदा मात्र जरूर असतो आपली भारतीय माणस सतत अवती भोवती असतात, सर्व प्रकारच मार्गदर्शन करायला ती तत्पर असतात परदेशातल्या जीवनामधल्या उणीवा त्यामुळे कितीतरी अशान भरून निघतात

मास्कोमधे पानाच्या ठेल्यासारखी कोपऱ्याकोपऱ्यावर मास-मच्छीची दुकान आढळतात बत्ताशाच्या माळासारखे या दुकानामधे मासाचे तुकडे टागलेले असतात काळ्या ब्रेडवर असा एक 'कल्बासाचा' तुकडा आणि वर मरोझनोय (आईस्क्रीम) खाल्ल की कुठलही रशियन पोरग खूष वरून रिपरिप बर्फाच्या सरी कोसळत असताना थडगार आईस्क्रीम खाण्यातली मजा रशियन माणसाना विचारावी अशी चवीन आईस्क्रीम चघळणारी रशियन माणस रस्त्यावर पावलागणिक दिसायची फूटपाथच्या कडेला बर्फाच्या ढिगाऱ्यामध्ये दुपारच्या प्रहरी गोबरी गोबरी मुल खेळताना दिसायची सगळीकडे काम करणाऱ्या नेहमी बायकाच जास्त दिसत असत उच उच इमारतींवर चढून रग सफेती करणाऱ्या, दुकानात काउंटरवर बसणाऱ्या, ट्रॅम, बस चालवणाऱ्या आणि

रस्त्यावरच बर्फ उपसून बाजूला करणाऱ्या, प्रामुख्यान बायकाच असायच्या नव्या नवलाईच्या दिवसामधे बघाव त्या गोष्टीच कुतूहल वाटत होत

रांगेत उभ राहण हा रशियन माणसाच्या जीवनाचा स्थायी भाव असावा (अजूनही इतक्या वर्षानंतरही तो बदललेला नाही ) केव्हाही कुठेही गेल तरी ठिकठिकाणी लोकाच्या रागा लागलेल्या दिसायच्या कधी सफरचद, कधी पाव तर कधी अड्यासाठी, कारण जेव्हा उपलब्ध असतील तेव्हाच या वस्तू घेऊन ठेवाव्या लागायच्या नाही तर त्या दिवसच्या दिवस कुठे दिसायच्या नाहीत शाकाहारी माणसाला मास्कोत उदरनिर्वाहाचा मोठाच प्रश्न! बटाटे, भात आणि गाजर यापुढे मजल जाऊच शकायची नाही मात्र वकिलातीच्या लोकानी कणीक मिळवण्याचा शोध लावला होता आणि दरमहा कणकेची पोती वकिलातीत आणण्याची व्यवस्था केली होती शाकाहारी माणसाला तो एक फार मोठा दिलासा होता

रशियामधे सर्व देशाच्या वकिलातीच्या लोकाना त्याच्यासाठी खास बाधण्यात आलेल्या इमारतींमधे रहावे लागत असे शहराच्या विविध भागामध्ये अशा डिप्लोमॅटिक बिल्डिग्ज असायच्या खास डिप्लोमॅट्ससाठी बाधण्यात आलेले हे फ्लॅट्स प्रशस्त असत वेगवेगळ्या देशाच्या प्रतिनिधींबरोबर एकाच इमारतीत रहात असल्या कारणान त्याच्याबरोबर मैत्रीचे सबध वाढायला मदत होत असे, कारण कित्येकदा ऑफिसमधून परत आल्यावर लिफ्टमधून वर एकत्र जायचा प्रसग येत असे किंवा थडीच्या दिवसात स्वत ची मोटार 'नाही मी नाथा' म्हणून रुसून बसल्यावर ती ढकलायला एकमेकाची मदत होत असे बाजारहाट करायला किंवा डिप्लोमॅटिक दुकानात जायला बायकाना एकत्र जाता यायच किंवा आज बाजारात ॲपल्स मिळताहेत अशी अत्यत उपयुक्त माहिती एकमेकाना लिफ्टमधेही पुरवता येत असे या डिप्लोमॅटिक इमारतींसमोर एक काचेची केबिन असायची आणि त्यात एक पहारेकरी या इमारतींमधे येणाऱ्या जाणाऱ्यावर देखरेख ठेवायचा सामान्य रशियन माणसाची या इमारतीकडे फिरकण्याची टाप होत नसे पार्टीला बोलावल्यावर सर्व रशियन जोडपी एकत्र येत आणि बरोबरच बाहेर पडत

'ओलित्सा ओबुखा' या रस्त्यावर असलेल्या भारतीय वकिलातीपर्यंत पोचायच म्हणजे ट्रॅम, मेट्रो आणि बस अशा तिन्ही वाहनानी प्रवास करावा लागायचा मेट्रो म्हणजे मास्कोची भुयारी रेल्वे जमिनीखालची भुयारी रेल्वेची स्टेशन म्हणजे प्रासादासारखी विस्तृत आणि भव्य! कोरीव चित्रकामाच्या भिंती, मुबलक खेळणार वार आणि शानदार दरवाजे असा तिथल्या रेल्वे स्टेशनाचा थाट आहे. मास्कोची भुयारी रेल्वे खरोखर

वाखाणण्याजोगी आहे. दर अर्ध्या मिनिटाला मेट्रो यायची मेट्रो चालवणारीसुद्धा बाई बघितल्यावर खरोखरच कौतुक वाटायच आमच्या घरापासून तिन्ही वाहनामधून साधारण तासाभराच्या प्रवासानतर ओलित्सा ओबुखा यायचा दोन्ही बाजूला अशोकचक्र असलेल्या दरवाज्यातून आत शिरल की मग ऑफिसची बैठी इमारत, पाठीमागे राजदूताचे भव्य निवासस्थान आणि आजूबाजूला मोठ आवार असा हा वकिलातीचा व्याप आहे. ऑफिसच्या इमारतीला लागूनच एक आउट हाऊस आहे. त्याच स्वरूप पाहिल्यावर तो एकेकाळी घोडयाचा तबेला असावा अशी शका येते पूर्वी एक रशियन सरदार या वकिलातीच्या इमारतीत रहात असे नेपोलियन तिथे आला तेव्हा या इमारतीच दार इतक पक्क होत की ते उघडेना म्हणून आऊट हाऊसमधे तो एक रात्र राहिला अशी आख्यायिका आहे

बाहेरच्या थडगार बर्फाळ वातावरणातून ऑफिसच्या आवारात शिरल की मग चहाच्या कपाचा परिचित किणकिणाट, "क्योंबे, त्वानु घर नही जाणा ?" असे सरदारजी दरवानाचे आपापसातले प्रेमळ सवाद, डॉक्टरकडे तपासणीसाठी जाण्याकरता ऑफिसच्या गाडीतून जायचे म्हणून ऑफिसमधे येऊन थाबलेली, इकडे तिकडे धावपळ करणारी कुणा अधिकाऱ्याची मुल या सर्व घरगुती वातावरणामुळे कस उबदार वाटायला लागायच ऑफिसचे कामाचे तास सपले की उन्हाळ्यात काही मडळी व्हॉलीबॉल खेळत मास्कोत फक्त भारतीय वकिलातीतच स्क्वॉश कोर्ट आहे. इतर देशाचे डिप्लोमॅटसही तिथे स्क्वॉश खेळायला येत असत

वकिलातीत नवीन रुजू झालेल्या अधिकाऱ्याना भाषा शिकवण्यासाठी एक रशियन शिक्षिका नियुक्त करण्यात आली होती रशियामधे भाषा आल्याशिवाय पुढे कुठलीही हालचाल करता येण अशक्य होत मला रशियन भाषेची पहिली ओळख झाली ती घरकाम करायला येणाऱ्या रशियन बाईकडून सुरुवातीच्या काही दिवसात आपले हातवारे किती प्रभावी असू शकतात याची कल्पना आली तिला काही समजवायच ते हातवाऱ्याच्या मदतीनच मी काहीतरी सागायच आणि तिन तिसरच काहीतरी करायच अस कितीतरी वेळा घडल दोन-तीन शब्द मात्र असे होते की त्यात गफलत होणेच शक्य नव्हत चाय आणि साखर हे दोन्ही शब्द आपले रोजच्या व्यवहारातले पुढे रशियन भाषा शिकताना काही काही सस्कृत शब्दाशी असच साम्य जाणवायच नभ म्हणजे न्येब व्हदा म्हणजे उदक घट्ट बुचडा बाधणाऱ्या आमच्या रशियन शिक्षिकेत आणि पूर्वीच्या आमच्या सानेबाईत किवा घाटेबाईमधे काहीच फरक नव्हता तशाच प्रेमळ आवाजात दटावायची आणि तसाच चिकार गृहपाठ द्यायची रशियन भाषेतले व्याकरण म्हणजे सस्कृत भाषेसारखच क्लिष्ट आणि पोपटपची करायला लावणार, पण

साठीच्या आमच्या रशियन शिक्षिकेन काही दिवसामधेच आमच्यात भाषेची गोडी निर्माण केली होती

मास्कोच्या वास्तव्याला सुरुवातीलाच 'उपदिकाचा' सबध सुरू होत असे उपदिका म्हणजे मास्कोतल्या सर्व देशाच्या वकिलातींना प्रशासकीय मदत पुरविण्यासाठी निर्माण केलेला रशियन सरकारचा एक विभाग घरात कुठल्याही प्रकारच्या गोष्टी करून हव्या असतील तर उपदिकातर्फे केल्या जायच्या अगदी झुरळ मारण्यापासून ते कामाची बाई मिळवून देण्यापर्यंत मास्कोच्या कडाक्याच्या थडीत कुठल्याही प्रकारचे पक्षी दिसायची मारामार माशा, चिलट हे प्रकार तिथे नाहीतच त्यामुळे फ्लॅटच्या ऊबदार वातावरणात जेव्हा झुरळ दृष्टीस पडली तेव्हा त्या रशियन झुरळानी भारतात परत गेल्याच समाधान दिल उपदिकाची कामाची पद्धत आपल्या म्युनिसिपालीटीसारखीच झुरळावर कारवाई होईपर्यंत त्यांच्या कित्येक बटालियन तयार झालेल्या असायच्या गाडीसाठी पेट्रोलची कुपनही उपदिकातर्फे मिळत असत रशियन शिक्षिकेची नियुक्तीसुद्धा उपदिकातर्फे झाली होती एकूण सर्वच नाड्या उपदिकाच्या हातात असत त्यामुळे अडला हरी धाव उपदिकाकडे असा तिथला खाक्या होता

परदेशातल्या आपल्या वकिलातीच्या जीवनाचाही हळूहळू सराव होत होता वकिलातीच्या जीवनाचा श्रीगणेशा करून देणारी पहिली सध्याकाळ मला अजूनही तशीच आठवते आम्हाला प्रथम सचिवाकडे जेवायला आमत्रण होत इतर रशियन पाहुणेही तिथे येणार होते तपमान मायनस सात-आठ सेल्सियस असाव हट्टी मुलाच्या रडगाण्यासारखी बर्फाची झिमझिम चालू होती सगळा आजूबाजूचा परिसर बर्फाच्या बुरख्याखाली झाकला गेला होता बसच्या प्रवासात झाडावरूनही बर्फाचे झुपके लोंबताना बघून आता सिड्रेलाच्या गोष्टीतल्या सारखा पाढरा शुभ्र रथ कुठून तरी येणार अस वाटायला लागल होत मात्र बाहेरच्या गारठ्यात शिरल्यावर काचेतून बघून सुचणाऱ्या कविकल्पना कुठल्या कुठे विरून गेल्या नाकाच्या शेंड्याला (तेवढाच भाग उघडा राहिला होता ) थडी बोचत होती नेहमी मिरच्या झोंबतात तर आज बर्फ म्हणून नवऱ्यान नको तिथ विनोद करून सूड घेतला सेंट्रल हीटेड बसमधून उतरून डिप्लोमॅटिक बिल्डिगपर्यंत पाचच मिनिट चालाव लागल तेवढ्यात ब्रह्माड आठवल

बाराव्या मजल्यावरच्या प्रथम सचिवाच्या फ्लॅटमधे शिरलो दार उघडताक्षणीच अगरबत्तीचा मद सुवास दरवळला आणि एकदम प्रसन्न वाटल बर्फान गारठलेल्या सवेदना परत यायला लागल्याच जाणवल राजनैतिक अधिकाऱ्याची पत्नी या अवघड भूमिकेचा सराव आपल्याला करावा लागणार आहे याच ओझ डोक्यावर होतच मास्कोला

प्रयाण करण्यापूर्वी आपले पती डिप्लोमॅट म्हणून जाणार आहेत हे सांगितल्यावर कितीतरी चेहरे कोरेच रहायचे

"अगोबाई, मास्कोला जाणार पण आमच्या ओळखीचे एक जण आहेत त्यांचा मुलगाही फॉरिन सर्व्हिसमधे आहे, तो तर स्वित्झर्लंडला होता तुम्हाला मात्र मास्कोला पाठवत आहेत तुझा नवरा कम्युनिस्ट तर नाही ना? सांभाळून ग बाई"

शंकाकुशंकांचे समुद्र पार करून धडधडत्या छातीन या नव्या आयुष्याची सुरुवात करायला सिद्ध झाले होते मी देशाच प्रतिनिधित्व करायची जबाबदारी आता आपल्यावरही आहे (म्हणजे नेमक काय याची त्यावेळी कल्पनाही नव्हती) याच चांगलच दडपण आल होत

"काय घेणार" प्रथम सचिवाच्या प्रश्नान मी भानावर आले क्षणभर नवऱ्याकडे चोरून पाहिल

"व्हिस्की" मी ताड्दिशी उत्तर देऊन मोकळी झाले

"पूर्वी कधी घेतलीय?" सचिवाच्या चेहऱ्यावर आता मिस्किल झाक होती

"नाही"

"मग आपण वाईनन सुरुवात करू या"

डिप्लोमॅटिक आयुष्याचा सोमरस हा जर अविभाज्य भाग असेल तर त्याची सुरुवात केव्हातरी करायलाच हवी या विचारान मी ताड्दिशी व्हिस्की म्हणून टाकल होत या प्रथम सचिवाची आणि आमची पुढे खूप मैत्री झाली त्या दिवशी रात्रीच्या जेवणात ते दोघेही शाकाहारी आहेत आणि त्याचा त्यांना अभिमान आहे हेही मला प्रकर्षान जाणवल आणि अपल्या शाकाहारी आहाराबद्दल आपल्याला ओशाळवाण वाटायच काहीच कारण नाही याचीही खात्री पटली. माझा शाकाहार पुढे कितीतरी डिनर पार्ट्यांमधे संभाषणाचा विषय होत असे मात्र त्यानंतर माझ्या शाकाहाराचा झेंडा मी कायम फडकावत ठेवला

राजकीय दृष्ट्या १९६५-६६ सालचा काळ सोव्हिएट युनियनच्या दृष्टीन कठीण होता पण भारत आणि सोव्हिएट युनियनमधले संबध हळूहळू वाढायला लागलेले होते ६४ सालच्या ऑक्टोबरमधे ख्रुश्चेव्हची सत्ता संपुष्टात आली त्याच्या अचानक पाडावानंतर कोसिजिन, ब्रेझनेव्ह आणि पदगोरनी याच त्रिकुट अग्रस्थानी होत ख्रुश्चेव्हनी आपल्या आठ-दहा वर्षांच्या राजकीय कारकीर्दीत सोव्हिएट युनियनमधे वैचारिक बदल आणि स्टॅलिनीकरणाचा अंत करण्याचा प्रयत्न केला होता अगदी थोड्या प्रमाणात

का होईना, पण सोव्हिएट युनियनवरचा पोलादी पडदा (iron-curtain) किंचित् उघडला गेला होता या त्रिकुटान तोही परत बद करून टाकला सोव्हिएट युनियनमधल्या त्यावेळच्या अतर्गत परिस्थितीचे वर्णन दबाब, भीती आणि आर्थिक तुटवडा ह्या तीन शब्दात करता येईल भारताबरोबरचे सोव्हिएट युनियनचे सबध त्यावेळी जुजबी होते तरी सोव्हिएट युनियनन भारत आणि भारतीय उपखडातल्या राजकारणामधे अधिक रस घ्यायला सुरुवात केली होती १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धानतर सोव्हिएट युनियनचे पतप्रधान कोसिजिन यानी भारत आणि पाकिस्तान यामधे समझोता घडवून आणण्यात पुढाकार घेतला, त्याची फलश्रुति १९६६ च्या जानेवारीत ताश्कद करारामधे झाली आम्ही मास्कोला गेल्यानतर महिनाभरातच ही घटना घडली आपले त्यावेळचे पतप्रधान श्री लाल बहादूर शास्त्री याच ताश्कदला आगमन आणि त्याच अकस्मात दु खद निधन या गोष्टी इतक्या अचानकपणे घडल्या की वकिलातीत सर्वांनाच त्याचा धक्का बसला श्रीमती गाधी भारताच्या पतप्रधान बनल्यानतर काही महिन्यातच त्यानी मास्कोला भेट दिली

भारत आणि अमेरिका दरम्यानच्या गैरसमज आणि तणावामुळे भारत आणि रशिया हे दोन्ही देश एकमेकाची अधिक मदत घेऊ लागते होते भारतातल्या अन्नधान्याच्या बिकट परिस्थितीमुळे आपल्याला अमेरिकेहून PLA 480 मार्फत गव्हाच्या मदतीची गरज तीव्रपणे भासत होती आणि त्यात अमेरिकन सरकार दबाव आणत होत आपल्या रुपयाच्या अवमूल्यनाशीही अमेरिकेच्या दबावाचे सबध भारतातली वृत्तपत्र आणत होती अमेरिकेच्या व्हिएतनाममधल्या वाढत्या हस्तक्षेपाबद्दल भारतान तीव्र टीका केली होती अशा पार्श्वभूमीवर भारत आणि रशिया याच्यात वाढत्या सामजस्याची भूमिका आकार घेऊ लागली होती आणि उभय देशाच्या शिष्टमडळाची आवक-जावकही त्याप्रमाणात वाढत होती आणि मास्कोच्या वकिलातीचा व्यापही त्याच प्रमाणात पसरत चालला होता

परदेशात होणारे भारतीय सास्कृतिक कार्यक्रम हा वकिलातीच्या जीवनाचा सक्रीय भाग असल्याची प्रचीती प्रथम मास्कोमधे आली प रविशकर याचा मास्कोत पहिला कार्यक्रम झाला तो आमच्या वास्तव्यात रशियन लोकाना रविशकराच नाव तेव्हा फारस माहीत नव्हत त्याच्या कार्यक्रमाला श्रोतृवृद जमवण्याची जबाबदारी वकिलातीवर येऊन पडली होती भारतीय विद्यार्थी आणि निवडक रशियन त्या कार्यक्रमाला हजर होते

भारतीय चित्रपट महोत्सवानाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असे राजकपूर तर रशियन जनतेचा हार्टथ्रॉब होता रस्त्यावर भेटलेला एक रशियन मजनू एकदम आवारा हूँ म्हणून

गायला लागला तेव्हा राजकपूरन वकिलातीच सास्कृतिक सबधाच काम सुकर केल्याची जाणीव झाली मास्कोत 'फ्रेंडशिप हाऊस' हे रशियन सास्कृतिक विभागातर्फे एक केंद्र चालवल जात असे तिथे वेगवेगळ्या देशाचे सास्कृतिक कार्यक्रम वारवार आयोजित केले जात वकिलातीतर्फे असे कार्यक्रम सादर करण्याचे बरेच वेळा प्रसग आले आपल्याकडे मुलीला सगीत किंवा नृत्य यातल काहीतरी याव म्हणून लहानपणी जे शिक्षण देण्यात येत त्याचा अशावेळी फार उपयोग होतो, कारण महाराष्ट्रीय बायकानी मिळून केलेल हळदीकुकू हा रशियन बायकासाठी भारतीय सस्कृती दर्शनाचाच एक भाग ठरला भारतीय वधू हा कार्यक्रम तिथे अनेक वेळा होऊनही अत्यत लोकप्रिय होता आपले वेगवेगळे प्रकारचे पोशाख आणि भारतीय दागदागिने लोकाना परत परत बघावेसे वाटायचे नऊवारी पातळ आणि नथ हा माझ्या चीजवस्तूमधला फार मोलाचा ठेवा आहे नऊवारी पातळ नेसल्यावर पायावरचा पातळाचा बोजा बाजूला करून उघड्या पायाला हात लावून, "तुम्हाला थडी तर वाजत नाही ना" म्हणून काही रशियन बायकानी परत परत विचारल अर्थात् घराबाहेर पडताना मी त्या वेषात जाऊ शकणार नाही हे मी तुटक्या रशियनमधे त्याना कसबस समजावल

शरीराचा कण न् कण झाकल्याशिवाय बाहेर पडण किती अशक्य होत याचा अनुभव मास्कोला आल्यावर पहिल्या काही दिवसातच मी घेतला होता कोट, टोपी, बूट, मोजे सर्व सरंजाम चढवून मी बस स्टॉपवर दोन चार मिनिटच वाट पहात उभी राहिले असेन चेहऱ्यावर पडलेले बर्फाचे थेंब बाजूला करण्यासाठी म्हणून मी नाकाजवळ हात नेला नाकाला हात लागला तरी तिथे कुठलीच सवेदना जाणवेना आपल्या चेहऱ्याचा तो भाग आहे अस वाटेचना मी परत परत तिथे हात लावून पाहिला माझ्या शेजारी एक रशियन बाई उभी होती तिला चट्दिशी हा प्रकार समजला तिन खाली मूठभर बर्फ उचलल आणि माझ्या नाकावर चोळल काही सेकदाच्या अवधीतच नाकाला चागल्याच झिणझिण्या आल्या इतक्या की डोळ्यातून पाण्याच्या धारा लागल्या अति थडीन शरीराचा कुठलाही भाग बधीर झाला की त्यावरचा हा उपाय आहे अस तिन मला समजावून सागितल पुढे पधरा दिवस नाकाचा शेंडा वर करून मी चालू शकले नव्हते, कारण विदूषकाच्या नाकासारखा हिरवा, पिवळा, काळा असे त्या शेंड्याने रग बदलले होते मास्कोच्या पॉलिक्लिनिकशी (डिप्लोमॅटस्‌साठीचे खास क्लिनिक) पहिली ओळख झाली ती याच सदर्भात

पॉलिक्लिनिक हे तिथल एक चक्रव्यूहच होत एकदा आत जायच ठरवल की मग सर्व प्रकारच्या चाचण्याच्या वर्तुळातून बाहेर येईपर्यंत ते दुखण बहुधा तसच बर होत आलेल असायच त्यातून दुखण जर पट्दिशी निदान होण्याजोग नसेल तर

मग इस्पितळात ठेवण्यात यायच साधा पोहण्याच्या तलावात प्रवेश हवा असला तरी पॉलिक्लिनिकमधे जाऊन अनेक टेस्टस् कराव्या लागायच्या प्रत्येक चाचणीसाठी रांगेत तिष्ठत थाबाव लागायच पॉलिक्लिनिकचा इगा जवळजवळ प्रत्येकालाच काही ना काही कारणान अनुभवावा लागत असे

मास्कोमधे रशियन भाषा शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची सख्या मोठी होती तिथले भारतीय विद्यार्थी बऱ्याच अशी रशियन जीवनात मिसळून जाण्याचा प्रयत्न करीत असत रशियन मित्र-मैत्रिणींबरोबर हिवाळचातले स्कीईंगसारखे खेळ, कॅपिंग, डान्सिग, पिकनिक, सगळचात भारतीय विद्यार्थी पुढे असत त्यापैकी काही विद्यार्थी रशियन मुलींच्या प्रेमात पडत आणि मग लग्नाची परवानगी मिळवण्यासाठी वकिलातीकडे येत यामधे दोन्ही सरकारच्या अनत फॉर्मेलिटिज असत कित्येक वेळा अजाणतेपणी सुरू झालेली भानगड निस्तरायची वेळ आली की मग हे शूरवीर वकिलातीकडे धाव घ्यायचे रशियन मुलींना काळ्या रगाच आणि विशेषत भारतीय मुलाच आकर्षण वाटायच या विद्यार्थ्यांच्या पालकत्वाची जबाबदारी वकिलातीवर पडल्यासारखी होती

देवावरच्या श्रद्धेलाही परदेशात अधिक मूर्त स्वरूप मिळत की काय नकळे वकिलातीत साईबाबाचे भक्तगण चिक्कार होते साईबाबाची भजन क्रमाक्रमान कुणाकुणाच्या घरी चालत असत जन्माष्टमीसारखे उत्सवही साजरे होत असत हिवाळ्यातल्या अधारलेल्या सर्द वातावरणामुळे मनात आलेली मरगळ कमी व्हायला या अशा प्रसगानी मदत होत असे तरीही वैफल्य, नैराश्य अनावर होऊन त्यातून आत्महत्या घडल्याची एक-दोन उदाहरण होती फ्लॅटमधल बदिस्त जीवन ना शेजार ना पाजार ना कुणाची सोबत ना कुणाचा आधार. बाहेर पहाव तेव्हा सतत अधार अधाराच गडदपण वाढवणारी काळ्या निळ्या कोटातली शातपणे चाललेली माणस ! जाग अशी कुठे नाहीच असिस्टटच्या पत्नीच आयुष्य आणखी खडतर रात्री साडेदहा-अकरा वाजेपर्यंत नवरा ऑफिसातून घरी येऊ शकायचा नाही त्याच्या तरुण बायकोला कमालीच वैफल्य आल दोन लहान मुलाना पांघरूणात गुडाळून ठेवून तिन आठव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली होती

परदेशातल जीवन म्हणजे गुलाबाच्या फुलासारख अस ज्याना वाटत त्याना त्या मखमलीच सौख्य अनुभवताना काटेही टोचून घ्यावे लागतात याची मात्र जाणीव नसते मास्कोतला हिवाळा कुणालाही उदास बनवून टाकायचा

मात्र हिवाळा सरत आला की सगळीकडेच टवटवी दिसायला लागायची इमारतीच्या छपरावरचा बर्फाचा थर वितळायला लागायचा ॲपलच्या बागामधली हिरवळ परत

वर यायला लागायची इतके दिवस बर्फाखाली गाडल्या गेलेल्या मोटारी हळूहळू वर निघायच्या लोकाच्या शरीरावरचे लोकरीचे थरही कमी व्हायला लागायचे आता पिकनिकचा सीझन जवळ यायला लागला याची ती निशाणी असायची रशियन लोकाना पिकनिकच फार वेड एक तर या देशामधे सूर्यप्रकाश इतका कमी की तो दिसल्यावर लोक घराबाहेर येऊन त्याची मजा मनमुराद लुटून घेतात आपल्याला याची कल्पना येणही कठीण कारण रविराजाचा नको इतका सहवास आपल्याला लाभल्यान अगाची लाहीलाही होण्याचा आपल्याला अनुभव ऊन नको तुझी सहस्रकिरण आवर अस म्हणण्याजोगी आपली स्थिती पण सतत ढगाळ हवेत, उदासीनता वाढवणाऱ्या धूसर दगडी रगाच्या इमारतींमधे राहून सूर्यदर्शनासाठी मनाची का तळमळ होते ते इथे राहणाऱ्या लोकानाच माहिती इथला सूर्यप्रकाश तितका प्रखरही नसतो हिवाळ्यात जेव्हा सूर्यदर्शन होत तेव्हा बर्फान गारठलेल्या शरीराला गरम शालीत लपेटल्याचा अनुभव मिळतो

इथला वसत ऋतू येतो तो वातावरणात आल्हाद घेऊनच आणि लोकाच्या चेहऱ्यावर हसू उमलत आता येणाऱ्या उन्हाळ्याची प्रतीक्षा असते कारण त्यात त्याना कितीतरी गोष्टी करायच्या असतात कुणाला सुट्टी घेऊन सोचीला सूर्यस्नानासाठी जायच असत तर कुणाला हायकिंगला ! शाळेत जाणाऱ्या मुलाच उन्हाळ्यात महिनाभर शिबीर भरवायच हा रशियनाचा दर वर्षीचा नियम त्यानाही सोचीसारख्या समुद्रकाठच्या ठिकाणी नेण्यात येत तरुण लोकाना कॅपिंगची हौस दाडगी तबू उभारून जवळच जाळ पेटवून, बार्बेक्यू (त्या विस्तवावर भाजलेले मासाचे तुकडे) करून वाईनच्या घोटाबरोबरच ते खाल्ल की गायन आणि नृत्य आपोआप स्फुरत कुणाजवळ तरी गिटार असत गिटारच्या मधुर तालावर तरुणतरुणींचे पाय दाद द्यायला लागतात रशियनाना नृत्याच फार वेड जितक त्याना मद्य प्रिय तितकच नृत्यही वकिलातीतल्या कुणाच्याही घरी जेवणाच आमत्रण असल्यावर बरेच वेळा जेवणानतर रशियन मडळी आपणहून यजमानीणबाईंचा हात धरून त्याच्याबरोबर नृत्य करायला लागत, मग सर्व पाहुणे मडळी त्यात सामील होत रशियन लोकामधली मद्याची आवड कधी कधी प्रमाणाबाहेर गेलेली दिसून यायची. रात्रीच्या जेवणानतर घरी परत येताना रस्त्यावर सपवलेली बाटली कुशीत घेऊन त्या तारेत पडलेली चार-दोन (रशियन तरुण मडळी) तरी दृष्टीस पडत असत

रशियन लोकाच आवडत पेय म्हणजे व्होडका मुळातच या दारूची चव अतिशय तीव्र आहे. ती रशियन पद्धतीन प्यायची म्हणजे घोटान नव्हे तर 'ददना' म्हणजे व्होडकाचा छोटा ग्लासच घशात उलटा करायचा अर्थात मायनस ४० सें हवामानाच्या ठिकाणी जिवत माणसाला सुद्धा बद शीतपेटीत असल्यासारख वाटेल तिथे मद्याच्या

एका घोटान काय फरक पडणार? शरीरामधे या द्रव्यान उब येत असावी हे खर, पण ते पचवण्यासाठी अगकाठी रशियनच असायला हवी रशियनाच्या बरोबरीन व्होडका पिणारी काही भारतीय मडळीही होती हिरवी मिरची घालून व्होडका पिणारे काही आबट शौकीनही तिथे होते

आमच्या मास्कोच्या वास्तव्यातल्या दुसऱ्या उन्हाळ्याला सुरुवात झाली आणि मास्कोतून आमची बदली वॉशिंग्टनला झाल्याची एका ओळीची तार आली कोलबसान शोधून काढलेली अमेरिका म्हणजे भारतीयाच पृथ्वीवरच एक आकर्षण उच्च शिक्षणाच्या निमित्तान महाराष्ट्रातून कितीतरी जण अमेरिकेला जात असत आणि उरलेल्यापैकी कित्येक पण अमेरिकेला जाण्याची स्वप्न बघत असत त्या अमेरिकेला आपल्याला इतक्या लवकर जायला मिळणार ही कल्पना अतिशय सुखावह होती त्यातून मास्कोहून अमेरिकेला जायच म्हणजे एका ध्रुवावरून दुसऱ्या ध्रुवावर जाण्यासारख ब्रेड, बटर, सफरचदासाठी लागलेल्या रागा, कोटाच्या आवरणाखाली दबून चालणारी माणस, डिप्लोमॅटिक इमारतीच्या बाहेर गस्त घालणारे पहारेकरी सर्व चित्रच एकदम बदलणार होत

नुकतीच रशियन भाषेची मत्रालयातर्फे होणारी परीक्षा पार पडली होती, आणि आता कुठे रशियन भाषेचा बोध होऊ लागला होता रस्त्यावरच्या पाट्यावर काय लिहिल आहे याचा अर्थ चक्क समजू लागला होता वर्तमानपत्र उघडल्यावर ठळक मथळ्याचा मथितार्थ थोडाफार कळायला लागला होता टी व्ही वरच्या निवेदिका काय सागतात याचही थोडस आकलन व्हायला लागल होत रस्त्यात थाबून लोकाना त्याच्या भाषेत प्रश्न विचारता येत होते आणि त्यानी सागितलेली माहिती बऱ्यापैकी कळत होती वॉशिंग्टनला बदली झाल्याची घोषणा आल्यावर मात्र रशियन भाषेशी चालू असलेली झटापट एकदम काहीशी थडावली

वॉशिंग्टनसारख्या ठिकाणी जायला फारशी काहीच तयारी करावी लागणार नव्हती मास्कोला येताना जय्यत तयारीनिशी याव लागल होत इथे असताना देखील डेन्मार्क, जर्मनी या ठिकाणाहून खाद्यपदार्थ आणि इतर सामान मागवाव लागायच डेन्मार्कच पीटर जस्टिसन हे जगभरातल्या डिप्लोमॅटस्‌च आवडत दुकान हेलसिंकीच स्टॉकमन, जर्मनीतल नेकरमन ही मॉस्कोतल्या डिप्लोमॅटस्‌ची कॅटलॉग शॉपिंगसाठीची खास दुकान मास्कोत कॅटलॉग शॉपिगची हौस पुरेपूर भागली कॅटलॉगमधे एखादी वस्तू दिसते आणि ती खूप आवडते प्रत्यक्ष आल्यावर तिच स्वरूप वेगळच दिसल कधी कधी साईजचा घोटाळा तर कधी रगाचा एकूण ती वस्तू येईपर्यंत सस्पेन्स असतो एवढ खर आता मास्को सोडण्यापूर्वी मास्कोला मिळणारी चित्रे, तिथल्या काही खास चादीच्या

वस्तू, काही क्रिस्टलच्या गोष्टी खरेदी करायच्या होत्या 'गुम्' आणि 'त्सुम', ही मास्कोतली मोठी दुकान आत पाय ठेवल्यावर कुणीही गुम व्हाव इतकी प्रचड आणि तऱ्हेतऱ्हेच्या चीजवस्तूनी ठासून भरलेली 'फरफोरा' ही क्रॉकरीची दुकानही सुशोभित पोर्सिलीनच्या वस्तूनी आणि क्रिस्टलनी सजलेली या दुकानाना अनेक वेळा भेट देऊनही त्याच आकर्षण कमी होत नसे फारशी खरेदी करायची नाही म्हणता म्हणता सामानाचा हत्ती वाढतच चालला

निरोप समारभाची गडबड चालू होती आणि जोडीला सामानाची बाधाबाध हौसेन जमवलेल्या वस्तू, आवडती पुस्तक स्वत च्या हातान पॅक करताना काही वेगळाच आनद मिळतो बदलीची पहिलीच वेळ असल्यान ताज्या उत्साहान सगळ पॅकिंग केल जहाजान हे सामान दुसऱ्या ठिकाणी पोचेपर्यंत इतका वेळ लागतो की तोपर्यंत आपण कोणकोणत्या वस्तू गोळा केल्या याचाही विसर पडलेला असतो आणि मग सामान उघडल्यानतर नव्यान सर्व वस्तू पहायचा आनद मिळतो अर्थात् ते सहीसलामत आलेले असेल तरच हा आनद टिकतो नवीन घेतलेल्या कटग्लासच्या फुलदाण्या अलगदपणे पॅक केल्या सिरॅमिक्सच्या कुडयाचाही मोह सोडवत नव्हता त्याही पॅकिंगमधे गेल्या त्या अल्प वास्तव्यात घरातली झाड, कुडया यानीही जीव लावला होता बटाटयाच्या फोफावणाऱ्या रोपानी खिडकी पूर्ण भरून गेली होती मन घट्ट करून त्याना कुणाकुणाला देऊन टाकल

जायचा दिवस उजाडला निरोप द्यायला आलेल्या मित्रमडळींना आणि सहकाऱ्याना गुडबाय करून विमानात चढणार तेवढयात विमानाच्या शिडीपाशी उग्र आणि गभीर चेहऱ्याच्या रशियन पोलिसान-आम्हाला थाबवल आणि आमच्या पासपोर्टची परत परत छाननी करायला सुरुवात केली नवऱ्याच्या पासपोर्टकडे बघून त्याना जा म्हणून सागितल माझ्याकडे आणि माझ्या पासपोर्टकडे पुन्हा पुन्हा बघून शहानिशा केली आणि माझ्या हातातल्या तान्हया मुलीकडे पाहात त्यान 'नियत्' म्हणून जोरदार मान हलवली आम्ही बुचकळ्यात पडलो या चार महिन्याच्या मुलीला न जाऊ देण्याजोग तिन काय केल असाव ? आम्ही रशियनमधे त्याला आम्हाला उशीर होत आहे, आमच विमान जाईल म्हणून सागण्याचा खूप प्रयत्न केला पण त्याचा 'नियत्' (नाही)चा पाढा चालूच विमानाच इजिन सुरू झालेल होत आणि विमान कुठल्याही क्षणी सुटणार होत ब्रिटिश एअरवेजच्या त्या विमानात इग्लडचे फॉरिन सेक्रेटरी बसलेले होते रशियन पोलिस तर आमच्या मुलीला जाऊ देणार नाही म्हणून धरण धरून बसलेला माझ्या पासपोर्टमधे माझ्या मुलीच्या नावाचा उल्लेख असूनही तिच्या नावाचा एक्झिट व्हिसा वेगळा असायला हवा होता अस त्याच म्हणण

ही मुलगी इथेच जन्मलेली असून तिला पहिल्यादाच देशाबाहेर नेत आहोत म्हणून रशियनमधे त्याच्या कानी-कपाळी ओरडून सागितल सरतेशेवटी विमानतळाच्या इमारतीत परत जाऊन आमच्या 'रशियन' मुलीला आमच्याबरोबर जाऊ द्याव अशी तिथल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला विनती केली त्यान शेवटी (आमच्या नशिबान) परवानगी दिली रशियातून बाहेर पडण रशियनाना किती त्रासदायक असाव याची झलक आमच्या 'रशियन' कन्येमुळ आम्हालाही अनुभवायला मिळाली

जशी विमानान उची घेतली तसा मास्को शहराचा प्रचड विस्तार लेगोच्या इमारतींसारखा भासायला लागला आणि बघता बघता मास्को दृष्टीआड होत गेल आणि कुठतरी आत दाटून आल इतक्या अडचणी येऊन सुद्धा त्या अल्पावधीत तिथल्या जमिनीचा ओढा निर्माण झाला होता हे मला त्या क्षणी जाणवल नकळत तोंडून दसविदानिया (See you again) हे शब्द बाहेर पडले

★ ★ ★

# वॉशिंग्टन-अमेरिका

आम्ही वॉशिंग्टनला पोचलो उन्हाळ्यातल्या एका सुरेखशा सकाळी विमानतळावरून शहराकडे येतानाच शहराचा रेखीवपणा डोळ्यात भरला पोटोमॅक नदीच्या काठाने रांगेत उभी असलेली जपानी चेरीची झाडं, शहरात ठिकठिकाणी गर्द झाडी, सुबक वळणं घेत जाणाऱ्या वृक्षांच्या छायेमधल्या वाटा, ठिकठिकाणी दृष्टीस पडणारे फुलांचे ताटवे सबंध आसमंतात आल्हाद होता, प्रसन्नता होती, लगबग होती विशेषत मास्कोनंतर हा फरक चांगलाच जाणवला होता मास्को शहरही सुंदर. मात्र मास्कोची भव्यता उंच, धिप्पाड, युनिफॉर्ममधल्या सैनिकासारखी तर वॉशिंग्टनचं रूप निसर्गाला साक्षी ठेवून साजशृंगार करणाऱ्या ललनेचं शहरातून कुठूनही दृष्टीस पडणारा वॉशिंग्टन मेमोरियलचा मनोरा आणि आजपर्यंत केवळ पिक्चर, पोस्टकार्डावर पाहिलेलं जेफरसन आणि जॉर्ज वॉशिंग्टन मेमोरियल, वॉशिंग्टनच्या सुबकतेत भर घालणारी ही ठिकाणं! वॉशिंग्टनचं स्वरूप प्रथमदर्शनी दाद मिळवून जाणारं!

मॅसेच्युसेटस् ॲव्हेन्यूवरची भारतीय वकिलातीची इमारत शहराच्या अत्यंत प्रमुख आणि सोयीस्कर भागात आहे दूतावासात शिरल्यावर समोरच दृष्टीस पडणारा उंच जिना इमारतीची भव्यता आणखीन वाढवतो या वकिलातीचा व्याप इतका मोठा की भारतीय वकिलांना आपल्या अधिकाऱ्यांची नावं लक्षात ठेवायला सुद्धा प्रयास

पडावा (पतप्रधान इंदिरा गांधींच्या ६८ सालच्या अमेरिका भेटीत राजदूतमहाशयांना एक दोन वेळा अशी पंचाईतीची वेळ आली की दुसऱ्याच्या नावान आपली ओळख करून दिल्यावर त्या अधिकाऱ्याला हसून हस्तांदोलन करण्याशिवाय दुसरा इलाजच नव्हता )

अनेक एकराच्या हद्दीन वेढलेला, राजेरजवाड्यांच्या प्रासादाची आठवण करून देणारा राजदूतनिवासही, अमेरिकेसारख्या बलाढ्य देशात आपली पत वाढवणारा! प्रथमदर्शनी ज्याच्या विस्ताराची कल्पनाच येऊ शकणार नाही अशा या निवासस्थानी अमेरिकेच्या अध्यक्षांना पाचारण करायला आपल्या राजदूताला अभिमानच वाटेल 'व्हाईट हाउस' या अमेरिकेच्या अध्यक्षाच्या निवासाबद्दल कितीतरी ऐकलेल आणि वाचलेल ते प्रत्यक्ष पाहिल्यावर मात्र थोडीशी निराशा झाली आपल्या संस्थानिकाच्या हवेल्या देखील त्याहून उजव्या ठराव्यात ज्याच्या बुरुजावरून जगाच राजकारण खेळल जात ते व्हाईट हाउस हेच का असा क्षणभर संभ्रम पडला

खुद्द वॉशिंग्टन शहरात सरकारी उच्चाधिकारी, राजकारणी आणि राजनैतिक वर्तुळातले प्रतिनिधी असे मोजके लोक राहतात वॉशिंग्टन शहरात काळ्या लोकांचही प्रमाण अधिक आहे. सुखवस्तू गोरे अमेरिकन लोक प्रामुख्यान उपनगरामधे राहतात त्या दिवसात रस्त्यावर टोलेजंग गाड्या खूप फिरताना दिसत अमेरिकनांना आधीच मोटारींच वेड, त्यातून गाडीचा आकार जितका मोठा तितक ते अधिक श्रीमंतीच लक्षण त्या काळात मानल जात असे आम्हीही स्वस्त किंमतीत जुनी प्रचंड मोटार खरेदी केली होती त्या प्लीमथ गाडीमधे बसल्यावर स्वतःलाच हॉलीवुडमधल्या नटनट्यांसारख वाटायला लागायचं आमच घर आम्हाला शोधाव लागेल हे आम्हाला गेल्या गेल्याच सांगण्यात आल सर्व स्वतःची कामे स्वतः करायची हे अमेरिकेत गेल्यावर मिळणार पहिल बाळकडू. घराच्या समोरचा बर्फ स्वतःच साफ करायचा, गळलेली पानं स्वतःच झाडायची आणि लॉनही स्वतःच कापायचे मास्कोसारख्या कम्युनिस्ट देशात उपदिकातर्फे कामाला बाई मिळण्याची सोय होती वॉशिंग्टनमधे ती शक्यताच नव्हती (आणि मिळालीच तर निम्मा पगार तिची पुंजी भरण्यात गेला असता ) त्यामुळे सर्व काम अंगवळणी पाडून घेण्याशिवाय इलाजच नव्हता त्याचा श्रीगणेशा घर शोधण्यापासून झाला

आम्हाला घर मिळाल ते अशाच एका सुखवस्तू उपनगरात एका रणरणत्या दुपारी आम्ही आमच्या नवीन घरात रहायला आलो आजुबाजूला घर असली तरी इतकी शांतता होती की एखादा पक्षी चिवचिवला तर बर वाटत होत आम्ही आमच सामान

उघडत होतो खोलीभर खोकी पसरली होती तेवढ्यात दारावरची बेल वाजली मी अगदी अवतारात बॉक्सेसच्यामधे उभी अस अचानक कोण आल असाव असा विचार करीतच मी दार उघडल नाकेली, सोनेरी केसाची आमची शेजारीण पॅट उर्फ मिसेस् स्ट्रिटर हसऱ्या चेहऱ्यान उभी होती तिन आपली ओळख करून दिली आणि काम झाल की माझ्याकडे कॉफी प्यायला ये म्हणून सागून ती गेली सुद्धा शेजारणीन आल्या आल्या दखल घेतलेली पाहून मला हायस वाटल कारण उपनगरात रहाण म्हणजे तस एकाताच तेव्हा गरज पडल्यास कुणी तरी मदतीचा हात पुढे करायला आहे हा फार मोठा दिलासा होता. पॅट आणि जिम या अमेरिकन जोडप्याच्या जुजबी ओळखीच रूपातर मैत्रीत कधी झाल ते आम्हाला कळलच नाही दर शनिवारी दुपारी जिमचा लॉन मोअर घरघरत असायचा आमची लॉनमोअरशी चाललेली झटापट त्याला बघवायची नाही तो झट्दिशी स्वत चा पॉवर मोअर आणून आमच लॉन कापून देत असे कुठल्याही अडचणीत जिमचा मदतीचा हात नेहमी पुढे असे

पॅट आणि जिमतर्फे झालेली अमेरिकन समाजाशी ही पहिली तोडओळख! मग मात्र अमेरिकनाच्या मैत्रीपूर्ण स्वभावाचा वारवार अनुभव येत राहिला दुसऱ्या भेटीतच घरी बोलावणारी अमेरिकन मित्रमडळी आम्हाला वॉशिंग्टनमधे मिळाली होती माझी जवळची मैत्रीण मेरिलिन सुरुवातीला मला एका पार्टीत भेटली होती तिच्या आणि माझ्या पोहोण्यावरून गप्पा सुरू झाल्या आमच्याजवळ पोहायची सोय नाही म्हणायचा अवकाश, आपल्या पोहोण्याच्या तलावावर ती मला आमत्रण देऊन मोकळी झाली पोहायच्या निमित्तातून झालेल्या भेटींमधून आमची मैत्री वाढली अमेरिकन मित्रमडळींबरोबर औपचारिकतेचा पडदा केव्हाच गळून पडत असे हाफ पॅट घालून आलेल्या बॉबबरोबर औपचारिपकणा वाटावाच कसा ! मला पॅनकेक आवडतात म्हणून पिशवीत पॅन बरोबर घेऊन येऊन माझ्या घरी पॅनकेक बनवून मला खाऊ घालणारी मिशेल! तिच्याबरोबर परकेपणा वाटणच शक्य नव्हत डायाना रॉस या पॉप सिगरबद्दल मी उत्सुकता दर्शवल्याबरोबर तिच्या कार्यक्रमाची तिकीट काढून आम्हाला आमत्रण करणारे मिस्टर आणि मिसेस् लाव्ही तर रविशकरच्या कार्यक्रमासाठी वॉशिंग्टनहून दीड तासाच्या रस्त्यावर आम्हाला घेऊन जाणार केनेडी दापत्य अमेरिकेच्या राजकीय परिस्थितीच विश्लेषण तासन् तास माझ्या नवऱ्याला ऐकवत राहणारा पीटर व्हाईट हा पत्रकार पत्रकाराची जात जगात सगळीकडे सारखीच ती माणस चाकोरीतली नव्हेतच पीटर व्हाईटला कधी वेळेच बधन नसायच धूमकेतूसारखा तो कधीही उगवायचा त्याच्याबरोबरच्या गप्पामधे वेळ कसा जायचा पत्ताच लागायचा नाही

साध दुकानात शिरल्यावर, काउंटरवरची मुलगी कस काय चालल आहे अशी आधी विचारपूस करून तुमचा दिवस चागला जावो अशी वर पुस्ती जोडायची कुठल्याही दुकानात हे दृश्य सर्रास आढळायच मात्र पहिल्या भेटीतच मैत्रीपूर्ण वागण्यान गार करून सोडणाऱ्या अमेरिकन माणसाचा आवेश कधी कधी उथळ पाण्याच्या खळखळाटासारखा भासायचा त्याच्या मनात खरोखरीच तेवढी आपुलकी असेल अस नाही मात्र चेहऱ्यावरची मैत्रीची भावना कायम असायची

तरीही अमेरिकनाशी सवाद साधण सुलभ असायच एवढ मात्र खर कुठल्याही क्षेत्रातल्या उच्चपदस्थ व्यक्तींना भेटण विनासायास शक्य होत असे

आम्ही जेव्हा वॉशिंग्टनमधे होतो तो काळ अमेरिकेत खळबळजनक होता अमेरिकेतल्या वर्णद्वेषाच्या सघर्षात त्या सुमारास मोठ्या प्रमाणात असतोष निर्माण झाला होता १९६६-६७ च्या उन्हाळ्यात अनेक शहरामधे काळ्या लोकानी केलेली भीषण स्वरूपाची निदर्शन आणि त्यावर झालेल्या तेवढ्याच भीषण प्रतिक्रिया उदा शिकागो आणि वॉटस् इथल्या दगली! काळ्या लोकाच्या नागरी हक्कासाठी झगडणारा मार्टिन ल्यूथर किंग त्यावेळी आपल्या लोकप्रियतेच्या उच्च शिखरावर होता मार्टिन ल्यूथरच 'I had a dream' हे वाक्य सर्वांच्या परिचयाच झाल होत त्याच्या या स्वप्नामधे समतापूर्ण समाज होता त्याच्यात काळा गोरा असा भेदभाव राहणार नव्हता आम्ही तिथे असतानाच १९६८च्या एप्रिलमधे मेंफिस इथे मार्टिन ल्यूथरचा अमानुष खून झाला नतर काही दिवस अमेरिकेतल्या अनेक शहरामधे मोठ्या प्रमाणावर हिंसक घटना घडल्या वॉशिंग्टनमधले काही भाग तीन-चार दिवस जळत होते मार्टिन ल्यूथरच स्वप्न उध्वस्त झाल होत अमेरिकेसारख्या अत्यत प्रगत देशात सुद्धा विरोधाला प्रत्युत्तर हिसक वधामधे व्हाव ह्याची विषण्णता जाणवली होती

तिथल्या हिंसावादी समाजात घडलेली आणखी एक घटना म्हणजे १९६८ मधे रॉबर्ट केनेडीची लॉस एजेलिसमधे झालेली निर्घृण हत्त्या राष्ट्राध्यक्ष केनेडींचा १९६३ मधे झालेला खून अमेरिकेच्या आणि जगाच्या आठवणीत अजून ताजा असतानाच त्याचा भाऊ रॉबर्ट हा एका पाशवी आणि माथेफिरू वृत्तीला बळी पडला रॉबर्ट केनेडींच व्यक्तिमत्व अत्यत उमद आणि तरुण होत तस पाहिल तर केनेडी कुटुबान अमेरिकेला आपल्या उत्स्फूर्त वागण्यान आणि प्रगतिशील विचारानी भारावून टाकल होत रॉबर्ट केनेडीचा खून आणि त्यानतरची त्याची शवयात्रा, या गोष्टी अजूनही डोळ्यासमोर येतात अमेरिकेत सर्वांनाच तेव्हा या घटनेमुळ फार हळहळ वाटली होती

व्हिएतनाम हा अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणामधला एक मोठा पराभव आम्ही अमेरिकेत असताना अमेरिकेची व्हिएतनाममधली ढवळाढवळ आणि त्याचा लष्करी हस्तक्षेप पराकोटीला पोचला होता हजारो अमेरिकन तरुण सक्तीच्या लष्कर भरतीतून व्हिएतनामला पाठवले जात होते त्याची व्हिएतनाममधे होणारी धूळधाण आणि हानी अमेरिकन लोकाच्या दिवाणखान्यात टेलिव्हिजन मार्फत स्पष्टपणे नजरेसमोर यायला लागली होती अमेरिकेची व्हिएतनाममधली भूमिका म्हणजे कम्युनिझमला आळा घालण्याची डेव्हिड आणि गोलियाथ याच्या तुलनेनुसार अमेरिकेसारख्या बलाढ्य देशान व्हिएतनाम या छोट्या देशात सैन्य पाठवल्यानतर त्याना माघार घ्यावी लागते हे मानायलाच काउबॉयच्या देशातील अमेरिकन जनता तयार नव्हती व्हिएतनाम युद्धाचे अमेरिकेतले पडसाद त्यामुळे अतिशय तीव्र स्वरूपाचे होते अमेरिकेच्या तिथल्या हस्तक्षेपाच प्रमाण आणि स्वरूप हे सरकारन लोकाच्या समोर पूर्णपणे माडलच नाही अशी जनतेची आणि विद्यार्थ्यांची तक्रार होती ६७-६८ च्या काळात त्या तक्रारीच रूप प्रखर निदर्शनामधे प्रकट व्हायला लागल

अमेरिकन जनतेच्या आवाजामुळे राजवटीवर सुद्धा दडपण येऊ शकत याचा हा अनुभव होता व्हिएतनामच्या धोरणाबद्दल लोकाच्या मनात निर्माण झालेली निराशा रिचर्ड निक्सन याना ६९ च्या निवडणुकीत उपयोगी पडली राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यानी पुढची निवडणूक लढवणार नाही हे जाहीर केल्यानतर डेमोक्रॅटिक पक्षात खूपच खळबळ उडाली होती या पक्षाचे उमेदवार हम्फ्रे, लोकमनाचा ताबा घेऊ शकले नाहीत चुरशीच्या निवडणुकीत ते निक्सनकडून पराभूत झाले त्याची त्यावेळची लोकप्रियता ध्यानात घेता काही वर्षानतर निक्सनही वॉटरगेट प्रकरणात गोवले जातील अशी कल्पना करणही त्यावेळी अशक्य होत

अमेरिकेची राजकीय वादळ होत असतानाच देशात आर्थिक आणि औद्योगिक प्रगती नेटान चालल्याच उदाहरण म्हणजे अमेरिकेचा अतरिक्षातला विजय १९६९ च्या जुलै महिन्यात अतराळवीर नील आर्मस्ट्रॉंग आणि त्याचे सहकारी जेव्हा चद्रावर उतरले तेव्हा जगाच्या इतिहासात एक नवीन पाऊल पडल हा क्षण रोमाचकारी होता ही चद्रावरची यात्रा टी व्ही वर पाहात असताना आपण इतिहासाला साक्षी आहोत ही भावना मनाला स्पर्श करून गेली

१९६९ मधे महात्मा गाधींची जन्मशताब्दी अमेरिकेतही मोठ्या प्रमाणावर साजरी झाली व्हिएतनाम युद्ध आणि अमेरिकेतली वर्णद्वेष सबधातली नागरी हक्काची चळवळ, मार्टिन ल्यूथर किंगचा आत्मयज्ञ यामुळे महात्मा गाधीच्या विचारप्रणालीबद्दल आणि

त्याच्या जीवित कार्यासबधी अमेरिकेतल्या लोकामधे आदर आणि कुतूहल निर्माण झाल होत अमेरिकन तत्त्वज्ञ एमरसन आणि थोरो यानी महात्मा गाधीना उद्युक्त करण्यात हातभार लावला होता याचीही लोकाना माहिती करून देण्यात आली आमच्या तिथल्या वास्तव्यात अमेरिकेच्या सर्व भागात महात्मा गाधींसबधीचे खूप कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते

अमेरिका आणि भारत या दोन देशामध्ये परराष्ट्र धोरणाबाबत नेहमीच गैरसमज आढळून आलेला आहे आम्ही तिथे असतानासुद्धा ते प्रकर्षान जाणवायच दोन्ही देश मोठ्या आणि जागृत लोकशाहीची असूनसुद्धा त्याच्यात सवाद नाही याची खत त्यानाही आणि आपल्यालाही वाटायची अमेरिकेच पाकिस्तानधार्जिण धोरण, तिन पाकिस्तानला केलेला अव्ययावत् शस्त्राचा पुरवठा, भारतान त्याबद्दल दर्शवलेली तीव्र प्रतिक्रिया आणि अमेरिकेची तिकडे कानाडोळा करण्याची वृत्ती या गोष्टी गेली २५-३० वर्ष चालू होत्या आमच्या अमेरिकेतल्या वास्तव्यात दोन्ही देशाच्या राजकीय स्तरावरच्या सवादात चढउतार चालूच राहिले एकमेकासबधीच्या मूलभूत धोरणात अर्थात् फारसा बदल झाला नाही

'थँक्स गिव्हिंग' हा अमेरिकनाचा खास सण आपण जशी दिवाळीची वाट पाहातो तशी ते थँक्स गिव्हिंगची आमच्या अमेरिकन शेजाऱ्यानी आणि अमेरिकन मित्रानी दरवर्षी आम्हाला या सणाला आवर्जून जेवायला बोलावल होत टर्की आणि क्रॅनबेरी सॉस हा त्या दिवशीचा ठरलेला मेनू, सक्रातीला जितक्या मेहनतीन खपून आपली गृहिणी गुळाची पोळी करेल तशी ही अमेरिकन गृहिणी त्या दिवशी टर्की भरण्यावर मेहनत घेते नोव्हेंबर महिन्यातली टेबलावरच्या मेणबत्त्याच्या उजेडातली ती टर्की डिनर्स आमच्या नेहमीच आठवणीत राहतील बाहेर बर्फाची झिमझिम आणि आत फायरप्लेसमधे जळणारी लाकड यानी हे थँक्स गिव्हिंगच चित्र पुर होत असे ख्रिसमसच्या वातावरणालाही एव्हाना उधाण येत असायच सगळीकडे ख्रिसमस डेकोरेशन विक्रीला यायला लागलेली असायची दिव्याच्या रोषणाईला सुरवात झालेली असायची रात्री उशीरापर्यंत शॉपिंग माल माणसानी गच्च भरलेले असायचे ठिकठिकाणी 'ख्रिसमस ट्री' उभारली जात असायची ख्रिसमसच्या रात्री एकमेकासाठी भेटवस्तू एकमेकाना नकळत सुरेख वेष्टनात गुडाळून झाडाखाली ठेवल्या जायच्या विदेश सेवेमधे ज्या ज्या देशामधे राहिलो त्या त्या ठिकाणचे सण मुलासाठी साजरे करायची सवय पडून गेली जितक्या उत्साहान आम्ही दिवाळीत पणत्या लावायचो तितक्या उत्साहान आमच्या मुली ख्रिसमसच झाड सजवून त्याच्यावर दीपमाळ सोडत असत ख्रिसमस हाही आमच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनून गेला

एप्रिल महिन्यातला वॉशिनग्टचा चेरी ब्लॉसम उत्सव तिथल्या वास्तव्यामधल एक खास आकर्षण होता एप्रिल उजाडला की जणु शकुतलेन लता प्रहार केला असावा अशी बघता बघता शहरातली सर्व चेरीची आणि डॉगवुडची झाड एकदम बहरुन जात असत या झाडाखाली उभ राहिल की वरून चेरीच्या फुलाचा वर्षाव होत असे चेरी डॉगवुडच्या ब्लॉसमस्नी सर्वत्र फुललेल वॉशिंग्टन पुष्पनगरीसारख दिसायच हा बहर जेमतेम १५ दिवस टिकायचा पोटोमॅक नदीच्या काठी ओळीन मानवदना देणारी चेरीची झाड जपान सरकारन अमेरिकेला भेट म्हणून दिली होती चेरी ब्लॉसम बघायला लाब लाबचे लोक येत असत

आम्ही अमेरिकेत होतो तो काळ हिप्पींचा होता वॉशिंग्टनच्या ड्युपॉं सर्कलमधे कितीतरी हिप्पी ड्रग्ज घेऊन ब्रम्हानदी टाळी लावून बसलेले दृष्टीस पडत उघडपणे सेक्स दाखवणाऱ्या चित्रपटाची आणि नाटकाची त्या काळात सुरुवात होती 'Oh Calcutta' सारख्या नाटकान (ज्यात स्त्री-पुरुषाच मीलन मिनिटामिनीटाला दाखवल जात असे) अमेरिकन जनतेच लक्ष चागलच वेधून घेतल कलकत्ता या नावाचा त्या नाटकाशी अर्थाअर्थी काहीच सबध नव्हता गेली २५ वर्षं त्या नाटकाचे प्रयोग न्यूयॉर्कमधे चालू राहिले

अमेरिकेतल्या सुखसोयी, तिथली सुबत्ता आणि भरभराट एव्हाना अगवळणी पडली होती रिमोट कट्रोलच्या स्विचन गराज उघडत काय आणि नुसत बटण फिरवल्यावर गॅस ऑन होतो काय, सर्वांची नवलाई केव्हाच सपली होती अहोरात्र चालणाऱ्या टेलिव्हिजनच्या सोबतीचीही सवय होऊन गेली होती मात्र सर्व सुख हात जोडून उभी असताना देखील, तिथली माणस किती एकाकी असतात माणुसकीला आणि माणसाच्या सहवासाला हपापलेली असतात याचाही अमेरिकेत कितीतरी वेळा अनुभव आला आमच्या पहिल्या घराला लागूनच लॅंडलेडीच घर होत आमची म्हातारी लॅंडलेडी त्या स्टुडिओवजा घरात एकटीच रहायची आणि दिवसभर पुतळे बनवत असायची ती एकटी रहात असल्यामुळे तिन तिच्या घरात सेक्युरिटी अलार्म बसवला होता इमर्जन्सीमधे तो आमच्या घरी वाजेल अशी व्यवस्था होती एखाद्या खोडकर मुलासारखा तो अलार्म कधीही वाजत असे तो वाजला की आम्ही तिच्या घरी धावायचो तर म्हातारी शातपणे काम करत बसलेली असायची आणि चेहऱ्यावर दिलगिरीच हसू, (त्या अलार्मचा स्विच ढिला झाला होता हे आम्हाला नतर कळल ) माणस दिसावीत हा तर त्या मागचा हेतू नव्हता ना अशी आम्हाला पुढे शका यायला लागली आमच्याकडे सतत येणाऱ्या पाहुण्याच तिला फार अप्रूप वाटायच नव्या वर्षाची ग्रीटिंग कार्डस् आणि आजारपणात 'गेटवेल'ची शुभेच्छा कार्डस् या पलीकडे तिचा तिच्या मुलाशीही

फारसा सबध राहिला नव्हता माझ्या सासूबाईंना घरी बोलावून तू किती लकी आहेस हे त्याना सागितल्याखेरीज तिला राहवल नाही

| उतारवयात काहीतरी विरगुळा हवा म्हणून बेबी सिटिंग करणाऱ्या मिसेस् ॲडम्स माझ्या मुलीला साभाळायला मधून मधून येत असत माझ्या तीन वर्षांच्या मुलीचा त्याना इतका लळा लागला की हळुहळू त्या आमच्या कुटुबातल्याच एक होऊन गेल्या कामाचे तास सपल्यावर त्या कित्येकदा आमच्याकडे जेवून जात असत जेवणाच्या टेबलावर गप्पाही खूप रगायच्या आमच्या सहवासान त्याच्या ओसाड जीवनात जो नवीन आनद निर्माण झाला होता, तो दर तासाला मिळणाऱ्या पैशापेक्षा मोलाचा होता हे त्यानी किती तरी वेळा बोलून दाखवल आम्ही वॉशिंग्टन सोडणार हे कळल्यावर त्या ढसाढसा रडल्या होत्या |

स्वातत्र्यापूर्वी जे विलायतेबद्दल भारतीयाना आकर्षण होत त्याची जागा स्वातत्र्यानतर अमेरिकेन घेतली नशीब काढायला जायच ते अमेरिकेत ब्रेन ड्रेनला मोठ्या प्रमाणात त्याच काळात (१९७०-७१) सुरुवात झाली अमेरिकेत भारतीय माणस येऊन स्थायिक होण्याची ती नुकती सुरुवात होती महाराष्ट्रातली २५-३० कुटुब त्यावेळी वॉशिंग्टनमधे होती जिथे मराठी पाणी साचणार तिथे नाटकाचे कोंब उगवायला लागणारच आमचा त्यावेळचा 'तुझे आहे तुजपाशी'चा छोटासा प्रयोग वॉशिंग्टनमधल नावीन्य ठरला होता आता मात्र तिथे नाटक कपन्या तयार झाल्या आहेत इतकी मराठी लोकाची सख्या वर गेली आहे

[illegible] आता [illegible] होत आला होता तिथल्या जीवनाची सुखद ग्लानी यायला सुरुवात झाली होती त्यावेळचे परराष्ट्र सचिव वॉशिंग्टनच्या भेटीवर आले असताना त्यानी सुधीरना मिटिंगनतर बाजूला बोलावून सागितल, 'तुला आता भारताजवळच्या डोंगराळ मुलखात जायच आहे तेव्हा तू आता तयारीला लाग तिथे तुला हिंदी बोलता येईल ' मग त्यानी आम्हाला सिक्कीमला पाठवण्याचा निर्णय घेतल्याच सागितल, आणि वॉशिंग्टनचा अमल खाड्दिशी उतरला नकाशावर आम्ही सिक्कीम शोधायला लागते सिक्कीमचा बारीकसा ठिपका भारताला लागूनच सापडला (याच राज्याच्या राजा-राणींबरोबर मास्कोमधे आपल्याला एकत्र जेवण्याचा योग आला होता त्याचीही एकदम आठवण झाली ) आता सिक्कीम हे भारताच्या २६ राज्यांपैकी एक आहे मात्र ७० साली ते भारताच प्रोटेक्टरेट होत त्याची परदेशनीती आणि सरक्षण हयाची जबाबदारी भारतावर होती हिमालयातल्या कचनजधा शिखराच्या [illegible] हजार फूट उंचीवरच १५-२० हजार वस्तीच गगटोक ही त्या सिक्कीमची राजधानी आहे याचाही बोध झाला गगटोकचे फोटोही कुणाकडे तरी पहायला मिळाले

आता अत्याधुनिक सस्कृतीमधून एकदम मध्यकालीन युगात परत जाव लागणार असल्याची फोटो पाहिल्यावर अधिकच तीव्रतेन जाणीव झाली लाकडाच्या पेटलेल्या चुली मधूनच ऐकू येणारी कोल्हेकुई, ऑर्किडची जगल आणि पावसाळ्यात पायाला चिकटणाऱ्या जळवा हे पुढच चित्र असणार होत याची कल्पना तिथल्या राहणीमानाच वर्णन वाचून आणि इतर वर्णन ऐकून आली प्रत्येक ठिकाणच्या राहणीमानाची माहिती देणारी माहिती पुस्तिका विदेश मत्रालयाच्या सौजन्यान तयार करण्यात आलेली असते

अशा अज्ञातवासात जायच म्हणजे काय तयारी करायची याचीही कल्पना येत नव्हती नकाशावर दिसणारा बारीकसा ठिपका आता आपल जग असणार आहे हे अजूनही खर वाटत नव्हत अमेरिका सोडताना काय खरेदी करू आणि काय नाही अस होऊन गेल होत सर्व आधुनिक साधन नेऊन तिथे काहीच उपयोग होणार नव्हता, हेही स्पष्ट दिसत होत, कारण व्होल्टेजचीसुद्धा तिथे शाश्वती असणार नव्हती वीज आहे यावरच समाधान मानाव लागेल अशी अवस्था! पुढे कुठल्या प्रकारचा अरण्यवास माडून ठेवलेला आहे या चिंतेच ओझ बरोबर घेऊन जगातल्या सर्वात सपन्न देशाला गुडबाय केल ते परत येण्याची आशा बाळगूनच!

★ ★ ★

# गंगटोक-सिक्कीम

अमेरिकेच्या जेटयुगातून मागल्या काळात परत चालल्याचा प्रत्यय सिक्कीमच्या वाटेवरच आला सिलीगुरी जवळ बागडोग्रा इथ विमान प्रवासाला पूर्णविराम द्यावा लागतो आणि गगटोकपर्यंत डोंगर कपारीतला आणि उच घळींमधला ८०-९० मैलाचा [illegible]

बाजूला खोल दरीतला तिस्तेचा प्रवाह हेच दृश्य सतत बरोबर असत वरून दरड तर कोसळत नाही ना, याची खात्री करून घ्यावी लागते एकदा दरड कोसळायला सुरुवात झाली की काही तासाची निश्चिती अशावेळी पुढे जायचा प्रयत्न करण म्हणजे निसर्गाशी टक्कर घेण! निसर्गापुढे मानवाला कस नमत घ्याव लागत याची प्रचीती हिमालयान आपल्या बाहूमधे अलगद उचललेल्या सिक्कीममधे सततच येत रहाते साडेपाच हजार फुटावरच टेकड्यामधे विखुरलेल हे ठिकाण प्रथमदर्शनी अगदी [illegible]

दहा-पधरा हजार लोकवस्तीच्या ठिकाणच आयुष्य होत आळसावलेल, कासवासारख्या गतीन सरकणार, घड्याळातल्या वेळेऐवजी कलल्या उन्हाच्या कोष्टकात बसवलेल आणि निसर्गाच्या वर्चस्याखाली काहीस दबलेल | गाव लहानच असल्याकारणान सगळच जवळजवळ वाटायच ऑफिसही चालण्याच्या अतरात होत बाजार फक्त दोन किलोमीटर दूर होता कापडाची, किराणामालाची दुकान मारवाड्याचीच असायची

घरापासून ऑफिसपर्यंत घोड्यावर जाण्याचा प्रयोग ऑफिसमधल्या एका अधिकाऱ्यान काही दिवस करून पाहिला मात्र एरवी जीप आणि झोंगा यानीच सर्व प्रवास करावा लागायचा

गर्द झाडीमधे बसलेली बैठी घर रात्री काजव्यासारखी चमकत एखादा कोल्हाही केव्हातरी दृष्टीस पडायचा अत्याधुनिक सोयीनी सुसज्ज अशा ठिकाणी नुकतीच तीन वर्षं घालवून आल्यावर त्या डाकबगलेवजा घरात लाकडाच्या चुलीशी सगनमत करताना सुरुवातीला ब्रह्माड आठवल होत विदेश सेवेच्या आयुष्यात प्रवेश करताना लाकडाच्या किवा कोळशाच्या चुलीशी गाठ पडेल हे कुणी सागूनही खर वाटल नसत घरातून बाहेर नजर टाकली की होणार काचनजघाच दर्शन मात्र मनाची मरगळ क्षणभरात दूर करीत असे आकाशाच्या निळाईवर उत्तुग हिमालयाच्या शिखराची नागमोडी राग बघत असताना निसर्गापुढे नतमस्तक व्हावस वाटायच विधात्यान आपली ओंजळ सिक्कीममधे रिती करून टाकली असावी, इतक सिक्कीमच निसर्ग सौंदर्य अवर्णनीय होत ऑर्किडस, कॅक्टस, स्वीटपीज, ग्लॅडिओला, मॅग्नोलिया तऱ्हतऱ्हेच्या फुलाची तिथे खैरात असायची रोडोडेंड्रनची झाड आपल्या लाल फुलानी येणाऱ्या जाणाऱ्याला सलामी देत असत तर हिवाळ्यात सपूर्ण पान गळून गेलेल झाड मार्चमधे सगमरवरी रगाच्या मॅग्नोलियानी एकदम डवरून उठायच झाडावर फक्त फुलच फुल असायची पान औषधालाही नसायच आठवडाभर हा बहर टिकायचा, मग त्याला पान यायची

कचनजघा पर्वताच्या पायथ्यापासून शिखरापर्यंतचा असामान्य देखावा बघण्यासाठी लोक उत्तर सिक्कीममधल्या सिधीक या ठिकाणी जात असत तिथला डाक-बगला ब्रिटिश अधिकाऱ्यानी फार कलात्मकपणे बाधला होता त्याच्या खिडकीतून पहाटे ५ वाजता सूर्योदयाच्या वेळी कचनजघा शिखराचा सपूर्ण मनोरा आपल्या समीप येऊन उभा आहे असा भास व्हावा इतका तो जवळ दिसायचा कुणाचाही श्वास रोखला जावा अस दृश्य असायच ते मात्र ढग आले तर ही सधी जायची

पश्चिम सिक्कीममधल्या पेमायागचे या ठिकाणाहून दिसणारी हिमालयाच्या शिखराची शोभा आणखीनच वेगळी होती ज्ञानेश्वराची भावड भितीवर बसून चालली असावी तशी ही शिखर एका माळेत तरगत असल्यासारखी दिसायची मावळत्या सूर्याच्या ताबड्ट गुलाबी सधिप्रकाशामधे ही शिखर आणखीनच उठून दिसायची एका बाजूला मनसोक्त आस्वाद घ्यावस वाटणार निसर्गाच रोमहर्षक रूप तर दुसऱ्या बाजूला उच कडे आणि त्याच्या लगत प्रचड घळी असा रौद्रावतार, निसर्गामधला असा विरोधाभास सिक्कीममधे सततच बघायला मिळत असे

सिक्कीम हे स्वतत्र राष्ट्र असल तरी भारत सरकार आणि सिक्कीम याच्या १९४९ च्या तहानुसार त्याच्या सरक्षणाची, विदेश-नीति आणि दळणवळणाची सर्व जबाबदारी भारत सरकारवर होती भारत सरकारच्या तिथल्या ऑफिसला पोलिटिकल ऑफिस म्हणत असत तर राजदूताऐवजी तिथे पोलिटिकल ऑफिसर म्हणण्यात येत असे पी ओ हे त्याच्या नावाच लोकप्रिय सबोधन होत पी ओ च घर ऊर्फ 'इडिया हाउस' टेकडीच्या माथ्यावर होत अतिशय कलात्मकरीतीन बाधलेल्या घरातून हिमालयाच्या शिखराच भव्य दृश्य दिसायच ते एखाद्या सिनेमास्कोपिक चित्रासारख ही शिखर नेहमीच दिसायची असही नाही बघता बघता क्षणार्धात ते दृश्य लुप्त होऊन जायच आणि मग ते परत दिसाव यासाठी निसर्गाची मनधरणी करत राहण्याशिवाय इलाज नसायचा

सिक्कीमचे राजे थोडुप नामग्याल ऊर्फ चोग्याल मूळ तिबेटी वशाचे। तिबेटहून आलेल्या भूतिया लोकानी सिक्कीममधे सत्ता धारण केली होती सिक्कीमचे मूळ 'लेपचा' जमातीचे लोक कामकरी वर्गातले तर 'भूतिया राज्यकर्ते' अशी सरळसोट विभागणी होती भूतिया आणि लेपचा याच्या अगकाठीत, पेहरावात आणि आचार विचारात लगेचच फरक जाणवायचा मात्र दोघेही बुद्धधर्मी होते, सिक्कीममधे भूतिया आणि लेपचया, दोघाच मिळूनही प्रमाण जेमतेम पचवीस टक्के होत तिथली पचाहत्तर टक्के प्रजा नेपाळी होती एकेकाळी नेपाळहून आलेले आणि नतर सिक्कीममधेच स्थायिक झालेले हे नेपाळी लोक मूळची तिबेटी बोली फक्त चोग्यालचे कुटुबीय आणि राजघराण्यातले लोक बोलत असत बाकी बहुधा नेपाळी भाषेचा वापर होत असे नेपाळी भाषा समजायला त्यामानान सोपी नेपाळीची लिपी देवनागरी या भाषेत पुष्कळ सस्कृत शब्द असल्यामुळे मराठी-हिंदीशी नेपाळीची खूप जवळीक आहे

सिक्कीम, भूतान, नेपाळ हे सरहद्दीवरचे प्रदेश भारताच्या दृष्टीन प्रथमपासून महत्त्वाचे पण चीनन १९६२ मधे भारतावर आक्रमण केल्यापासून भारताच सरक्षण करण्यासाठी सिक्कीमच्या सरहद्दीपर्यंत सेना ठेवायची आवश्यकता पडली, त्यामुळे सिक्कीममधली अतर्गत परिस्थिती, सिक्कीमबरोबरचे सबध या बाबीच महत्त्व अधिकच वाढल हा प्रदेश आकारान एका जिल्हयाएवढा असला तरी एका बाजूला नेपाळ, दुसऱ्या बाजूला भूतान, वर तिबेट आणि खाली भारत अशा भौगोलिक दृष्टया मोक्याच्या ठिकाणी वसलेला होता चुबी खोऱ्याच्या खालचा भाग सरक्षणाच्या दृष्टीन नाजुक असल्याकारणान भारताच सैन्य फार वर्षांपासून तिथे मोठया प्रमाणात होत

सिक्कीमच्या सरक्षणाची जबाबदारी त्या काळात भारत सरकारची असल्यामुळे लष्करातली एक पूर्ण डिव्हिजन 'नाथुला' या भारत-चीन दरम्यानच्या सरहद्दीपर्यंत पसरलेली होती उत्तर सिक्कीममधेही आपल सैन्य होत तिथे आसाम रायफल्स नावाची आपली पलटण पूर्वीपासून असायची सिक्कीमच्या सरक्षण योजनेबाबत पोलिटिकल ऑफिस आणि आपले वरिष्ठ सेनाधिकारी याच्यात नेहमीच सपर्क असे सिक्कीम राजदरबारचे भारतीय सैन्याबरोबरचे सगळे सबध पोलिटिकल ऑफिसमार्फत चालत असत

ज्याच्या सरक्षणासाठी पोलिटिकल ऑफिस आणि आपल लष्कर सतत जागरूक असायच ते सरहद्दीवरच नाथुला हे ठिकाण सर्वांच्या कुतूहलाच ! नाथुलाचा प्रवास दुर्गम होता वाटेत काही ठिकाणी एका वेळी एकच वाहन रस्त्यावरून जाऊ शकेल इतका रस्ता अरूद असायचा आणि जरा ड्रायव्हरचा अदाज चुकला की गाडी घळीत जायची भीती असायची असे कैक अपघात या रस्त्यावर घडले होते एखादा याक कुठेतरी वाटेत चरताना दिसायचा नाथुलाच्या रस्त्यावर छागु हा प्रसिद्ध तलाव आहे. तो थडीत पूर्ण गोठलेला असतो राजघराण्यात एखादी दुर्दैवी घटना घडायची असली की त्याची पूर्वसूचना म्हणून छागु तलावात काळी छाया दिसते, अशीही आख्यायिका होती (चोग्यालची पहिली पत्नी निवर्तली त्यापूर्वी छागु तलावात मोठ काळ प्रतिबिंब दिसत होत अस म्हणतात )

नाथुलाच्या सरहद्दीवर पोचल्यावर थोडस अतर पायी चालाव लागायच मग पलीकडे हॅट घातलेला गभीर चेहऱ्याचा चिनी पहारेकरी गस्त घालताना दिसायचा आणि मगच नाथुलाची प्रदक्षिणा पूर्ण व्हायची दुर्बिणीतून बघितल्यावर तो आपल्याकडे रोखून बघत असल्याच जाणवायच नाथुलाला जायला सहसा कुणाला परवानगी मिळत नसे पोलिटिकल ऑफिसच्या काही मोजक्या लोकासाठी हा अपवाद केला जाई नाथुला आणि गगटोकच्या मध्यावर कॅगनोसला या ठिकाणी १७ माउटन डिव्हिजनची मुख्य कचेरी होती एकदा असच लष्करी मित्राबरोबर नाथुलाची सफर करून आम्ही गगटोकला परत येत असताना अर्ध्या रस्त्यावर धुक्यान आसमताचा कब्जा घेतलेला दिसला धुक्यामुळे रस्ता दिसतच नव्हता आता ड्रायव्हरच्या कौशल्यावर सर्व मदार होती प्रत्येक विमान प्रवासानतर पायलटचे आभार मानतच मी बाहेर पडते त्याची पुनरावृत्ती सिक्कीममधे जीपच्या प्रवासात होत असे सिक्कीमच्या दऱ्याखोऱ्यामधले जीपचे प्रवास म्हणजे प्रत्येकवेळी नव्यान सुखाचा जीव दु.खात घालण्यासारख निसर्ग केव्हा अक्राळविक्राळ स्वरूप धारण करेल याची शाश्वती नसायची नाथुलाचा हा प्रवास म्हणजे अमरनाथाच्या यात्रेच पुण्य मिळवण्याइतका कठीण होता

लष्करी अधिकाऱ्यांची नाथुला आणि कॅगनोसलावरून गगटोकला सारखीच ये-जा चालत असे छावण्यासारखे तळ ठोकून त्यात जवान आणि लष्करी अधिकारी रहात असत नाथुलासारख्या १४,००० फुटावरच्या ठिकाणी माणूसही गोठून जावा इतका थडीचा कडाका असे या छावण्या बुखाऱ्याच्या साहाय्यान गरम ठेवल्या जायच्या (बुखाऱ्या म्हणजे लोखडाचे बबच त्याचा पाईप थेट छतामधून वर जायचा बुखारी कोळशान नाहीतर केरोसीनन पेटवावी लागायची त्यामुळे सपूर्ण खोली गरम रहायची गगटोकमधे काही ठिकाणी फायर प्लेस असायच्या करमणुकीची साधन जवळजवळ नसायचीच रेडिओ आणि मासिक हाच काय तो त्याचा विरगुळा इतक्या प्रतिकूल परिस्थितीतही लष्करी अधिकारी कधी नाउमेद झालेले दिसायचे नाहीत कुणी गाणी ऐकत बसायचे, स्वत गायचे किंवा फावल्या वेळात पत्ते खेळायचे असेल त्या परिस्थितीत आनदात राहण्याची कला शिकावी ती लष्करी अधिकाऱ्याकडून कुटुबापासून कित्येक योजन दूर, सरहद्दीवर सतत लढाईसाठी सिद्ध अवस्थेत रहाव लागत असूनही आयुष्याचा उपभोग घेण्याची त्याची जिद्द कमी होत नाही आणि स्वत मधे ते कडवटपणा येऊ देत नाहीत पोलिटिकल ऑफिसमधली कुटुब आणि लष्करातले अधिकारी याच्यात आप्तेष्टाचा सहभाव निर्माण झाला होता आमच घर नाथुलाच्या रस्त्यावर असल्या कारणान कितीतरी लष्करातले मित्र नाथुलाला परत जाताना उतरून आमचा निरोप घेतल्या खेरीज पुढे जात नसत

गगटोकपासून दोन किलोमीटर्स अतरावर 'हनुमान टोक' नावाच ठिकाण होत औंधचे राजे श्री अप्पासाहेब पत सिक्कीममधे पी ओ (पोलिटिकल ऑफिसर) असताना त्यानी तिथे टेकडीवर हनुमान आणि गणेश मदिर बाधल त्यानतर तेही एक बघण्याच ठिकाण झाल

सिक्कीमचे राजे थोंडुप नामग्याल ऊर्फ चोग्याल आणि त्याची पत्नी होप कुक ऊर्फ ग्यालमो, ह्याच तिथल जीवन म्हणजे खर राजाराणीच त्याचा प्रासाद दुसऱ्या टेकडीवर होता प्रासादाच्या मानान ती इमारत साधी, पण सुबक होती त्याच्या प्रागणातच बुद्ध मदिर होत चोग्यालची पहिली पत्नी तिबेटी होती राजपुत्र तेनसिग, वागचुक आणि राजकन्या यागचीन याच्या जन्मानतर तिचा मृत्यू झाला नतर चोग्यालनी अमेरिकन स्त्रीशी लग्न केल थोंडुप नामग्याल तिथले राजा कसे झाले यालाही एक इतिहास होता राजघराण्यातला मोठा मुलगा राजा बनत असे आणि दुसरा लामा किंवा बौद्ध भिक्षू! थोंडुप नामग्याल खर तर लामा बनायचे पण राजा बनणारा मोठा मुलगा नेहमी अपघातात मरेल असा त्या घराण्यावर शाप असल्याची आख्यायिका होती आणि प्रत्येक ज्येष्ठ राजपुत्र खरोखरच अपघाताचा बळी झालेला आहे असे

स्थानिक लोक सागत ही आख्यायिका खरी ठरावी म्हणून की काय चोग्यालचा मोठा भाऊ भारताच्या हवाई दलात असताना अपघातात मरण पावला आणि थोंडूप नामग्याल 'चोग्याल' ऊर्फ सिक्कीमचा राजा बनले पुढे दुर्दैवान थोंडुप नामग्यालची गादी पुढे चालवणारा राजपुत्र तेनसिगही मोटार अपघातात मरण पावला (त्याचा धाकटा भाऊ वागचुक लामा होण्याऐवजी सिक्कीमचा राजा बनला असता, परतु तस व्हायच नव्हत तोपर्यंत सिक्कीम भारतात विलीन झाल होत ) चोग्यालच्या अमेरिकन राणीमुळे राजवाड्यातले वातावरण त्यावेळी काही अशी आधुनिक आणि पाश्चात्य पद्धतीकडे झुकलेल होत तिथे अमेरिकन आणि परदेशी मडळी सतत जात येत असत चोग्यालची मुल इग्लडला शिकायला होती ती सुट्टीला गगटोकला येत मग पाश्चिमात्य पद्धतीच्या नृत्यानाही जोर यायचा म्यालमो मात्र सतत बाकू (ड्रेसिंग गाऊन सारखा दिसणारा पायघोळ झगा आणि त्यावर हातान विणलेल्या कापडाचा घट्ट पट्टा) हा खास सिक्कीमी पोषाख वापरत असे

सिक्कीमच जीवन होत सस्थानात राहिल्यासारख जगरहाटीपासून दूर, आपल्यातच गुरफटलेल चोग्यालचा परिवार, राजघराण्यातली माणस, भूतिया-नेपाळी समाजातली प्रतिष्ठित मडळी, पोलिटिकल ऑफिसचे आणि इतर सबधित सरकारी अधिकारी आणि लष्करी अधिकारी अशाच मिळून हे सस्थान होत आलेल्या पाहुण्यासाठी एकदा पी ओ कडे तर एकदा चोग्यालकडे, एकदा राज्याच्या दिवाणाकडे किंवा लष्कराच्या जनरलकडे आलटून पालटून मेजवान्याची खैरात होत असे पी ओ आणि चोग्यालकडे नोकरचाकराचा ताफा होता त्यामुळे वऱ्हाडासारखी माणस गोळा करून जेवणावळी घालायची दोघाकडे प्रथा होती दिवसातून तीन ठिकाणी त्याच त्याच व्यक्तींना भेटल्यावर तिसऱ्या वेळी जुजबी सभाषण काय करायच हा खरोखरी प्रश्न पडायचा अशा ठिकाणी लष्करातले मित्र असल्यावर ब्रिजचा डाव रात्र रात्र बसायचा सकाळी नाश्त्यापूर्वी ते आपापल्या छावण्यावर रवाना होत असत

चोग्यालला माजाँग खेळायचा फार नाद होता चिनी आणि तिबेटी लोकामधे हा कवड्याचा खेळ पूर्वीपासून लोकप्रिय होता जुन्या काळात तिबेटमधे माजाँगच्या मेजवान्या आठवडाभर चालत असत एखादे दिवशी चोग्यालला लहर आली की माजाँगचा डाव पडायचा आणि चोग्यालचा परिवार, दरबारातले इतर अधिकारी त्यात सामील व्हायचे मग तुबा (बार्लीपासून तयार केलेली दारू) चा आस्वाद घेत घेत माजाँगचा खेळ दिवसभर चालायचा मग नाश्ता, जेवण, चहापान तिथेच चालायच सिक्कीमी घरामध्ये आलेल्या पाहुण्याच तुबा देऊन स्वागत करण हा शिष्टाचाराचा एक भाग समजला जातो तिथली एक मजेदार चाल होती आलेला पाहुणा फुरफुर असा आवाज

करून जोपर्यंत ते पेय सपवत नाही तोपर्यंत घरातल्या स्त्रिया जवळ उभ्या राहून त्याला सुईन हलके हलके टोचत रहायच्या

तर नेपाळी मडळींना तीनपत्तीचा फार शौक! एखाद्या वारी असा डाव बसला की मग इतर व्यवहार बाजूला पडायचे आणि तो वार रविवारच होऊन जायचा उद्याची फिकीर फारशी कुणालाही जाणवत नसे

सिक्कीमी लोकाना नाचगाण्याच फार वेड. तिथली नेपाळी मडळी तर नेपाळी लोकप्रिय गाण्याचे स्वर ऐकू आले की कमरेवर हात ठेवून त्या तालावर नाचायला लागायची तिबेटी आणि नेपाळी नृत्य वेगवेगळी असायची मात्र दोघाना नृत्याची आवड सारखीच भूतिया आणि नेपाळी लोकाच्या जेवणातही फरक होता चोग्याल आणि इतर भूतिया लोक थुप्पा (नूडल्स) खायचे तर नेपाळी लोकाना मसुराच्या डाळीची आमटी आणि भात प्रिय

सिक्कीमधला राजकीय धर्म बौद्ध धर्म होता कारण चोग्याल बौद्ध होता हा बौद्ध धर्म महायान शाखेतला आणि तिबेटमधून आलेला महायान शाखेमधे पूजा, अर्चा, आन्हिक बुद्धाच्या अनेक मूर्ती आणि रूप याना खूप महत्त्व बहुताशी या गोष्टी हिंदू धर्मामधूनच अगीकारलेल्या आहेत तिबेटी लिपीसुद्धा देवनागरीला जवळची सस्कृत आणि पालीमधल्या अनेक ग्रथाच पूर्वीच्या काळी तिबेटीत भाषातर झाल होत आज मूळ सस्कृत आणि पालीमधले ग्रथ आपल्याकडे उपलब्ध नसले तरी त्याची तिबेटीमधली भाषातर अस्तित्वात आहेत गगटोकमधे तिबेटॉलॉजीच्या सस्थेत ती पाहायला मिळतात सिक्कीममधली तिबेटॉलॉजी इन्स्टीट्यूट हे तिबेटी आणि बौद्ध धर्मावरच्या अभ्यासाच प्रमुख स्थान आहे

१२ व्या ते १३ व्या शतकात तिबेट, सिक्कीम आणि भूतानमधे आलेला गुरुपद्मसभव सिक्कीममधे अजूनही देवासारखा मानला जातो बहुतेक बुद्ध मदिरामधे त्याची प्रतिमा असते त्याला सिक्कीममधे गुरू रिपोची म्हणतात गगटोकपासून १५ किलोमीटरवर रूमटेक नावाच्या ठिकाणी एक बौद्ध मठ आहे तिथे तिबेटमधले प्रसिद्ध लामा श्री ग्यालवा कर्माप्पा रहात असत चीनच्या तिबेटच्या आक्रमणानतर दलाईलामा आणि इतर बौद्ध धर्मगुरू भारतात आश्रयाला आले त्यामधे ग्यालवा कर्माप्पाही होते ग्यालवा कर्माप्पाचा लाल टोपीचा पथ हा तिबेटमधल्या बौद्ध धर्माच्या अनेक पथापैकी प्रमुख होता त्याचे सिक्कीम आणि भारतात इतर ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर अनुयायी आहेत चोग्याल त्याना धर्मगुरू मानीत असत पी ओ इतर अधिकारी तसच लष्करी अधिकारी त्याच्याकडे वारवार भेटीसाठी जात त्याच व्यक्तिमत्व फार प्रसन्न आणि

शातीपूर्ण होत त्याच्या धबधब्यासारख्या हास्यामधून त्याच निरागसत्व उठून दिसायच त्याच्याकडे आलेल्या पाहुण्याना लोणी घातलेला खास चहा चादीच्या नक्षीदार प्याल्यामधून देण्यात येत असे हा तिबेटी चहा घ्यायचा म्हणजे परीक्षाच असायची

सिक्कीमी लोकाच्या जीवनात एकूणच बौद्ध भिक्षूच स्थान फार मोठ तपकिरी रगाचे डगले परिधान करून हातात प्रार्थना चक्र घेऊन चालणारे लामा हा गगटोकच्या दृश्याचा स्थायी घटक होता बुद्धाच्या मूर्तीपुढे मेणबत्त्या लावण हा लामाच्या पूजेमधला एक महत्त्वाचा भाग वर्षातून एकदा होणारी धार्मिक लामा नृत्य हा सिक्कीमी लोकाचा फार मोठा उत्सव असतो आसमतातल्या असुर, हिंसक आणि विघातक वृत्तींचा नाश करण हा त्या लामा नृत्याच्या मागचा हेतू. जरीच्या किनखाबी कापडाचे डगले घातलेले आणि चेहऱ्यावर मुखवटे चढवलेले लामा तल्लीन होऊन दिवसभर नृत्य करीत असत आकाशाच्या निरभ्र पडद्यावर आणि हिमालयाच्या उत्तुग शिखराच्या पार्श्वभूमीवर राजप्रासादातल्या बुद्ध मदिरासमोर हातात ढाली वाजवत बेभान होऊन नाचणारे लामा त्या चित्राचाच एक भाग वाटत या दिवसासाठी खास चोग्यालच्या राजवाड्यासमोर मोठा शामियाना उभारला जायचा गावच्या प्रतिष्ठित मडळींना आणि काही परदेशी मित्रगणाना त्याच आमत्रण असायच चोग्यालतर्फे सर्वांना दुपारी मेजवानी असे

किनखापी सिल्कच्या कापडावर बुद्धाच्या धार्मिक जीवनाची अनेक चित्र रगवलेले थके बुद्ध मदिरात ठिकठिकाणी टागलेले असत काही लामाना ही थका बनवण्याची विद्या खास शिकवण्यात येत असे हे थंके भारतात आणि इतर ठिकाणी खूप लोकप्रिय झाले आहेत थक्यावर रगकाम करायची कला अत्यत अवघड असून एक थका बनवायला जवळ जवळ ५-६ महिने लागतात मात्र दिवसेदिवस ही कला दुर्मिळ होत चालली आहे

बौद्ध धर्मीयाच्या नैसर्गिक शक्तींवरच्या अधश्रद्धेचा इथे वारवार पडताळा येत असे चेटूक आणि तत्सम चालीरीतींवर लोकाचा पूर्ण विश्वास होता २६ जानेवारीचा गणतत्र दिवसाचा समारभ इडिया हाउसच्या बाहेर उघड्या मैदानावर होत असे तेव्हा पाऊस पडू नये यासाठी लामा खास प्रार्थनेला बसायचे किती तरी वेळा काळे ढग भरून आलेले दिसत असूनही पाऊस पडायचा नाही एवढ मात्र खर.

बौद्ध धर्माच्या शिकवणुकीमुळे किंवा निसर्गाशी असलेल्या सवादामुळे सिक्कीमी लोकाच्या मनोवृत्तीत स्थितप्रज्ञता जाणवायची आनदान ते हरळून गेल्यासारखे भासत नसत किंवा दु.खाच्या प्रसगी ते फारस शोकप्रदर्शनही करत नसत 'वासासि जीर्णानि यथा विहाय' ही शिकवण बौद्धधर्मीय लोकाच्यात पूर्णपणे भिनल्यासारखी वाटायची

जवळची व्यक्ती गेल्यानंतर एखादा चागला मुहूर्त बघून तिच दहन करण्यात येत असे तोपर्यंत मृत व्यक्तीला रुद पेटीत बुद्धासारख्या आसनामधे बसवण्यात येत असे मुहूर्ताचा दिवस उगवेपर्यंत घरात लामाच्या पूजा-अर्चा चालत जेवणावळी घालण्यात येत या सोहळ्यान मृत व्यक्तीच्या आत्म्याला शाति मिळेल असा त्याचा समज असे

सिक्कीमी लोक एकूण उत्सवप्रियच! तऱ्हतऱ्हेचे उत्सव तिथे साजरे होत असत लोसर हे सिक्कीमी लोकाच नव वर्ष ते अगदी वाजतगाजत साजर होत असे तुबा प्यायला तेव्हा लोकाना ऊत येत असे तर नेपाळी लोक दसरा, भाईटीका आणि होळी साजरी करायचे दसऱ्याला नेपाळी लोकाच्या घराघरातून झेंडूच्या माळा टागलेल्या असत आणि नेपाळी पुरुष त्या गळ्यात घालूनही मिरवत असत सणाच्या दिवशी त्याच्या तीनपत्तीला अधिक जोर चढायचा होळीच्या दिवशी तिथले भारतीय आणि नेपाळी लोक हातात रगाच्या पिचकाऱ्या घेऊन पी ओ च्या घराभोवती गराडा घालायचे पी ओ च्या ऑफिसमधला कुणीही अधिकारी मग त्या रगाच्या फवाऱ्यातून वाचत नसे लष्करी अधिकारीही त्यात सामील व्हायचे अमेरिकन राणीमुळे हॅलोविन हा सणही तिथे साजरा होत असे

हॅलोविनच्या सणाच्या दिवशीची गोष्ट रात्री १२-१२ ३० वाजता आमच्या अगणातून अचानक ढमढम असे वाद्याचे आवाज यायला लागले मी अर्धवट जागी झाले आमच्या अगणाला लागून हमरस्ता होता एखादे वेळेस रस्त्यावरून चालणाऱ्या लामाचा तो आवाज असेल अस समजून मी कूस बदलली मात्र लामाचे आवाज पाश्चात्त्य सगीताचे कसे असतील हे मला अर्धवट झोपेतही जाणवल होत आवाज काही कमी होईनात उलट ते जवळ जवळ यायला लागले मग तर कानाशीच कुणी ढमढम वाजवत असाव इतके ते वाढले आणि दरवाजावर धडका बसायला लागल्या मी बिछान्यातून उडीच मारली हा काय अघटित प्रकार आहे कळेचना मी घाबरत घाबरत जाऊन दार उघडल तेवढ्यात सुधीरही ड्रेसिंग गाऊन घालून बाहेर आले दाराशी बघते तर काय खुद्द म्यालमो इतर ८-१० तरुण सिक्कीमी मुलामुलींसकट आमच्या दाराशी उभी होती तिच्या हातात ड्रम होता मी गोंधळून बघतच राहिले मी काही म्हणायच्या आत वावटळीसारखी ती आत घुसली आणि ड्रेसिंग गाऊन घातलेल्या माझ्या नवऱ्याचा तिन ताबा घेतला 'लेट अस हॅव द म्युझिक' म्हणून तिन सुधीरना सागितल आणि डोळे चोळत चोळत त्यानी म्युझिक लावेपर्यंत तिन त्याच बखोट पकडल आणि सगीताच्या तालावर त्याच्याबरोबर नाचायला सुरुवात केली इतर मुलमुली पण आपापल्या जोड्या पकडून नाचायला लागली जवळ जवळ पाच सात मिनिट हा प्रकार चालला असेल

तुलसी नावाचा आमचा नोकर आतल्या बाजूला निजला होता कर्णकर्कश ड्रमचे आवाज ऐकून तोही जागा झालेला होताच बाहेर कसली डान्स पार्टी चालली आहे हे बघायला तोही उठून बाहेर आला बघतो तर काय खुद्द राणीबरोबर आपले साहेब ड्रेसिग गाऊनमधे नाचताहेत तो आ वासून हे दृश्य बघतच राहिला रात्री एकच्या गडद अधारात बाहेरच्या काजव्याच्या आणि घरातल्या मद उजेडातल्या हॉलोविनच हे दृश्य बघून तो चक्रावला असल्यास नवल नाही मीही स्तिमित होऊन हा सर्व प्रकार बघत होते नाचता नाचता तिन सुधीरचा हात अचानक माझ्या हातात दिला आणि आम्ही नाचत असताना ग्यालमोची टोळधाड आली तशी एकाएक निघूनही गेली ग्यालमोला इतक मनापासून हसताना आणि आनद लुटताना मी क्वचितच पाहिल होत सिक्कीमच्या वास्तव्यातला हा एक मनात जसाच्या तसा कोरलेला प्रसग! परत जेव्हा ग्यालमो आम्हाला भेटली तेव्हा तिन त्या प्रसगाचा उल्लेखही केला नाही

तिथल्या भूतिया आणि नेपाळी नेत्याशी आमचा वारवार सबध येत असे त्याच्यापैकी कितीतरी जणाना आमच घरही परक राहिल नव्हत अनेक प्रकारचे नेपाळी आणि भूतिया लोक सुधीरना भेटायला वेळी अवेळी घरी येत असत सकाळी ७ वाजता पहिले पाहुणे आमच्या दारात हजर व्हायचे आणि चहाच्या कपाबरोबर राजकारणाची चर्चा व्हायची भूतिया-नेपाळी तटे चागलेच पेटले त्या काळात दोन्ही पक्षाचे लोक आपापली बाजू माडण्यासाठी त्याच्या ऑफिसमधे येऊन हजर होत असत

मार्तम तोपदेन हे तिथले एक वयस्क भूतिया नेते त्याच्या घरी आम्ही रस्त्यात जाता येताही डोकावत असू. थुबा पीत असलेल्या अमला तोपदेन आमच नेहमी हसून स्वागत करायच्या रायबहादर धनसाप्पा हे चोग्यालचे तिथले प्रमुख सल्लागार त्याच्या शेतावरच्या घरी आम्हाला त्यानी बोलावल होत बागेत सत्र्योंच्या झाडाना शेकडो सत्री लागलेली होती हातान सत्री तोडून खायचा आणि शेतात इकडेतिकडे मनसोक्त भटकायचा आनद आम्ही त्या दिवशी लुटला कुसुग दोरजी या तिथल्या भूतिया नेत्यान आम्हाला त्याच्या चहाच्या मळ्यातल्या घरी मोठ्या अगत्यान जेवायला बोलावल होत तर मोहन प्रताप प्रधान या नेपाळी अधिकाऱ्यान त्याच्या खेड्यातल्या वाडावजा घरात दोन दिवस आमचा प्रेमान पाहुणचार केला होता

सिक्कीममधे प्रवास करायची आम्हाला अमाप सधी मिळाली उत्तरेकडे लाचेन लाचुग ही रोडोडेंड्रमसाठीची प्रसिद्ध ठिकाण तर दक्षिणेकडे नामची कधी दार्जिलिंग तर कधी कॅलिपॉंग सर्व प्रवास जीपमधले आणि साहसपूर्ण चार दिवस प्रवासाला बाहेर पडायच म्हणजे शिध्यापासून सर्व ससार गाडीत बरोबर घेऊन जाव लागायच

अगदी स्टोव्ह पेटवण्याच्या केरोसीनच्या जेरी कॅनपासून ते फोडणीला घालायच्या मोहरीपर्यंत सर्व! कारण वाटेतल्या जगलामधे काय मिळणार? वाटेत दिसायच ते अमाप सृष्टीसौंदर्य जे हरखून बघत बसावस वाटायच! दार्जिलिग कॅलिम्पॉंगचा रस्ता वळणावळणाचा आहे कॅलिपॉंग हे छोटस गाव अतिशय सुबक आणि टुमदार! पण एकेकाळी हेराचा अड्डा अशी त्याची ख्याती असल्यामुळे ते उगीचच रहस्यमय वाटायच

सिक्कीमी नेते काझी लेंडुप दोरजी कॅलिपॉंगमधे राहायचे त्याच्याही घरी जाण्याचा आम्हाला प्रसग आला सिक्कीमच्या राजकारणात काझी लेंडुप दोरजी हे नाव तेव्हा सर्वांना चागलच परिचित झाल होत मात्र स्वत काझी अत्यत मितभाषी सर्व सभाषण त्याची पत्नी काझीणीच करत असते काझिणी हे एक अफाट व्यक्तिमत्व होत स्वत युरोपियन असली तरी अनेक भाषा तिला आत्मसात होत्या तिची पूर्वी अनेक लग्न झालेली होती हिंदुस्थानात येऊन राहिल्यावर दिल्लीत असताना ती काझींना भेटली आणि त्याच्या प्रेमात पडली ती चोग्यालची कट्टर विरोधी काझीण बोलायला लागली की तोफखाना सुटायचा त्या काळात तिला सिक्कीममधे पाय ठेवायची बदी होती काझीची राजकारणातली प्रमुख सल्लागार तीच होती स्वत काझीकडे बघून इतका अबोल गृहस्थ 'नेता' कसा होऊ शकला याच मला आश्चर्य वाटायच त्याच्या हुकारातच बहुधा त्याचे अनुयायी अर्थ काढत असणार.

दार्जिलिग हे त्या भागातल एक रोमँटिक ठिकाण सिक्कीमशी त्याच फार जवळच नात गेल्या शतकात तर दार्जिलिंग हा सिक्कीमचाच भाग होता तिथले चहाचे मळे, प्लँटर्स क्लब, विंडरमेयर होटेल, टायगर हिल ही दार्जिलिगच्या वैभवाची आठवण करून देणारी ठिकाण! टायगर हिलवरून दिसणारा सूर्योदय लाल पिवळ्या रगाची उधळण करून जायचा तर एव्हरेस्ट, लोत्से, लुकाबू या तरगणाऱ्या शिखराच टायगर हिलवरून दिसणार दृश्य विहगम असायच

दार्जिलिगमधे शिकून आलेल्या नेपाळी-सिक्कीमी पुढाऱ्याची एक नवी पिढी तिथे तयार होत होती सिक्कीमच्या राजकारणात नतर त्यांनी पुढाकार घेतला होता नरबहादूर खातीवाडा, रामचद्र पौडियाल ही नाव तेव्हा नवीन होती नरबहादूर खातीवाडा त्यावेळेस काझीचा मानसपुत्र समजला जात असे

आम्ही सिक्कीममधे होतो तो काळ भारत-सिक्कीम सबधाच्या दृष्टीन फार कठीण होता १९४९ मधे सिक्कीमबरोबर करार झाल्यापासून भारतान सिक्कीमच सरक्षण, दळणवळण आणि परकीय धोरण याचीच नव्हे तर उत्तम राज्यकारभार आणि शातता याबाबतची जोखीम सुद्धा स्वीकारलेली होती थोंडुप नामग्याल आणि त्याचे वडील

ताशी नामग्याल यानी बरीच वर्ष सिक्कीममधल्या मिश्र लोकसख्येमुळे होणारा अतर्गत समतोल आणि भारताबरोबरचे सबध योग्य रीतीने पाळले होते भारतान पण या दोन्ही राज्यकर्त्यांना पुरेसा पाठिबा दिला होता सिक्कीममधे जवळजवळ ७५ टक्के नेपाळी वशाचे लोक बारा टक्के भूतिया आणि तेरा टक्के लेपचा अस असताना भूतियाना त्याच्या सख्येच्या खूप अधिक प्रमाणात हक्क आणि सवलती मिळालेल्या होत्या या आर्थिक आणि सामाजिक विषमतेचा केव्हातरी विस्फोट होणार याची चोग्यालनाही कल्पना होती सिक्कीममधल्या वेगवेगळ्या पुढाऱ्यानी पूर्वी सुद्धा भारतामधे समाविष्ट होण्याची मागणी केली होती हेही ते जाणून होते

नेपाळी लोकाना चोग्यालची राजवट दिवसेंदिवस नको होती त्याच्यामधला असतोष एकीकडे वाढत होता तर एकीकडे चोग्याल पूर्णपणे स्वतत्र होण्याची स्वप्न बघत होते

१९७१ ते ७३ सालापासून सिक्कीमची राजकीय परिस्थिती चिघळत गेली ७३ साली चोग्यालच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाचा सोहळा चालू असताना प्रचड निदर्शन झाली चोग्यालवरचा अविश्वास उघडपणे व्यक्त व्हायला तेव्हा प्रथम सुरुवात झाली परिस्थिती पूर्ववत् होण्याची चिन्ह दिसेनात तेव्हा ७३ च्या ऑगस्टमधे चोग्यालच्या अमेरिकन राणीन सिक्कीमला रामराम ठोकला (चोग्यालचे दिवस भरत आल्यामुळे ती चोग्यालला सोडून् गेली अस अनेकानी निदान केल ) चोग्याल आणि होम कुकची दार्जिलिगमधे गाठ पडल्यावर त्यानी विवाहबद्ध व्हायच ठरवल तेव्हाच सिक्कीममधल्या अनेक जणाना ही घटना आवडली नव्हती केवळ राणीपदाच्या आशेन या तरुण अमेरिकन मुलीन चोग्यालशी लग्न केल असाव अस अनेक जणाच मत होत

दरम्यान तिथल्या जनतेमधे लोकशाहीची मागणी वाढत होती या काळात चोग्यालबरोबर वाटाघाटी करण्यासाठी दिल्लीहून खुद्द परराष्ट्र सचिव दोन तीन वेळा येऊन गेले (परराष्ट्र सचिव येणार असल्याची बातमी गुप्त असायची मात्र पोलिटिकल ऑफिसरच्या मुलाना त्याचा सुगावा लागलेला असायचा कारण घरात तऱ्हतऱ्हेचे केक बनायला सुरुवात व्हायची) ते आले की नेपाळी लोक त्याच्याकडे काहीना काही तक्रारी घेऊन यायचे आणि त्याना शात करता करता परराष्ट्र सचिवाच्या नाकी नऊ यायचे चोग्यालचे दिवाण सेवानिवृत्त झाल्यावर भारत सरकारन त्याच्या जागी स्वत चा प्रतिनिधी नेमला

याच सुमारास काझी लेंडुप दोरजींच्या बडखोर नेतृत्वाखाली अनेक भूतिया, नेपाळी आणि लेपचा लोक एकत्र आले सिक्कीममधे ७४ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत

(एक व्यक्ती एक मत या नियमानुसार ही पहिलीच निवडणूक होती) काझी दोरजी याच्या पक्षाला मोठ मताधिक्य मिळाल चोग्याल आणि त्याचे सल्लागार याना अजूनही सिक्कीमी लोकाच्या आकाक्षा आणि ध्येये याची पूर्ण कल्पना आली नव्हती आणि ते जनतेची मुस्कटदाबी करत राहिले अखेर या सर्व परिस्थितीचा परिणाम म्हणून सिक्कीमधल्या लोकाची भारतात समाविष्ट होण्याची मागणी वाढत गेली आणि ७५ सालच्या मे महिन्यात सिक्कीम असेंब्लीन भारतात विलीन होण्याचा ठराव मजूर केला लोकशाहीच्या मार्गावरची सिक्कीमच्या लोकाची ही यशस्वी वाटचाल म्हटली पाहिजे

सत्य समोर येऊन सुद्धा वस्तुस्थितीची कल्पना येऊ शकली नाही हे चोग्यालच दुर्दैव! सरजामशाहीच्या वातावरणात ते शेवटपर्यंत मश्गुल राहिले आणि भारतात विलीन झाल्यावर त्याचे डोळे पूर्ण उघडले परतु जनतेची मागणी एव्हाना पूर्ण झाली होती, त्यामुळे वैयक्तिक जीवनही उध्वस्त झाल

सिक्कीममधे राजकीय उलथापालथ चालू असतानाच आम्ही दिल्लीला जाणार असल्याचा सुगावा लागला गेली चार वर्ष सतत ज्या हिमालयाच्या छायेत काढली ते हिमालयाच छत्र आता यापुढे राहाणार नाही या सत्याची तेव्हा प्रथमच जाणीव झाली आजूबाजूचा निसर्गरम्य परिसर, हिमालयात हात उचावून आशीर्वाद द्यावा अस भासणार कचनजघा शिखर, लामाचे सान्निध्य आणि बुद्ध धर्मातली शाती याचा आमच्याभोवती कोश तयार झाला होता आधुनिक जगाचा सपर्क तुटल्यासारख वाटायला लागल होत आगगाडीचा आवाजही विसरला गेला होता जीपशिवाय दुसरी वाहन बघण्याचीही सवय राहिली नव्हती सिक्कीम राज्याच्या साठा उत्तराच्या कहाणीत आपण इतके गुरफटलो गेलो असू याची आम्हाला स्वत लाही कल्पना आली नव्हती

राजेरजवाड्याचा काळ सपल्यानतरही आपण तशा देशात जाणार या उत्सुकतेन आम्ही गगटोकचा चढ चढलो होतो मात्र सिक्कीमच्या आमच्या वास्तव्याची इतिश्री झाली ती राजाराणीच्या कहाणीच्या शोकातिकेन!

★ ★ ★

# जिनीव्हा-स्वित्झर्लंड

दिल्लीच्या रखरखीत उन्हाळ्यात आमची जिनीव्हाला बदली झाल्याची बातमी आली

सिक्कीमच्या चार वर्षांच्या दुर्गम हिमालयीन वास्तव्यानतर आणि त्याहूनही कठीण अशा दिल्लीच्या सरकार दरबारातल्या तपस्येनतर कुठली तरी चागली जागा मिळणार याची खात्री होती मात्र ती स्वित्झर्लंड हे कळल्यावर मनचक्षु आल्पस् पर्वतात जाऊन पोचले सुद्धा. अभिनदन करणाराची सख्याही एकदम वाढली. जाण्यापूर्वी एकदा तरी आमच्याकडे आल पाहिजे ह अस आवर्जून म्हणणाऱ्या कितीतरी चेहऱ्याची नावही मला नीटशी माहीत नव्हती (ते स्वित्झर्लंडमधे नतर वारवार दिसणार आहेत याची त्यावेळी कल्पना आली नाही) स्वित्झर्लंडसारख्या प्रगत देशात प्रयाण करताना फारशा तयारीचीही जरूर भासत नसे डाळ, तादूळ, मसाल्यानीच बरोबरच सामान भरल होत

जिनीव्हाला आमच एअर इडियाच विमान उतरल तेव्हा उत्सुकता आणि अधीरता शिगेला पोचली होती निसर्ग सुदर आणि जगातल्या सर्व श्रीमताचा पैसा खुळखुळणार हे ठिकाण कस असेल याची अनेक चित्र मनात तरळत होती तलावाच्या अलीकडे आणि पलीकडे विखुरलेल हे लहानस शहर प्रथमदर्शनीच मोहिनी घालणार आहे. तलावाच्या कडेन जात असताना तलावात पाण्याच्या मनोऱ्यासारखा भासणारा जेहो, (प्रचड उचीच

कारज) जरा पुढे गेल्यावर काटे सावरून बसलेल फुलाच घड्याळ, ओळीन लागलेली जडजवाहिराची दुकान आणि त्यातली चमचम करणारी घड्याळ, जिनीव्हाच ही खास आकर्षण केव्हाच परिचयाची होऊन गेली

तलावाच्या अलीकडे जास्त स्विस लोकाची वस्ती तर पलीकडे सयुक्त राष्ट्र कचेरी, इतर आतरराष्ट्रीय कचेऱ्या आणि आतरराष्ट्रीय समुदायाच्या वसाहती अशी या शहराची ढोबळ विभागणी आहे. आमच घर गावाच्या मध्यभागी होत गावातच घर असल्यान दिवसाच्या कुठल्याही वेळी शहरात फिरता येत असे, आणि शहराची माहिती करून घ्यायला पायी फिरण्याइतका उत्तम उपाय नाही सकाळी लवकर स्विस लोकाची लगबग सुरू होत असे खिडकीतून बाहेर डोकावल्यावर दिसणार दृश्य म्हणजे ताजी भाजी घ्यायला चाललेल्या वयस्कर स्विस स्त्रिया, 'बागेत्' हा खास बेकरीमधला ताजा ब्रेड काखेत मारून मग कॉम्प्यूर (हेअर ड्रेसर्स) कडे वळणाऱ्या 'कोकेत्' तरुण महिला, मुलाना शाळेत पोचवायला चाललेल्या आया आणि बससाठी थाबलेली पुरुष मडळी

इतर इमारतींकडे नजर गेली की स्विस स्त्रिया आपल्या खिडक्या साफ करायला लागलेल्या दिसत स्वच्छतेच वेड बघाव तर या युरोपियन देशामधे त्याच्या आवडीचा उद्योग म्हणजे घरात सर्व प्रकारची साफसफाई करणे आणि जमिनी पॉलिश करणे खिडक्या साफ करण्याची स्विस स्त्रियाची हौस तर महा दाडगी रस्त्यावर कधी कागदाचा कपटाही पडलेला दिसायचा नाही चुईंगम चघळणारी माणस एखादा गार्बेजचा कॅन दिसेपर्यंत तो चघळतील आणि मगच तो टाकतील पाण्याचे फवारे सोडून रस्ते धुवत जाणारे ट्रक मी प्रथम जिनीव्हातच बघितले ऑटममधे झाडाची पान जितके वेळा गळत तितके वेळा ती कुणीतरी साफ करत असे दुपारी चारच्या सुमारास टी रूम्स (चहा आणि पेस्ट्रीची उपाहारगृह) अगदी गजबजून जायच्या पेस्ट्री आणि केक्स्‌ ... [illegible] स्विस लोकाना मनापासून आवड चहाचा घोट घेत खिडकीतून बाहेरची रहदारी बघत रहाण हा स्विस आणि फ्रेंच लोकाचा वेळ घालवण्याचा आवडता कार्यक्रम शहराच्या जुन्या भागात फिरायचीही युरोपियन लोकाना अत्यत आवड! जिनीव्हामधे जुन्या काळातले दगडी रस्ते अजूनही त्याच स्थितीत ठेवण्यात आले आहेत तिथे नवीन रेस्टॉरटस्‌ आणि आधुनिक दुकान बाधण्यात आल्यान तो शहराचा अगदी आकर्षक भाग बनला आहे त्या भागातले बार आणि कॅफे रात्री माणसानी फुललेले असायचे

घराबाहेर पडल्यावर सबध शहरावर एक प्रकारच चैतन्य जाणवायच मात्र अपार्टमेंटच दार बद झाल की बाह्य जगाचा सबध तुटायचा शेजाऱ्यान आणि आपण चुकून एखादे वेळी दार उघडल तरच आपल्याला आपले शेजारी कोण हे कळणार [illegible]

बाहेरच्या पाटीवरून आणि नावावरून त्याची जेवढी माहिती होईल तेवढीच अपार्टमेंट बिल्डिंगच्या आवारात मुलानी दगा करायचा नाही असा दडक असे रात्री साडेदहानतर फ्लशचा आवाज करायचा नाही असाही काही बिल्डिंगमधे नियम होता घरात उशीरापर्यंत पार्टी चालली तर म्युझिकचा आवाज होऊ नये याची दक्षता घ्यावी लागायची

जिनीव्हामधे बहुतेक सर्व व्यवहार फ्रेंच भाषेत होत असत स्वित्झर्लंडमधे तीन भाषिक प्रदेश आहेत फ्रेंच, इटालियन आणि जर्मन आग्नेय भागात इटालियन तर नैऋत्येकडे फ्रेंच भाषा बोलली जाते जिनीव्हा स्वित्झर्लंडच्या फ्रेंच भाषीय विभागात येत असल्याकारणान तिथे प्रत्येकजण आपापल्या परीन फ्रेंच बोलण्याचा प्रयत्न करतो इटालियन लोक फ्रेंच बोलताना त्या भाषेची गोडी घालवतात असा स्विस लोकाचा कळत नकळत त्याच्यावरचा आरोप आहे तर स्विस लोकाची फ्रेंच भाषा धेडगुजरी आहे असा फ्रेंचाचा दावा अर्थात जिनीव्हामधे एकूण आतरराष्ट्रीय वातावरण असल्याकारणान इग्लिश थोडफार सर्वांनाच कळत पण केवळ इग्लिश भाषेचा वापर करून जिनीव्हामधे रोजचे व्यवहार करण केवळ अशक्य होत नीग्रो या तिथल्या सुपरमार्केटातल्या काउटरवरच्या स्विस बाईला 'सा कूत कोंबिया ? (फ्रेंचमधे याची किंमत काय ?) अस विचारल्याशिवाय कळत नसे

तलावाच्या पलीकडे गावाला एकदम आतरराष्ट्रीय जत्रेच स्वरूप येत सयुक्त राष्ट्राची कचेरी, जागतिक आरोग्य सघटना, आतरराष्ट्रीय कामगार सघटना, आतरराष्ट्रीय दूरसचार सघटना या सर्व सस्थाच्या इमारती जवळजवळ आहेत सयुक्त राष्ट्रासाठीची भारताची स्थायी कचेरी याच भागात आहे. स्थायी कचेरीतले भारतीय अधिकारी या सस्थाशी सलग्न असलेली काम बघतात अनेक प्रकारच्या आतरराष्ट्रीय परिषदाही जिनीव्हामधे घडत असतात आपल्याकडे नाही का, वराकडचे लोक धुळ्याचे तर वधूकडचे लोक कोल्हापूरचे पण लग्न मात्र पुण्यात, तोच प्रकार आमच्या तिथल्या वास्तव्यात ऱ्होडेशियावरची परिषद जिनीव्हामधे घडली होती नि शस्त्रीकरणावरची परिषद न्यूयॉर्क आणि जिनीव्हा या ठिकाणी वर्षातून दोनदा घडत असे

जिनीव्हाच्या सृष्टिसौंदर्याबद्दल ऐकलेल वर्णन किती ततोतत खर होत याची प्रचीती जिनीव्हा आणि आजुबाजूचा परिसर बघताना येत असे जूरा टेकड्यामधून वळसे घेत जाताना, इटरलाकेनच्या पर्वतराजीतून किंवा लुसर्न तलावाकडे जातानाचा सपूर्ण निसर्ग कोरलेल्या शिल्पकामासारखा रेखीव असायचा शेत नेहमी नागरून ठेवलेली असत शेतात किंवा आजुबाजूच्या परिसरात चिटपाखरूही दृष्टीस पडायच नाही, मात्र सर्व कस जिथल्या तिथे तयार करून ठेवलेल, जणु रात्री जादूची काडी फिरवावी

अस उतरणीवरचे पायऱ्या पायऱ्याचे द्राक्षाचे मळे ऑगस्ट सप्टेंबरमधे अगदी तयार व्हायचे आणि सगळीकडे वाईन टेस्टिंगचा मूड सुरू व्हायचा ठिकठिकाणी हे वाईन टेस्टिंगचे उत्सव साजरे होत असत 'बोजोले' ही तिथल्या लोकाची आवडती वाईन बागेत (खास फ्रेंच ब्रेड) वर चीजचा तुकडा आणि शेजारी बोजोलेचा भरलेला गडू म्हणजे स्विस माणसाची ब्रह्मानदी टाळी लागत असे

लाल जिरॅनियमच्या कुड्यानी सजलेली घर हे स्वित्झर्लंडच खास वैशिष्ट्य होत लाकडी दुमजली घर (त्याना रॉले अस सबोधन होत) आणि समोर टागलेल्या लाल कुडया हे दृश्य जूरा टेकड्यामधे सततच बरोबर असे हिवाळ्यामधे हे जूरा पर्वत बर्फाचे आच्छादन आणि बर्फाचे टोप पाघरून बसत हिवाळाभर हे बर्फ रहात असल्याकारणान लहान मुलाना आणि नवशिक्या लोकांना स्कीईंग शिकायला जूरा टेकड्या फार उपयोगी पडत तिथे उत्साही, शिकाऊ स्कीअर्सची गर्दी होऊन जात असे लहान मुल रोबगॉनिंग (बर्फावरून घसरणाऱ्या गाड्या) करत असत स्कीईंग हा स्विस लोकाचा अत्यत आवडता खेळ उत्साही स्कीईंगपटू आल्पस् पर्वतामधे शामोनीच्या बाजूला फ्रान्समधे तर स्वित्झर्लंडमधे इटरलाकेन जवळ यूँ फ्रा शिखराच्या बाजूला खास स्कीईंगसाठी जात असत बऱ्याचशा श्रीमत स्विस लोकाच्या पर्वतामधे कुट्या असायच्या वीकएड तिथे घालवून ते आजुबाजूच्या पर्वतराजीत स्कीईंगला जात असत मुलाना स्किईंग शिकवण्याची खास शाळेतर्फे व्यवस्था करण्यात येत असे

स्वित्झर्लंडमधे परत एकदा छोट्या देशात रहाण्याचा अनुभव घ्यायला मिळत होता आणि डोंगराच सान्निध्यही परत लाभल होत बर्फाच्छादित पर्वताशी आमच नातच जडल असाव कारण थोड्या अवधीनतर आम्ही परत तशा देशात आलो होतो हिमालयाच्या अफाट विस्तारानतर आल्पस्ची राग केवढीशी दिसत होती मात्र ही बर्फाच्छादित शिखर बघूनही मनाला तशीच शाती मिळत असे

सृष्टिसौंदर्याबरोबर स्वित्झर्लंडबद्दलची आणखी एक नेहमीची कल्पना म्हणजे स्विस बँका आणि त्यामधले गुप्त व्यवहार. स्विस बँकानी आपल्या देशाच्या तटस्थतेचा फायदा घेऊन जगातल्या अनेक भागातून रकमा आणि भाडवल आपल्याकडे आकर्षल आहे स्वित्झर्लंडमधल्या नबर अकाउटमधे पैसे ठेवले असताना बाहेरच्या कोणत्याही व्यक्तीला एवढच काय तर सरकारलाही त्यासबधीची माहिती मिळू शकत नाही स्विस सरकार याबाबतीमधे कुणाचीही मदत करायला उत्सुक नसते, आणि सतत बँकाच्या स्वातत्र्याकडे बोट दाखवते

स्वित्झर्लंडच प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे स्वत जवळ कुठलीही साधन सामग्री नसताना आणि युरोपमधल्या प्रबळ आणि सघर्षग्रस्त देशानी वेढलेल असताना देखील स्वित्झर्लंडन गेली कित्येक शतक आपल स्वातत्र्य साभाळल आहे आणि हे प्राप्त करताना तटस्थ भूमिका पत्करली आहे. परतु केवळ तटस्थतेच्या राजनीतीमुळे देशाच स्वातत्र्य आणि आर्थिक सुस्थिती सरक्षित ठेवता येईल असा त्यानी गैरसमज केलेला नाही स्वित्झर्लंडजवळ अत्यत आधुनिक शस्त्रास्त्रानी परिपूर्ण सेना आहे याच कुणालाही आश्चर्य वाटेल देशाची लोकसख्या केवळ ६०-६५ लाख असल्याकारणान प्रत्येक तरुणाला आणि धडधाकट माणसाला सैन्यामधे २-२॥ वर्षं सक्तीच शिक्षण घ्याव लागत आणि नतरही दरवर्षी काही दिवस त्याची उजळणी करावी लागते स्विस विमान दलाची बरीच विमान देशाच्या दुर्गम पर्वताच्या कड्या कपारींमधे बोगदे करून लपवलेली आहेत आणि आवश्यकता भासल्यास त्यातून बाहेर येऊन उड्डाण करायची व्यवस्था त्यानी योजलेली आहे.

स्वित्झर्लंडमधे नागरी सरक्षणाबद्दल खूप बघायला मिळाल सर्व उच इमारतींना तळघर असायची आणि त्यात काही खोल्या कॉंक्रीट आणि लोखडान बनवलेल्या असायच्या उद्देश असा की अणुयुद्ध जरी झाल तरी लोकाना अपाय न होता सुरक्षित रहाण्याची व्यवस्था असावी मात्र आजुबाजूच्या शक्तिशाली देशानी (फ्रान्स किंवा जर्मनी) स्वित्झर्लंडवर आक्रमण केल तर या योजना फोल ठरतील याची त्याना पूर्णपणे जाणीव आहे, त्यामुळेच स्वत ला तटस्थ ठेवण्यासाठी आणि आतरराष्ट्रीय सघर्षात न पडण्यासाठी त्याचा आटोकाट प्रयत्न चालू असतो स्विस लोकशाहीनुसार महत्त्वाच्या अतर्गत प्रश्नावर निर्णय घेण्यापूर्वी त्याच्या कॅन्टॉनमधे (या देशामधली अनेक जिल्हेवजा राज्य) लोकमत घ्याव लागत स्वित्झर्लंडच सयुक्त राष्ट्रामधल सदस्यत्व इथल्या कॅन्टॉनस्नी कितीतरी वेळा नाकारल आहे

स्वित्झर्लंड हा एक अत्यत पुढारलेला औद्योगिक देश आहे याची कित्येकाना कल्पना नसते सीबा, रोश, हॉफमनसारख्या औषधाच्या प्रसिद्ध कपन्या, 'नेसले' ही दुधाची भुकटी आणि चॉकलेटस् बनवणारी कपनी तसच सुलझर रोटी ही आधुनिक कापड यत्र सामग्री बनवणारी कपनी भारतातही परिचित आहेत शस्त्रसामग्री बनवण्यामधेही स्वित्झर्लंड पुढे आहे. स्विस घड्याळ तर गेली कित्येक शतक आघाडीची वाटचाल करत आहेत आणि स्वित्झर्लंडच्या औद्योगिकीकरणाचा अविभाज्य भाग आहे. [illegible] कार्टझ घड्याळ बाजारात आणून स्वित्झर्लंडच्या या परपरागत धद्याला शह देण्याचा प्रयत्न केला होता परतु स्विस लोकानी परत आपली योजकता दाखवून स्वॉच नावाच स्वस्त, मात्र उत्तम दर्जाच घड्याळ निर्माण करून जगातल्या बाजारपेठेत [illegible]

आपली पकड घट्ट केली भारत आणि स्वित्झर्लंडमधे मोठ्या प्रमाणावर व्यापार आहे तसच स्वित्झर्लंडमधले अनेक कारखानदार भारतातल्या उद्योगधद्यांबरोबर समन्वित योजना सुरू करण्यासाठीही उत्सुक आहेत

आम्ही स्वित्झर्लंडमधे होतो त्या काळात भारतीय वकिलातीतल्या मुलाना स्विस शाळामधे जाऊन फ्रेंच भाषेत शिक्षण घ्याव लागत असे इग्रजी माध्यमातून शिकवणाऱ्या अमेरिकन शाळा तिथे होत्या मात्र त्याच्या फीज, प्रचड असत आणि भारतीय अधिकारी स्वखर्चान या शाळामधे मुलाना कधीच पाठवू शकत नसत (स्विस शाळा मात्र मोफत होत्या ) आता गेल्या काही वर्षांपासून भारत सरकारकडून अमेरिकन शाळाच्या फी मिळू शकतात आणि मुल शालेय शिक्षण सपेपर्यंत आईवडिलाजवळ राहू शकतात मात्र ऐंशी सालापर्यंत ही सोय नव्हती आमच्या मुलींनी शालेय शिक्षणाची सुरुवात फ्रेंच भाषेत केली त्याची आपापसातली गुपित तेव्हा फ्रेंच भाषेत चालायची

जिनीव्हातल्या काही उत्साही भारतीय मडळींनी एकत्र येऊन भारत मडळ स्थापन केल होत तिथल्या आतरराष्ट्रीय परिसरात या मडळातर्फे भारतीय सण साजरे केले जात त्यासाठी उत्साहान सास्कृतिक कार्यक्रम बसवले जात असत परदेशामधे आपले सणवार साजरे करता येण याला मुलाच्या दृष्टीन फार महत्त्व आहे. देशापासून सतत दूर राहिल्यानतर आपल्या परपरा, चालीरीती, आपले उत्सव या सर्वांची माहिती या प्रसगाच्या निमित्ताने मुलाना होत असते सर्वांनी एकत्र येऊन हे प्रसग साजरे करण्यामधे आपले आप्त स्वकीय जवळ नसल्यामुळे भासणारी उणीव थोड्या अशान भरून निघते कारण परदेशात मित्रमडळीच कुटुबातल्या व्यक्तींइतकी जवळची वाटू लागतात सुखदु खाच्या प्रसगी साथ द्यायला तेच बरोबर असतात

जिनीव्हाच्या आतरराष्ट्रीय सस्थामधे काम करणारे भारतीय बहुसख्येने भारत मडळाच्या कार्यक्रमामधे सामील होत असत पधरा वीस वर्षं सतत स्विस लोकाच्या सान्निध्यात राहूनही त्याच भारतीयपण कमी झाल नव्हत आपली सस्कृती टिकवण्याची भारतीयाची आच जगात सगळीकडे वाखाणण्याजोगी आहे. स्विस लोकाना मात्र परदेशीयाच वावड नाही त्याना त्याच्या जीवनात जराही बदल झालेला खपत नाही परदेशातले कुणी व्ही आय् पी आले की जिनीव्हातल सुरक्षेच प्रमाण वाढत असे त्याचा त्याना लगेच जाच वाटायला लागायचा घरी बोलावलेल्या पाहुण्याना काही मिनिट जरी उशीर झाला तरी स्विस माणूस अस्वस्थ होऊन येरझारा घालायला लागत असे

ऑगस्ट महिन्यात जिनीव्हामधे मोठी जत्रा व्हायची सर्व स्विस मडळी आपापले एकलकोंडेपणाचे बुरखे त्या रात्रीपुरते काढून टाकतात आणि जत्रेचा आनद लुटतात

रात्रभर तलावाच्या काठचा रस्ता पुंग्याचे आवाज, केक आईस्क्रीमचे स्टॉलस यानी गजबजलेला असे रात्रभर कॉनफेटीचा खच या रस्त्यावर पडलेला असायचा उन्हाळा आल्याचा आनद व्यक्त करण्यासाठी ही जत्रा असावी अस मला नेहमी वाटायच कारण युरोपीय लोकाना स्वेटर आणि कोट न घालता हिंडायला मिळण्याचे दिवस कमीच जून ते सप्टेंबर या उन्हाळ्याच्या सीझनचा ते जास्तीत जास्त उपभोग घेतात समुद्रकिनारी जाऊन सूर्यप्रकाशात सचैल स्नान करण हा त्याचा आवडता कार्यक्रम हिंवाळ्यातली ती धूसर कोरडी हवा, पान गळालेली ओकी बोकी झाड आणि शहरावर तरंगणारा धुक्याचा थर या सर्वांचा या तीन महिन्यात विसर पडलेला असायचा

उन्हाळा आल्यावर पाहुणे येण्याचीही नादी होत असे जिनिव्हामधल्या वास्तव्यात आपल्या हितचिंतकाची सख्या किती अफाट आहे याची जाणीव झाली अमेरिकेहून भारताला परतताना, युरोपमधे कुठे कॉन्फरन्स असल्यास जिनीव्हामधे आमच्या सहवासात एखादा दिवस घालवून जाण्याचा मोह कित्येकाना आवरत नसे. पूर्वी ज्याची कधी गाठही पडलेली नाही असेही कुणाचे कुणी असणारे पाहुणे आमच्याकडे येऊन थडकत कुणी मॉरिशसहून यायचे, कुणी बेल्जियमहून तर कुणी मुबईहून आमच्या घरी असताना, भारतात आल्यावर आमच्याकडे आलच पाहिजे ह अस अगदी अघळपघळ आमत्रण देऊन जायचे आणि आम्ही खरच भारतात गेल्यावर गायब व्हायचे! माणसाचे किती प्रकार या एवढ्याशा अवधीत पाहिले असतील स्थान महात्म्यामुळे आलेल्या बऱ्याचशा पाहुण्याचा आणि आपला पुढे फारसा सबधही येणार नाही याची पूर्ण कल्पना असायची 'कर्मण्येवाधिकारस्ते' या न्यायान आलेल्या पाहुण्याच यथायोग्य स्वागत करण हा राजनैतिक जोडप्याचा स्वभावधर्म बनून जातो आम्हीही त्याला अपवाद नव्हतो आलेल्या पाहुण्यासाठी आल्पस्च्या टूर्सची वेळापत्रक, शामोनीच्या बसेसच्या वेळा, सर्व टूरिस्ट मटेरियल तयार असायच आणि रात्री गरम जेवणही आमचे नित्यनियमाने येणारे कित्येक पाहुणे आम्ही जिनीव्हा सोडून जाणार हे ऐकल्यावर हळहळले होते

हापूसच्या आब्याची चव जिभेवर रेंगाळत असावी आणि कुणी आवळा आणून पुढे करावा, कस वाटेल ? जिनीव्हातल्या अत्याधुनिक इमारतीत आठव्या मजल्यावरच्या अद्ययावत् किचनमधे कॉफी मशीनमधली एक्स्प्रेसो कॉफी पीत असताना यानी येऊन एकदम स्फोट केला की आता इथून पुढे आगेकूच रगूनला, तेव्हा मला एकदम ठसकाच लागला बदलीच्या नोकरीत दर तीन वर्षांनी चंबूगबाळ आवरून मुक्काम हलवण्याची सवय आम्हा बदलीकराना असतेच एका जागेत दोन अडीच वर्ष काढल्यावर आता या स्थळाचा आणि आपला सबध सपत आला याची जाणीव होऊन हळूहळू नकळत मन तिथून विरक्त होऊ लागत ज्या घरान आपल्या सुखदु:खात निर्भीडपणे साथ

दिली ते घर आता आपण आयुष्यात कधीच पाहणार नाही या कल्पनेन मन आधीच उदास झालेल असत भितीवरचा वॉलपेपर नीट करायला हवा, सीलिंग परत एकदा रगवायला हव, किचनमधे व्हाईटवॉश करायला हवा या गोष्टींना आपण उगीचच अवास्तव महत्त्व देतो हे एकदम जाणवू लागत कारण इतक सुदर करून ठेवलेल घर कुणासाठी तरी सोडायच असत

हे सगळ तत्त्वज्ञान सामान्य परिस्थितीतल या नदनवनातून पृथ्वीवर पाय ठेवावे लागणार या कटु सत्याची बोचही मनाला होती विदेश मत्रालयातून त्याच दिवशी ऑर्डर आल्याच यानी जाहीर केल्यावर लुंगी घातलेल्या स्त्रिया, स्ट्रॉ हॅट घातलेले पुरुष आणि पगोडाची चित्र माझ्या डोळ्यासमोर तरळायला लागली

रंगून हे एकेकाळच अगदी व्यापारासाठी प्रसिद्ध आणि गजबजलेल शहर. हिरे माणकाच्या या देशाचे २० वर्षानतर राहिलेत ते फक्त अवशेष अशीही माहिती मिळाली ज्या जागी जायच तिथली माहिती काढण भाग होतच विदेश मत्रालयाच्या रहाणीमानाची पुस्तिका ताबडतोब मागवली रगूनमधे काडयापेक्षा, मेणबत्त्या, सुईदोरा इत्यादी बारीक सारीक गोष्टी मिळत नाहीत हे जेव्हा वाचल तेव्हा आपल्या देशाची प्रगती, सुबत्ता याची महती प्रकर्षाने जाणवू लागली रगूनला राहून आलेले तीन-चार जण त्या १५-२० दिवसात भेटले. जागतिक आरोग्य सघटना, कामगार सघटना किंवा सयुक्त राष्ट्रासारख्या आतरराष्ट्रीय सघटनामधले काम करणारे लोक आफ्रिकेतल्या गबॉन, दारेसलाम, सेनेगाल तर आशियाई देशापैकी ब्रह्मदेश, फिलीपाईन्स, बागला देश अशा ठिकाणी कामानिमित्त फिरून आलेले असतात या विकसनशील देशाना भेटी देऊन परत 'यू. एन.' कल्पवृक्षाच्या छायेत येऊन पहुडले की नोकरीतही बढती मिळते आणि जिनीव्हातला भोज्याही बळकट होतो अशा ठिकाणाची खुलवून वर्णन ऐकावीत ती त्याच्याकडूनच मलेरियावर एक्स्पर्ट असलेले आमचे मित्र नुकतेच रगूनला जाऊन आले होते आम्ही लौकरच रगूनला जाणार हे ऐकल्यावर क्षणभर त्याचाच चेहरा क्विनाईन खाल्ल्यासारखा झाला "वा, फारच चॅलेंजिंग पोस्टिंग आहे बर का!" एखाद्या जागेच वर्णन करायला फारसे वाईट शब्द वापरावे लागू नयेत म्हणून सभ्य भाषेत त्याला चॅलेंजिंग म्हणतात परराष्ट्र खात्याच्या शब्दकोषातला हा खास शब्द आहे (उदा आफ्रिकेतली बरीच ठिकाण 'चॅलेंजिंग' आहेत )

ज्याच्या त्याच्या तोंडून वीस वर्षांपूर्वीच्या रगूनची वर्णन खूप ऐकायला मिळत होती तेव्हा ते पूर्वेकडच पॅरिस होत अशा थाटाची वर्तमानकाळाबद्दल बोलायला मात्र कुणी तयार नव्हत थोडक्यात आता फारस सागण्यासारख नव्हतच "आता

तुम्ही अगदी महाराजासारखे रहाल नोकरचाकर, बगला, फर्निचरही करून घ्या प्रसिद्ध बर्मा टीकच '' अशा प्रकारच्या वर्णनानी रगून ही जागा कशी आहे याच्यावर फारसा प्रकाश पडतच नव्हता तीन वर्षं काय आम्ही फर्निचरवर तग धरणार होतो ? ILO मधल्या आमच्या दुसऱ्या एका मित्राला आम्ही थट्टेत म्हटल, आमची बदली कुठे झाली आहे ओळख बघू. त्याची उत्स्फूर्त प्रतिक्रिया म्हणजे ''कुठेही जा, रगूनला जाऊ नका म्हणजे झाल '' आमचे चेहरे पडले हे सागायला नकोच वाचायला चिकार पुस्तक घेऊन जा कारण तिथे वेळच वेळ आहे, करायला दुसर काही नसणारच, हा अतिशय मोलाचा सल्ला त्यानी आम्हाला दिला औषध तर ॲनॅसिन, इनोज फ्रूटसॉल्टपासून ते ॲटी बॉयोटिक्सपर्यंत सर्व न्या हे तीनतीनदा बजावून सागितल 'शहर मात्र अतिशय हिरवगार आहे. नारळाच्या झाडाच्या पार्श्वभूमीवर रात्रीच्या निरभ्र आकाशात चद्र उठून दिसतो अस आपल्यापरीन काव्यात्मक वर्णनही त्यान केल मुलाना पुढची तीन वर्षं आजारी पडू नका अस सागून आम्ही रगूनच्या तयारीला लागलो

जूराममधले ड्राईव्हज्, ओल्ड टाऊनमधली राकलेट, फॉड्यूची रेस्टॉरटस, आता कशातच मन लागत नव्हत नेसलेच चॉकोलेटही गोड लागेना व्हेव्हे हे गाव मॉंत्रोजवळच चार्ली चॅपलिनच मुलाच्या हट्टान परत एकदा बघून आलो 'बदली' हा विषय मुलाना एकदम प्रिय त्यातला बडगा फारसा त्याच्या अनुभवाला येत नाही आणि काहीतरी एक्साईटमेंट हवीच असते धाकटीच्या रडण्याच्या बाहुलीच्या एक्स्ट्रा बॅटरीज तर मोठीचे जीनला फाटलेल्या ठिकाणी लावायचे पॅचेस्. तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी खरेदीच्या यादीमधे वाढत होत्या आणि मी लेटर पॅडस्, टॉयलेट पेपर, कपडे, तेल-तुपाचे डबे यातल काय घेऊ आणि किती घेऊ या विवचनेन ग्रासलेली जोडीला मित्रमडळींनी अत्यत कल्पकतेन योजलेल्या निरोप समारभाची गडबड

बदलीच्या पूर्वतयारीचा काळ आणि नवीन जागी आल्यावर स्थिरस्थावर होईपर्यंतचा अवधी म्हणजे घरात कार्य काढल्यासारखा धामधुमीचा आणि गोंधळाचा असतो सामानाची आवराआवर, त्यातला कशाचाही न सुटणारा मोह त्यामुळे वाढत जाणाऱ्या विवचना, काय काय नवीन घ्यायच, कुणाला काय द्यायच त्याच्या करायच्या नोंदी, कुणाकुणाला बोलवायच राहिल आहे, त्याच्या आठवणी मग सर्व काम लिहून ठेवलेला कागद कुठे हरवला म्हणून शोधाशोध, दर तीन वर्षांनी ही लगीनघाई अनुभवून सुद्धा प्रत्येकवेळी तीच नव्याची नवलाई

बघता बघता जायचा दिवस उजाडला मित्रमडळी फुलाचे गुच्छ घेऊन विमानतळावर आली होती आम्ही जिनीव्हा सोडून जाणार याचा त्याना खेद होताच पण आम्हाला

रगूनला जाव लागतय याचा विषाद त्याच्या नजरामधे स्पष्ट लिहिलेला होता जिनीव्हाचा परिचित झालेला विमानतळ आता आपल्यालाही निरोप देणार हे अजूनही खर वाटत नव्हत सतत येणाऱ्या पाहुण्याच्या निमित्तान विमानतळाची वाट केव्हाच पायाखालची होऊन गेली होती. विमानात चढताना मात्र आता जिनीव्हाचा लेक लेमान, शामोनीची पर्वतराजी, मॉंत्रोचा शातो द शियॉं कदाचित् पुन्हा कधीच दिसणार नाही याची जाणीव झाली आणि मन विषण्ण होऊन गेल विमानान आकाशात गरुडासारखी भरारी घेतली आणि जिनीव्हाचा परिसर बघता बघता नजरेआड झाला डोळे ताणून बघितल तरी काही दिसेना जिनीव्हाचा ऋणानुबध सपला याचीच ती निशाणी नव्हती काय !

★ ★ ★

# रंगून-ब्रह्मदेश

विमानाच्या प्रवासाची मला नेहमी धास्ती मग मी कुठ जातय—वाशिग्टनला, का रगूनला यान त्यात काही फरक पडत नाही भीती वाटायची ती वाटतेच आणि विमान सुरक्षितपणे पोचल की स्वर्ग सात बोट उरल्यासारखा मला आनद होतो विमानात ज्यावेळी बसते तेव्हापासून माझा पाप-पुण्याचा घडा भरत तर आलेला नाहीना या चिंतेन मन ग्रासलेल असत एकदा मुक्कामी पोचले की ती चिंता आपोआप विरल्याला जाते त्यातून बर्मा एअरचा हा पहिलाच प्रवास कुठल्याही दुसऱ्या देशात जाताना एअर इडियान गेल की कुणीतरी बोट धरून पोचवल्यासारख वाटत ब्रह्मदेशात बर्मा विमानान जाण्याखेरीज दुसरा पर्यायच नव्हता कलकत्ता विमानतळावर इतर देशाना जायला सिद्ध असणाऱ्या एअर इडियाच्या विमानाकडे जड मनान पहात ब्रह्मदेशाच्या छोट्याशा दिसणाऱ्या विमानात आम्ही बसलो

घारीसारखी झेप घेऊन आमच्या विमानान वेग घेतला आणि अलगद ढगाच्यामध्ये विराजमान होऊन ते एकसथ लयीत चालू लागल अवतीभोवती बघितल तर चट्ट्यापट्ट्याच्या लुग्या नेसलेली माणस साधारणपणे आपल्या डोळ्यासमोर विमानाचा प्रवासी असतो त्यापेक्षा अगदीच निराळी त्यामुळे ब्रह्मदेशाच्या अद्भुत जगाचा माझा पहिला परिचय विमानातच झाला ब्रह्मदेश खरा तर आपला अगदी जवळचा शेजारी

पण नेपाळ, भूतान, बागला देश, पाकिस्तान या देशाना सभाषणात जितक प्राधान्य मिळत तेवढ ब्रह्मदेशाबद्दल बोलताना कधी कुणी आढळत नाही गेली काही वर्ष ब्रह्मदेशान सर्वच देशापासून स्वत ला इतक अलिप्त ठेवल आहे की आपण तिथे गेल्यावर अलिबाबाच्या तिळेत गेल्यासारख तिळेच दार बद होणार की काय अस काहीस दडपण मनावर आल होत

रगूनचा विमानतळ दिसायला लागल्यावर जिवात जीव आला रगूनचा विमानतळ छोटासाच पण टुमदार आहे. विमानापासून विमानतळाच्या इमारतीपर्यंत चालतच जाव लागत जोरदार पाऊस असला तर विमानाच्या क्रू जवळ छत्र्या असतात त्यातली एक छत्री उघडायची आणि चालायला लागायच हा अनुभव जरा वेगळा आणि नवीन होता क्षणभर नागपूरच्या विमानतळावर असल्याचाच भास झाला अर्थात् आत गेल्यावर सर्व पाट्या ब्रह्मी भाषेत बघून आपण परदेशात असल्याची जाणीव झाली

विमानतळापासून ते शहरापर्यंतचा पल्ला बराच लाबचा आहे. रस्त्यातून जाताना नजरेत भरते ती दुतर्फा झाडी आणि ठिकठिकाणी विखुरलेली तळी दुपारच्या रखरखीमधे या गर्द हिरव्या झाडीनी डोळ्याला जरा गारवा मिळतो शहराच्या मध्यभागातल्या हमरस्त्यावरून गाडी जात असताना एकदम सोन्याचा कळस दिसायला लागतो रगून शहरातला हा श्वेदगॉग पगोडा फार प्रसिद्ध आहे. बुद्धाच हे देऊळ दिवसभर भक्तगणानी गजबजलेल असत इथली एक प्रचड आकाराची घटा एकदा वाजवली की रगूनला परत यावच लागत असा इथला समज ! चद्रप्रकाशात निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर या पगोडाची सोन्याची झिलई आणखीनच उठून दिसते हा पगोडा आपण बौद्धधर्मीय देशात असल्याची जाणीव करून देतो

ही हिरवीगर्द झाडी रगून शहरात सर्वत्र साथ देते रस्ते खूप रुद आणि वाहतूकही जाणवण्यासारखी शहराच्या काही भागात कोकणातल्या वाड्याची आठवण होते लाकडाची उच पायावर बाधलेली घर आणि दुतर्फा नारळाची झाड शहराच्या चहुबाजूनी माडव घातल्यासारखी सर्वत्र नारळाची झाड आढळतात पौर्णिमेच्या दुधाळलेल्या रात्री नारळाच्या फाद्यावर चद्र पाहिला की कुणालाही कविता सुचावी इतक ते दृश्य मनावर कोरल जात बाकी रगून शहरात आल्यावर कलकत्याच्या एखाद्या उपनगरात आल्यासारख वाटाव इतक या शहरामधे साम्य आहे. तोच उकाडा, तीच चिकचिक फक्त माणस कमी आणि हिरवळ जास्त शहरातल्या काही गल्ल्याबोळातून जाताना मात्र गिरगावात आल्याचा भास होतो तशाच उच काळवडलेल्या चाळवजा इमारती, खाली ठिकठिकाणी टाकलेल्या पानाच्या पिचकाऱ्या, कोपऱ्याकोपऱ्यावर पानाचे ठेले आणि

उतू जाणारी माणस ठिकठिकाणी, हिंदी चालीवरची पण ब्रह्मी भाषेतली जोरजोरात लावलेली सिनेमाची गाणी ऐकून गमत वाटायची

रंगून शहरावर एकेकाळच्या श्रीमतीची लक्षण स्पष्ट दिसत असली तरी आता राहिली आहे त्याच्यावर आलेली अवकळा जुन्या आलिशान इमारती, मोठमोठी थिएटर्स, एकेकाळची वैभवशाली घर, आता मात्र पोपडे गेलेली, पडझड झालेली अत्यत केविलवाणी आणि कळाहीन दिसतात. शहरात जी बस वाहतूक चालायची त्यातल्या बसेसही दुसऱ्या महायुद्धाच्या काळातल्या असाव्यात तुडुब भरलेल्या उतारूनी त्या एका बाजूला नेहमी कलडलेल्या असत एकेकाळच हे वैभवशाली शहर आता त्याची अवस्था मात्र काळ्या पडलेल्या चादीसारखी

ठेंगणे, ठुसके, काहीस फाटके, गव्हाळ बदामी रगाचे आणि नकटच्या नाकाचे ब्रम्ही लोक चिरतरुण दिसतात जो मनुष्य तिशीतला दिसतो तो असतो खरा पन्नाशीचा स्त्रिया तर फार तरुण दिसतात लुग्या घातलेले पुरुष मात्र जरा बायकीच भासतात एखादी स्त्री रस्त्यावरून चालताना घसरलेला पदर जितक्या सहजपणे सावरेल तितक्याच सहजतेन इथले पुरुष भर रस्त्यात लुगीची गाठ सोडून ती पुढेमागे करून परत बाधतात अशा वेळी त्या इसमाची लुगी खाली घसरू नये ही प्रार्थना हे दृश्य बघणाऱ्यानच करायची

प्रथमदर्शनी ब्रम्ही स्त्रियाच्या व्यक्तिमत्वाची छाप अधिक पडते सुबक बाध्याच्या ब्रम्ही स्त्रिया आकर्षक आणि थोडयाशा मादक दिसतात त्याचे केस काळेभोर, लाब आणि तुकतुकीत असतात, तर अगकाठी परत परत वळून बघाव इतकी सतेज आणि नितळ भासते. चदनासारख्या गुणकारी तनखा झाडाच्या खोडाचा लेप स्त्रियानी लावायची इथे पद्धतच आहे. चादण्यासारखा तो शीतल असतो ब्रम्ही स्त्रियाच्या सौंदर्याच गुपित या तनखाच्या खोडात असाव शरीरावर चपखल बसलेल्या लुंगीतून आणि त्यावरच्या तग पोलक्यामधून त्याच्या अगप्रत्यगाची गोलाई अधिकच जाणवते चदनाचा लेप लावून चाललेल्या विपुल केशसभाराच्या या मदनमस्त तरुणी कालिदासाच्या नाटकाकून उतरलेल्या नायिकासारख्या दिसतात फुलाचा आणि दागिन्याचा स्त्रीसुलभ सोस ब्रम्ही बायकानाही भरपूर आहे त्यातून हा देश तर हिरे, माणक, पाचूसाठी प्रसिद्ध ! हिरे, माणक ल्यायलेल्या पुरध्री इथे सर्रास दिसतात बँकेत पैसा ठेवण्यापेक्षा दागिन्यामधे गुतवण्याची प्रवृत्ती इथेही अधिक गळयात लाल चुटूक माणकाची कठी, हातात अगठी, डोक्यावर नारदमुनींसारख्या केलेल्या केशरचनेवर हिऱ्याचा नाहीतर माणकाचा सर आणि एजीवरची (लुगीवरचे ब्लाऊज) मॅचिंग लाल माणकाची बटण

असल्याशिवाय ब्रम्ही ललनेचा साज पूर्ण होऊ शकत नाही स्वत ला न पेलणाऱ्या वजनाच्या मोत्याची कठमाळ घालणाऱ्या सोसमावशा इथे बऱ्याच दिसतात बेकरीमधे केक बिस्किट विकणाऱ्या विक्रेत्याच्या कानातही चमचमणाऱ्या हिऱ्याच्या कुडचा असतात मात्र तरुण स्त्रियापेक्षा वयस्क स्त्रियामधे दागिन्याची आवड अधिक आढळते

इथला समाज स्त्रीप्रधान आहे. लग्न झाल्यावर बायकोला नवऱ्याच्या घरी जाव लागत नाही तर नवराच मुलीच्या आईवडिलाकडे येऊन राहतो मुलीला माहेरी राहून आपले पूर्वीचे आयुष्य कायम ठेवून विवाहसौख्य अनुभवायला मिळते पुढे मुलबाळ झाल्यावर आई साभाळ करीत असल्यान मुलीला कुठलीच गैरसोय सहन करावी लागत नाही स्त्रिया जास्त अधिकारवाणीन बोलू शकतात आणि नवरे त्याच्या हो ला हो म्हणत असतात आयुष्यातून अधिकाधिक आनद कसा लुटता येईल हे इथल्या स्त्रियाकडून शिकण्याजोगे आहे स्वयपाकाच फारस स्तोमही त्या माजवत नाहीत मुलाना शाळेत पाठवून ब्रम्ही स्त्री बाजारहाट करायला गेली की तिथेच एक प्लेट खाऊसवे (नूडल्सची ब्रम्ही डिश ऊर्फ चुटचुटीत जेवण) खाऊन ती आपल्या पुढल्या कामाला जाते तरुण मुलामुलींना इथे केव्हाही एकत्र भेटण्याच स्वातत्र्य आहे. ब्रम्ही तरुण-तरुणींची जोडपी दिवसाच्या कुठल्याही वेळी रस्त्यात, बागेत, तलावाजवळ हातात हात घालून स्वैर विहरताना दिसतात त्याच्याकडे दुसऱ्यादा वळूनसुद्धा कुणी बघत नाही इतकी इथल्या लोकाना अशा दृश्याची सवय आहे. इथला समाज स्त्रीप्रधान असला तरी इथल्या लष्करी राजवटीत स्त्रियाना अजिबात स्थान नाही

ब्रम्हदेशीय लोकाच्या शब्दकोषात घाई आणि गडबड हे दोन्ही शब्द नाहीत सर्व व्यवहार सथ गतीन चाललेले असतात जगात इतरत्र काळ धावतो तर इथे तो चक्क थाबल्यासारखा वाटतो हा देश सुपीक आहे आणि लोकसख्या बेताची असल्यान त्याना खाण्यापिण्याची भ्रात नाही फारसे परिश्रम न करता सर्वानाच पुरेस खायला मिळत त्यामुळे स्वत ला तोशीस लावून काम करायची सवयही इथल्या लोकामधे दिसत नाही त्याच्याकडे आधुनिक साधन फारशी उपलब्ध नाहीत आणि अतिशय आरामप्रिय असल्यान कुठल्याही गोष्टींसाठी ते धडपड करताना आढळत नाहीत

ब्रम्हदेशात थेरावाद ऊर्फ हीनयान शाखेचा बौद्धधर्म प्रचलित आहे. हीनयान शाखेच्या बौद्धधर्मात रूढी आणि अन्हिकाच महत्त्व त्यामानान कमी आहे. तरीही बौद्धधर्मात रूढ झालेले आचार विचार लोक अजूनही आचरणात आणताना आढळून येतात आपण मुलाची मुज करतो तसच ब्रह्मी समाजात मुलाला ठराविक वयानतर सात दिवस बौद्ध भिक्षूकडे नेऊन सर्व प्रकारचे धार्मिक विधी करून घेण महत्त्वाच समजतात

हा प्रसग मोठा सोहळ्याचा असतो मग ते कुटुब गरीब असो अथवा श्रीमत बौद्ध भिक्षूच (त्याना इथे पौंजी म्हणतात) ब्रम्ही समाजातल स्थान सर्वात वरच आहे.

कुठल्याही सणाच्या प्रसगी आधी भिक्षूला मान आणि मग इतर वयस्क व्यक्तींचा मान केला जातो आपल्याहून वडील माणसाचा आदर करण्याची आपली परपरा फार जुनी मात्र दिवसेंदिवस तिच महत्त्व कमी होऊ लागल आहे. पाश्चिमात्य देशात तर तिचा अभावच आहे. ब्रम्ही समाजात मात्र ही प्रथा पूर्वीइतकीच अजूनही रूढ आहे. बौद्धधर्माची शिकवण ब्रम्ही लोकाच्या रोजच्या जीवनात पुरेपूर भिनली आहे अस या समाजाकडे पाहून वाटत आपल्या प्राक्तनावर ते विसबून असतात

इथल बेकारीच प्रमाण पाहून कुणाचीही मुवई उचावली जाईल कितीतरी ग्रॅज्युएट झालेले तरुण मोटार ड्रायव्हरचे किंवा बेअररचे काम करताना आढळायचे तरीही नोकरी मिळवण्यासाठी खास धडपड करतानाही कुणी दिसत नसे कुणीही उठाव आणि काळ्या बाजारात वस्तू विकून पैसे मिळवावे पैसे मिळवण्याचा हा सोपा मार्ग उपलब्ध असताना नोकरीसाठी यातायात करायचे परिश्रम घ्यावेतच कुणी ? इथे प्रत्येक जुन्या वस्तूलाही मोल असत ब्रम्हदेश मागासलेला असेल पण या शहराच्या ऐन मध्यभागी असलेल्या खुल्या काळ्या बाजारात युरोप, अमेरिका आणि जपानमधे बनणाऱ्या कॉस्मेटिक्स पासून ते व्हिडिओपर्यंतची सर्व अद्ययावत् यत्रसामग्री उपलब्ध होती त्या त्या देशामधून चोरट्या मार्गानं आणून त्या वस्तू बाजारात अव्वाच्या सव्वा किंमतीला विकल्या जात असत बाजाराच नावच मुळी ब्लॅकमार्केट होत, आणि ब्रम्ही लोक सढळतेन या बाजारातून वस्तू खरेदी करायचे

ब्रम्हदेश हा देशही फार उत्सवप्रिय! दर महिन्याला त्याचा कुठला ना कुठला तरी सण असायचा एप्रिलमधे येणारा 'थिनग्यान' हा सर्व सणाचा केंद्रबिंदू—आपल्या गुढीपाढव्यासारखा त्याचा तो नव्या वर्षाचा दिवस एप्रिलमधे उकाडाही शिगेला पोचलेला असतो सर्वांनी एकमेकावर पाणी उडवून हा सण साजरा केला जातो तीन दिवस हा सोहळा चालतो पाण्यान भिजलेल्या वसतसेना पहाण्यासाठी कितीतरी चारुदत्त वर्षभर अधीर होऊन वाट पाहात असतात 'अगे भिजली जलधारानी' या मृच्छकटिकेतल्या प्रसगाची कितीतरी वेळा आठवण झाली कारण मोठमोठ्या होजपाईप्सच्या साहाय्यान ही जलक्रीडा चालते लहान मुल घरासमोर पिचकाऱ्या घेऊन सज्ज असतात जो कुणी त्यावेळी रस्त्यावरून जाईल तो नखशिखान्त भिजतो गावात ठिकठिकाणी रगमच उभारून रात्री नृत्याचे कार्यक्रम आयोजित केलेले असतात

आमच रगूनमधल जीवन म्हणजे जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणी कलेक्टर आणि त्याच्या सचाच असाव अस तिथल्या जीवनात पुरेपूर गुरफटून घेण्याशिवाय गत्यतरच नव्हत

रगूनमधल वास्तव्य आनददायी बनवण्याचा तोच एक उत्तम उपाय होता आमच घर नारळाच्या वाडीतच वसलेल होत २५-३० नारळाच्या झाडाच्या झावळ्यानी घराभोवती जणु माडव घातला होता घर छोट आणि आगण मोठ असा आमच्या घराचा प्रकार होता घरापेक्षा बागेतच माझा वेळ अधिक जात असे इतर ठिकाणी घर सजवली तर रगूनमधे बाग ब्रम्ही लोकाना अत्यत प्रिय असलेल दूरियान फळाच झाड आमच्या बागेत होत रगूनमधे फार क्वचितच घराच्या अगणामधे अस झाड असायचं दूरियान पिकल की ते धम्म आवाज होऊन खाली पडायच हे फळ अतिशय [illegible] जात त्याच्या मदनमस्त वासाच्या भपकाऱ्यान आजूबाजूचा आसमत भरून जायचा मात्र तो वास हवासा वाटायला ब्रम्हदेशातच जन्म घ्यायला हवा दूरियानच्या झाडाखाली बसण्यासाठी आमच्या ब्रम्ही मित्रामधे अहमहमिका लागायची सिताफळाच आणि दूरियानच आईस्क्रीम म्हणजे ब्रम्ही लोकाना जिंकण्याच हमखास साधन आमच्या घरातल सडा-समार्जन करण्याजोग कोरड ठणठणीत अगण आमच्या रगूनच्या वास्तव्यात हिरवगार होऊन गेल सुरवटाच फुलपाखरात रूपातर व्हाव अशी आमची बाग बहरली आम्ही लावलेली मोगऱ्याची कितीतरी झाड आमच्या समोर बघता बघता तरारली आलेल्या पाहुण्याच स्वागत प्रथम मोगऱ्याच्या दरवळान होत असे. बागेच्या कोपऱ्यात खास सध्याकाळच्या चहापानासाठी एक झोपडा उभारण्याच्या प्रयत्नातही मला यश मिळाल आणि चुकला फकीर मशिदीत या न्यायान मला शोधायला घरच्या आणि बाहेरच्या माणसाना त्या झोपडीत याव लागत असे

रगूनची वकिलात मोठी होती सर्व मिळून आम्ही ६०-६५ माणस असू. वकिलातीची इमारत शहराच्या मध्यभागी होती चार मजली इमारतीचा एकेकाळी डामडौल असेल तो असेल, आता मात्र ती इतर इमारतींप्रमाणे गरीब, बिचारी कळाहीन दिसत होती राजदूताच घर भव्य, हवेलीवजा होत पुढे प्रचड लॉन आणि बाजूला टेनिस कोर्ट. २६ जानेवारीचा स्वागत समारभ या बागेतच होत असे

आधुनिक युगातून काळाच्या मागे जाण्याचा अनुभव आम्ही ब्रम्हदेशात येऊन परत एकदा घेतला गॅसच्या शेगडीची आठवण काढत मी केरोसीनचा स्टोव्ह पेटवीत असे बटर, कोक, कॉफी, चीज असे पदार्थ तिथे दृष्टीस पडायची खरोखरच मारामार होती ब्लॅक मार्केट आणि स्कॉट मार्केट हे तिथले सर्व गोष्टी शोधण्याचे बाजार. तिथे चादीच्या, लाखेच्या चीजवस्तू मिळण एक वेळ सोप होत, पण नेहमीच्या सवयीच्या खाण्यापिण्याच्या वस्तू मिळण अवघड होत पेनाग (मलेशिया) हून तीन महिन्यात एकदा अशा सर्व गोष्टींचा स्टॉक एकदम येत असे घरातले हे पदार्थ सपले की त्या जहाजाकडे डोळे लावून बसायची वेळ यायची कोक किंवा पेप्सी प्यायला मिळण

हे तिथे अप्रूप होत नेहमी प्यायला मिळणार पेय म्हणजे तिथल्या फॅक्टरीत बनणारा अननसाचा स्क्वॉश

रगूनमधली भाजी मार्केट म्हणजे आपल्याकडली मडई तऱ्हतऱ्हेच्या डाळी, भाज्या आणि पोत्यामधे अनेक प्रकारचे समुद्रातले वळवळणारे प्राणी घेऊन भाजीवाले रस्त्याच्या कडेला बसलेले असतात, आणि कोवळ्या भेंड्या किंवा गवारीच्या शेंगा वेचाव्यात तशा ब्रम्ही बायका हे प्राणी निवडतात चिनी लोकाप्रमाणे सर्व तऱ्हेचे प्राणीमात्र ब्रम्ही लोकाना खायला आवडत असावेत त्याचबरोबर पराठा आणि डाळ हे आपले पदार्थही ते चवीन खातात त्यात सर्वांचे आवडत खाण म्हणजे मासे पहाटे चार वाजता नदीच्या किनारी जाऊन तिथले ताजे मासे विकत आणण्यात ब्रम्ही लोकाना ब्रह्मानद मिळतो आब्याच्या दिवसात बोटी भरभरून आंबे असेच नदीच्या किनारी विकायला येतात मग भाव करून ते शेकड्यान विकत घ्यायचे इथल्या भाजी मार्केटाची शोभा वाढवतात त्या गालाला तनखाचा लेप लावून रुपयाला दहा दहा मोगऱ्याचे गजरे विकणाऱ्या ब्रम्ही कुमारिका रगूनच्या तिळेत बद झाल्याची भावनाहि मधून मधून डोक वर काढीतच असे कारण बाहेरच्या जगाशी सपर्क फारसा नसायचाच ब्रम्हदेशाबाहेर काय चालल आहे याचा पत्ता लागायचा तो आठवड्यातून एकदा डिप्लोमॅटिक बॅग यायची तेव्हा एरवी नारळी पोफळींकडे बघूनच दिवस घालवावे लागत इग्लिश पुस्तकाची लायब्ररी तिथे अस्तित्वात नव्हतीच इग्लिश वर्तमानपत्राचाही दुष्काळ. रगूनहून निघणारी वृत्तपत्रे म्हणजे सत्ताधारी पक्षाची मुखपत्रे यात सक्षिप्त रूपात सेन्सॉर केल्याप्रमाणे जगाची बातमी असे दोन दोन ओळींमधे जगाच राजकारण आटोपून टाकल्यावर वाचणाऱ्याच समाधान व्हाव तरी कस! सिनेमा थिएटर्समधे जाऊन बसण ही शिक्षाच वाटायची इतकी त्या थिएटरची दयनीय अवस्था असे खुर्च्यांखालून उदीर पळत असावेत अशी सारखी शका येत रहायची अमिताभ बच्चनचे सिनेमे तिथेही लोकप्रिय होते तर बॉबीसारखा सिनेमा दहा वेळा बघणारे ब्रह्मी मजनूहि तिथे दिसत पडद्यावरच्या अमिताभला अस्खलित ब्रम्ही भाषेत बोलताना ऐकून गमत वाटायची रेस्टॉरटस्मधे जाऊन बसाव आणि काहीतरी ऑर्डर कराव अशी वाटण्याजोगी रेस्टॉरट नव्हतीच पेट्रोलची स्वस्ताई होती, मात्र ड्राईव्हला जाण्याजोगे रस्ते नव्हते आणि परवानगीशिवाय शहराच्या बाहेर जाताही येत नसे

पुढे पुढे रगूनमधे टी व्ही सुरू झाला सध्याकाळचे दोन तास ब्रम्ही भाषेतले कार्यक्रम त्यावर बघता येऊ लागले व्हिडिओंचा जमानाही तेव्हा नुकताच सुरू झाला होता वर्षातून एकदा होणारा इडियन बझार हेही तिथल आकर्षण होत विशेषत

तिथल्या सर्व प्रकारच्या तुटवड्यामुळे बझारमधे ठेवू त्या वस्तू खपल्या जात असत त्यातून करमणूक आणि दुर्मिळ वस्तूची प्राप्ती हे दोन्ही उद्देश सफल होत नृत्य, सगीत, नाटकाच्या आमच्या छदाला रगूनमधे बहर आला होता अवतीभवती वावरणाऱ्या माणसावर नाटक लिहून त्यात त्या माणसाला स्वत चीच भूमिका करायला लावण्याची मौज मी रगूनमधे अनुभवली अभिनयाची सुप्त कला स्वत कडे असल्याची कित्येकाना तिथे प्रथम जाणीव झाली

इतक असून सुद्धा एखादा दिवस असा उगवायचा की घड्याळयाचा काटा आता पुढे सरकेल तर बर वाटायच कारण वेळ जाता जायचा नाही

मात्र तिथल्या कितीतरी त्रुटी भरून निघायच्या त्या ब्रम्ही लोकाच्या अत्यत सौजन्यशील वागणुकीन ज्या ब्रम्ही लोकाशी आमचा सपर्क आला त्याच्यात सदैव भारतीयाबद्दल आपुलकीची भावना दिसून आली आम्हाला जलमहोत्सवात भिजायच आहे अस एका जलमहोत्सवाच्या सुरुवातीला मुलींनी जाहीर केल तर माझी ब्रम्ही मैत्रीण सँड्रा आणि तिच्या कुटुबान एक स्टेशन वॅगन आणून गावात आम्हाला ठिकठिकाणी फिरवून मनसोक्त जलक्रीडा करवली होती ओनुखाउसवे (नारळाच्या दुधातली चुटपुटीत ब्रम्ही नूडल्सची डिश) बनवायला मला तिनच शिकवल ब्रम्ही बायकाना माजाँगचा अत्यत नाद दिवसाचे तासन् तास त्याच्याबरोबर माजाँग खेळण्यात घालवल्यानतर दिवस पटकन् जायचा डॉ रेजि बापे हे आमचे डॉक्टर पुढे आमचे चागले मित्र बनले आतरराष्ट्रीय परिषदाच्या निमित्तान त्याना ब्रम्हदेशाबाहेर वारवार जाण्याचा प्रसग येत असल्यामुळे लुगी आणि शर्ट या पहरावातल्या डॉ बापेंना जगात काय चालल आहे याची पूर्ण माहिती होती (पुढे डॉ बापेंना एकदा दिल्लीत भेटायचा प्रसग आला तेव्हा सुटाबुटातले डॉ बापे ओळखू यायला पचाईत पडली ) शैक्षणिक आणि वृत्तपत्रीय क्षेत्रात आमच्या चागल्या ओळखी झाल्या होत्या त्याच्यापैकी कुणालाच मोकळेपणान बोलता येत नव्हत राजकीय विषयावर ब्र सुद्धा काढता येत नव्हता हे उघडच दिसत होत कोण केव्हा गजाआड जाईल याचा तिथे भरवसा नव्हता दोन-चार दिवसापूर्वी घरी तास दोन तास गप्पा मारून गेलेले सेनविन बरेच दिवस दिसले नाहीत की ते सक्तीच्या विश्रातिगृहात (तुरुगात) असणार अस धरूनच चालायच

बाजारात, दुकानात मात्र मैत्रीपूर्ण वातावरण असायच लाखेच्या, इतर नक्षीकामाच्या आणि सोन्याचादीच्या चीजवस्तू एकाच मार्केटात एकाच ठिकाणी मिळत असत नक्षीकामाच्या वस्तू बनवाव्यात त्या ब्रम्ही लोकानी चादीच्या लहानशा सुपारीच्या माड्यावरही कोरलेल्या अप्सराची नक्षी असे

लाकडाच सबक फर्निचरही रगनमधे ठिकठिकाणी बघायला मिळायच सर्व ठिकाणी घासाघीस चालायची मग शेवटी एका किमतीवर दुकानदारीण अडून बसायची आणि कागदात ती चीजवस्तू लपेटून हातात देऊन मोकळी व्हायची, मग ती किंमत देण भागच पडायच डॉलर शॉप या खास डिप्लोमॅटिक दुकानात ब्रम्ही दागिने आणि इतर नक्षीकामाच्या वस्तू परदेशी चलनामधे विकत घेता येत असत इतर सरकारी दुकानाप्रमाणे तिथेही बरेच वेळा काही माल नसायचाच

मात्र वर्षातून एकदा रगूनमधे जडजवाहिराच जगी प्रदर्शन होत असे जगभरातले श्रीमत लोक हे प्रदर्शन पाहायला आणि रत्नामाणकाची खरेदी करायला येत असत हिरे, माणक, मोती, पाचू याचा खच या प्रदर्शनात बघायला मिळायचा या प्रदर्शनात फक्त परकी चलनामधे खरेदी करता येत असे ब्रम्ही लोक अर्थातच् तिकडे फिरकूही शकत नसत. 'इनया लेक' या एकमेव तीन तारांकित हॉटेलमधे हे प्रदर्शन भरायच मात्र हे एक ठिकाण सोडल्यास एरवी माणिक मोती फारसे बघायलाही मिळायचे नाहीत ज्या जागाहून ते पूर्वी रगूनला येत असत त्या मार्गावर बडाळी चालू असल्याकारणान फारसा माल रगूनला येऊ शकत नाही अस ब्रम्ही लोकाच त्यावरच स्पष्टीकरण होत

ब्रम्हदेश केवळ भौगोलिक दृष्ट्या शेजारी देश नव्हे नर ब्रिटिशाच्या काळात तो भारताचा भाग राहिल्यान पूर्वीची अनेक वर्णन ऐकल्यानतर ब्रम्हदेशाबद्दल एक प्रकारची आपुलकीची भावना निर्माण झाली होती विशेषत आपल्या जुन्या पिढीला रगूनबद्दलच खास आकर्षण असायच 'पिया गए रगून-वहॉसे आया टेलिफून' हे गाण आपल्याकडे एकेकाळी अत्यत गाजल होत ब्रिटिशानी भारतीयाना मोठ्या प्रमाणावर रगूनला नेल तिथे गेलेल्या भारतीयामधे पजाब, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, बगाल, तामीळनाडू, गुजराथ अशा सर्व भागातले लोक होते त्यानी सरकारी नोकऱ्या, शिक्षणखात, बाधकाम, शेतीवाडी, व्यापार या सर्व क्षेत्रामधे नाव कमावल होत १९३७ साली जेव्हा ब्रम्हदेशाला भारत सरकारच्या राजवटीपासून ब्रिटिशानी वेगळ केल तेव्हा तिथे भारतीयाची लोकसख्या जवळ जवळ ९-१० लाखापर्यंत होती भारतीय वस्ती ब्रम्हदेशाच्या सर्व भागात थोड्या फार प्रमाणात पसरलेली होती आणि रगून शहर तर प्रामुख्यान भारतीय समजल जायच रगूनमधला बहुताशी व्यापार भारतीयाच्या हाती होता भारतीयाच्या वर्चस्वाविरुद्ध ३६-३७ साली निदर्शन झाली होती अस असूनसुद्धा भारतातले लोक ब्रम्हदेशात पुष्कळ अशी समरस झाले ब्रम्हदेश आणि भारतामधल सामाजिक जीवन, धर्म, चालीरीती इत्यादीमधल्या साम्यामुळे त्याच्यात एक प्रकारची जवळीक निर्माण झाली होती

भारतातल्या अनेक प्रमुख व्यक्ती आणि पुढारी त्याकाळी ब्रम्हदेशात जात असत महात्मा गांधी, पंडित नेहरू यांनी ब्रम्हदेशाला पन्नास-साठ वर्षांपूर्वी भेट दिल्याची वर्णन आम्हाला लोक आठवणीने सांगत होते भारतातल्या काही नेत्यांना ब्रिटिशांनी ब्रम्हदेशात कारावासात ठेवल्याच सर्वश्रुत आहे. बहादूर शहा जफर या शेवटच्या मोंगल राजालाही रंगूनमधे हद्दपार करण्यात आल आणि तिथे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्याच निधन झाल 'लगता नहीं है दिल मेरा उजडे दयारमें' ही त्याची प्रसिद्ध गझल रंगूनमधे--शब्दबद्ध झालेली आहे.

पूर्वीचे अनेक सुप्रसिद्ध बंगाली लेखकही रंगूनमधे राहिले होते (श्री शरच्चन्द्र चॅटर्जी त्यापैकी एक होत ) महाराष्ट्रातल्या अनेक कुटुंबानीसुद्धा ब्रम्हदेशाला आपल घर बनवल होत सुप्रसिद्ध लेखिका श्रीमती इरावतीबाई कर्वे यांच माहेरही ब्रम्हदेशातल

दुसऱ्या महायुद्धामधे जपान्यानी जेव्हा ब्रम्हदेशावर हल्ला केला तेव्हा हजारो भारतीय ब्रम्हदेश सोडून खुष्कीच्या मार्गाने जंगलातून आणि दऱ्याखोऱ्यातून आपली मालमत्ता सोडून भारतात परत आले आपल्या अवघड परिस्थितीत भारतीय आपल्याला सोडून गेले याचा ब्रम्ही लोकांना विषाद वाटत राहिला पुढे १९६२ साली जनरल ने विनन जेव्हा सत्ता पादाक्रांत केली तेव्हा त्यान मोठ्या प्रमाणावर सर्व विदेशी लोकांना—भारतीयांना सुद्धा ब्रम्हदेशातून हाकलून दिल आपल नागरिकत्व हरवलेले आणि देशोधडीला लागलेले भारतीय आपली सर्व जायदाद सोडून भारतात परत आले तरी अजूनही चार पाच लाख भारतीय वंशाचे लोक ब्रम्हदेशात राहिले आहेत बहुतेकांना कोणत्याच प्रकारच नागरिकत्व नाही ब्रम्हदेशाच नागरिकत्व मिळवण फारच दुरापास्त असल्यामुळे बहुतांशी लोक अनाथ अवस्थेमधे तिथे जीवन काढतात

लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य हा ग्रंथ मंडालेच्या कारावासात लिहिला तिथे जाऊन त्यांना श्रद्धांजली वाहण्याची अनिवार इच्छा मनात होती ती साकार होण्याचा लवकरच योग आला मंडालेचा प्रवास वाई, चिपळूणच्या प्रवासासारखा वाटेत तसेच खाचखळग्याचे रस्ते आणि तसेच धुळीचे लोट! वाईच्या रस्त्यावर शिरवळला निदान दूध कोल्ड्रिंक मिळण्याची तरी सोय असायची इथे त्याचाही अभाव होता बरोबर घेतलेली शिधा-शिदोरी मंडालेपर्यंत कामी आली

मंडाले ही एकेकाळची ब्रम्हदेशाची राजधानी ब्रिटिशांच्या काळात त्यांनी ती रंगूनला हलवली मंडाले शहरावर जुन्या वैभवाच्या खुणा अजून कायम आहेत तिथल्या राजवाड्याची दुसऱ्या महायुद्धात चिकार नासधूस झाली लो टिळकांना तुरुंगात ठेवल होत ती जागा म्हणजे भारतीयांना पुण्य स्थानासारखी! ती अजूनही स्वच्छ, नीटनेटकी

ठेवण्यात आली आहे. तुरुगाला लागून एका हॉलमधे लो टिळकाच स्मारक आहे. तिथे त्याचा फोटो आणि पुस्तक आहेत ते ज्या छोटयाशा घरात राहिले ते आता अस्तित्वात नाही त्याच्या शेजारी एक विहीर आहे. तिथल पाणी ते वापरत असत लो टिळकानतर श्री लाला लजपतराय आणि श्री सुभाषचद्र बोस यानाही या तुरुगात ठेवण्यात आल होत

मडालेहून परतताना, झियावाडी-चौतागा इथल्या भारतीयाच्या गाठीभेटी घेतल्या बिहारमधली खेडी उचलून आणून ब्रम्हदेशात ठेवली असावीत अशी भासणारी खास बिहारी लोकाची ही खेडी वकिलातीचे अधिकारी आपल्या भेटीला आले म्हणून त्या लोकाच्या चेहऱ्यावर गहिवर होता तर डोळ्यात अजिजी आणि आनदाश्रूच मिश्रण दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून राहिलेले हे भारतीय! त्याना हवे ते अधिकार मिळणही कठीण पण वकिलातीचे अधिकारी आल्यानतर आपल्याला काहीतरी मदत करू शकतील अशी त्याची धारणा हारतुरे घालून आमच स्वागत करण्यात आल तिथल्या देवळात आमच्यासाठी मोठा स्वागत समारभ योजण्यात आला होता

जगातले ठिकठिकाणचे पर्यटक येऊन बघतात ते ब्रम्हदेशातल पगान हे प्रसिद्ध ठिकाण बघण्याचा आम्हाला योग आला बारा-तेराशे वर्षापूर्वी इरावती नदीच्या काठावर ब्रम्ही राजान वसवलेली ही त्या काळची राजधानी भारतातल्या कारागिरानी त्याकाळी जाऊन हिंदू देव-देवताच्या उपासनेसाठी बाधलेली होती अनेकवेळा झालेल्या भूकपामुळे बरचस पगान उध्वस्त झाल मात्र जी मदिर राहिली ती अजूनही सुस्थितीत आहेत हिंदुस्थानातील देवळ दगडामधे बाधलेली असतात तर पगानमधील देवळ चुना आणि विटानी बाधण्यात आलेली आहेत

त्या इमारती इतकी वर्षं राहू शकल्या हेही विशेष! अजिंठा, वेरुळ, बोरूबद्दूर, अकोरव्हाट या जगप्रसिद्ध मालिकेत पगानचाही समावेश होतो परतु ब्रम्हदेशातल्या परिस्थितीमुळे त्याला प्रसिद्धी मिळू शकलेली नाही शेकडो पगोडे विखुरलेल हे गाव म्हणजे मानववश शास्त्रज्ञाना मेजवानीच भर्तृहरीच्या काळातल एखाद गाव, सत्य स्वरूप घेऊन उभ रहाव अस ते ठिकाण मला भासल चद्रप्रकाशात सचैल न्हायलेले बुद्धमदिराचे कळस पुरातन काळात डोकावल्याची साक्ष पटवून देत होते

ब्रम्हदेशान बाहेरच्या जगाशी सपर्क ठेवला असता तर पगानचा नावलौकिक जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोचला असता ब्रम्हदेशातल्या लष्करी राजवटीन देशाची अगदी पाळमुळ उन्मळून टाकली इतकच नव्हे तर आतरराष्ट्रीय नकाशावरच आपल नाव आपल्या हातान पुसून टाकल १९६३ च्या लष्करी सत्ताहरणानतर ब्रम्हदेशात लोकशाही

सपुष्टात आली गेल्या २५-३० वर्षात लष्करी बळावर आधारलेल्या राजकीय पक्षान (बर्मा सोशॅलिस्ट प्रोग्रॅम पार्टी) देशात राज्यकारभार चालवला आहे. यामागे आहे जनरल ने विन या लष्करी अधिकाऱ्याच अधिपत्य जनरल ने विनन आपल्याविरुद्ध असलेली माणस सत्तेवरून काढून जनतेच्या, विद्यार्थ्यांच्या स्वातत्र्य आणि लोकशाहीच्या मागण्या निर्घृणपणे दाबून टाकल्या आणि आपल मूठभर लष्करी राजकीय पुढाऱ्याच वर्चस्व चालू ठेवल आपला देश हा जगाचा केंद्रबिंदू आहे. ब्रम्हदेशावर परकीय सत्ताचा डोळा आहे आणि ब्रम्ही सस्कृती, भाषा ही सर्वश्रेष्ठ आहे अशा भ्रामक कल्पना देशातल्या लोकावर लादून राज्यकर्त्यांनी ब्रम्हदेशाला जगातल्या इतर देशाच्या समुदायातून काढूनच टाकल

आतरराष्ट्रीय सस्थानातूनही ब्रम्हदेश सरकारच प्रतिनिधित्व जवळजवळ नावापुरत राहिल १९७९ साली ब्रम्हदेशान असलग्न देशाच्या सघटनेतून सभासदत्व काढून घेतल देशाचा इतर देशाबरोबरचा व्यापारही पुष्कळ अशी समाप्त झाला आयातीवर सरकारन कडक नियत्रण आणल्यामुळे नवीन तत्रज्ञान, मशीनरी येईनाशी झाली पूर्वी ब्रम्हदेश म्हणजे जगातल तादूळाच कोठार. ४०-४५ सालापर्यंत हा देश तीस लाख टन तादूळ निर्यात करत होता, पण सरकारी धोरणामुळे आणि निर्बंधामुळे उत्पादनही घटल आणि तादुळाची निर्यात ५ लाख टनावर आली

ब्रम्हदेशाचा एकेकाळचा नेता जनरल ऑंग सान यानी ४७ साली देशाचे अनेक भाग एकत्र आणून एक सघटित देश बनवला होता ऑंग सान हा लोकप्रिय नेता होता वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी त्याचा खून होण्यापूर्वी त्यान जपान आणि इग्लड या दोन्ही सत्ताशी लढा देऊन वाशिक भेद मिटवून एक सघटित ब्रम्हदेशाची स्थापना केली होती. जनरल ऑंग सान याचे पडित नेहरूबरोबर मैत्रीचे सबध होते ते नेहरूचा सल्ला घेत असत त्याची पत्नी नतर भारतात राजदूत होती. भारतात शिक्षण घेतलेली त्याची कन्या ऑंग सान सूची आज ब्रम्हदेशातल्या जुलमी राजवटीविरुद्ध निकरान लढत आहे. तिच्या या झुजार व अविरत मनोनिग्रहाचा नुकताच शाततेसाठीचे नोबल पारितोषिक देऊन जगाने सन्मान केला व ब्रम्हदेशातल्या या लोकशाहीच्या लढ्याचा पुरस्कार केला

स्वत च्या सत्तेसाठी जनतेच्या डोळ्यात समाजवादाच्या स्वप्नाची धूळ टाकून स्वायत्तता आणि लोकशाहीची गळचेपी केली की देशाची काय दुर्दशा होते याच आपल्या जवळच्या भागात ब्रम्हदेश हे एक उदाहरण आहे आम्ही ब्रम्हदेशात असाताना ने विन आणि त्याचे लष्करी मित्र याच्या देशावरच्या पकडीत फरक पडला नव्हता,

किंबहुना १९८८ साली विद्यार्थ्यांनी, धर्मगुरूनी आणि जनतेन प्रचड उठाव करीपर्यंत ब्रम्हदेशात काही स्थित्यतर होऊ शकेल अस वाटत नव्हत ८८ च्या आदोलनात हजारो लोक मारले गेले ब्रम्ही लष्करान अमानुषपणे निदर्शन मोडून काढली गेल्या सार्वजनिक निवडणुकीत जनतेन लोकशाहीसाठी प्रचड बहुमत देऊनही लष्करी अधिकारी सत्ता जनतेच्या हाती द्यायला तयार नाहीत ब्रम्ही प्रजेचा लोकशाहीसाठीचा लढा अजूनही चालूच आहे.

जनरल ने विनन तरुण पिढीच इग्रजीमाध्यमातून शिक्षण पार बद करून टाकल्यामुळे तरुण पिढीशी सवाद साधता येण अशक्य होत, कारण ब्रम्ही भाषा सोडल्यास ते दुसऱ्या कुठल्या भाषेत बोलू शकत नसत जुन्या पिढीच शिक्षण इग्रजीतून झाल्यामुळे त्याना इग्रजी उत्तम बोलता येत असे तरुण पिढीच्या शिक्षणाची होत असलेली अवहेलना त्याना बघवत नसे अर्थात् लष्करी राजवटीत सरकारविरुद्ध ब्र काढण्याची कुणाचीही तेव्हा छाती नव्हती आणि अजूनही नाही

रगूनला येऊन आम्हाला आता सव्वादोन वर्ष होत आली होती एका सध्याकाळी मी बागेत कार्ली तोडत असताना सुधीर माझ्या मागे येऊन उभे राहिले हेमा, लवकरच आपल्याला दिल्लीला जाव लागेल आजच समजल यानी कार्ली तोडून टोपलीत टाकताना सहजपणे सागितल दिल्लीला परत जायच त्याचा आनद आणि आपलाच वाटायला लागलेला ब्रम्हदेश सोडून जाण्याचा विषाद अस उनपावसाच मिश्रण याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत

सुरुवातीच्या काळात प्रोम रोडच्या बडवर फिरत फिरत दिवसाचे तास मोजत, इनया लेक या एकुलत्या एक तीन तारांकित हॉटेलमधे आईस्क्रीम खात घटिका आणि पळे घालवली होती कारण तेव्हा वेळ खरोखरच कासवाच्या गतीन जात होता आता मात्र दिवसाचा वेळ न पुरण्याइतक्या गोष्टी मागे लागल्या होत्या रगूनमधल्या म्यूझिक सोसायटीच्या उपाध्यक्षपदी माझी निवड झाली आणि सास्कृतिक कार्यक्रम बसवण्याची खुमखुमी पुरेपूर भागवता आली यानी गॉल्फचा कित्ता गिरवायला सुरुवात केली आणि शनिवार-रविवार त्याना अपुरे पडायला लागले आता कुठे सूर लागल्यासारख वाटत होत

अर्थात् आता घरीच जायच होत त्यासाठी कुठल्याही तयारीची जरूर नव्हती कुठल्याही प्रकारच दडपण मनावर नव्हत नारळाची बाग, मोगऱ्याची झाड, कार्ल्यांचे वेल आणि ग्रेपफ्रूटच्या भारान वाकलेल झाड हे सर्व सोडून जायच मात्र जिवावर आल होत

विमानतळावर जाण्यापूर्वी श्वेदगॉंगमधली घटा मनापासून वाजवली रगूनला परत भेटीवर यायला मिळेल या आशेन, आणि ते ईप्सित सुधीरच्या बाबतीत खरोखरच साध्य झाल परत दोन-तीन वर्षांनी त्याना रगूनच्या भेटीवर जायची सधी आली तेव्हां आमची बाग तशीच बहरलेली आहे हे ऐकून मुलगी सासरी सुखात आहे हे ऐकल्यावर आईला कसा आनद होईल याचा प्रत्यय मला आला माझ्या मनात कुठेतरी खोलवर ब्रम्हदेशान स्वत साठी खास स्थान निर्माण केल आहे याची मला तेव्हा जाणीव झाली.

★★★

# सिओल-दक्षिण कोरिया

ब्रम्हदेशाहून दिल्लीला परत आलो आणि भारतातल्या जीवनाचा परत एकदा श्रीगणेशा केला स्वगृही येऊन स्थिरस्थावर होण्याची ही दुसरी खेप चाणक्यपुरीच्या सरकारी कॉलनीत हसत खेळत घालवलेले पूर्वीचे दिवस अजूनही स्मरणात ताजे होते त्याच अपेक्षेन परत चाणक्यपुरीत आलो आणि थोडी निराशाच पदरी आली काळ बदलदल्याच द्योतक होत ते बहुधा शेजारी कोण नव आल याची ना कुणाला उत्सुकता होती ना फारशी पर्वा अर्थात् स्वदेशी परतल्याचा आनद एवढा असतो की आपल्या घरी फारस कुणी विचारल नाही तरी त्याची खत वाटत नाही

घराची घडी हळूहळू बसत होती तर एकीकडे अलिप्त राष्ट्राची शिखर परिषद, राष्ट्रकुल देशाची शिखर परिषद अशा महत्त्वाच्या घटना राजधानीत घडत होत्या परराष्ट्र व्यवहार खात्यातर्फे त्या आयोजित करण्यात आल्यामुळे आम्हा विदेश सेवाधिकाऱ्याच्या बायकानाही त्यात सक्रिय भाग घ्यायला मिळाला हा एक आगळाच अनुभव होता वेगवेगळ्या भाषामधली एकाच वेळी चालणारी भाषातर (interpretation) कुठल्या देशाच्या प्रतिनिधींनी कुठे बसायच यासाठी तयार करायचे तक्ते, ठरावासाठी आणि त्यातल्या सुधारणासाठीचे कागद आतरराष्ट्रीय स्तरावरची परिषद कशी घडते याची तपशीलवार माहिती आम्हाला त्या निमित्तान झाली राष्ट्रकुल देशाच्या शिखर

परिषदेच्या वेळी विदेश सेवाधिकाऱ्याच्या पत्नींना Ladies in waiting म्हणून राष्ट्राध्यक्षाच्या पत्नी समवेत रहाव लागल बागला देशाच्या अध्यक्षाच्या पत्नीबरोबर माझी नेमणूक झाली होती राष्ट्राध्यक्षाच्या पत्नींसाठी खास वेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते त्या सर्वात आमचा वाटा होताच या सर्व घडामोडींमधे दिल्लीतली तीन वर्षं पाखरासारखी पळाली ८५ च्या सप्टेंबरमधे याची दक्षिण कोरियाला राजदूत म्हणून नेकणूक झाली ब्रम्हदेशात असताना कोरियन कौन्सिलरची बायको माझी चागली मैत्रीण झाली होती तिच्याकडच्या आमच्या निरोपाच्या जेवणाच्या वेळेस तुम्ही आमच्या देशात राजदूत म्हणून नक्की याल अस तिन भाकीत केल होत आता ते खर ठरल होत

कोरियाला जायच म्हटल्यावर अतिपूर्वेकडल्या दक्षिण आणि उत्तर अशा दोन भागात विभागलेल्या या देशाबद्दलची उत्सुकता साहजिकच खूप वाढली चीन आणि जपानमधे अतरपाटासारखा बसलेला देश इतपत दक्षिण कोरियाची भौगोलिक ओळख आतापर्यंत होती कम्युनिस्ट राजवटीमुळे उत्तर कोरियाची प्रगति खुटलेल्या अवस्थेत आहे तर कोरियन युद्धात जमीनदोस्त झालेल्या आपल्या देशाला, अविरत परिश्रमाच्या जोरावर भरभराटीच्या यशस्वी मार्गावर आणणाऱ्या दक्षिण कोरियाची प्रतिमा साधारणपणे माहिती होती दक्षिण कोरियन 'मिरॅकल'बद्दल झालेला बोलबालाही पुसटसा ऐकिवात होता

दक्षिण कोरिया तेव्हा भारतातही कुतूहलाचा विषय बनला होता याच मुख्य कारण १९८६ साली तिथे होणार असलेले 'आशियाई खेळ' त्यामुळे सिओलच नाव भारतातही ज्याच्या त्याच्या तोंडी होत याची नियुक्ती सिओलला होणार असल्याची बातमी महिनाभर आधी अनधिकृतरीत्या कळली असली तरी त्याबद्दलचा 'अॅग्रेमा' तिथल्या सरकारन पाठवल्यानतरच ती जाहीर करण्यात आली कुठल्याही राजदूताच्या नियुक्तीच्या आधी त्याच नाव त्या देशाकडे पाठवण्यात येत आणि तिथल्या सरकारन त्यावर समतीचा शिक्का दिल्यानतरच तिची घोषणा करण्यात येते

दक्षिण कोरियाची आम्हाला पहिली रुजवात झाली ती दिल्लीच्या त्यावेळच्या कोरियाच्या राजदूतानी त्याच्या निवासस्थानी आम्हा दोघाना जेवायला बोलावल तेव्हा त्याच्या पद्धतीनुसार खास कोरियन ठशाच्या जेवणघरात खाली बसून जेवण्याची आमची व्यवस्था करण्यात आली होती कोरियन बगळ्याच भरतकाम असलेल्या चौकोनी, तावडचा लाल आणि निळचा रेशमी उशा बसायला ठेवल्या होत्या मग वैशिष्ट्यपूर्ण कोरियन खाद्यपदार्थांनी सजलेले छोटे छोटे चौरग आमच्या समोर आणून ठेवण्यात आले त्याच लोणच ऊर्फ किमची आपल्याकडच्या आंध्रातल्या लोणच्यालाही लाजवेल

इतक झणझणीत होत (किमची हा कोरियन जेवणाचा अविभाज्य भाग असल्याच पुढे उमगल) फ्राय केलेल्या भाज्या, तऱ्हेतऱ्हेच्या नूडल्स आणि मोड आलेले मूग असे विविध प्रकार जेवणात दिसत होते

दक्षिण कोरियाला प्रयाण करताना एका अनोळख्या प्रातात प्रवेश करताना वाटणारी उत्सुकता आणि कुतूहल तर होतच, पण परत एकदा बौद्ध धर्मीय देशात चाल्लो हे जाणवून, गेल्या जन्मी आपला आणि बौद्ध धर्माचा काहीतरी निकटचा सबध असावा अस वारवार मनात येत होत एअर इडियाचा टोकिओलाच निरोप घ्यावा लागला मग सिओलपर्यंतचा पुढचा प्रवास दक्षिण कोरियन एअरनी केला जपानी आणि कोरियन दिसायला साधारण सारखे त्याच्यातला फरक ओळखण इतर परदेशीयाना फारच कठीण मात्र अजूनही कोरियनाच्या चेहऱ्यावरच जगाबद्दलच कुतूहल चट्दिशी ओळखू येत एक भाबावलेला भाव त्याच्या चेहऱ्यावर सतत लिहिलेला असतो नव्यान श्रीमंती आलेल्या रागडच्या लोकामधे ती अनुभवतानाही ते रागडेपण कायम असत तेही कोरियनामधे दिसून येत

हान नदीच्या भोवताली महिरपीसारख्या वसलेल्या उत्तुग इमारती हे विमानातून होणार सिओल नगरीच पहिल दर्शन विमान जसजस खाली येत तसे या नदीत डोकावणारे सभोवतालचे डोंगर स्पष्ट व्हायला लागतात विमानतळ अतिशय आधुनिक शानदार आणि स्वच्छ आहे. विमानतळापासून शहराकडे जाणाऱ्या रस्त्यावर ओळीन दुतर्फा लावलेली एकसारख्या उचीची झाड पाहुण्याना जणु मानवदना देत असतात शहरात प्रवेश केल्यावर अफाट पसरलेल्या समुद्रासारखा शहराचा विस्तार जाणवतो उच चढावर जाणाऱ्या नागमोडी वाटा शहराला वळसे घालत जातात

या शहराचा पेहेराव आहे श्रीमती थाटाचा एकाच वेळी दोन्ही बाजूनी आठ वाहन ये-जा करू शकतील इतके प्रचड रस्ते, वाहतूक सुलभ व्हावी यासाठी एकावर एक बाधलेला नागमोडी पूल, भुयारी रेल्वे, डिपार्टमेंटल स्टोअर्स, असख्य पचतारांकित हॉटेल ! शहराच्या चेहऱ्यावर समृद्धीची झळाळी आहे. मात्र न्यूयॉर्क किंवा हाँगकाँग सारख्या श्रीमत शहराचा बेदरकारपणा या शहरात नाही इथे अजनूही अगत्य आहे. गेल्या वीस वर्षात केलेल्या अफाट प्रगतीमुळे 'हम भी कुछ कम नही' असा जबर आत्मविश्वास या शहरामधे जाणवतो मात्र शहराच व्यक्तिमत्त्व पौर्वात्य कायम असल्याच्या खुणा जागोजाग दिसतात रस्ता चुकल्यावर भाषा येत नसल्यामुळे बावरून गेलेल्या परदेशी पर्यटकाला मोडक्या तोडक्या इग्रजीत त्याची विचारपूस करून हव्या त्या ठिकाणी नेऊन सोडायला कोरियन माणसाची हसत तयारी असते शहराची झालेली भरभराट

नवी असल्याची चिन्हही ठिकठिकाणी आहेत एकीकडच्या आलिशान इमारतींबरोबर काही ठिकाणच्या झोपडपट्ट्यावजा वसाहती डोळयात खुपल्याखेरीज रहात नाहीत भुयारी रेल्वेची तशीच सार्वजनिक स्वच्छतेची लोकाना अजून पूर्णपणे सवय व्हायची आहे

शॉपर्स पॅरडाईज हे अमेरिकनानी या शहराला दिलेल्र सबोधन सार्थ असल्याची प्रचीती इथल्या बाजारपेठा बघून यायची इथली डिपार्टमेंटल स्टोअर्स खर तर परदेशी पाहुण्याना दाखवण्यापुरतीच आहेत खरेदी करायची खरी ठिकाण वेगळीच असतात नामदेमून (दक्षिण दरवाजा) आणि दोंग्देमून (पूर्व दरवाजा) हे दोन्ही बाजार म्हणजे अल्लाउद्दीनचे खजिनेच मेणबत्त्यापासून ते भाडीकुडी, झाडझुडप, कोट, सूट, बॅग्ज, हॅंडबॅग्ज, उची अत्तर आणि जडजवाहिरापर्यंत सर्व माल या बाजारामधल्या छोटया छोटया दुकानामधे खच्चून भरला आहे. तिथल्या खरेदीची खुमारी अधिक वाढायची ती हा माल विकणाऱ्या कोरियन अजमाबरोबरच्या घसाघाशीमुळे ही अजमा लाजत, मुरडत, नाही नाही म्हणत वस्तूच्या किंमती थोड्या कमी करायची आणि मग कशी जिंकली म्हणून मिस्किल हसायची कारण मूळ किंमत तिन दाम दुपटीन वाढवून सांगितलेली असायची या अजमा सपूर्ण दिवसभर दुकानात ठाण माडून बसलेल्या असायच्या

कोरियन शिष्टाचाराच्या पद्धती अनेक! खाशा पाहुण्यासाठीचा आदरातिथ्याचा खास प्रकार म्हणजे कीसेन हाउस कुठल्याही प्रकारच्या व्यापारी उलाढाली करायच्या झाल्या तर दिवसा चर्चेच्या टेबलावर हमरीतुमरीवर आलेल्या दोन्ही पार्टी सध्याकाळी कीसेन हाउसमधे जमतात प्रत्येक पुरुषाच्या दिमतीला एक गौरागना असते मद्याचा ग्लास तिच्या हातून प्यायचा असतो बिझिनेसमधल्या भागीदाराबरोबर हलकी फुलकी बोलणी करायची आणि मग कीसेन सुदरीच्या हातून जेवायच दिवसाचा सगळा शीण या प्रकारान घालवायचा ही त्यामागची कल्पना मात्र या सुदरीच्या हातून घेतलेली दारू चढू न देण्याची खबरदारीही बाळगावी लागते, नाहीतर वाटेल त्या गोष्टीला कबुली देऊन जाण्याचीही शक्यता! भारतातून व्यापार शिष्टमडळ आली की कीसेन हाऊसची एखादी सध्याकाळ ठरलेली असायची मधून मधून राजदूत महाशयाना बोलावण असायच त्यातल्या त्यात व्ही आय् पीं-कडे लक्ष देण्याची प्रमुख जबाबदारी याच्यावर असल्याकारणान कीसेन सुदरीपेक्षा त्याच लक्ष प्रमुख पाहुण्याकडे अधिक असेल अशी मी मनाशी समजूत करून घ्यायची एकदा मला स्वत लाच कीसेन हाऊसमधे जायची सधी मिळाली जितक्या सहजपणे कपातला चहा बशीत ओतून प्यावा तितक्या सहजतेन कोरियन पुरुष कीसेन सुदरीच्या हातून मद्यप्राशन करीत होते त्यात कामुकतेपेक्षा सवयीचाच भाग अधिक दिसत होता

एकूण कोरियन पुरुषाची स्त्रियाकडे बघण्याची दृष्टी काहीशी उपेक्षेची ! लग्न झाल्यावर कितीतरी स्त्रियाना नोकरी सोडून घरी बसाव लागत नवऱ्याची आणि कुटुबाची सेवा हा तिचा धर्म हे तिच्यावर बिंबवल जात कुटुबात सासूच आणि नणदेच स्थान मोठ. सुनेन दोघींच्या तालावर राहिल पाहिजे अशी अपेक्षा असते मात्र कोरियन पुरुषानी स्त्रियाना पायाच्या दासीसारख वागवल तरी कोरियन स्त्रियाच स्वतत्र व्यक्तिमत्व कमी होत नाही लग्न झाल्यावर त्या स्वत च माहेरच नाव आणि आडनावही बदलत नाहीत त्यामुळे श्री किम् याची बायको श्रीमती ली असते किंवा श्री पार्क याची बायको श्रीमती लिम् असते कोरियन स्त्रिया कणखर, व्यवहार चतुर आणि कुशलतेन ससार करणाऱ्या असतात पुरुषाची घरातली भूमिका पाहुण्यासारखी पानावर येऊन जेवण्यापुरती ऑफिस सपल की चार मित्राबरोबर सोझू (कोरियन दारू) पिऊन मग नवरा आरामात घरी येतो प्रत्येक गृहिणी कसला ना कसला तरी बिझिनेस करून पैसे मिळवत असते नाहीतर दुकान घालून बसते आणि नवऱ्याशी वादविवाद न घालता चतुराईन नवऱ्याला आपल्या मुठीत ठेवते. बाहेर मात्र नवऱ्याच्या दोन पावल मागेच चालते

घरातले महत्त्वाचे आर्थिक व्यवहार बायकाच साभाळतात मुलाच्या शिक्षणाकडे, अभ्यासाकडे विशेष लक्ष देतात कोरियात साक्षरतेला आणि उच्च शिक्षणाला नेहमीच प्राधान्य देण्यात आल आज तिथे शभर टक्के साक्षरता आहे चागल्या विद्यापीठामधे प्रवेश मिळवण्यासाठी देशात मोठ्या प्रमाणावर चुरस लागते शेती विकून खेड्यातले आईबाप मुलाना सिओलच्या विद्यापीठात पाठवण्याचा प्रयत्न करतात या सर्वात स्त्रीचा वाटा फार मोठा आहे. मात्र स्त्रीच्या गुणाची कदर कोरियन समाजाला फारशी नसते

कुटुबात नेहमी मुलगा हवा असतो मुलगा झाला की आनद आणि मुलगी झाली की कपाळावर आठ्या हा प्रकार इथेही आहे. आईवडिलानी म्हातारपणी मुलाकडे नाहीतर कुणाकडे बघायच हा सवाल कोरियन आईबापही करतात मोठ्या मुलाकडे आईबापानी म्हातारपणी रहायच ही आतापर्यंतची तिथली प्रथा अमेरिकेत राहिलेले कितीतरी कोरियन आपली कौटुबिक जबाबदारी पूर्ण करण्यासाठी मायदेशी परतल्याची उदाहरण आम्ही तिथे पाहिली प्रेमविवाहाची प्रथा अजूनही फारशी प्रचलित नाही बरीचशी लग्न मध्यस्थामार्फत ठरतात

तरुण पिढीवर पाश्चात्य सस्कृतीचा पगडा अधिकाधिक जाणवतो विशेषत तरुणतरुणी पाश्चात्य पद्धतीचे कपडे घालतात मात्र कोरियन पुरुषानी कितीही

पाश्चात्यपणाचा आव आणला तरी त्याच्या खाण्यापिण्याच्या सवयी, आवडीनिवडी कोरियनच असतात जेवणात भरपूर लसूण घातलेल लोणच असल्याशिवाय त्याच जेवण पूर्ण होऊ शकत नाही खाली बसून जेवण्याची पद्धत आपल्याकडे जुनी होत चालली मात्र कोरियात अजूनही खाली बसून समोरच्या बैठ्या टेबलावर गरम भाताची मूद खाल्याशिवाय 'किम्' किंवा 'लिम्' गुरूजींना जेवल्यासारख वाटत नाही फरक इतकाच की तो भात ते चॉपस्टिकस्नी खातात थडीच्या दिवसात या जमिनी खालून गरम होण्याची (ओंदोल) सोय असते बाहेर बर्फ पडत असताना गरम जमिनीवर बसून वाफाळणाऱ्या नूडल्स खायला अधिक मजा येते आपल्यासारखा आजीबाईचा बटवाही कोरियात आहे त्यातला महत्त्वाचा औषधी घटक म्हणजे जिनसेन जिनसेन या पूर्वापार चालत आलेल्या औषधी वनस्पतीला कोरियन जीवनात फार महत्त्वाच स्थान आहे. रोजच्या चहापासून ते सौंदर्य प्रसाधनापर्यंत जिनसेनचा सर्रास वापर होत असतो शरीर स्वास्थ्य आणि शरीर सौष्ठव राखण्यासाठी जिनसेनचा वापर केला जातो हिवाळ्यात उष्ण आणि उन्हाळ्यात शीतल अस हे जिनसेन झाडाच मूळ सर्व व्याधींवरचा रामबाण उपाय समजला जातो आपल पौरुषत्व दीर्घकाळ टिकवण्यासाठी कोरियन पुरुष रोज कुठल्या ना कुठल्या स्वरूपात जिनसेनच सेवन करतात कोरियातून व्यापारी स्तरावर जिनसेनची होणारी निर्यात फार मोठी आहे

परपराना अभिमानपूर्वक जपण्याची वृत्ती कोरियनामधे आढळते 'चुसोक' हा तिथला प्रमुख सण पितृपधरवड्यात येणाऱ्या चुसोकमधे ते आपल्या पूर्वजाना श्रद्धाजली वाहतात तीन दिवसाच्या या अन्हिकासाठी शहराकडून आपल्या गावाकडे जाणाऱ्या लोकाची रीघ लागलेली असते पूर्वजाच्या समाधीवर प्रत्येकान जाऊन फुल वाहायची आणि प्रार्थना करायची, अशी इथली प्रथा आहे. इतरवेळी अहोरात्र मेहनत करणारा कोरियन चुसोकच्या दिवसात कुठलही काम अगावर घेत नाही हे तीन दिवस त्याच्या कुटुबासाठी असतात कोरियात पहिला आणि साठावा वाढदिवस मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो विषेशत स्त्रीला षष्ट्यब्दिपूर्तीनतर स्वतत्रपणे वागायची मुभा असते मग तिच्यावर कौटुबिक बधन लादली जात नाहीत हॉलमुनि (आजीबाई) या सदरात जाऊन ती बसली की मग तिची मुक्ती सुरू होते एरवी पाश्चात्य कपड्यामधे वावरणारी कोरियन स्त्री घरगुती किंवा सार्वजनिक समारभात मात्र पायघोळ झग्यासारखा दिसणारा राष्ट्रीय पोषाख (हाम्बुक) परिधान करते

प्राचीन सस्कृती जतन करण्याच्या त्याच्या वृत्तीनुसार अनेक लहान लहान शहरामधे राष्ट्रीय सग्रहालयात हजारो वर्षांपूर्वीच्या वस्तू उत्तम तऱ्हेन जतन करण्यात आल्या आहेत शाळेच्या विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी मुद्दाम सहली काढून त्या दाखवण्यात

येतात परपराच्या जाणीवेमुळेच भारताबद्दल त्या देशाला अमाप आदर आहे कारण कोरियाला बौद्ध धर्माची दीक्षा मिळाली ती भारताकडून तुम्ही बुद्धाच्या देशाचे का अस रस्त्यात थाबवून कितीतरी लोक विचारीत आणि शाक्यमुनि म्हणून रस्त्यातच बुद्धाला हात जोडून मनोभावे नमस्कार करीत दुसऱ्या शतकात अयोध्येची 'हा' नावाची एक राजकन्या जहाजान कोरियाला आली आणि तिन कोरियाच्या किंग सुरो या राजाशी लग्न केल आणि त्याच्यापासून जी प्रजा निपजली तिथपासून किम्है किम्च्या गोत्रावळीला सुरुवात झाली अशी आख्यायिका आहे. कोरियात दर तिसरा माणूस किम् नावाचा असतो किम्, ली आणि पार्क ही वारवार आढळणारी नाव त्यातल्या किम्है गावच्या किम् कुटुबियानी राजकारणात आणि इतर सर्व क्षेत्रात खूप नाव कमावल आहे या राजकन्येची आणि राजा सुरो याची समाधी दक्षिणेकडे पुसान जवळ किम्है गावात अजूनही बघायला मिळते समाधी शेजारी काही दगड ठेवण्यात आले आहेत असे दगड कोरियात आढळत नसल्यामुळे तेही या राजकन्येबरोबर भारतातून आले असावेत असा समज आहे. या स्मारकाच्या प्रवेशद्वारावर मत्स्याकृती काढलेल्या आहेत तशाच प्रकारच्या आकृती अयोध्येच्या मदिरात दिसून येतात या राजकन्येन येताना बुद्धाचा सदेश आणला असही काही जण मानतात (हिंदू पद्धती प्रमाणेच कोरियामधेही एकाच गोत्रातले पुरुष आणि स्त्री एकमेकाशी विवाह करू शकत नाहीत ) बौद्ध धर्माचा पगडा आता कमी झाला आहे आणि ख्रिश्चन धर्माचा प्रसार पहिल्या मानान खूप वाढला आहे. तरीही बुद्धमदिरातली गर्दी अजूनही कायम असते

कोरियातली बुद्धमदिर मानसिक शातीची आणि चैतन्याची ठिकाण आहेत हेनसा, चिंगवानसा, थोंदूसा सर्व बुद्धमदिर नयनरम्य ठिकाणी बसलेली आहेत राखाडी रगाचे डगले घातलेले भिक्षु-भिक्षुणी जपमाळ घेऊन जागोजाग मनन करताना दिसतात त्याना बाहेरच्या जगाचा कानोसा देखील नसतो बुद्धपौर्णिमेला सर्व बुद्धमदिर गजबजून जातात दिव्याची रोषणाई होते आणि कदिलाची मिरवणूक निघते

कोरियाच्या सगीतावर पाश्चात्य सगीताचा प्रभाव दिसून येतो 'ऑपेरा' हा प्रकार इथे बराच लोकप्रिय झाला असून कोरियन कलाकारही त्या क्षेत्रात उतरले आहेत कोरियन लोककला मात्र त्याच्या मूळ स्वरूपात जतन करण्यात आल्या आहेत लोकनृत्य आणि सगीत याच मिश्रण असलेले इथले कार्यक्रम फार प्रभावी असतात ब्रश-पेंटिंग हे इथल खास वैशिष्ट्य ही कला दिसायला सोपी आणि शिकायला कठीण आहे. 'सिरॅमिक' हा इथल्या प्राचीन परपरेचा खास महत्त्वाचा भाग कोरियन विद्यापीठामधे सिरॅमिकस्च्या अभ्यासक्रमावर पदवी मिळवणारे अनेक विद्यार्थी आहेत 'सिलेडॉन' हा सिरॅमिकमधला अत्यत मौल्यवान प्रकार समजला जातो हिरवट रगाची पातळशी

चमक असलेले तऱ्हेतऱ्हेचे राजण, गड्डू, फुलदाण्या, नक्षीकामाच्या डब्या इथे सर्वत्र दिसतात कोरियन चेस्ट ऊर्फ सदुका जगप्रसिद्ध आहेत लाखेच्या सदुकावर शिंपल्यानी केलेल कोरीव काम हा त्यातला एक लोकप्रिय प्रकार आहे. मुलीन सासरी जाताना या सदुकीत आपल सामान भरून न्यायची प्रथा फार पूर्वीपासून चालत आली आहे. जितके आईबाप श्रीमत तितकी ही पेटी अधिक कोरीव काम केलेली आणि महागाची असते

कोरियातली आधुनिक प्रेक्षणीय स्थळ म्हणजे तिथले कारखाने आणि जहाजबाधणीची आवार. पोहांग इथला प्रचड पोलाद कारखाना, हयूडेच जहाज बाधणीचं प्रचड आवार आणि तिथली यत्र सामग्री, थेगु इथल्या कापड गिरण्या आणि नायकीचे बूट बनवण्याचा कारखाना ही इथली प्रसिद्ध औद्योगिक ठिकाण

कोरियामधे लोखड किंवा कोळसा नसूनही कोरियान पोहाग इथे पोलादाचा कारखाना सुरू केला आज तिथल वार्षिक उत्पन्न नव्वद लाख टन आहे. तर हयूडेचा मोटार कारखाना जर्मनीतल्या मर्सिडीज कारखान्याशीही मुकाबला करू शकेल दिवसाला पधराशे मोटारी तिथे तयार होऊन बाहेर पडतात देवू आणि हयूडे या कपन्याची जहाजबाधणीची आवार प्रचड आहेत या दोन्ही कपन्या अवघ्या ९ महिन्यात एक जहाज बाधतात इतर ठिकाणी, उदा कोचीन किंवा विशाखापट्टण इथे ते बाधायला तीन ते चार वर्षं लागतात केवळ वीस पचवीस वर्षांच्या अल्पावधीत कोरिया हा एक औद्योगिक दृष्ट्या प्रगत देश बनला निर्यातीच्या क्षेत्रात त्यान कमालीची प्रगती केली आणि विकसित देशाच्या बरोबरीन आपल दरडोई उत्पन्न वाढवल ८५ ते ८६ सालात कोरिया निर्यातीच्या बाबतीत जगात सर्वात अग्रेसर होता कोरियन मिरॅकल घडल तरी कस हे जाणून घेण्याची उत्सुकता होतीच साहजिकच कोरियात असताना आम्हाला कोरियाच्या झपाट्याच्या आर्थिक वाटचालीच जवळून निरीक्षण करायची सधी मिळाली

कोरियाच्या आर्थिक प्रगतीत सामसूग, हयूडे, देवू यासारख्या प्रसिद्ध खागजी कपन्यानी मोठी कामगिरी बजावली तर कोरियाच्या सर्वांगीण प्रगतीत तिथल्या सरकारन मोठ्या प्रमाणावर नियत्रण करून स्वत लक्ष घालून आणि मार्गदर्शन करून हे साध्य केल कोणत्या प्रकारची उद्योग सामग्री तयार करायची, बँकाकडून किती प्रमाणामधे कर्जं घ्यायची, विदेशी चलनावर कशा प्रकारची बधन ठेवायची, निर्यात कोणत्या मार्गान वाढवायची अशा अनेक बाबतीत सरकारी धोरण आर्थिक व्यवस्थेवर पूर्णपणे देखरेख आणि त्याच चालन करत होत कोरियाचे राष्ट्राध्यक्ष दर महिन्याला आर्थिक आणि व्यापारी मत्रालय तसंच वेळप्रसगी मोठे उद्योजक याच्याशी वैयक्तिक चर्चा करीत

असत देश लहान असला आणि नैसर्गिक साधन-सपत्ती मर्यादित असली तरी कोरियान आपली आर्थिक उद्दिष्ट प्रथमपासूनच उच्च पातळीवर ठेवली ज्यावेळी देशातली बाजारपेठ मर्यादित स्वरूपाची होती तेव्हा उत्पादन बहुताशी निर्यात करण्याच धोरण ठेवल त्यासाठी उत्पादनाची मर्यादा सुद्धा सकुचित ठेवली नाही

अर्थात कोरियाला आपल्या आर्थिक वाटचालीमधे अनेक इतर घटकाच सहाय्य मिळाल उदा एकतत्री राजवट, मजूर चळवळी, सघ इत्यादींवर नियत्रण, औद्योगिक शिस्त, अमेरिकेकडून मिळालेल भाडवल, तत्रज्ञान आणि अमेरिकेतली हक्काची बाजारपेठ आणि या सर्वांच्या जोडीला कोरियनाची जिद्द आणि त्याचा जबर आत्मविश्वास! जपानला टक्कर देण्याच्या भावनेन प्रेरित झालेले कोरियन लोक साक्षरता आणि शिक्षण यासाठी कुठलाही त्याग करायला तयार होते जिथून मिळवता येईल तिथून त्यानी उच्च तत्रज्ञान प्राप्त करायचा ध्यास घेतला जनतेन मोठ्या प्रमाणावर आर्थिक बचत करून ती देश उभारणीच्या कामी उपलब्ध करून दिली कोरियामधे जमीन वाटपासबधीचे कायदे देश स्वतत्र झाल्यावर लवकरच करण्यात आले त्यामुळे देशातली कृषि पद्धती सुधारली आणि खेड्या-पाड्यापर्यंत सोयी जाऊन पोचल्या

हा प्रगतीचा टप्पा गाठायला कोरियाला अमेरिकेची मदत झाली कोरियाच्या उभारणीत अमेरिकेचा वाटा मोठा आहे. दुसऱ्या महायुद्धापासून अमेरिकेन दक्षिण कोरियाच्या सरक्षणाची हमी घेतली कोरियन युद्धामधे अमेरिकन फौजा फार मोठ्या प्रमाणावर कोरियात गेल्या नतर झालेल्या तहानुसार अमेरिकन सैनिक कोरियाच्या सरक्षणासाठी तिथे राहिले सरक्षणाची जबाबदारी घेताना अमेरिकेन दक्षिण कोरियाला मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत आणि इतर सोयी पण उपलब्ध करून दिल्या कोरियन विद्यार्थी अमेरिकेत प्रचड प्रमाणावर गेले अमेरिकन तत्रज्ञान कोरियनाना मिळाल त्याचबरोबर कोरियाच्या वाढत्या निर्यातीला अमेरिकेची बाजारपेठही मिळत गेली

शीतयुद्धाच्या काळात अमेरिकेच छत्र कोरियाला नेटान प्रगती करण्यास पुष्कळ उपयोगी पडल चीन आणि रशिया हे दोन्ही देश दक्षिण कोरियाच्या सरहद्दीजवळ असल्यान आणि उत्तर कोरियाच लष्करी सामर्थ्य मोठ्या प्रमाणावर असल्यान दक्षिण कोरियालासुद्धा अमेरिकेशिवाय तरणोपाय नव्हता मात्र दक्षिण कोरियाच आर्थिक बळ दिवसेंदिवस वाढल्यावर अमेरिका आणि दक्षिण कोरिया याचे सबध हळुहळू बरोबरीचे होऊ लागले आहेत आणि शीतयुद्धाच्या समाप्तीनतर दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया याच्यामधला तणाव जसा कमी होईल तस अमेरिकेच दक्षिण कोरियातल लष्करी अस्तित्व कमीकमी होत जाईल

कोरियातली जहाजबांधणीची आवार सुद्धा अगदी जवळून पाहण्याचा आम्हाला अनेकदा योग आला शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि भारतीय नौदलासाठी देवू आणि ह्यूडे या कंपन्यानी जहाज बनवली होती राजदूताची पत्नी या नात्यान त्याच नामकरण करण्याचा बहुमान मला मिळाला जहाजाच नामकरण हा तिथला मोठा समारंभ असायचा जहाजविषयक अनेक अधिकारी जहाजाच्या बारशाला उपस्थित असत जहाज फुलाच्या माळानी आणि रंगीत फितींनी सजून समुद्र किनारी उभ असायच लगतच्या किनाऱ्यावर एक मोठा शामियाना उभारला जायचा भारताचे राजदूत, जहाज बांधणीवर देखरेख करणारे आपल्या नौदलाचे किंवा शिपिंग कॉर्पोरेशनचे प्रमुख अधिकारी, तसच ह्यूडे किंवा देवू कंपनीचे जहाजविषयक प्रमुख याची तिथे भाषण व्हायची जहाजावर स्वस्तिक काढलेल असायच त्या स्वस्तिकावर हळद-कुंकू वाहून पूजा केल्यावर मग नारळ फोडायचा असा तो विधी असतो पाण्याची धार त्या स्वस्तिकावर लागली की ते शुभ समजल जात (पाश्चिमात्य पद्धतीमधे नारळाच्या ऐवजी शॅंपेनची बाटली फोडतात ) जहाजाला दोरी बांधलेली असायची शामियान्यात जिथून नावाची घोषणा करायची त्या टेबलावर तिची दुसरी बाजू असायची व्यासपीठावरून नावाची घोषणा केल्यावर ही दोरी सोनेरी हातोडीन तोडली की त्या क्षणी जहाजावरून फुलाचा वर्षाव व्हायचा कानपूर, अलकनंदा, सुकन्या ही मी जहाजाना दिलेली काही नाव आहेत एकावेळी तर दोन जहाजाच एकदम नामकरण करण्यात आल आणि जुळ्याच बारसही करायचा मला योग आला प्रत्येकवेळी ज्या हातोडीन मी दोरी तोडली ती मला भेट म्हणून देण्यात आली अशा सात आठ सोनेरी हातोड्या माझ्या संग्रही जमा झाल्या आहेत

कोरियाच्या कानाकोपऱ्यात प्रवास केल्यानंतर देशात सर्वत्र जाणवणारी कोरियनाची देशनिष्ठा अत्यंत वाखाणण्याजोगी होती मग तो कंपनीचा मालक असो किंवा कामगार 'कोरिया नंबर वन्' म्हटल की कुठलाही कोरियन मनापासून खूष! किंबहुना लोकानी तस म्हणाव अशी त्याची अपेक्षा असते मात्र चूकुन कुणी कोरियावर टीका केली तर त्याचा चेहरा पडतो, आणि आपला देश कसा चांगला आहे हे त्याला पटवून देण्याचा तो अगदी मनापासून प्रयत्न करतो प्रत्येक नागरिकाच्या ज्वलंत देशाभिमानाच्या जोरावर कोरिया आज विकसित देशाच्या बरोबरीन येऊन उभा आहे

१९१० ते १९४५ सालापर्यंत कोरिया जपानच्या अधिपत्याखाली होता कोरियाची त्या काळची स्थिती अत्यंत हलाखीची होती दुसऱ्या जागतिक युद्धानंतर कोरिया स्वतंत्र झाला मात्र कोरियाची दोन शकल झाली उत्तर कोरियामधे रशियन फौजा राहिल्या तर दक्षिण कोरियात अमेरिकन! या दोन देशामधे परत सलोखा निर्माण होऊ

शकला नाही १९५० साली उत्तर कोरियान दक्षिण कोरियावर हमला केला तीन वर्षं ही लढाई चालू होती त्यावेळी कोरियाची परिस्थिती आणखीनच बिकट झाली १९५० ते ५३ दरम्यान भारतान सयुक्त राष्ट्रामधे कोरियाचा प्रश्न शातीपूर्वक रीतीन सोडवण्यासाठी खूप प्रयत्न केले त्यात पडित नेहरूचा पुढाकार होता सयुक्त राष्ट्रानी नेमलेल्या आयोगाच अध्यक्षपद भारताकडे होत लढाई सपायच्या सुमारास उत्तर आणि दक्षिण कोरियाच्या सैनिकाच पुनर्वसन करण्यासाठी भारतान आपली शाति-फौज (Peace-keeping force) पाठवली होती

जवळ जवळ ६१ सालापर्यंत कोरियात राजकीय स्थैर्य नव्हत साठ साली विद्यार्थ्यांच्या निदर्शनानतर राजकीय सत्ता उलथून पडली आणि पार्क चुघी या लष्करी अधिकाऱ्यान सत्ता हातात घेतली ती सतरा वर्षं त्याच्या हातात होती त्या अवधीत त्यानी कोरियाचा कायापालट केला कोरियाच औद्योगिकीकरण केल आणि कोरियाची निर्यात वाढवली १९७९ साली त्याचा खून झाला तोपर्यंत कोरिया औद्योगिक देश बनला होता कोरियामधे गेल्या २५-३० वर्षात सतत लष्कराचाच वरचष्मा असल्यामुळे पार्क चुघीच्या निधनानतर पुन्हा थोड्या अवधीतच चु दू व्हान हा दुसरा जनरल देशाचा राज्यकर्ता बनला त्याच्याही काळात कोरियाची प्रगतीची वाटचाल झपाट्यान चालूच राहिली उद्योगाच महत्त्व आणखी वाढल देशाला आणखी ऊर्जितावस्था आली

मात्र लष्करी सत्तेच वर्चस्व दिवसेंदिवस सामान्य जनतेला नकोस होऊ लागल होत देशाची आर्थिक प्रगती, लोकाची साक्षरता, शिक्षणाच वाढत प्रमाण आणि विद्यार्थ्यांची जागरूकता ध्यानात घेता, हुकूमशाही राजवट लौकरच हाणून पाडून लोकशाहीचा प्रारभ व्हावा अस जनमतही वाढत्या प्रमाणात होतच १९८७ च्या मध्याला अध्यक्ष चु दू व्हान यानी आगामी निवडणूक सुद्धा पूर्वीच्याच घटनेनुसार घेतली जाईल अशी जेव्हा घोषणा केली तेव्हा मात्र जनतेचा सयम सपुष्टात आला, आणि महिनाभर प्रचड प्रमाणावर निदर्शन झाली सबध शहरभर दिवसच्या दिवस अश्रुधूर भरलेला असे राज्यसत्ता कोलमडून पडणार की काय अशी शक्यताही निर्माण झाली होती मात्र तेव्हा राष्ट्राध्यक्ष चु दू व्हान आणि त्याचे तेव्हाचे सहकारी आणि आताचे राष्ट्राध्यक्ष नो ते बू यानी मोठ्या मुत्सद्दीपणे निवडणुका लोकशाही पद्धतीन घेतल्या जातील आणि राजकीय पक्षाना पूर्ण स्वातत्र्य असेल अशी ८७ सालच्या २९ जूनला घोषणा केली तो दिवस कोरियाच्या इतिहासात सुवर्णाक्षरानी लिहिला गेला असणार इतक तिच प्रचड स्वागत झाल दक्षिण कोरियातले प्रसिद्ध राजकीय पुढारी आणि अध्यक्षपदासाठीचे उमेदवार किम दे जुग, किम यॉग साम आणि किम जॉग पिल याच्या सहमतान सरकारन नवीन घटनाही अमलात आणली आणि कोरियात

८७ सालच्या नोव्हेंबरमधे लोकशाही पद्धतीन निवडणुका होऊन श्री नो ते वू थोड्याशा मताधिक्यान निवडून आले सामान्य जनतेच्या महत्त्वाकाक्षेच्या जोरावर कोरियात लोकशाही प्रस्थापित होऊ शकली हा कोरियाच्या सर्व क्षेत्रातला प्रगतीचा उच्चाकच म्हटला पाहिजे

लष्करी राजवट जाऊन लोकशाही प्रस्थापित झाली तरी कोरियातल्या विद्यार्थ्याची निदर्शन चालूच राहिली तो तिथल्या जीवनाचा जणू स्थायी भाव बनून गेला होता मागण्या बदलत असत पण निदर्शनाचा जोर कायम असे ही निदर्शन मात्र तशी शिस्तीची असत त्याच्या वेळाही ठरलेल्या असायच्या दुपारी सुरू होऊन ती सध्याकाळी सहा वाजेपर्यंत सपायची निदर्शन म्हटली की पोलिसाचा अश्रुधूरही आलाच वकिलातीच्या शेजारी एक महाविद्यालय होत तिथे नेहमीच अश्रुधूर सोडलेला असायचा कधी कधी तो वकिलातीपर्यंत येऊन पोचायचा आणि मग जो तो डोळे चोळायला लागायचा माझी मुलगी दुपारच्या वेळी विद्यापीठात जाताना नाकाला जैन साधूसारख फडक बाधून जात असे कितीतरी कोरियन विद्यार्थी अश्रुधूराचा त्रास वाचवण्यासाठी या मार्गाचा अवलब करीत

कोरियामधल्या आमच्या वास्तव्यात सतत जल्लोषाच वातावरण होत ८६ सालचे आशियाई खेळ, ८८ सालचा नो ते वू याचा अध्यक्षपदाचा सोहळा आणि नतर ऑलिम्पिक क्रीडास्पर्धा, आशियाई खेळ कोरियनाच्या लेखी ऑलिपिक्सच्या रगीत तालमीसारखे होते त्याचीही तयारी वर्षानुवर्षं आधीपासून चालली होती ८२ सालच्या भारतातल्या यशस्वी आशियाई खेळानतर सिओलमधे हे खेळ होत होते आशियाई खेळापूर्वी काही कोरियन अधिकारी भारतातली आशियाई खेळाची यत्रणा समजावून घेण्यासाठी भारतात मुद्दाम जाऊन आले

आशियाई खेळासाठी, सिओलमधे खास आशियाई ग्राम उभारण्यात आल होत तसच अनेक स्टेडियमसही बाधण्यात आली होती तर रिगाटा नौका स्पर्धासाठी एक खास कृत्रिम तलावही बाधण्यात आला या निमित्तान शहरात पचताराकित हॉटेलस् बाधायला सुरुवात झाली ऑलिंपिक स्पर्धापर्यंत त्याची बाधकाम चालू होती या आशियाई खेळाच आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात भाग घेण्यासाठी चीनन प्रथमच कोरियामधे आपले खेळाडू आणि प्रतिनिधी पाठवले चीन आणि दक्षिण कोरियामधल्या १९५० साली पासूनच्या तणावाचा आणि सघर्षाचा विचार करता चीनचा हा निर्णय महत्त्वपूर्ण होता यानतर उभय देशाचे सबध हळूहळू सुधारले आशियाई खेळाच्या दरम्यान अनेक सास्कृतिक महोत्सवही आयोजित करण्यात आले होते आपल्यासारखे

कोरियनही उत्सवप्रिय असल्यान ते कुठलाही कार्यक्रम उरकला घेत नाहीत तर त्यातली लज्जत ज्यान वाढेल त्या गोष्टींचाही त्यात समावेश करतात रंगीबेरंगी, झगझगीत पायघोळ झग्यामधल्या (कोरियन भाषेत त्याला हाम्बुक म्हणतात) ललना लगबगीन इकडून तिकडे करत कार्यक्रमाची शोभा वाढवत असत

आशियाई खेळाच्या दरम्यान् पी टी उषाचे नाव ज्याच्या त्याच्या तोंडी होत मागल्या आशियाई खेळामधल्या तिच्या विजयान सर्वांच्या तिच्याबद्दलच्या आशा उचावल्या होत्या कुणीही भारतीय त्या दिवसात टॅक्सीत जरी बसला तरी कोरियन टॅक्सी ड्रायव्हर उषा नबर वन म्हणून त्याला अगठा दाखवत असे उषा गोल्डन गर्ल अस कोरियनानी तिला किताब दिला होता भारतीयाच्या हॉकीबद्दल कोरियनामधे कुतूहल होत कोरियनानी काही वर्षांपूर्वी हॉकी शिकण्यासाठी खास भारतातला कोच बोलावला होता

चारशे जणाचा चमू घेऊन भारतीय खेळाडू सघ आशियाई खेळामधे भाग घेण्यासाठी एका खास विमानान येऊन पोचला त्याना यथायोग्य खुराक मिळावा म्हणून दोन स्वयपाकी शिध्यासह त्या विमानात होते काही दिवस रोज सध्याकाळी वकिलातीच रूपातर खाणावळीत होत असे ज्या खेळाडूच भारतीय जेवणाशिवाय चालत नसे ते वकिलातीत येऊन जेवून जात असत आशियाई नगर वकिलातीपासून बरच दूर होत खेळाडूना तिथे आणण्यासाठी एका खास बसची सोय करण्यात आली होती स्वयपाक्याचे आणि खेळाडूचे आपापसात चाललेले प्रेमळ सवाद ऐकून जलदरच्या कक्केदी हद्दीमधे पोचल्यासारख वाटायच वेटलिफ्टर्सकडून मिळणारी दाद बघून स्वयपाकी खूष होते आमचे हात पोळ्या करायला थकतात पण ते खायला थकत नाहीत अशी प्रेमळ तक्रार ते करत असत दर दोन दिवसाला लोणच्याचा एक डबा फस्त होत होता राशन सभाळणाऱ्या वकिलातीच्या प्रशासन अधिकाऱ्याला भाजीपाल्याची पूर्तता करता करता नाकीनऊ येत होते विदेश सेवेचे हात थेट मुदपाकखान्यात पोचलेले बघून ते जरा चक्रावूनच गेले होते

खेळाडू प्रॅक्टिसच्या काळात मधूनच गायब झाले की इतेवॉन नाहीतर नामदेमून किवा दोगदेमून या अलिबाबाच्या गुहामधे सापडायचे हे खेळाडू सारखेच अतर्धान पावायचे आणि त्याना शोधून आणता आणता पुरेवाट व्हायची खेळाडूना घरी बोलावण्यासाठी स्थानिक भारतीय उत्सुक होते पी टी उषा आमच्याकडे उपमा खाऊन गेली अस दोन तीन भारतीय कुटुबानी अभिमानान सागितल (अर्थात् तिला चार सुवर्णपदक मिळाल्यानतर त्यानी ते जाहीर केल) आशियाई खेळाच्या पहिल्या

दिवशीच्या टोलेजग, नेत्रदीपक मिरवणुकीत खेळाडूबरोबर भारतीय मुलामुलींना समाविष्ट करण्यात आल होत माझी मुलगी अश्विनी बनारसी शालू नेसून त्या सोहळ्यात मिरवून आली विविध देशाच्या रगीबेरगी पोषाखानी सर्वच स्टेडियममधे रगबहार होऊन गेली होती

मागचे आशियाई खेळ भारतात झाले असल्यान आशियाई खेळाचा टॉर्च दिल्लीहून आणण्यात आला होता आणि उद्घाटन समारभाच्या सरुवातीला तो समारोहानिशी कोरियनाच्या हाती सोपवण्यात आला आपल्या हिमाचल आणि मणिपुरी नृत्य पथकाना उदघाटनाच्या वेळेस नृत्य सादर करण्याचा खास मान देण्यात आला होता पधरा दिवस सबध शहराला कार्यालयाच स्वरूप आल होत आणि शहराबरोबर राजदूताच्या घरालाही आज पत्रकाराच्या जथ्याच सुरापान, उद्या नृत्यपथकाच चहापान तर परवा मत्री आणि त्याचे सहकारी याच जेवण अशा मेजवान्या आमच्या घरी रोज चालू होत्या

खेळाच्या मत्री श्रीमती मागरिट अल्वा खेळाडू सघाबरोबर सिओलला आल्या होत्या ज्या खेळामधे भारतान भाग घेतला होता ते खेळ बघायला सर्व ठिकाणी त्या हजर असत आणि त्याच्या जोडीला इतर सबधित अधिकारी आणि आम्हीही असायचो विमान भरून खेळाडूची सख्या आल्यावर काही खेळात तरी भारत विजय मिळवेल अशी आशा सुरुवातीला वाटत होती बरेचसे खेळ होऊन गेले भारताच नाव कुठेही वर येईना हॉकीमधेही निराशाच पदरी आली भारताच राष्ट्रगीत त्या स्टेडियममधे वाजणार की नाही अशी शका मनात यायला सुरुवात झाली होती ती दूर केली पी टी उषान ॲथलेटिक्समधे चार सुवर्णपदक प्राप्त करून आतरराष्ट्रीय स्पर्धेतल्या विजयानतर आपल्या देशाचा झेंडा वर जाताना दिसला.की अगावर रोमाच उभे राहातात पी टी उषाच सुवर्णपदक जाहीर झाल्यानतर, हजारो आतरराष्ट्रीय प्रेक्षकानी भरलेल स्टेडियम आपल राष्ट्रगीत ऐकत निश्चल उभ राहिलेल बघून डोळ्यात आनदाश्रू उभे राहिले देशाबद्दलची ही आच देशाटन केल्यावरच जाणवते की काय नकळे! पी टी उषान तेव्हा भारताची लाज राखली आणि सुवर्णकन्या हा कोरियनानी तिला बहाल केलेला किताब परत.एकदा सिद्ध केला

श्रीमती अल्वा आणि इतर अधिकारी आमच्या घरी मधून मधून यायचे आणि गप्पाना रग चढायचा इतेवॉन हा भाग आमच्या घरापासून चालत जाण्याच्या अतरावर होता याच त्या सर्वांना अप्रूप वाटायच, कारण तो भाग जसा शॉपिंगसाठी तसा रात्रीच्या करमणुकीसाठीही प्रसिद्ध होता एकदा रात्रीच्या जेवणानतर श्रीमती अल्वाना

तिथे फिरून यायची लहर आली त्याचे यजमानही त्याच्या समवेत होते मग श्री आणि सौ अल्वा, ॲथलेटिक्सचे त्यावेळचे अध्यक्ष श्री सुरेश कलमाडी, इतर काही खेळ सबधित अधिकारी, राजदूत महाशय आणि मी अशी आमची वरात इतेवॉनच्या प्रखर प्रकाशात शतपावली करून आली काही खेळाडूही तिथे आपापल्या बॅगा सावरत जाताना दिसले तेवढ्यात आमच्या ओळखीच कुणीतरी तिथे भेटल आणि काय यावेळी इकडे कुणीकडे म्हणून आम्हाला त्यानी विचारलच "काही नाही हे चर्च बघायला आलो होतो" म्हणून श्री सुरेश कलमाडींनी हजरजबाबीपणे त्याना समोरच चर्च दाखवून वाटेला लावल आणि आम्हा सर्वांची हसता हसता पुरेवाट झाली इतेवॉनसारख्या रेड लाईट भागात रात्री चतु.श्रृगीच्या जत्रेसारखी गर्दी बघून सगळ्याचीच करमणूक झाली दुकानदारानीही आपला दुकानातला माल रस्त्यावर ठेवून आपली विक्री चालू ठेवली होती त्यामुळे काहींनी तेवढ्यात खरेदीची हौसही भागवली श्रीमती अल्वाना होटेलवर सुरक्षितपणे नेऊन पोचवल्यानतर राजदूत महाशयानी सुटकेचा निश्वास टाकला

आशियाई खेळ सपल्यानतर मुलीची पाठवणी केल्यानतर माहेरच्याची दमणूक होते आणि एकदम सुनसुन वाटायला लागत तशी आम्हा सिओलकराची तेव्हा अवस्था झाली होती

हळूहळू तिथल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीची तयारी जोरात सुरू झाली त्याच सुमारास कोरियन एअरलाईनच एक विमान ब्रह्मदेशाजवळ पडल ते घातपाती कृत्य असून त्यात उत्तर कोरियाचा हात असावा याची सिओलला जवळ जवळ खात्री होती एक वयस्क पुरुष आणि तरुण स्त्री या दोघानी मिळून ते विमान पाडल असा सशय होता त्यापैकी पुरुषान आपण पकडले जाणार असा सशय येताच आत्महत्या केली मात्र ती मुलगी सापडली आणि आपण उत्तर कोरियाची नागरिक असून विमानात बॉम्ब ठेवायचा आदेश आपल्याला मिळाला असल्याच तिन कबूल केल ही बातमी दक्षिण कोरियातल्या वृत्तपत्रानी मोठे मथळे देऊन प्रसिद्ध केली ती अध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिव्शीच ही करामत सत्ताधारी पक्षान करून दाखवली म्हणून या पक्षाचे उमेदवार श्री नो ते वू याना जास्त मत पडली असही विरोधी पक्षाच्या काही लोकाना वाटल श्री नो ते वू बहुमतान निवडून आले श्री किम् दे जुग, श्री किम् मान साम् आणि किम् जॉग पिल या तिन्ही प्रतिस्पर्ध्यांना त्यानी हरवल श्री नो ते वू यानी समारभपूर्वक अध्यक्षपदाची सूत्र हाती घेतली आणि कोरियातल्या लोकशाहीच्या वाटचालीला प्रारभ झाला आपले त्यावेळचे ऊर्जामत्री श्री वसतराव साठे भारताचे प्रतिनिधी म्हणून या समारभाला उपस्थित होते

नव्या राजवटीला सुरुवात झाल्यावर ऑलिपिक्सच्या तयारीलाही नव्या जोमान सुरवात झाली. ही तयारी चालू असताना देखील दक्षिण आणि उत्तर कोरियामधला तणाव चालूच राहिला किंबहुना त्याची तीव्रता विमान पडण्याच्या घटनेनतर आणखी वाढली या भाऊबदकीला सुरुवात झाली ती १९४५ सालामधे कोरियाची दोन शकल झाली तेव्हापासून उत्तरेकडे कम्युनिस्ट राजवट नेहमीच जारी राहिली तर दक्षिण कोरिया भाडवलशाहीच्या जोरावर प्रगतीचे टप्पे पार करत राहिला मात्र तेव्हापासून दक्षिण आणि उत्तर कोरिया याच्या एकमेकाविरुद्धच्या प्रचारात कधी खड पडला नाही जगामधे जिथे जिथे अशा फाळण्या झाल्या तिथे गेल्या काही वर्षांत परत दळणवळण व्हायला सुरुवात झाली नतर काही ठिकाणी त्या देशाच एकीकरणही झाल (उदा व्हिएतनाम, जर्मनी, येमेन)

मात्र दोन कोरियामधली सरहद्द अजूनही अभेद्य आणि लष्करी प्रमाणात सुसज्ज राहिली आहे पॅनमुजॉन या त्याच्या सरहद्दीवर सारखेच दिसणारे दोन्ही बाजूचे सैनिक एकमेकाकडे शिंग रोखल्यासारखे पाहात असतात या देशाच विभाजन झाल तेव्हा कुटुबाचीही फारकत झाली आईवडील उत्तरेत तर मुल दक्षिण कोरियात असही काही कुटुबामधे घडल मात्र गेल्या पचेचाळीस वर्षात एकमेकाबद्दलची कुठलीही माहिती त्याना कळू शकली नाही मध्यतरी आतरराष्ट्रीय रेडक्रॉसतर्फे अशा काही कुटुबाना एकमेकाच्या भेटी घेऊ देण्यात आल्या होत्या मात्र थोड्या अवधीतच परत राजरोस भाडण सुरू झाली आम्ही तिथे होतो त्या काळात हा तणाव चालूच राहिला उत्तर आणि दक्षिण कोरियन भाईबदाची एकमेकाबद्दलची तेढ राजनैतिक वर्तुळामधे इतरत्रही जाणवत असे भारत आणि पाकिस्तान याच्यातले राजकीय सबध जरी दुराव्याचे असले तरी सास्कृतिक मेळाव्याच्या प्रसगी किंवा इतर समारभात दोन्ही देशाचे राजनैतिक अधिकारी एकमेकाशी सलोख्यान वागतात दक्षिण आणि उत्तर कोरियाचे अधिकारी एकमेकाकडे बघत तेही मुठी वळतच

अध्यक्षाच्या शपथविधीनतर ऑलिंपिक्सची लगीनघाई सुरू झाली तशी तर एशियाड स्पर्धानतरच ती सुरू झाली होती आता मात्र पडदा वर जायची वेळ आली की नाटकातली पात्र शेवटच्या रगरगोटीचा हात चेहऱ्यावर फिरवतात तशी सिओलची स्थिती झाली होती 'आशियातले सर्वोत्तम रहस्य' हे अमेरिकनानी केलेल दक्षिण कोरियाच वर्णन किती सार्थ आहे हे आशियाई खेळाच्या निमित्तान अनेकाना चक्षुर्वैसत्यम् बघायला मिळाल होत ज्याच्या बळावर कोरियन लोकानी आर्थिक आणि औद्योगिक क्राती घडवून आणली त्या 'कॅन डू' या कोरियन इच्छाशक्तीच्या जोरावर एशियाड आणि ऑलिपिक्स् आपल्या भूमीवर घडवून आणण्याची महत्त्वाकाक्षी कामगिरी कोरियनानी

आपल्या हाती घेतली होती आणि आता ती सफल करण्यासाठी सारी जिद्द जणु पणाला लावली होती

सिओल नगरी सर्व तऱ्हेने ऑलिपिक खेळासाठी सुसज्ज झाली होती सुरक्षिततेची समस्या तीव्र असूनही त्याचा फारसा बाऊ न करता उत्तम व्यवस्था करण्यात आली होती रस्त्यावर वाहनाची गर्दी होऊ नये म्हणून एका दिवशी केवळ सम आकड्याच्या गाड्या तर दुसरे दिवशी विषम आकड्याच्या गाड्याच रस्त्यात जाऊ देण्यात येतील असा नियम करण्यात आला होता ज्या प्रचड प्रमाणावर कोरियनानी ऑलिम्पिक खेळाची तयारी केली होती त्यामानान जगाच्या सर्व ठिकाणाहून प्रेक्षक कमी प्रमाणावर आले तरीही हजारो प्रेक्षक ऑलिंपिक खेळासाठी हजर होते भारताच्या खेळाडूच्या यादीत कुणाकुणाचा समावेश आहे याची यादी शेवटच्या घटकेला कळवण्यात आली नाव नोंदवण्याची मुदत सपण्याच्या आधल्या रात्री बारा वाजता ऑलिम्पिक समितीला फोन करून पी टी उषा आणि इतर महिला खेळाडूची नाव देण्यात आली कारण तोपर्यंत ती येणार की नाही आणि तिच्याबरोबर कोण येणार यासबधीचा घोळ चालू होता

शहराच्या उत्साहाला पुन्हा एकदा उधाण आल होत खेळाडूच्या आणि पर्यटकाच्या झुडीच्या झुडी शहरात फिरत होत्या कोरियन नागरिक मात्र आपल सपूर्ण शहर ऑलिम्पिक पाहुण्याच्या दिमतीला देऊन स्वत बाजूला झाल्यासारखे वागत होते ऑलिम्पिक स्पर्धांसाठी आलेल्या भारतीय चमूची प्रचड पगत राजदूतावासात साजरी झाली साडेतीनशे माणसाचा जथा आमच्या घरात सामावण्याचा आमचा प्रयत्न तडीस गेला खरा मात्र लाटामधे गटागळ्या खाण्याचा अनुभव मी त्या दिवशी स्वत च्या घरच्या मानवी समुद्रात घेतला

चहूबाजूनी माणस घरात शिरत होती आलेल्या पाहुण्याच स्वागत करायला आम्ही मुख्य दरवाजापाशी उभे राहिलो होतो हे कुणाच्या गावीही नसाव कारण घरात शिरताच समोरच्या टेबलावर तदुरी चिकन, नान, गुलाबजामून, बोंडे याची आरास लोकाच लक्ष वेधून घेत होती एरवी सिओलमधे भारतीय जेवण दृष्टीस पडायची देखील मारामार, तेव्हा ते लोकाच प्रमुख आकर्षण ठरल्यास नवल नव्हत अडीचशे लोकाना आमत्रण गेली असताना शभरान आकडा वाढला कसा याच आम्ही मनाशी नवल करत राहिलो बहुधा सिओलमधल्या सर्व भारतीय मडळींनी राजदूतावासाला भेट देण्याचा विडा उचलला होता की काय नकळे! आमच्या प्रचड डायनिंग हॉलमधेही माणस मावत नव्हती शेवटी बाहेरच्या थडीवाऱ्याला न जुमानता गर्दी अगदी ओसडून बाहेर वहायला

लागली त्या बाजून बाहेर जाणारा रस्ता तलावातल्या गोल पायऱ्यावरून तोल सावरत जाण्याचा होता घाईगर्दीत त्यात कुणी चुकून पडत तर नाही ना ही भीती होतीच सर्वांना जेवण पुरवता पुरवता त्या दिवशी मला ब्रह्माड आठवल त्या मेजवानीनतर आठशे मीटर्सची शर्यत स्वत च पळाल्यासारखी माझी दमछाक झाली

ऑलिम्पिक खेळामधे आपल्या खेळाडूकडून फारशा आशा नव्हत्याच हॉकी सघाकडून आपली थोडीफार अपेक्षा होती त्यानही आपली निराशा केली त्यावेळच्या आपल्या क्रीडामत्री श्रीमती अल्वा आपल्या चमूबरोबर ऑलिम्पिक खेळासाठी आल्या होत्या इग्लडबरोबर आपल्या हॉकीचा सामना चालू असताना श्रीमती अल्वा आणि इग्लडच्या प्रिन्सेस ॲन व्ही आय पीं साठीच्या शामियान्यात एकाच ठिकाणी बसल्या होत्या प्रिन्सेस ॲन याच्या समोर ताठ मानेन बसण्याचा मान आपला सघ आपल्याला देईल अशी श्रीमती अल्वाना आशा वाटत होती मात्र आपला सघ इग्लडबरोबरही हरला आपल्या खेळाडूनी पदकाची आशाच न बाळगल्यामुळे ती न मिळाल्याचा विषादही फारसा कुणाला जाणवल्याच दिसल नाही कोरियात यायला मिळाल्याच्या आनदात सर्व मडळी मश्गुल होती

एकीकडे सारा दक्षिण कोरिया एकजुटीन ऑलिम्पिक महोत्सवाच्या यशासाठी झटत असताना विद्यार्थीगण ऑलिम्पिकचा फार्स आपल्या देशात करायची गरजच काय असा प्रश्न विचारत होते तर कधी एकदा ऑलिम्पिक खेळ सपतात आणि आम्ही सुटकेचा निश्वास टाकतो अशी सामान्य कोरियनजनाची प्रतिक्रिया होती मात्र कोरियात घडत असलेले ऑलिम्पिक खेळ म्हणजे आपल्या देशान केलेल्या प्रगतीवर जगाच शिक्कामोर्तब आहे यात कुठल्याही कोरियन नागरिकाला सदेह नव्हता ऑलिम्पिक्सचे पाहुणे देशोदेशी परतले ते 'हँड इन हँड' या कोरियाच्या ऑलिम्पिक गीताची धुन गुणगुणत आणि कोरियाची प्रशसा करतच ऑलिम्पिक्सनतर कोरियनाना मोठी पोकळी निर्माण झाल्याच जाणवल असल्यास नवल नव्हत ८१ साली जर्मनीत बादन बादन या ठिकाणी ८८ सालच्या ऑलिम्पिक्सच ठिकाण म्हणून सिओलची निवड झाली तेव्हापासून फलफल (८८) चा घोष कोरियात सुरू झाला होता ऑलिम्पिक खेळानतर तो सपला आणि हळुहळू पूर्ववत जीवन सुरू झाल लष्करी राजवटीत कुठल्याही प्रकारची टीका ऐकायची सवय नसलेल्या राज्यकर्त्यांना लोकशाहीत जनमत किती प्रभावी असू शकत याची प्रचीती येऊ लागली होती देवू-ह्यूडे सारख्या मोठ्या कपन्यामधे आतापर्यंत व्यवस्थापनाविरुद्ध ब्र उच्चारण्याची कुणाची छाती नव्हती तिथे आता राजरोस सप होऊ लागले होते लोकशाहीची बीज रुजत असल्याची ती चिन्ह होती ऑलिम्पिक महोत्सवानतर माजी राष्ट्राध्यक्ष श्री चु दू व्हान याच्या राजवटीतल्या

कारभाराची ससदेत चौकशी झाली ती टेलिव्हिजनवरही दाखवण्यात आली गैरव्यवहाराच्या कृत्याचे त्याच्यावर आरोप ठेवण्यात आले त्याना जनतेची जाहीर क्षमा मागावी लागली त्याची सर्व मालमत्ता सरकारन ताब्यात घेतली देशाच्या पूर्वकिनाऱ्यावर पेकताम या ठिकाणच्या बुद्धमदिरात त्याना जवळ जवळ हद्दपार करण्यात आल ते आणि त्याच्या पत्नी तिथे बौद्ध'भिक्षुभिक्षुणीसारखे राहू लागले

ऑलिम्पिक्सची निरवानिरव होईपर्यंत आमच्या कोरियातल्या वास्तव्याला साडेतीन वर्ष पूर्ण होत आली होती कोरियातली रोजची दृश्य आता सवयीचा भाग बनून गेली होती भाजीच्या मोटारीतून कर्ण्यावर भाजीचे भाव ओरडणारे भाजीवाले, हातात कोरियन गुचीच्या आणि पिअर कार्डाच्या पिशव्या लटकावलेल्या अजमा, दुऽऽध म्हणून आरोळी देण्याऐवजी दुधाचे डबे जोरान जमिनीवर आपटून दूध आल्याची खबर देणारे दूधवाले, रात्री दहा-अकरा वाजेपर्यंत रस्त्यावर कपबशा आणि क्रॉकरीपासून बुटापर्यंतचा माल हसऱ्या चेहऱ्यान विकणारे कोरियन विक्रेते आणि मोडक्यातोडक्या कोरियनमधे त्याच्याशी भाव करताना होणारी त्रेधा तिरपीट एव्हाना आमच्या जीवनाचा स्थायी भाव बनून गेली होती

तिथली भाषा, सस्कृती, धर्म आणि चालीरीती वेगळ्या असूनही काही व्यक्ती अशा भेटल्या की हे मधले अडसर गळून पडले आणि ती नात्यागोत्याची नसलेली माणस कायमची मनावर कोरली गेली फुलामधे रमणाऱ्या मदाम ईम् व्हा कॉग पहिल्या भेटीत हसल्या त्याच खूप दिवसाची ओळख असल्यासारख्या गेली तीस वर्ष त्या तिथे कोरियन इकेबाना फ्लॉवर सोसायटी चालवत आहेत ती त्यानी लहानाची मोठी केली आणि त्यात स्वत चा जीव ओतला कितीतरी विद्यार्थिनी त्याच्या हाताखाली शिकून स्वत इकेबाना शिकवू लागल्या आहेत मात्र मदाम ईम कुणावरही अवलबून न राहाता पहाटे पाच वाजता उठून फुलाच्या मार्केटमधे जाऊन स्वत फुल निवडून त्याच्या पुष्परचना करीत असत आणि पुन्हा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला तत्पर असत देशोदेशी स्वत च्या पुष्परचनेची प्रदर्शन भरवून आलेल्या विनम्र व्यक्तिमत्वाच्या मदाम ईम् स्वत च पाढऱ्या सोनचाफ्याच्या फुलासारख्या सदा प्रफुल्लीत दिसत फुलाच्या सगतीतच उभा जन्म घालवलेल्या पासष्ट वर्षांच्या मदाम ईम् व्हा कॉगच बोलणही हळूवार असायच इकेबानासाठी लागणाऱ्या खास फुलदाण्या त्या आपल्या भट्टीत स्वत बनवत असत फुलाच आणि माझ नातही फार जवळच आमच्या वयातल अतर फुलाच्या सगतीत केव्हाच विरून जायच त्यानी प्रेमान भेट म्हणून दिलेल्या माझ्या जवळच्या फुलदाण्यामधे फुल लावताना मला नेहमी त्याची हसरी मूर्ती दिसते

तर समाज कार्यामधे मन रमवणाऱ्या श्रीमती ली बुम सुक. त्यांच्या पतींनी भारतात कोरियाचं राजदूतपद भूषवलं होतं तिथल्या त्यांच्या कारकीर्दीत ते भारतीयांमधे अत्यंत लोकप्रिय झाले होते नंतर ते कोरियाचे परराष्ट्रमंत्री झाले १९८३ साली कोरियाच्या राष्ट्राध्यक्षाबरोबर ते ब्रम्हदेशाच्या भेटीवर गेले असताना तिथल्या दुर्दैवी घातपाती कृत्यात ते मारले गेले तेव्हा सर्व कोरिया हळहळला होता मोठ्या कष्टानं त्या दु:खातून वर येऊन श्रीमती लींनी स्वत:ला समाजकार्यात बुडवून घेतलं त्या गरीब स्त्रियांसाठी निधी गोळा करून त्यांना पोटापाण्याचा व्यवसाय उभा करून देतात भारताबद्दल श्री ली बुम सुक यांना वाटणारा आपलेपणा श्रीमती ली यांच्याबरोबरच्या संभाषणात पदोपदी जाणवायचा कुणीही भारतीय भेटल्यावर त्यांना जवळचं माणूस भेटल्यासारखं वाटायचं त्यांच्याकडून मिळालेलं प्रेम निर्व्याज होतं

अनेकवेळा पाहिलेली बुद्धमंदिरं परत त्याच उत्साहानं आमच्याबरोबर पाहाणारे प्राध्यापक याग! त्यांच्या कोरियन शरीरात भारतीय मन होतं की काय नकळे! ते कधी परके वाटलेच नाहीत धोंगदूसा, हेईनसा, चिंगवानसा, पोपचूसा अशा बुद्धमंदिराची यात्रा केल्यावर सुधीर त्यांच्याशी त्या मंदिराच्या वैशिष्ट्याविषयी चर्चा करीत असत भारतातून चौदाव्या शतकात आलेल्या तायाँग या भिक्षूची समाधी आम्ही प्रा यागबरोबर पाहिली जपानमधे बुद्धधर्मातली झेन ही शाखा प्रस्थापित करण्यात या भिक्षूचा प्रमुख भाग होता

पुसान विद्यापीठातले उमद्या व्यक्तिमत्वाचे प्रा आन दिल्लीत पाचसहा वर्षं काढल्यानंतर दिल्लीकरच होऊन गेले होते कुडता, कोल्हापुरी चपला आणि शबनम् घेऊन दिल्लीत वावरणाऱ्या प्रा आन यांना कोरियातला कोट, बूट, टोपी हा सरंजामही आता नकोसा वाटायला लागला होता कोरियाच्या दक्षिण टोकाला असलेल्या पुसान विद्यापीठात हिंदीचा विभाग सुरू ठेवण्यात प्रा आन यांचाही भाग होता आम्ही तेथे असताना या हिंदी विभागातर्फे कोरियन विद्यार्थ्यांसाठी हिंदी वक्तृत्वाच्या स्पर्धा सुरू करण्यात आल्या होत्या

प्रा आनना भारतीय जेवण फार प्रिय करीच्या वासानं त्यांना भूक लागत असे कोरियात 'करी' या नावानं लोकांना फसवण्यात येऊन काहीतरी भलतंच खायला मिळतं अशी त्यांची तक्रार असायची प्रा आन यांना पुसानमधले भारताचे अनधिकृत प्रतिनिधी म्हणता येईल इतकी त्यांना भारताविषयी आच होती कोरियन भाषेच्या अभ्यासासाठी भारतातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढावी यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असत

श्री हाम् सुक हान या विचारवंताशी झालेली भेट अविस्मरणीय होती त्याना कोरियाचे महात्मा गाधी म्हटल जात असे कोरियातल्या लष्करी, जुलमी राजवटीला त्यानी सतत विरोध केला तसच लोक स्वातत्र्य, मत स्वातत्र्य आणि अहिंसा यासाठी ते जन्मभर झगडले गाधींच्या शिकवणुकीचा अभ्यास करून त्यानी भारताला भेट दिली होती त्याना कितीतरी वर्ष भाषण करण्याची पण बदी होती मात्र ८७ साली गाधीच्या पुण्यतिथीच्या दिवशी जाहीर सभेत भाग घ्यायला त्याना सरकारन परवानगी दिली महात्मा गाधींची सत्याग्रह आणि अहिंसा याबाबतची शिकवणूक कोरियालाही कशी लागू आहे याचा त्यानी आपल्या भाषणात वारवार उल्लेख केला होता पुढे आम्ही तिथे असतानाच त्याचा मृत्यू झाला

भारतीय सस्कृतीची धुरा कोरियामधे उचलून धरणाऱ्या मदाम किम् याग शिक भारतीयाना फार जवळच्या वाटत कोरियाच्या टागोर सोसायटीच्या त्या अध्यक्षा श्री रवींद्रनाथ टागोरानी १९२९ साली आपल्या कोरियावरच्या कवितेत 'द लॅम्प बेअरर ऑफ एशिया' असा मानाचा किताब कोरियाला दिला आणि सर्व कोरियनाची मन जिंकून घेतली भारताच्या सदर्भात बुध्दानतर कोरियनाच्या तोंडी येत ते श्री रवींद्रनाथ टागोर याच नाव इतका त्याच्या नावाचा तिथे महिमा आहे.

मदाम् किम यॉग शिक गेली दहा वर्ष सातत्यान ही सोसायटी चालवत आहेत अनेक कोरियन विद्यार्थी या सोसायटीतर्फे शाति निकेतनमधे भारतीय सस्कृतिचा अभ्यास करण्यासाठी म्हणून जातात

कोरिया ताकोमा या शिपिंग कपनीचे अध्यक्ष श्री ली हेही अतिशय खुमासदार व्यक्तिमत्व ते पूर्वी कोरियन नेव्हीमधे रिअर ॲडमिरल होते १६ व्या शतकातले कोरियाचे सुप्रसिद्ध नौसेनानी ॲडमिरल 'ली सुनशिन' या लींच्या वशातले हया त्याच्या पूर्वजान आपल्या लोखडाच कवच असलेल्या नाविन्यपूर्ण जहाजातून जपानचा पराभव केला होता लींना आपल्या या प्रसिद्ध पूर्वजाचा फार अभिमान टाकोमा कपनीच्या जहाजाच नामकरण मी केल त्यानिमित्तान त्याची आमची ओळख झाली आणि त्यातून स्नेह वाढत गेला वयाची साठी उलटली तरी आयुष्याचा वेग श्री लींनी कुठेही कमी केला नव्हता आठवडाभर दिवसाचे १२-१४ तास काम आणि शनिवारी-रविवारी गॉल्फ आपणही सात मजली हसून अवतीभवतीच्या सर्वांना त्या हास्यात सामील करून घेण्याची कला त्याना चागलीच साधली होती

एके दिवशी ऑफिसमधून घरी आल्यावर सुधीर म्हणाले, ओळख पाहू आपण कुठे जाणार ते तोही देश विभागलेला आहे आणि अतिशय श्रीमत आहे मला मात्र

ओळखता आल नाही मग यानी आम्ही जर्मनीला जाणार असल्याचा गौप्यस्फोट केला जर्मनीतला पैसा एकवटलेला आहे त्या फ्रॅंकफर्ट या ठिकाणी आमची बदली झाली होती 'आपल' झालेल हे जग आता सोडून जाव लागणार आणि स्नेहाचे धागे उपसून परत नवीन वीण घालावी लागणार याची मनाला टोचणी लागायला लागली कोरियन जीवनाच्या लयीत आम्ही किती सामावून गेलो होतो याचच ते लक्षण असाव एका विभाजनाकडून दुसऱ्या विभाजनाकडे असही क्षणभर मनात आल (तेव्हा पुढे घडणाऱ्या इतिहासाची काय कल्पना )

आम्ही कोरिया सोडून जाणार ही बातमी लगोलग सर्व स्नेहीमंडळींना समजलीच मग राजनैतिक वर्तुळातले निरोप समारभ, कोरियन मित्रमंडळींकडचा पाहुणचार आणि जोडीला पॅकिंग, शेवटचा महिनाभर ही धामधूम चालू होती

कोरियन परराष्ट्र मत्र्यानी आम्हाला खास मेजवानी देऊन अधिकृतरीतीन निरोप दिला राजदूत या नात्यान, सुधीरनी राष्ट्राध्यक्ष श्री नो ते वू याची भेट घेऊन त्याचा निरोप घेतला मीही श्रीमती नो ते वू याची वेगळी भेट घेतली बुद्धधर्म ज्या देशातून आला त्या भारतातून आलेले आम्ही, कोरियन लोकाना किती जवळचे वाटतो हे श्रीमती नोते वू यानी स्वत बोलून दाखवल त्या स्वत बौद्धधर्मीय असल्यान त्या हे मनापासून बोलत असल्याच मला जाणवल

सिओलचा निरोप घ्यायचा दिवस उजाडला किंपो विमानतळावर जाताना पावल जड झाली होती विमानतळावर पोचल्यावर कोरियन अधिकारी, हितचिंतक आणि स्नेहीमंडळींचा जमाव बघून मन अधिकच भरून आल सर्वांना गुडबाय म्हणून झाल तीन वर्षं सावलीसारखा याच्या पाठीमागे राहिलेला ड्रायव्हर त्याचा निरोप घेताना मात्र मला स्वत ला आवरता आल नाही

कोरियन एअरच्या विमानात अन्यगहाशिमनिका (सुस्वागतम्) म्हणून कोरियन सुदरीन लवून अभिवादन केल विमानाची घरघर सुरू झाली विमानान उची गाठली आणि रोजची परिचयाची झालेली दृश्य हळूहळू धुक्यात विरत गेली टोलेजग इमारती, हान नदीवरचे पूल, भोवतालच्या टेकड्या, सर्व नजरेआड झाल कोरिया सोडल्यानतर मन पटलावरून कोरियाची पाटी पुसट होऊन तिथे नवीन चित्र निर्माण व्हायला फार अवधी लागला मनाचा एक कप्पा आजही कोरियाच्या सुगधी आठवणींनी भरलेला आहे

★ ★ ★

# फ्रँकफर्ट-जर्मनी

फ्रँकफर्टला जायच हे निश्चित झाल्यावर तिथली सतत ढगाळलेली हवा डोळ्यासमोर यायला लागली युरोपमधला समृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या बलाढय झालेला देश असं जर्मनीच मनात ठसलेल चित्र! विशेषत युरोपीय आर्थिक समुदायामधल्या देशाच्या सदर्भात जर्मनीच स्थान आणखी महत्त्वाच झाल्यामुळे जर्मनीबद्दलच कुतूहल अलिकडे सर्वत्र वाढलेल होत त्या जर्मनीत रहायला मिळणार याच आकर्षणही वाटल मात्र पूर्वी जिनीव्हामधे राहिल्यामुळे युरोपच जीवन जवळून अनुभवलेल होत तेव्हा आशियामधल्या मैत्रीपूर्ण आणि कोरियामधल्या खेळीमेळीच्या वातावरणानतर युरोपच्या थड आणि औपचारिक मौसमाची आता परत सवय करण जरा कठीणच जाणार होत मात्र युरोपात परत प्रवास करायला मिळणार ही भावनाही मनाला सुखावून गेली होती विशेषत फ्रँकफर्ट युरोपच्या मध्यावर असल्याकारणान युरोपमधे कुठेही जाण फ्रँकफर्टहून अत्यत सोयीस्कर एवढच नव्हे तर आजकाल जगात हिंदुस्थानातून पूर्व युरोप, उ अमेरिका, द अमेरिका, आफ्रिका कुठेही जाण्यासाठी फ्रँकफर्टचा विमानतळ हे जक्शन बनल आहे.

प्रत्यक्ष फ्रँकफर्टमधे पाऊल टाकल्यावर पर्यटकाच्या दृष्टिकोनातून ध्यानात असलेली या शहराची प्रतिमा आणि आताच फ्रँकफर्ट यात कितीतरी बदल जाणवला मध्यतरीच्या

काळात फ्रँकफर्टमधे अमेरिकेसारख्या काचेच्या अनेक गगनचुंबी इमारती बांधण्यात आल्या आहेत जर्मनीतल्या इतर शहराच्या मानान फ्रँकफर्टच वेगळेपण जाणवत ते याचमुळे बर्लिनमधे पॅरिसचा भास आहे तर हॅम्बुर्ग आणि म्युनिक जुन्या जर्मनीच्या वैभवाची आठवण करून देतात फ्रँकफर्ट मात्र अमेरिकेतलच एखाद शहर वाटत (दुसऱ्या महायुद्धात फ्रँकफर्ट पूर्ण बेचिराख झाल्यान त्याची सपूर्ण पुनर्रचना झाली )

जगातल्या बँकर्ससाठी फ्रँकफर्ट हे अत्यत महत्त्वाच ठिकाण कारण सर्व महत्त्वाच्या बँकाच्या शाखा इथे आहेत गेल्या काही वर्षात जर्मन बँका अत्यत श्रीमत झाल्या त्याच वैभव फ्रँकफर्टमधल्या इमारतींमधे दिसत आपल्या रिझर्व बँकेसारखी जर्मनीची बुंदेस बँक फ्रँकफर्टमधेच आहे या बँकेचा देशाच्या आर्थिक व्यवस्थेवरचा सल्ला महत्त्वाचा समजला जातो डॉईश मार्क हे सध्याच महत्त्वाच चलन आहे त्याच्या उलाढाली फ्रँकफर्टमधे होतात फ्रँकफर्टची स्टॉक एक्स्चेंज प्रसिद्ध आहे. न्यूयॉर्क, टोकिओ, लडन आणि फ्रँकफर्ट या जगातल्या सर्वात महत्त्वाच्या स्टॉक एक्सेंज समजल्या जातात

जर्मनीत येऊन स्थिरस्थावर होत नाही तोच बर्लिन भित पडल्याची घटना घडली आणि बघता बघता इतिहास बदलला ९ नोव्हेंबर १९८९ हा जर्मनीच्या इतिहासातला फार मोठा मैलाचा दगड आहे. (बर्लिन शहराच्या इतिहासातला तर हा विजयाचा दिवस गेल्या दोन तपापेक्षा अधिक काळ या शहराला आणि जर्मनीला विभागणारी बर्लिनची भित या दिवशी नामधारी ठरली ) इतके दिवस ही भित विभाजनाची किंबहुना थड युद्धाची सतत आठवण करून देणारी त्या भितीवरून किंवा खालून बोगदे खणून पश्चिम बर्लिनमधे जाण्याचा कितीतरी जणानी प्रयत्न (बहुधा असफलच आणि दारूण) केला नोव्हेंबरच्या ९ तारखेला ही अभेद्य भित पार झाली त्यात मानवी मनोशक्तीन आणि सातत्यपूर्ण दबावान खिंडार पडल दोन जर्मनीत एकजूट आणि मिलाप याची ती नांदी होती

दोन्ही बाजूला जाण्यायेण्याची अफाट गोष्ट घडलीही मोठ्या झपाट्यान १९८९ च्या उन्हाळ्यात हगेरी देशान पूर्व जर्मन नागरिकाना आपल्या देशातून ऑस्ट्रियात जाऊ देण्याची मुभा दिली मग पर्यटनाच्या निमित्तान हजारो पूर्व जर्मनाचे तांडे, गाड्यातून, बसेसमधून आणि चालतही हगेरी मार्गे ऑस्ट्रियात येऊ लागले आणि ऑस्ट्रियातून पश्चिम जर्मनीत लवकरच झेकोस्लोव्हाकियातून अशा प्रकारचा मार्ग सुरू झाला पूर्व जर्मन तरुण-तरुणी बर्लिनमधे पूर्व-पश्चिम जर्मनी याच्या सरहद्दीवरही मोठ्या जिद्दीन निदर्शन करू लागले पश्चिमेकडे जाण्यासाठी कमालीच्या लाब रांगा लागू लागल्या आणि तिकडे गेलेले लोक परत पूर्व जर्मनीला जाण्याच नावही काढेनासे झाले

ज्या सख्येन आणि आवेगान पूर्व जर्मन पश्चिमेकडे यायला लागले ते बघून पश्चिम जर्मनीच्या राज्यकर्त्यांना, लोकाना वाटायला लागल की जर सरहद्द उघडी केली नाही तर हा दबाव असह्य आणि स्फोटक होईल त्यानीही पूर्व जर्मनीतल्या लोकाना आवाहन करायला सुरवात केली आधीच पश्चिम जर्मनीच्या टेलिव्हिजनमुळे पूर्वेकडे खूप प्रभाव पडतच होता या सगळ्याचा परिणाम म्हणजे ९ नोव्हेंबरची घटना।

नतरच्या सहा महिन्यात फार वेगान घटना घडल्या ३१ डिसेंबर १९८९ ची रात्र दोन्ही बाजूच्या जर्मन नागरिकानी बर्लिन भितीच्या सभोवती एकत्र येऊन सुप्रसिद्ध ब्रँडनबर्ग कमानीच्या परिसरात आतषबाजीच्या जल्लोषात घालवली नव्या वर्षाच स्वागत जर्मनीच्या जवळजवळ आठ कोटी लोकानी एका नव्या उत्साहान आणि जोशान केल नोव्हेंबर ८९ ते ऑक्टोबर ९० या जेमतेम वर्षभराच्या कालखडात ४५ साली घडलेला इतिहास पुसून टाकला गेला आणि रक्तपात न होता जर्मनीचे दोन विभिन्न भाग जर्मन लोकाच्या एकमेकाच्या ओढीमुळे देशभावनेच्या बळावर एकत्रित आले पूर्व जर्मनीतली विस्कळीत यत्रणा, आर्थिक पीछेहाट आणि तिथल्या जनतेची पश्चिम जर्मनीकडे जाण्याची तीव्र इच्छा या कारणामुळे पूर्व जर्मनीतल्या निवडणुकीत तिथल्या कम्युनिस्ट आणि सोशॅलिस्ट पार्टीचा पाठिंबा सपुष्टात आला आणि पश्चिम जर्मनीच्या ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियनला बरीच मत मिळाली ९० च्या जुलैमध्ये दोन देशातल चलन एक म्हणजे पश्चिम जर्मनीचा मार्क अस बनल एक पश्चिम मार्कला एक पूर्व मार्क अशा दरान पूर्व जर्मन जनतेला आपली काही शिल्लक बदलता आली नतरच्या दोन तीन महिन्यात पूर्वेकडची आर्थिक आणि राजकीय परिस्थिती अशा गतीन बिघडत गेली की एकीकरणाशिवाय दुसरा मार्ग दोन्ही देशातल्या पुढाऱ्याना दिसेना अर्थात् एकीकरण पश्चिम जर्मनीच्या घटनेच्या कलमानुसार पश्चिम जर्मनीच्या अटींवर होणार होत पूर्व जर्मनीला ते मानण्याशिवाय उपायच नव्हता कारण अधिक विलब लागला असता तर पूर्वेकडची यत्रणा सपूर्णत मोडून हजारोंच्या सख्येन लोक पश्चिमेकडे यायला निघाले असते

एकीकरणाचा प्रश्न फक्त दोन जर्मनीतलाच होता अस नाही दुसऱ्या महायुद्धात जर्मनीवर सार्वभौमत्व प्राप्त केलेले जे चार विजयी देश होते (अमेरिका, इग्लड, फ्रान्स आणि रशिया) त्याची समतीही त्याला आवश्यक होती पश्चिमेच्या देशाची नाटो आणि पूर्वेच्या वॉर्सा करार अशा सघटनाचे पश्चिम आणि पूर्व जर्मनी हे सदस्य असल्यान दोन्ही कराराच्या सेनाच पुढे काय करायच, बर्लिनच भवितव्य कस ठरवायच हे मोठे प्रश्न पुढे होते मात्र जर्मनीच भाग्य अस मोठ की अमेरिका आणि सोव्हिएत युनियन याच्यातल वाढत सामजस्य, गोर्बाचोव्हची वाढती अतर्गत राजकीय आणि

आर्थिक कुचबणा, तसच पश्चिम जर्मनीत चान्सलर कोल याच आत्मविश्वासपूर्वक नेतृत्व यामुळे अमेरिका, रशिया, फ्रान्स आणि इग्लड या जर्मनीतल्या सत्ताच जर्मन एकीकरणाला मान्यता मिळायला आणि त्या सबधीच्या तपशीलवार शिक्कामोर्तब व्हायला काही अवधी लागला नाही जर्मनी नाटोत राहूनही चार वर्षांपर्यंत रशियन फौजा पूर्व भागात राहतील आणि हळूहळू तिथून परत काढण्यात येतील असं ठरलं रशियन सैन्याच्या पुनर्वसनासाठी जर्मनीन आर्थिक हमी घेतली

जर्मन नेत्यानी सुद्धा जर्मनी आणि पोलड याची सरहद्द ओडर निसे ही नदी राहील आणि जर्मनी आपल्या मागच्या काळातल्या सीमाची मागणी करणार नाही अस आश्वासन दिल गेल्या ५-६ दशकाच्या भीषण घटनावर, दुसऱ्या महायुद्धानतरच्या शीत युद्धावर, बर्लिन शहराच्या कृत्रिम दुर्दैवी विभाजनावर अशा रीतीन पडदा पडला मार्कचा मार्क्सवर विजय झाला फिनिक्स पक्षान राखेतून वर याव तसा एक नवीन जर्मनी उदयाला येऊ लागला

३ ऑक्टोबर १९९० च्या रात्री बर्लिनमधे राईशस्टागच्या सुप्रसिद्ध इमारतीसमोर रोषणाईत एका इतिहासाची पूर्तता होऊन नवीन भवितव्याचा प्रारभ झाला हा समारभ गौरवपूर्ण, गभीर आणि रोमाचकारी होता एकत्रित जर्मनीचा उदय हा पश्चिम युरोपच्या वाढत्या सामर्थ्याच्या विशेषत आर्थिक आणि व्यापारी सपन्नतेच्या आणि दिवसेंदिवस होणाऱ्या एकीकरणाच्या घडामोडींशी सलग्न आहे का, नवा जर्मनी युरोपला आणि नतर सगळ्या जगाला आपल्या बळान परत धोका निर्माण करील का अशी भीती युरोपमधल्या अनेक देशाना वाटत आहे आणि ती अनेक नेत्यानी व्यक्तही केली आहे. इग्लडच्या माजी पतप्रधान मार्गारेट थॅचर या जर्मन एकीकरणाबद्दल फारशा उत्साही नव्हत्या फ्रान्सचे अध्यक्ष श्री मितराँ या घटनेबद्दल साशक होते, पण जर्मन सरकारची आश्वासन, पश्चिम जर्मनीतल्या गेल्या चाळीस वर्षांच्या लोकशाहीची कारकीर्द आणि अमेरिकेचा एकीकरणाला पाठिबा यामुळे युरोपीय नेत्याना निमूटपणे आणि सन्मानपूर्वक मान्यता देण भागच होत

जर्मनीच एकीकरण झाल खर मात्र एकीकरणाच्या विजयोन्मादात पुढे कुठल्या प्रकारच्या समस्या उभ्या रहातील याची दोन्ही जर्मनीना पुरेशी कल्पना आली नव्हती पूर्व जर्मनी पश्चिम जर्मनीत विलीन झाला आणि त्या देशाच व्यक्तिमत्व पार सपुष्टात आल त्याचा झेंडा उतरला त्याची राजकीय सत्ता सपली त्याचे स्वतत्र उद्योग पार बद पडले सरकारी यत्रणा सपुष्टात आल्या त्यापैकी फार थोड्या जणाना पश्चिम जर्मन सरकारी यत्रणेत सामावून घेण्यात आल बाकीच्याना अलविदा करण्यात आली

हजारो लोकानी आपल्या नोकऱ्या गमावल्या अर्थव्यवस्था खुली करण्यात आली मात्र पश्चिम जर्मनीसारख्या फार पुढे गेलेल्या देशाबरोबर चढाओढ करण पूर्व जर्मनीला अशक्यप्राय होत त्याचे आर्थिक उद्योग सरकारी यत्रणेत सामावले असल्यामुळे त्याची उत्पादकता आणि वस्तूचा दर्जा कमी प्रतीचा होता एकीकरणानतर पूर्व जर्मनीमधले नागरिक सुद्धा आपल्या वस्तू नाकारून पश्चिमेकडे बनलेल्या वस्तू घेऊ लागले त्याचे कारखाने बद पडायला लागले तशी बेकारीची समस्या प्रचड प्रमाणावर वाढली

अखड जर्मनीच्या भावनेन दोन्हीकडून जर्मन इतके भारावून गेले होते की त्यासाठी वाटेल त्या हाल अपेष्टा सोसायची पूर्व जर्मनीची आणि त्याना हवी ती मदत करायला पश्चिम जर्मनीची मानसिक तयारी होती मात्र प्रत्यक्ष ते घडवून आणताना निर्माण होणाऱ्या समस्या त्याना पदोपदी जाणवत आहेत पूर्व जर्मनीतल्या आर्थिक प्रगतीसाठी, तिथली प्रचड बेकारी नष्ट करण्याकरता आणि रशियाला दिलेली आश्वासन पूर्ण करण्यासाठी पश्चिम जर्मनीला मोठ्या प्रमाणात सपत्ति खर्चावी लागेल पूर्व जर्मनीत कराव्या लागणाऱ्या गुतवणुकीचा परिणाम पश्चिम जर्मनीच्या अर्थव्यवस्थेवर आधीच झाला आहे पश्चिम जर्मनीमधले जनतेचे करही अलीकडे वाढले आहेत जर पश्चिम जर्मनी हा प्रश्न योग्य तऱ्हेन हाताळण्यात यशस्वी ठरला नाही तर त्याचा परिणाम सर्व युरोपच्या अर्थव्यवस्थेवर होईल कारण आज युरोपमधे जर्मनी आर्थिक दृष्ट्या सर्वात प्रबळ राष्ट्र आहे. मात्र सध्या तरी जर्मनी एकीकरणानतरच्या अनेक तऱ्हेच्या समस्यानी भेडसावलेल्या स्थितीत आहे. कारण पूर्व जर्मनीची उभारणी हे जर्मनीच्या खर्चाला पडलेल प्रचड खिडार आहे.

निसर्गाच प्रेम जर्मनीइतक फार थोड्या जागी असेल शहराच्या मधूनच एकदम गर्द झाडी सुरू होते शहर जगलात आहे का जगल शहरात आहे असा कधी कधी सभ्रम पडावा इतकी जर्मन लोकाना झाडी प्रिय आहे जर्मन उपनगरात राहिल की तर रानावनात राहिल्यासारख वाटत कारण प्रत्येकाच्या परसदारी निसर्ग असतो घरातही दाटीवाटीन कुड्या ठेवून हिरवळ निर्माण केलेली असते

आमच फ्रॅंकफर्टमधल सरकारी मालकीच घर फ्रॅंकफर्टच्या बाहेर एका श्रीमत खेड्यात आहे. खेड्यामधल हे कौलारू घर आत मात्र ऐसपैस आहे तर घराच्या पार्श्वभूमीवर विस्तीर्ण टेकड्या आणि उच डेरेदार वृक्ष आहेत घराच्या पाठीमागे फिरायला जायची पायवाट थेट जगलात जाते उन्हाळ्यात तिथे फिरायला जाणाऱ्याची गर्दी उसळलेली असते हिंवाळ्यात पाईनची झाड सोडल्यास बाकी झाडाचे खराटे होऊन जातात आजूबाजूच वातावरण निश्चल असत पक्षी आणि माणस कुठे गडप होतात कुणास

आर्थिक कुचबणा, तसच पश्चिम जर्मनीत चान्सलर कोल याच आत्मविश्वासपूर्वक नेतृत्व यामुळे अमेरिका, रशिया, फ्रान्स आणि इग्लड या जर्मनीतल्या सत्ताच जर्मन एकीकरणाला मान्यता मिळायला आणि त्या सबधीच्या तपशीलवार शिक्कामोर्तब व्हायला काही अवधी लागला नाही जर्मनी नाटोत राहूनही चार वर्षांपर्यंत रशियन फौजा पूर्व भागात राहतील आणि हळूहळू तिथून परत काढण्यात येतील अस ठरल रशियन सैन्याच्या पुनर्वसनासाठी जर्मनीन आर्थिक हमी घेतली

जर्मन नेत्यानी सुद्धा जर्मनी आणि पोलड याची सरहद्द ओडर निसे ही नदी राहील आणि जर्मनी आपल्या मागच्या काळातल्या सीमाची मागणी करणार नाही अस आश्वासन दिल गेल्या ५-६ दशकाच्या भीषण घटनावर, दुसऱ्या महायुद्धानतरच्या शीत युद्धावर, बर्लिन शहराच्या कृत्रिम दुर्दैवी विभाजनावर अशा रीतीन पडदा पडला मार्कचा मार्क्सवर विजय झाला फिनिक्स पक्षान राखेतून वर याव तसा एक नवीन जर्मनी उदयाला येऊ लागला

३ ऑक्टोबर १९९० च्या रात्री बर्लिनमधे राईशस्टागच्या सुप्रसिद्ध इमारतीसमोर रोषणाईत एका इतिहासाची पूर्तता होऊन नवीन भवितव्याचा प्रारभ झाला हा समारभ गौरवपूर्ण, गभीर आणि रोमाचकारी होता एकत्रित जर्मनीचा उदय हा पश्चिम युरोपच्या वाढत्या सामर्थ्याच्या विशेषत आर्थिक आणि व्यापारी सपन्नतेच्या आणि दिवसेंदिवस होणाऱ्या एकीकरणाच्या घडामोडींशी सलग्न आहे का, नवा जर्मनी युरोपला आणि नतर सगळ्या जगाला आपल्या बळान परत धोका निर्माण करील का अशी भीती युरोपमधल्या अनेक देशाना वाटत आहे आणि ती अनेक नेत्यानी व्यक्तही केली आहे इग्लडच्या माजी पतप्रधान मार्गारेट थॅचर या जर्मन एकीकरणाबद्दल फारशा उत्साही नव्हत्या फ्रान्सचे अध्यक्ष श्री मितराँ या घटनेबद्दल साशक होते, पण जर्मन सरकारची आश्वासन, पश्चिम जर्मनीतल्या गेल्या चाळीस वर्षांच्या लोकशाहीची कारकीर्द आणि अमेरिकेचा एकीकरणाला पाठिंबा यामुळे युरोपीय नेत्याना निमूटपणे आणि सन्मानपूर्वक मान्यता देण भागच होत

जर्मनीच एकीकरण झाल खर मात्र एकीकरणाच्या विजयोन्मादात पुढे कुठल्या प्रकारच्या समस्या उभ्या रहातील याची दोन्ही जर्मनीना पुरेशी कल्पना आली नव्हती पूर्व जर्मनी पश्चिम जर्मनीत विलीन झाला आणि त्या देशाच व्यक्तिमत्त्व पार सपुष्टात आल त्याचा झेंडा उतरला त्याची राजकीय सत्ता सपली त्याचे स्वतत्र उद्योग पार बद पडले सरकारी यत्रणा सपुष्टात आल्या त्यापैकी फार थोड्या जणाना पश्चिम जर्मन सरकारी यत्रणेत सामावून घेण्यात आल बाकीच्याना अलविदा करण्यात आली

हजारो लोकानी आपल्या नोकऱ्या गमावल्या अर्थव्यवस्था खुली करण्यात आली मात्र पश्चिम जर्मनीसारख्या फार पुढे गेलेल्या देशाबरोबर चढाओढ करण पूर्व जर्मनीला अशक्यप्राय होत त्याचे आर्थिक उद्योग सरकारी यत्रणेत सामावले असल्यामुळे त्याची उत्पादकता आणि वस्तूचा दर्जा कमी प्रतीचा होता एकीकरणानतर पूर्व जर्मनीमधले नागरिक सुद्धा आपल्या वस्तू नाकारून पश्चिमेकडे बनलेल्या वस्तू घेऊ लागले त्याचे कारखाने बद पडायला लागले तशी बेकारीची समस्या प्रचड प्रमाणावर वाढली

अखड जर्मनीच्या भावनेन दोन्हीकडून जर्मन इतके भारावून गेले होते की त्यासाठी वाटेल त्या हाल अपेष्टा सोसायची पूर्व जर्मनीची आणि त्याना हवी ती मदत करायला पश्चिम जर्मनीची मानसिक तयारी होती मात्र प्रत्यक्ष ते घडवून आणताना निर्माण होणाऱ्या समस्या त्याना पदोपदी जाणवत आहेत पूर्व जर्मनीतल्या आर्थिक प्रगतीसाठी, तिथली प्रचड बेकारी नष्ट करण्याकरता आणि रशियाला दिलेली आश्वासन पूर्ण करण्यासाठी पश्चिम जर्मनीला मोठ्या प्रमाणात सपत्ति खर्चावी लागेल पूर्व जर्मनीत कराव्या लागणाऱ्या गुतवणुकीचा परिणाम पश्चिम जर्मनीच्या अर्थव्यवस्थेवर आधीच झाला आहे. पश्चिम जर्मनीमधले जनतेचे करही अलीकडे वाढले आहेत जर पश्चिम जर्मनी हा प्रश्न योग्य तऱ्हेन हाताळण्यात यशस्वी ठरला नाही तर त्याचा परिणाम सर्व युरोपच्या अर्थव्यवस्थेवर होईल कारण आज युरोपमधे जर्मनी आर्थिक दृष्टचा सर्वात प्रबळ राष्ट्र आहे. मात्र सध्या तरी जर्मनी एकीकरणानतरच्या अनेक तऱ्हेच्या समस्यानी भेडसावलेल्या स्थितीत आहे. कारण पूर्व जर्मनीची उभारणी हे जर्मनीच्या खर्चाला पडलेल प्रचड खिडार आहे

निसर्गाच प्रेम जर्मनीइतक फार थोड्या जागी असेल शहराच्या मधूनच एकदम गर्द झाडी सुरू होते शहर जगलात आहे का जगल शहरात आहे असा कधी कधी सभ्रम पडावा इतकी जर्मन लोकाना झाडी प्रिय आहे. जर्मन उपनगरात राहिल की तर रानावनात राहिल्यासारख वाटत कारण प्रत्येकाच्या परसदारी निसर्ग असतो घरातही दाटीवाटीन कुड्या ठेवून हिरवळ निर्माण केलेली असते

आमच फ्रँकफर्टमधल सरकारी मालकीच घर फ्रँकफर्टच्या बाहेर एका श्रीमत खेड्यात आहे. खेड्यामधल हे कौलारू घर आत मात्र ऐसपैस आहे तर घराच्या पार्श्वभूमीवर विस्तीर्ण टेकड्या आणि उच डेरेदार वृक्ष आहेत घराच्या पाठीमागे फिरायला जायची पायवाट थेट जगलात जाते उन्हाळ्यात तिथे फिरायला जाणाऱ्याची गर्दी उसळलेली असते हिंवाळ्यात पाईनची झाड सोडल्यास बाकी झाडाचे खराटे होऊन जातात आजूबाजूच वातावरण निश्चल असत पक्षी आणि माणस कुठे गडप होतात कुणास

ठाऊक जाग असते ती फक्त आजूबाजूच्या कुत्र्याच्या भुकण्याची मात्र मार्च महिना आला की अचानक झाडाची सळसळ सुरू होते पक्ष्याच कूजन ऐकू यायला लागत बागेतल मॅग्नोलियाच झाड बघता बघता फुलानी डवरत पिवळसर पडलेल्या हिरवळीच्या गवतामधे एकदम हिरवी झाक दिसायला लागते आजूबाजूची फळाची झाड मोहोरून उठतात आणि वसत ऋतू आल्याची चाहूल लागते

वसत आणि हेमत हे इथले दोन अत्यत रेखीव ऋतू. वसतातले रग उमलत्या कळ्याचे कोमल, तर हेमतातले रंग अग्नीच्या दाहासारखे गहिरे, पिवळे धमक, ताबडे तपकिरी वसतातला बहर असतो गालावरच्या लज्जेसारखा नाजुक अगावर रोमाच उभे रहावेत तशी झाड बघता बघता मोहोरून जातात गवतातून डोकावणारी पिवळी पाढरी फुल मैलो न् मैल पसरलेल्या विस्तीर्ण कुरणाना गालिच्याच स्वरूप देतात कुणाच्याही हृदयात प्रेमाचा कोंब फुटावा अस इथल वसताच रूप असत तर हेमत ऋतूतली झाडावरची सोनेरी पान त्याना सुवर्ण वृक्षाच रूप देतात. मात्र ज्योत विझण्यापूर्वी मोठी व्हावी तस हे वैभव असत. पधरा वीस दिवसात ही पान गळून जातात आणि मग राहतात ती ओकीबोकी शुष्क झाड

ब्रह्मदेश आणि जर्मनी दोन्ही देशात निसर्गाच मनसोक्त सान्निध्य लाभल ब्रम्हदेशातला निसर्ग खेळकर, अनौपचारिक, सदोदित बहरलेला आणि स्वागताला सिद्ध असणारा मात्र काहीसा आडदाड तर जर्मनीतला निसर्ग जर्मन माणसासारखा गभीर, काटेकोर, शिस्तबद्ध. तो फुलण्याची तारीख ठरलेली आणि पान गळण्याची वेळही ठरलेली इथला निसर्ग रौद्र असूनही माणसाच्या वर्चस्वाखाली दबलेला, पाळीव जगली डॉबरमन कुत्र्यासारखा कितीही गर्द झाडीत पाऊल टाकल तरी इथे कुठल्याही प्रकारच्या जीव जिवाणूची भीती नसते डोंगराच्या कितीही उचीच्या शिखरावर मनुष्याचा पायरव असतो

निसर्गाच वरदान आणि निसर्गाविषयीच प्रेम या दोन्हींच्या युतीमुळे हा देश पर्यावरणाच्या बाबतीत इतर देशाच्या मानान खूप आधी जागरूक झाला सर्वत्र हिरवीगार शेत, कुरण, डोंगर टेकड्यावरची सूचिपर्णी वृक्षाची घनदाट जगल आणि सखल भागातून वाहणारे असख्य ओढे आणि नद्या या प्रदेशाला पाण्याची वर्षभर मुबलकता दर सातआठ दिवसानी थोडा बहुत पाऊस पडणारच दुष्काळ किंवा पूर याची भीतीही फार क्वचित्. तरीपण दुसऱ्या युद्धात होरपळून निघालेल्या आणि फार मोठ्या प्रमाणावरच्या औद्योगिकीकरणामुळे हानी पोचलेला हा देश पर्यावरणाच्या सरक्षणाच्या बाबतीत केव्हाच सावध झाला

किंबहुना जर्मनीत प्रदूषणाविरुद्ध जनतेने २५-३० वर्षांपासून मोठी मोहीमच उघडली आणि प्रगतीच्या किंवा वाढीच्या कोणत्याही टप्प्यात पर्यावरण ही अत्यावश्यक बाब ठरून गेली न्हाईन नदी म्हणजे आपल्या गगेसारखी जर्मन जनमनाशी खोलवर सगठित झालेली पण गेल्या शभर वर्षात या नदीच्या काठच्या अनेक कारखान्यानी ती कमालीची दूषित केली होती मग न्हाईनच प्रदूषण कमी करायच असा चगच अलीकडच्या काळात बाधला गेला आज जगातल्या स्वच्छ जलप्रवाहात न्हाईनची गणना केली जाते पर्यावरणाची नासधूस न होता त्याच रक्षण आणि पुनरुज्जीवन व्हाव यासाठी देशात लोकमत निर्मिती बरोबरच कडक कायदेही करण्यात आले आणि त्याच पालन करण्याची जबाबदारी सरकारन उचलली हवा, पाणी, जमीन, वन, पशुपक्षी, इ निसर्गदूत सपत्तीचा नाश न करता आधुनिकतेच्या काळात ते घटक समाजाला पूरक ठरतील यासाठी या देशात सतत प्रयत्न चालू आहे.

पर्यावरणाच्या विषयाला जर्मनीत किती प्राधान्य दिल जात ह्याची ठळक खूण म्हणजे या देशातला 'ग्रीन' हा राजकीय पक्ष वीस वर्षांपूर्वी प्रथम पर्यावरणाच्या सरक्षणाच्या हेतून प्रेरित होऊन निर्माण झालेली ही एक तरुण लोकाची सघटना अल्पावधीतच राजकारणातल एक महत्त्वाच अग बनली तसच विश्व शातीसाठी झटणाऱ्या अनेक युवसमूहानाही या पक्षान प्रेरित केल जर्मनीत अणवस्त्राच्या विरोधी झगडणाऱ्या अनेक सघटना वेळोवेळी ह्या पक्षाखाली आल्या ग्रीन पक्षाला जर्मनीच्या अनेक राज्यातून काही जागा मिळत गेल्यावर देशातला मोठा पक्ष एस् पी डी — समाजवादी पार्टी यानी ग्रीन्सबरोबर युति करून अनेक सरकार स्थापली आहेत अशा बहुतेक सरकारात साहजिकच पर्यावरण, ऊर्जा इ खात्याचे मत्रीपद ग्रीन पार्टीच्या सभासदाकडे असत सर्वसाधारणपणे ग्रीन पक्षाची भूमिका पर्यावरणाच्या बाबतीत जागरूकता निर्माण करण आणि दक्षता बाळगण अशी असली तरी प्रत्यक्ष राज्यकारभाराची जबाबदारी पडल्यावर मात्र तितकीशी सुलभ रहात नाही कारण मग विकास आणि पर्यावरणाच्या गरजा याचा मेळ घालण किती अवघड आहे याचा त्याना प्रत्यय येतो

जर्मन माणूस काहीसा मितभाषी, सकोची, परतु अत्यत सडेतोड! सहसा कुणाच्या अध्यात मध्यात न पडणारा, थोडासा बुजरा, मात्र एकदा मैत्री झाली की ती नेहमीच जपणारा जर्मन माणूस कित्येक वेळा मराठी माणसाची आठवण करून देतो जर्मन स्त्रिया स्विस स्त्रियासारख्या स्वच्छता प्रिय खिडक्याची साफसफाई आणि घराची स्वच्छता यात जर्मन स्त्री रमलेली असते अलिकडच्या तरुण पिढीमधे नोकरी करणाऱ्या स्त्रियाच प्रमाण जास्त आहे, त्यामुळे त्याना फारसा वेळ घरात घालवता येत नाही मात्र शनिवारी प्रत्येक कुटुबातली माणस आपापली लॉन आणि झाड कापत असतात

आणि रविवारी सपूर्ण आराम जर्मन स्त्री रविवारी तऱ्हेतऱ्हेचे केक बनवते आणि सर्व कुटुब त्याच्यावर तुटून पडत एरवी जर्मन स्त्रीला फारसा स्वयपाक करायचा नसतोच ब्रेड, चीज आणि ब्रॉतवुर्स्त (ब्रेडमधे तळलेल सॉसेज) हा जर्मनाचा आवडता आहार रात्रीही थड जेवण जर्मन माणसाला आवडत बरोबर एखादा ग्लास बियर असली की तो सतृप्त होतो फ्रेंचासारखे चोचले जर्मन माणसाच्या जेवणात नाहीत परतु त्यामुळेच जर्मन माणूस इतर देशाच जेवण चाखून बघायला नेहमीच उत्सुक असतो भारतीय जेवण जर्मनाना अतिशय आवडत मसालेदार करी त्याना फार प्रिय त्याना खाण्याचा छद असावा याची कल्पना बऱ्याच जर्मनाच्या शरीरयष्टीकडे पाहून येते तुदिलतनु जर्मन स्त्री-पुरुष बरेच आढळतात

जर्मनीमधे प्रकर्षान जाणवतो तो लहान मुलाचा अभाव रस्त्यान किंवा पार्कमधे लहान मुल धावत आहेत, बागडत आहेत अस दृश्य जवळ जवळ नाहीच, कारण लहान मुलाची सख्या अत्यत कमी इथला जन्मवाढीचा दर जवळ जवळ शून्य आहे. आधी नवरा बायको लवकर मूल होऊ देत नाहीत आणि एखाद्या मुलानतर त्याच कुटुब लगेचच पूर्ण होत मुलाची सख्या वाढावी म्हणून जर्मन सरकारही प्रोत्साहन देत असत कुटुबातल्या तिसऱ्या मुलाला तर अनेक सवलती मिळतात खर तर मुलाच शिक्षण जर्मनीत मोफत आहे. विद्यापीठामधे सुद्धा शिक्षणासाठी फी नसते हल्ली तर युरोपमध्ये लग्नबधनच तरुण पिढीला नकोस वाटू लागल आहे. लग्नावाचून कितीतरी वर्ष एकत्र राहिल्यावर केवळ सोपस्कार म्हणून कित्येक जोडपी मग लग्न करतात किंवा एखाद मूल झाल्यावर ते लग्न करायचा निर्णय घेतात एकूण तरुण पिढीला मुलाच सगोपन करायला नको वाटत जर्मन लोक मुलाची हौस घरात एखादा कुत्रा किंवा माजर पाळून भागवत असावेत कुत्र्या माजरावर किंवा कोणत्याही मुक्या प्राण्यावर जर्मनाचे अतोनात प्रेम घराचा मालक सतत कुत्र्याच्या तैनातीला असतो ऐन थडीत सकाळच्या प्रहरी बर्फान घसरडया झालेल्या रस्त्यावर झोपाळलेल्या अवस्थेत कुत्र्याना फरफटत रपेटीला नेणारे जर्मन स्त्री-पुरुष सर्रास दिसतात कुत्र्याना इथे कुठेही मज्जाव नसतो सुपर मार्केटपासून हॉस्पिटलपर्यंत ते कुठेही आपल्या मालकाबरोबर जाऊ शकतात

जर्मन माणसाना कामाची शिस्त जितकी दाडगी तितकी वर्षातली सुट्टीही त्याना प्रिय भारतामधे सुट्टी न घेण भूषणास्पद मानल जात (किंवा सुट्टी घेऊन करायच तरी काय असाही अनेक जणापुढे प्रश्न असतो ) जर्मनीमधे सर्व ठिकाणी वर्षातून सहा आठवड्याची तरी सुट्टी असते सरकारी ऑफिसापासून ते खाजगी बँकापर्यंत सर्वत्र हा नियम लागू आहे आणि जर्मन लोक या सवलतीचा पुरेपूर लाभ घेतात अलीकडे इतर देशामधळ जर्मन पर्यटकाच प्रमाण वाढल आहे. जर्मन लोकाना नवीन

नवीन देश बघण्याची अत्यत हौस!' त्याचे थवेच्या थवे दर हिंवाळ्यात भारताला भेट देत असतात नियोजन जर्मन लोकाच्या जन्मत-च अगी बाणलेल असाव दोन महिन्यानतर काय करायच याची सर्व सूची कुठल्याही जर्मनाकडे तयार असते

जर्मन माणसानी केलेल्या भारताचा सखोल अभ्यास हे जर्मनीच आणखी एक वैशिष्ट्य कितीतरी जर्मन अभ्यासकानी भारताच्या वेगवेगळ्या क्षेत्रामधे पाडित्य प्राप्त केल आहे. ही परपरा अर्थात् मॅक्समुलरच्या काळापासून चालत आलेली आहे. वेद उपनिषद-शाकुतल याच्यासकट सस्कृत भाषेच्या खजिन्याच दार जर्मनीला उघडून दिल ते मॅक्समुलर यानी दोनशे वर्षांपूर्वी सस्कृतच प्रेम आजही जर्मनीत दिसून येत हायडलबर्ग, मारबर्ग, गोटिंगेन, ट्यूबिंगेन इत्यादी विद्यापीठामधे स्वतत्र इडॉलॉजी कक्ष आहे आणि जर्मन प्राध्यापक तिथे शिकवताल हायडलबर्ग हे जर्मनीतल अत्यत प्रसिद्ध विद्यापीठ तिथला दक्षिण आशिया विभाग आणि हायडलबर्गचा परिसर पाहिल्याशिवाय कुठल्याही भारतीयाचा जर्मनीतला मुक्काम पूर्ण होऊ शकत नाही जर्मनीतली अनेक शहर दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झाली हायडलबर्गला मात्र किंचितही धक्का लागला नाही त्यामुळे १७८३ पासूनच्या पाटचा असलेल्या जुन्या घडणीच्या इमारती हायडलबर्गमधे आजही त्याच स्थितीत उभ्या आहेत हायडलबर्गमधे मराठी भाषेचे अभ्यासकही आहेत प्राध्यापक सॉथायमर यानी पढरीच्या वारीवर सशोधन केल होत जेजुरीच्या खडोबावर त्याची कुलदैवतासारखी श्रद्धा खडोबावर त्यानी वार्तापटही तयार केला वाघ्यामुरळीची माहिती अस्सल मराठी भाषेत प्रा सॉथायमर याच्याकडून ऐकताना या जर्मन-मराठी युतीच फार कौतुक वाटायच दुर्दैवाने त्याच नुकतच हृदयविकारान निधन झाल आणि महाराष्ट्राचा जर्मनीतला एक आप्तेष्ट हरपला

हायडलबर्ग विद्यापीठातले प्रा रॉथरमुड हे भारताच्या शिक्षणतज्ज्ञाचा जर्मनीतला दुवाच! भारताच राजकारण, अर्थव्यवस्था आणि सध्याचा भारत यावर त्याच प्रभुत्व आहे. केवळ भारताच प्रेम म्हणून भारताचा अभ्यास करणाऱ्या स्टुटगार्डच्या डॉ गिझेला बॉन या भारत-जर्मन सबधाचे एक चालते बोलते ऐतिहासिक प्रतीक आहेत पडित नेहरूच्या काळापासून त्या भारताच्या चाहत्या आहेत भारतावर जर्मन भाषेत त्यानी अनेक पुस्तक लिहिली जर्मनीमधल्या त्या भारताच्या सास्कृतिक वकील आहेत त्याच्या भारतावरच्या अविरत कार्याप्रीत्यर्थ भारत सरकारन अलीकडेच त्याना 'पद्मश्री' हा किताब बहाल केला

भारतीय सगीत, नृत्य, चित्रकला याचे अभ्यासकही जर्मनीत ठिकठिकाणी आहेत सिल्कच्या झब्ब्यामधे डोळे मिटून ध्यानस्थ बसलेला आणि सतारीचे बोल छेडण्यामधे

रगून गेलेला जर्मन युवक आणि तितकेच तल्लीन होऊन ऐकणारे जर्मन प्रेक्षक हे दृश्य जर्मनीत वारवार दिसत डामस्टार्ट हे फ्रॅंकफर्ट जवळच गाव जर्मनीतल सगीत नृत्याच कलाक्षेत्र बनल आहे. प भीमसेन जोशी, प जसराज, अहमजद अलि, शिवकुमार शर्मा, हरिप्रसाद चौरासिया हे सर्व कलाकार या ठिकाणी आपली वर्णी लावून गेले आहेत पुण्यातल्या सवाई गधर्व पुण्यतिथीच्या जलशाची ज्या आतुरतेने रसिक वाट पाहातात त्याच आतुरतेन जर्मन श्रोतृवृद डामस्टार्टच्या जलशाची प्रतीक्षा करताल गेल्या वर्षी स्टुटगार्ट या ठिकाणी भीमसेन जोशींची रात्रभर चाललेली मैफल जर्मन श्रोत्याच्या स्मरणात अजूनही ताजी आहे.

१९९१ च्या सप्टेंबरमधे जर्मनीत सुरू झालेल्या भारत महोत्सवाच्या निमित्तान जर्मन नागरिकाना भारतीय सस्कृतीची झलक साग्रसगीत बघायला मिळाली जर्मनीची राजधानी बॉन इथ पतप्रधान नरसिह राव आणि जर्मनीचे चान्सलर कोल याच्या हस्ते या महोत्सवाच शानदार उद्घाटन झाल शेकडो जर्मन नागरिक या सोहळचाला उपस्थित होते कथ्थक, मणिपुरी समूह नृत्य, पचवीणा वादन असा रगतदार कार्यक्रम उद्घाटन प्रसगी सादर करण्यात आला तर बॉनच्या मार्केट स्वेअरमधे लावणीचा फड रगला भागडाच्या बल्लेबल्लेच्या घोषान तर चौक दुमदुमून गेला होता भारतीय लोकनृत्याची ही पर्वणी हजारो जर्मन नागरिकांनी चौकात उभे राहून बघितली

हा महोत्सव जर्मनीतल्या अनेक शहरामधे सात साठ महिने चालू होता 'विस्तार' या स्थापत्य विषयाच्या प्रदर्शनावर जर्मन प्रेक्षक खूष होते बर्लिन तर जर्मनीतला सस्कृतीचा गाभा भारत महोत्सव चालू असताना बर्लिन शहरात भारतीय सास्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल होती जर्मन एकीकरणाच्या गुतागुतीच्या प्रश्नानी वैतागून गेलेल्या सामान्य जर्मन जनाना या महोत्सवातून होणार वेगळचा सस्कृतीच दर्शन स्वागतार्ह वाटल असाव अस भारत महोत्सवाला मिळालेल्या त्याच्या प्रतिसादावरून निश्चितच जाणवल

जर्मन एकीकरणानतर पूर्व जर्मनीच्या स्थितीबद्दल अनेक वर्णन ऐकत होतो आणि वाचतही होतो कितीतरी पूर्व जर्मन नागरिक नोकरीच्या शोधात फ्रॅंकफर्टपर्यंत येऊन पोचल्याच दिसल होत पूर्व जर्मनीच्या प्रत्यक्ष सद्य परिस्थितीबद्दल खूपस कुतूहल होत तेव्हा पूर्व भागातल्या लाईपाझिगला जायची सधी मिळाली, तेव्हा खूपशी उत्सुकता आणि अनेक प्रश्नचिन्ह मनात होती खर तर पश्चिमेची सरहद्द सपून पूर्व जर्मनी कुठे सुरू झाला ते कळलही नाही पूर्व आणि पश्चिम जर्मनीतला निसर्ग बराचसा सारखा तशीच मैलोन्मैल पसरलेली विस्तीर्ण हिरवी, पिवळी कुरण, दाटीवाटीन उभे

राहिलेले पाईनचे वृक्ष आणि कोनिफरची झाड मात्र टेहळणीसाठी बाधण्यात आलेला ओकाबोका बुरूज मागे गेला त्याच्या बाजूला पडलेली काटेरी ताराची भेंडोळी दृष्टीस पडली आणि सरहद्द ओलाडल्याच ध्यातान आल या बुरुजावरून पूर्वी बदुकीचे नेम धरले जात असावेत आता मात्र त्याची अवस्था थडग्यासारखी होती

जर्मनीच्या पूर्व भागातल गाव दिसायला लागल आणि आपण पूर्व जर्मनीत असल्याची खात्री पटली घराच्या कौलाची झालेली पडझड, लाबून दिसणारे रस्त्यामधले खड्डे आणि रिकाम्या सडका, गावाचा दीनवाणा चेहरा दुरूनही ओळखता येण्याजोगा लाईपझिगला जाणारा महामार्ग मात्र सुस्थितीत होता शेवट शेवट रस्त्यामधल्या खड्ड्यामुळे हिसके जाणवले अर्थात् भारतीयाना अशा हिसक्याची सवय असल्यामुळे त्याचा विशेषत बाऊ वाटला नाही लाईपझिग आणि ड्रेसडेन ही जर्मनीतली एकेकाळची अत्यत वैभवशाली शहर

ज्याच्या नावातच झगमगाट आहे असे हे लाईपझिग एल्ब नदीच्या काठावर वसलेल एकेकाळच अत्यत प्रसिद्ध शहर. सस्कृति, कला, शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात झगमगणार गोथे या सुप्रसिद्ध जर्मन कवीन लाईपझिगच वर्णन पॅरिसची छोटी आवृत्ती या शब्दात केल होत इतकी या शहराची एकेकाळी शान होती या पार्श्वभूमीवर लाईपझिगच सध्याच चित्र अत्यत निराशाजनक एकेकाळच्या श्रीमतीच्या खुणा शहरावर दिसत असल्या तरी आज त्याची अवस्था देशोधडीला लागल्यासारखी नेपोलियन रशिया आणि प्रशिया बरोबर हरला त्या जागी उभारण्यात आलेल स्मारक रात्रीच्या अधारात दिसायला कठीण इतक ते काळठिक्कर पडलेल आहे. इतर इमारतींची तीच अवस्था दुकानामधे माल फारसा नव्हताच उचित दराच्या रास्त दुकानामधे जशा प्रकारचा माल असावा तशाच प्रकारच्या गोष्टी दुकानामधे दिसत होत्या माळरानात एखाद फुलझाड दिसाव तशी पोर्सिलीनची छोटी छोटी दुकान एकदम लक्ष वेधून घेत होती पोर्सिलीन हे जर्मनीच खास वैशिष्ट्य! पूर्व जर्मनीतल 'मायसन' हे युरोपमधल सर्वात प्राचीन पोर्सिलीन जर्मनीला अभिमानास्पद वाटावा असा हा पूर्व जर्मनीतला एक उद्योग अजूनही ...जोगा आहे. पूर्वीच्या काळात राजवाड्याच्या सग्रहाल्यात मायसनच्या मोठ्या मूर्ती किंवा फुलदाण्या असायच्याच इतकी मायसनची तेव्हापासून प्रसिद्धी आहे. मात्र सतत नियत्रणाखाली असलेल्या राजवटीनतर देशाची झालेली कळाहीन अवस्था लाईपझिगमधे जागोजाग दिसली

एल्ब नदीच्या काठरवरच ड्रेसडेन हे ऐतिहासिक दृष्ट्या एकेकाळच अत्यत श्रीमत शहर जर्मनीतल्या ज्या सॅक्सनी भागात लाईपझिग आणि ड्रेसडेन ही शहर वसली आहेत तिथल्या राजानी स्थापत्यशास्त्र आणि शिल्पकला याना खूप प्रोत्साहन दिल्यामुळे

या शहरामधे सुदर कलाकृती निर्माण झाल्या पूर्व युरोप आणि पश्चिम युरोप याच्या वाटेवर ही शहर असल्यामुळ तिथे पूर्वीपासून व्यापाराला खूप महत्त्व होत पूर्वेला पोलड रुमेनिया बोहेमिया तर पश्चिमेला फ्रान्स, नेदरलँडस् इ देशाच्या मध्यावर असल्यामुळे तिथे व्यापाराला खूप महत्त्व मिळत गेल आणि ही शहर भरभराटीला आली

ड्रेसडेनचा झ्विगर प्रासाद शहराच भूषण समजला जात असे त्याचा खजिना समजल जाणार जडजवाहिऱ्याच प्रदर्शन 'आल्बर्टिनियम हे ड्रेसडेनची प्रतिष्ठा वाढवणारे। सतराव्या शतकात इथल्या ऑगस्टस राजान जगाच्या सर्व भागातून जडजवाहिराच्या कलावस्तू आणल्या आणि त्याचा सग्रह केला औरगजेबाचा मिनी दिल्ली दरबार या सग्रहातील खास वैशिष्ठ्यपूर्ण कलाकृती आहे दुसऱ्या महायुद्धात या शहराचे काय धिडवडे निघाले ते लोकाच्या लक्षात रहाव यासाठी शहराच्या मध्यभागी मोठ्या दगडी इमारतीत पडलेल प्रचड भगदाड आजही दर्शकासाठी तसच ठेवण्यात आल आहे आणि सभोवताली पडलेल्या दगडाचा खच अजूनही त्याच अवस्थेत आहे. आलिशान इमारती, त्याच्या भितीवरच कोरीव काम, शहराच्या मधेमधे मोठे चौक एकेकाळच हे अत्यत अलिशान शहर मात्र आज त्याची अवस्था काळ्या पडलेल्या चादीसारखी शहराच सचेतनपणच हरवून गेल आहे.

पूर्व जर्मनीत आता व्यापार करता येईल या आशेन गेले काही महिने पश्चिम जर्मनीतल्या व्यापारी क्षेत्रातल्या लोकाची पूर्वेकडे रीघ लागलेली आहे. पूर्वी ज्या रस्त्यावर फक्त ट्रॅबी आणि लाडा अशा तुरळक गाड्या दिसायच्या त्या रस्त्यावर आता मर्सिडीज, गॉल्फ याची रेलचेल झाली आहे. सध्या पूर्व जर्मनीत एकीकरणाबद्दल खूपसा आनद, कुतूहल आणि तितकीच भविष्याबद्दल साशकता आहे या सर्व बदलाना आपणच यशस्वीरीत्या तोंड देऊ शकू काय असा संदेह त्याच्या मनात नक्कीच जाणवतो टी व्ही वर पश्चिम जर्मनीच चित्र पूर्वीही बघायला मिळत असल्यान त्याची उत्तम कल्पना असलेल्या या लोकाना आत्ताच स्वातत्र्य सुखद वाटत आहे हे निश्चित परतु पूर येणार याची कल्पना असली तरी पुराच्या पाण्यान चहूबाजूनी वेढल्यावर माणसाची जी अवस्था होईल ती अवस्था सध्या पूर्व जर्मनीतल्या लोकाची झाली आहे 'घेता किती घेशील दो करानी' अशी पश्चिमेकडच्या लोकानी त्याची स्थिती करून टाकली असली तरी त्यासाठी द्याव लागणार मोल अनेक प्रकारच आहे.

पैशाच पाठबळ वाढत तशी माणसाला माणसाची गरज कमी भासायला लागते हा जगाचा नियम असावा पश्चिम जर्मनीमधे १८ व्या वर्षीच आईवडिलापासून वेगळी

राहणारी मुल-मुली हे नेहमीचच चित्र पूर्व जर्मनीत कुटुंबाच महत्त्व अजून तरी जास्त दिसत लोकाच्या चेहऱ्यावर स्मितहास्य अजूनही कायम आहे जे पश्चिम जर्मनीत दुर्मिळ होत चालल आहे वेळ म्हणजे पैसा हे समीकरण तिथे यायला अजूनही काही अवधी लागेल श्रीमतीबरोबर श्रीमतीची इतर लक्षणही पूर्वेकडे जाणारच श्रीमतीच माप भरताना माणुसकीची किंमत मोजावी लागते याला कुठलाही श्रीमत देश अपवाद नाही हळूहळू पूर्व जर्मनी आपल्या श्रीमत भावाच बोट धरून त्याच मार्गान वाटचाल करणार हे निश्चित

जर्मनीतले भारतीय चेहरे ओळखून काढता येणार नाहीत इतके ते जर्मन वातावरणात एकजीव होऊन गेले आहेत वीस-पचवीस वर्षांपूर्वी विद्यार्थी दशेत आलेले बरेचसे भारतीय इथेच राहिले त्यापैकी कित्येक जणानी जर्मन स्त्रियाशी लग्न केली आणि बहुतेक जण आचार विचार राहणी यातही जर्मन होऊन गेले आहेत मराठी जर्मन विवाहही इथे बरेच आढळतात घरी बोली भाषा अर्थातच जर्मन असते, त्यामुळे इथे गेली पाच वर्षे होत असणाऱ्या मराठी भाषिक समेलनात अर्धा व्यवहार जर्मन भाषेत चालतो कारण मराठी मुलही आपापसात जर्मन भाषेत बोलतात

जर्मनीत येणाऱ्या भारतीयाची सख्या पुढे पुढे मदावली कारण व्हिसाचे नियम अवघड होत गेले इथले भारतीय अमेरिकेतल्या भारतीयाच्या मानान जर्मन वातावरणात मिसळून गेले असले तरी अमेरिकेत जितकी उच्च पद भारतीयानी भूषवली आहेत ते प्रमाण इथ त्यामानान कमी आहे.

... प्रदर्शन आणि भारताचा त्यातला सहभाग

हाही जर्मनीच्या मुक्कामातला एक महत्त्वपूर्ण भाग डुसेल्डॉर्फमधे भरणार तयार कपड्याच्या फॅशन्सच 'इगेडो' हे प्रदर्शन तर कॉम्प्युटर आणि इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, टेलिकम्युनिकेशन्सच्या क्षेत्रातली अत्याधुनिक माहिती पुरवणार हॅनोव्हर इथे दरवर्षी भरणार 'सेबिट', फ्रँकफर्टमधल पुस्तकाच वार्षिक व्यापारी प्रदर्शन आणि होम टेक्सटाईल्स् हे प्रदर्शन तसच फ्रँकफर्टमधे वर्षातून दोनदा घडणार तऱ्हेतऱ्हेच्या वस्त्राच आणि कापडाच 'इन्टेरस्टॉफ' ही इथली प्रसिद्ध प्रदर्शन! १९८६ मधे आतरराष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनात तर १९८९ साली 'सेबिट'मधे भारत हा भागीदार देश असल्याकारणान

ता। ...

सेबिटमधे भारतीय कपन्यानी सॉफ्टवेरच्या क्षेत्रात खूप उत्सुकता निर्माण केली आहे भारतातले तरुण उत्पादक कॉम्प्युटरच्या आधुनिक जगात जलद गतीन वाटचाल करीत आहेत विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि लोकमान्य टिळकाच शैक्षणिक क्षेत्रातल

गाजलेल पुण आता कॉम्प्युटर क्षेत्रातली सॉफ्टवेअरची बाजारपेठ म्हणूनही नावलौकिक मिळवू लागल आहे ब्रेमेन आणि पुण या दोन शहरामधे दुवा निर्माण झाला असून जर्मनीमधे महाराष्ट्राच्या निर्यातीला वाव मिळण्यासाठी त्याचा काय उपयोग होणार आहे. पुण-ब्रेमेन मैत्रीच प्रतीक म्हणून पुण्याचा मोर ब्रेमेनला भेट म्हणून पाठवण्यात आला आणि तो मैत्रीचा पिसारा आजही फुलत आहे.

भारतात बनलेली तऱ्हेतऱ्हेची कापड हे इन्टेरस्टॉफच एक प्रमुख आकर्षण सेंचुरी, मफतलाल ही नाव जर्मनाना चागली परिचित झाली आहेत इतक त्यानी या क्षेत्रात स्वत च वेगळ स्थान निर्माण केल आहे. भारताच्या कापड गिरण्यामधे बनलेल्या जरीच्या कलाकुसरीचा मुलायम रेशमी कपडा तर रोजच्या धकाधकीच्या जीवनात वापरता येईल अस दाडगट सुती कापडाच कॅजुअल वेअर आणि कॉटनच शर्टिंग-सूटिंग बघण्यासाठी भारताच्या स्टॉलस्मधे युरोपीय लोकाची झुबड उडते ज्यूटच्या क्षेत्रात तर आपल्या कपन्यानी नवीनच किमया केली आहे. प्रिंटेड आणि तऱ्हेतऱ्हेची डिझाईन्स असलेल्या जूटच्या कपड्यानी युरोपियनाच लक्ष वेधून घेतल आहे. आपल्या देशान कोणकोणत्या क्षेत्रात काय काय प्रगती केली आहे याची प्रचीति आणून देणारी ही प्रदर्शन आपला देश केवळ सस्कृतीच्या डोहात डुबणारा नव्हे याची जाणीव करून देतात

फ्रँकफर्टमधल आमच कॉन्सुलेटच जीवन वकिलातीच्या जीवनापासून काहीस वेगळ्या धर्तीच | कॉन्सल जनरल या नात्यान आपल्या देशाच्या लोकाशी अधिक सपर्क ठेवण आणि त्याच्या समस्याकडे जातीन लक्ष देण ही त्या पदावरची प्रमुख जबाबदारी व्यापार प्रदर्शनाच्या निमित्तान येणारे भारतीय प्रतिनिधी, खाजगी व्यापारी आणि त्याच्या समस्या हाही इथल्या कॉन्सुलेटच्या कामाचा महत्वाचा भाग. एरवी कॉन्सुलेटची फारशी दखल न घेणारे व्यापारी काही समस्या निर्माण झाल्या की मात्र कॉन्सुलेटकडे धाव घेतात पासपोर्ट आणि पाकीट चोरीला जाण ही तर इथली नेहमीची घडणारी घटना अशावेळी मग ते विमनस्क स्थितीत कॉन्सुलेटचा थारा घेतात आणि तातडीच्या प्रसगी तर काही तासाच्या अवधीत त्याना कॉन्सुलेटकडून पासपोर्ट मिळतो

फ्रँकफर्टच्या आसपास पाच हजार भारतीय राहतात जिथे भारतीय जास्त प्रमाणात तिथे प्रातवार मडळही आलीच इथे बगाली, केरळ, मराठी सर्व प्रकारची मडळ आहेत बगाली लोकाची तर दोन मडळ आहेत त्यामुळे दुर्गापूजाही दोन ठिकाणी साजऱ्या होतात 'भारत फेराइन, हे भारत मडळ इथे सर्व भारतीयाना एकत्र आणण्याचा प्रयत्न करत आणि २६ जानेवारी', १५ ऑगस्ट, होळी, दिवाळी अशा सणाच्या निमित्तान

हिंदुस्थानातून एखाद पथक बोलावून किंवा स्थानिक भारतीय कलाकार बोलावून काही ना काही कार्यक्रम आयोजित करत फ्रँकफर्टमधे असताना भारतापासून दूर असल्याच कधी जाणवलच नाही

फ्रँकफर्टमधे विमान आणि विमानतळाचा संबध खरोखरच पाचवीला पुजल्यासारखा भारतातून युरोप, अमेरिका, कुठेही जायच झाल तरी वाट जराशी वाकडी करून फ्रँकफर्टवरून जायला आपल्या लोकाना फार आवडत मग अर्जेंटिना किंवा कोलंबियाला जायच असो अथवा नामीबिया किंवा युगोस्लाव्हियाला! फ्रँकफर्टमधे उतरून तिथल्या विमानतळावर आघोळ वगैरे करून (तिथे आंघोळीची सोय आहे) ताजतवान होऊन पुढे जायला व्ही आय्. पीं ना सोयीच वाटत आपल्या व्ही आय्. पीं चा फ्रँकफर्ट विमानतळावर उतरण्याचा आवडता वार म्हणजे शनिवार किंवा रविवार एअर इंडिया किंवा लुफ्तांझाच विमान सकाळी सात साडेसातला फ्रँकफर्टला पोचत लुफ्तांझाच विमान तर कित्येकवेळा वेळेपूर्वीच पोचत फ्रँकफर्टच्या कॉन्सिल जनरलला रविवारी पहाटे उठून विमानतळावर वारी लावायचा प्रसग सारखाच येत असतो व्ही आय् पी चे दर्शन ही त्यातल्या त्यात जमेची ( ?) बाजू त्यातले काही रविवार मात्र अगदी लक्षात राहण्याजोगे

राजीव गाधी पतप्रधानपदावर नसताना शेवटच्या काळात मास्कोहून परतताना फ्रँकफर्ट विमानतळावर काही तास त्याच्याबरोबर घालवून त्याच्या हास्यविनोदात सामील होण्याची संधी मिळाली पतप्रधानपदाची टागती तलवार डोक्यावर नसल्याच हलकेपण त्याच्या त्या दिवशीच्या खेळकरपणात जाणवत होते इतर देशाच्या लोकानाही राजीव गाधींबद्दलच किती जबरदस्त आकर्षण होत ते तिथे उघड उघड दिसत होत राजीव गाधी आणि सोनिया गाधी पर्यटकासारख विमानतळावर मजेत फिरत असताना लोक अतिशय औत्सुक्यान त्याच्याकडे बघत होते तिथे बसलेल्या काही भारतीयानी उठून श्री राजीव गाधींच्या स्वाक्षऱ्या मागितल्या सार्वत्रिक निवडणुकाच्या धामधूमीला सुरुवात होण्यापूर्वीची ही गोष्ट आहे त्यानतर केवळ चार महिन्याच्या अवधीत त्याचा भीषण खून झाला आणि अशा मोकळेपणाचे त्याचे हे शेवटचे दिवस ठरले अशा काही हृदयस्पर्शी आठवणी फ्रँकफर्ट विमानतळाशी निगडित आहेत

आणखी एक रविवार असाच लक्षात राहण्याजोगा श्री नरसिह राव पतप्रधान झाल्यानतरची गोष्ट हिंवाळ्यातली अशीच एक ढगाळ सकाळ पतप्रधान स्वित्झर्लंडमधे दावोसला जाणार होते त्याच विमान धुक्यामुळे झुरिकला उतरू शकल नाही तर ते आयत्यावेळी फ्रँकफर्टला उतरणार अशी बातमी फ्रँकफर्टला मध्यरात्री कळवण्यात

आली होती मग सकाळी विमान तळावर कुठल्याही क्षणी पोचाव लागेल यासाठी कौन्सुलेट आणि एअर इडिया याची जय्यत तयारी होती एरवी एअर इडिया आणि कौन्सुलेटचे अथवा वकिलातीचे आपापसातले सबध दोन जावासारखे एकाच कुटुबातले पण फारसे एकमेकाच्या वाटे न जाणारे शक्यतो एकमेकाची जबाबदारी आपल्या अगावर पडू नये याची दक्षता बाळगणारे त्यातून कोणी व्ही आय. पीं नी लुफ्ताझान प्रवास केला तर सासरच्याची सर्व जबाबदारी थोरल्या जावेन उचलावी असा एअर इडियाचा एरवीचा नूर अशा महत्त्वाच्या प्रसगी मात्र दोन्ही जावा सासुरवाशिणीसारख्या एकमेकींच्या मदतीला तत्पर असतात अर्थातच् त्या दिवशी दर दहा मिनिटानी एअर इडियाशी सपर्क साधला जात होता कौन्सुल जनरल साहेबाची गाडी आणि ड्रायव्हर होशियार अवस्थेत ठेवण्यात आले होते सकाळी साडेदहा अकराच्या सुमाराला ठरणार होत विमान तिथे उतरू शकेल की नाही ते पतप्रधान आकस्मिकपणे येणार याचीच सर्वांना एक्साईटमेंट होती शेवटी साडेअकराच्या सुमाराला बातमी आली की झुरिकच धुक कमी झाल आणि विमान तिथे सुखरुपपणे उतरल मग त्या रविवारची एकदम हवाच गेली आणि तोही रविवार नेहमीच्या ढगाळ, हिंवाळी रविवारसारखा शातपणे पार पडला

बोलता बोलता आमचा जर्मनीतला मुक्काम हळहळ सपत आला आहे त्या अवधीत जर्मनीत इतिहास घडला भारतातली सरकार बदलली जगातही कित्येक स्थित्यतर झाली सपूर्ण पूर्व युरोपचा चेहरा बदलला सोव्हिएट युनियनचा दरारा पार सपुष्टात आला आणि देशाची शकल झाली इराकन कुवेतवर आक्रमण करून अमेरिकनाकडून मार खाल्ला आणि हात दाखवून अवलक्षण करून घेतल मध्य-पूर्वेत आता काय घडत याकडे सर्व जगाच लक्ष वेधल गेल आहे. तर जर्मनी सध्या युरोपचा केंद्रबिंदू बनला आहे. जर्मनी सध्या तरी युरोपमधल श्रीमत आणि प्रबळ राष्ट्र आहे. एकीकरणाची जबरदस्त आर्थिक किंमत द्यावी लागल्यानतर जर्मनीच ते स्थान पूर्ववत राहील काय ! १९९२ मधे युरोपीय आर्थिक समुदायातले E.E.C. देश एकत्र येतील आणि त्यावर जर्मनीतल्या या स्थित्यतराचा काय परिणाम होईल यावर सध्या बरेच तर्क कुतर्क केले जात आहेत

जर्मनीच्या एकीकरणानतर काही महिन्याच्या आतच सामाजिक स्तरावर जे काही पडसाद उठले ते जर्मनीत स्थायिक झालेल्या परदेशी लोकासबधी जर्मनीच्या लोकसख्येच्या मानान (एकीकरणानतर जर्मनीची लोकसख्या आठ कोटी झाली आहे. आणि युरोपमधे रशिया वगळल्यास हा सर्वात मोठा देश बनला आहे) विदेशी लोकाची टक्केवारी इतर युरोपीय देशाच्या मानान कमी आहे. गेल्या ३०-४० वर्षांमधे अधिक

सख्येन आलेले विदेशी म्हणजे तुर्की, युगोस्लाव्ह आणि इटालियन तुर्की लोकाची सख्या जवळजवळ २५ लाख असेल बर्लिनला तर इस्तबूल नतर सर्वात मोठ तुर्की शहर समजतात.

१९५० च्या सुमारास जर्मनीची पुनर्रचना करताना जेव्हा कामगाराची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर भासली तेव्हा बाहेरच्या देशातून लोकाना मजूर पाहुणे म्हणून बोलावण्यात आल त्यातले बहुताशी लोक जर्मनीमधेच राहिले आणि त्यानी इथे आपल बऱ्यापैकी बस्तान बसवल. जर्मनी आर्थिक दृष्ट्या सपन्न असल्यामुळे आणि जर्मनीच्या घटनेतल्या परदेशीयाच्या दृष्टीन उदारमतवादी कायद्यांमुळे नतरच्या काळातही बाहेरच्या लोकाचा थोडयाफार प्रमाणामधे ओघ येतच राहिला गेल्या दोन-तीन वर्षात पूर्व युरोपमधल्या घटनामुळे तसच इराण, श्रीलका, भारत या देशातूनही इथे येणाऱ्याची सख्या एकदम वाढली बरेचसे यातले लोक बेकायदेशीरपणे जर्मनीत शिरून नतर आश्रय मागू लागले जर्मनीमधे नाझी प्रणालीला पाठिंबा देणाऱ्याची आणि वर्णविद्वेषी (निओनाझी) लोकाची सख्या थोडीबहुत होती तिलाही गेल्या काही वर्षांमधे पाठिंबा मिळत आला आहे. अर्थात् अजून अशा लोकाच प्रमाण खूप कमी आहे. परतु जर्मन एकीकरणानतर निर्माण झालेल्या विशेषत पूर्व जर्मनीच्या बेकारीच्या समस्येमुळे तिथल्या अनेक युवकाना एक प्रकारची फूस मिळाली, आणि गेल्या सात आठ महिन्यात या जहाल युवकानी विदेशी लोकाविरुद्ध (आफ्रिका, आशियाई) हल्ले केल्याचे हजारो प्रसग घडले आतरपक्षीय राजकारणामधे हा सध्या एक महत्त्वाचा विषय आहे. यानतर जागतिक वृत्तपत्रामधे आणि टी व्ही.वर या घटना बघितल्यानतर, जर्मनीच्या दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर आसापासच्या देशात किंबहुना जगातच सर्वत्र त्यामुळे थोडीबहुत साशकता निर्माण झाली आहे. अर्थात् जर्मन सरकारन या घटनाचा कडक निषेध केला आहे. तरीपण परदेशी लोकाना आश्रय देण्याच्या कायद्यामधे बदल घडवून आणावा आणि त्यावर अधिक मर्यादा घातल्या जाव्या अशी मागणी इथल्या राजकीय पक्षामधे केली जात आहे आतरपक्षीय राजकारणामधे हा सध्या एक महत्त्वाचा विषय आहे.

जर्मनीच्या एकीकरणानतर विकसनशील देशाच्या इथल्या बाजारपेठेवर कोणत्या प्रकारचा परिणाम होईल हीही विचारात घेण्याजोगी बाब सध्याच्या दोन्ही जर्मनींच्या आर्थिक ओढाताणीत पुढच भवितव्य वर्तवण कठीण आहे.

१९९३ मधे युरोपीय आर्थिक समुदायातले देश एकत्र येतील त्यावर जर्मनीतल्या या स्थित्यतराचा काय परिणाम होईल यावर सध्या बरेच तर्क कुतर्क केले जात आहेत हॉलडमधे मास्ट्रिट या ठिकाणी नुकत्याच घडलेल्या युरोपीय आर्थिक समुदायाच्या

शिखर परिषदेत युरोपच्या एकीकरणासबधी महत्त्वाचे करारनामे करण्यात आले या दशकाच्या अखेरीस पश्चिम युरोप, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक दृष्टचा एकजीव होऊन जाणार या सदर्भात त्या एकीकरणाचा आराखडा आणि त्यासबधीची यत्रणा त्यात तयार करण्यात आली पश्चिम युरोपमधे एकच चलन होणार ते करण्यासाठी इग्लड सोडल्यास बाकी सर्वांनी मान्यता दिली तसेच डेनमार्कने नुकत्याच झालेल्या सार्वमतात 'माडस्ट्रिटला नकार दिला आहे या पार्श्वभूमीवर काय घडणार याकडे राजनैतिक अभ्यासकांच लक्ष लागल आहे.

'युक्रेन' या नवीन निर्माण झालेल्या देशात भारताचे पहिले राजदूत म्हणून नुकतीच सुधीरची नियुक्ती झाली आहे. तृतीय चिटणीस म्हणून मास्कोच्या वकिलातीत याच्या विदेश सेवेतल्या कारकीर्दीला प्रारभ झाला आज पचवीस वर्षांनतर त्याच भागात नवीन निर्माण झालेल्या युक्रेन देशात राजदूत म्हणून ते परत जात आहेत आणि त्याच्याबरोबर मी त्याची अर्धांगिनी। तेव्हाचा काळ आता सर्वच दृष्टीन बदलला आहे सोव्हिएट युनियनच तेव्हाच सार्वभौमत्व पार सपुष्टात आल आहे आणि आज त्याची अनेक शकल झाली आहेत

आज त्या भागात जाताना समिश्र भावना मनात आहेत जे झाल ते योग्य झाल का? काळच आता त्याच उत्तर देईल चेरनोबीलचा बागुलबुवा. अजूनही भेडसावत असलेल्या युक्रेन देशात आपण जाणार या कल्पनेच ओझ मनावर आल आहे. पण त्याचबरोबर एका नव्या पर्वाचा उदय आपण स्वचक्षुर्वे पाहाणार आणि इतिहासाला साक्षी होणार याचाही अभिमान वाटतोय नव्या देशात नव्यान ससार माडण्याची पचवीस वर्षांपूर्वीची धाकधूक कुठल्या कुठे विरून गेलीय कारण राजदूताची पत्नी म्हणून बराचसा शिधा आता जमेला आहे. एक आवर्तन सपून परत समेवर येताना गवयाला मिळणारा आनद असाच असेल नाही? सम कशी सहज सापडली याचा!

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. ६८८
२६०७८

REF K 0026917
REFBK-0026917